निकोलाय अस्त्रोवस्की

अग्निदिव्य





Н Островский

निकोलाय अस्त्रोवस्की

अग्निदिव्य

(दोन भागांमधील कादंबरी)

भाग पहिला

प्रगती प्रकाशन
मॉस्को

अनुवाद – अनिल हवालदार

सजावट – रेझनिचेन्को

Николай Островский

КАК ЗАКАЛЯЛАСЬ СТАЛЬ

Книга I

на языке маратхи

सोविएत संघात मुद्रित

$О \frac{70302-206}{014(01)-80}$ 764—80 4702010200

ओळख

निकोलाय अस्त्रोवस्की हे आपल्या युगामधील एक अत्यंत खंबीर आणि तेजस्वी व्यक्तिमत्व आहे. केवळ आपल्या पुस्तकांमधूनच ते जिवंत आहेत असे नाही तर खुद्द त्यांची स्वतःची प्रतिमा वीराची आहे.

दैव त्यांच्याशी अतिशय क्रूर खेळ खेळले. त्यांना अंधत्व लाभले होते आणि आपल्या हाता-पायांचा उपयोग करण्यासही ते असमर्थ होते. पण आपल्या शारीरिक व्यंग्यांवर, आपल्या असाध्य दुखण्यावर, दुबळेपणावर, दुःखावर आणि बधीरतेवर त्यांनी मात केली व विजयोन्मादाने जीवनाचा, सृजनशील प्रयत्नांचा आणि संघर्षाचा पाठपुरावा केला. बोल्शेविक युवकाचे ते निष्ठावंत गायक होते. समाजसत्तावादाच्या लढ्याची आणि विजयाची लढाऊ, आनंदी गाणी त्यांनी गायली. सुंदर भावबळाने निनादणारा त्यांचा आवाज अखिल सोविएत भूमीवर आणि सबंध जगभर दुमदुमला.

१९३२ साली, मॉस्कोमधील वसंताच्या आरंभीच्या एका थंड चावरे वारे सुटलेल्या दिवशी मी त्यांना भेटायला गेले होते.

घराच्या एका मोठ्या गाळ्यात अनेक भाडेकरूंची गर्दी ठासलेली होती.

हनुवटीपर्यंत पांघरूणांमध्ये आणि शालींमध्ये गुंडाळून घेतलेला एक माणूस बिछान्यावर पडला होता. उशांचा उंच ढीग रचलेला होता व त्यावर गडद तांबूस पिंगट रंगाचे केसांचे झुलुप, एक भव्य ठसठशीत कपाळ आणि पांढराफटक रोडावलेला चेहरा मी पाहिला.

पातळ पापण्या किंचित थरथरल्या. दाट पापण्यांचे खोलगट गालांवर निळसर सावट पडले होते. मेणासारखे पारदर्शक दिसणारे हात पांघरूणाच्या वरच्या बाजूस विसावले होते.

निकोलाय अस्त्रोवस्की अपंग आहेत याची मला माहिती होती, पण ते अशा अवस्थेत असतील असे चित्र कधीही माझ्या नजरेसमोर उमटले नव्हते.

ते इतके क्षीण आणि असहाय्य दिसत होते की, त्यांना त्रास न देता पुन्हा कधीतरी यावे असे मी मनाशी ठरविले.

तेवढ्यात एक किंचितशी वयस्क महिला झपझप चालत खोलीत आली. तिचे गडद बदामी डोळे कमालीचे बोलके होते आणि तिच्या चेहऱ्यावर हसू पसरले होते.

"आई, कोण आलंय ग?" काहीशा भकास, पण अत्यंत जोमदार आणि खंबीर आवाजात निकोलाय यांनी अचानक विचारले.

त्यांच्या आईने त्यांना माझे नांव सांगितले.

"अरे वा! किती छान," ते म्हणाले. "इकडं अशा जवळ या ना!"

सुंदर शुभ्र दंतपक्ती दाखवणारे हास्य त्यांच्या चेहऱ्यावर उजळले. त्या चेहऱ्यावरची प्रत्येक रेषा यौवनसुलभ कुतुहलाच्या आणि जीवनानंदाच्या आभेने जणू चमकत होती. प्रथम मला भास झाला की, त्यांचे मोठे, बदामी रंगाचे

डोळेसुद्धा आनंदाने चमकत होते. पण दुसऱ्याच क्षणी मला जाणीव झाली की, डोळ्यांतील बाहुल्यांच्या भोवतालच्या काळ्या पडद्यातील खोलवरच्या संपन्न रंगामधून ती चमक उमटत होती. पण तरीही, त्यांच्या उजळलेल्या चेहऱ्यावर एवढी एकतानता, एवढे अवधान आणि एवढा मिस्कीलपणा होता की, ते आंधळे आहेत याचा अख्ख्या संभाषणभर मला सारखा विसर पडत होता.

त्यावेळी 'मलादाया ग्वार्दिया' नांवाच्या मासिकात मी संपादक म्हणून काम करीत होते व अस्त्रोवस्कींच्या 'अग्निदिव्य' कादंबरीचा पहिला भाग त्या मासिकात छापण्याबाबत नुकतेच कराररमदार झाले होते. त्या कादंबरीसंबंधात आमचे संभाषण चालले होते. आपल्या व्यक्तिरेखांनी आमच्यावर कितपत छाप पाडली हे जाणून घेण्यास निकोलाय उत्सुक होते.

"मला वाटतं पावेल तसा काही वाईट पोरगा नाही," मिस्कीलपणे ते म्हणाले आणि माझ्याकडे त्यांनी एक स्मित टाकले. "अर्थात निकोलाय अस्त्रोवस्की आणि पावेल कोर्चागिन हे अगदी जिवाभावाचे मित्र आहेत हे काही मी लपवून ठेवीत नाही. हा पावेल माझ्या मेंदूतून, माझ्या रक्तामधून जन्मलाय... मला हे जाणून घ्यायचंय की, माझी कादंबरी म्हणजे नुसतं आत्मचरित्र वाटतं का, फक्त एका जीवनाची कहाणी वाटते का?"

एकाएकी त्यांचे स्मित लोपले, ओठ घट्ट आवळले गेले आणि त्यांचा चेहरा निर्विकार व कठोर भासू लागला.

"मी एवढ्या निर्भीडपणं हा प्रश्न टाकला कारण मी जे काही करतोय ते लोकांच्या दृष्टीनं चांगलं, बरोबर आणि उपयुक्त आहे किंवा नाही, हे मला समजून घ्यायचंय. तशा

आपापल्या परीनं रंजक असलेल्या अनेक कथा आहेत!"

या बाबतीत त्यांनी धास्ती बाळगण्याचे कारण नाही असे मी त्यांना सांगितले.

माझे बोलणे त्यांनी हळूच थांबवले आणि मला ते म्हणाले: "कृपा करून आपण एक गोष्ट मान्य करू या; तुमच्या मनाचा दयाळूपणा दाखवून माझं सांत्वन करू नका. कडू गोळीला साखरेचा लेप लावायची काही जरूरी नाही. काही झालं तरी मी सैनिक आहे, अगदी लहान असताना मी घोड्यावर बसायला शिकलोय आणि आता सहजी फेकला जाणार नाही."

त्यांच्या ओठांची थरथर होती आणि त्यांचे स्मित लाजरे व मंद होते, तरी त्यांच्या अभंग इच्छाशक्तीचे सामर्थ्य मला एकाएकी कमालीच्या स्पष्टपणे जाणवले. मला कमालीचा आनंद झाला कारण मला जे काही त्यांना सांगायचे होते ते ऐकून त्यांना बरेच वाटले असते.

मी त्यांना सांगितले की, त्यांची कादंबरी वाचत असताना नकळपतणे मला रशियन आणि पाश्चात्य अभिजात साहित्याची आठवण झाली.

महान आणि वैभवशाली व्यक्तिरेखांमध्ये पावेल कोर्चागिन अभिमानाने आणि विश्वासाने उभा राहू शकला असता. यादवी युद्धाच्या ज्वालांमधून उदयाला आलेल्या या नवागत युवकाला मान्यवरांच्या सहवासात गोंधळून जाण्याचे काही कारण नव्हते. त्याच्या तरुण अंत:करणात अक्षय ताकद सामावलेली होती आणि संघर्षाच्या दुर्दम्य इच्छेने त्याचे जोरदार स्पंदन चालू होते. लोकांना स्वातंत्र्य आणि सुख मिळवून देण्याच्या अत्यंत पुरोगामी व उदात्त विचारांनी त्याचे मन पेटून उठले होते.

साहित्यामधील सर्व स्वातंत्र्यप्रेमी व्यक्तिरेखा – मग त्या पुष्किनच्या साहित्यातील असोत, बायरनच्या असोत वा स्टेन्धालच्या असोत – मानसिकदृष्टचा त्याच्या निकटच्या होत्या. अर्थात गोर्कींच्या नायकांमध्ये त्याला अनेक समानधर्मा भेटले असते.

एव्हाना आम्ही खूप जुनी ओळख असलेल्या स्नेह्यांप्रमाणे बोलू लागलो होतो. तसे आम्ही अनेक विषयांवर बोललो, पण सरतेशेवटी अपरिहार्यपणे संभाषणविषय कादंबरीवर येऊन पोचायचा. संपादनाचे काम कसे झाले आणि 'मलादाया ग्वार्दिया' चे साहाय्यक संपादक मार्क कोलोसोव यांनी आणि मी कोणते बदल केले हे निकोलायना जाणून घ्यायचे होते. सर्व प्रकारचे अलंकारिक वाक्प्रयोग आम्ही कसे काढून टाकले हे मी त्यांना सांगितले तेव्हा ते पोट धरधरून हसले. त्यांनी वापरलेल्या अशा काही शब्दांचे नमुने मी त्यांना ऐकवले तेव्हा खिलाडूपणे ते गालातल्या गालात हसले.

एकूण कादंबरीची रचना मला कशी वाटली, वेगवेगळे प्रसंग, संवाद, स्थळवर्णने यांची हाताळणी त्यांनी कशी केली होती, आपल्या व्यक्तिरेखांच्या खास लकबी प्रकट करण्यात ते कितपत यशस्वी झालेत आणि भाषेच्या वापरात, तुलनां-मध्ये, अलंकारांमध्ये, वर्णनात्मक नांवांमध्ये इत्यादी त्यांनी गोंधळ केला आहे का, याबद्दल त्यांनी मला बरेच प्रश्न विचारले.

त्या विषयावर त्यांनी खूप वाचन आणि मनन केल्याचे त्यांच्या प्रत्येक प्रश्नावरून दिसून येत होते. त्या साहित्यकृती-मध्ये अंतर्भूत असलेल्या अनेक समस्यांकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन त्यांच्या परिपक्वतेची साक्ष देत होता.

वेळ भुर्र्रदिशी उडाला. निकोलाय यांनी मला आपल्या लेखनाच्या योजनांसंबंधी आणि चिंतांसंबंधी सांगितले, आगामी प्रकरणांसाठी त्यांनी कोणती मर्यादा आखून घेतली आहे त्याबद्दल ते बोलले. त्यांच्या शब्दांमधून एवढा विलक्षण जोम जाणवत होता, की निष्कारण त्यांना सहानुभूती दाखवावी किंवा उत्तेजन द्यावे असे मला कधी वाटलेच नाही.

ताज्या दमाचा, प्रभावी, एक बोल्शेविक, यादवी युद्धातला एक झुंजार लढवय्या, सैद्धांतिक आणि नैतिक मूल्यांसंबंधी एवढी सुस्पष्ट कल्पना असणारा असा हा नवा लेखक 'मलादाया ग्वार्दिया' ला सापडल्याबद्दल मला मनस्वी आनंद झाला होता.

त्यांचा घनगंभीर, सुखाने आणि अभिमानाने किंचित मृदु बनलेला असा स्वर अद्याप माझ्या कानात घुमतो:

"म्हणजे मी पुन्हा सैन्यात दाखल झालो! हीच महत्त्वाची बाब आहे, ठाऊक आहे? मी परत सैन्यात दाखल झालो! आयुष्य किती छान आहे नाही! किती विलक्षण आयुष्याची सुरुवात होते आहे माझ्या!"

घरी परत जाताना सबंध रस्ताभर माझ्या मनात हे शब्द घुमत राहिले होते: "किती विलक्षण आयुष्याची सुरुवात होते आहे माझ्या!" ते शब्द मला एखाद्या गाण्यासारखे भासले.

त्यांना सोचीला नेण्यापूर्वी मी आणखी काही वेळा त्यांच्या भेटी घेतल्या आणि या विलक्षण धैर्यशाली माणसाच्या मनोवृत्तीचा व स्वभावाचा अधिक अंतरंगातून ठाव घेता आला.

मॉस्कोमधील त्या माणसांनी दाटलेल्या फ्लॅटमध्ये राहणे म्हणजे एक कसोटीच होती. त्यांना होणाऱ्या आजाराच्या

यातना आरंभी आरंभी कौशल्याने लपवून ठेवणे त्यांना जमत नव्हते. त्याशिवाय त्यांच्या पाठी इतर संकटे आणि काळज्या होत्याच. त्यांचे उत्पन्न अगदी तोकडे होते.

'मलादाया ग्वार्दिया'च्या संपादकांनी कम्सोमोलच्या (कम्युनिस्ट युवक संघ – अनु.) मध्यवर्ती समितीशी संपर्क साधला आणि निकोलाय अस्त्रोवस्की यांना सोची येथे पाठवावे अशी विनंती केली. १९३२ च्या उन्हाळ्यात त्यांची आई त्यांना घेऊन दक्षिणेत गेली. जाण्यापूर्वी आदल्या दिवशी त्यांनी मला पुढील चिठ्ठी पाठवली:

"प्रिय कॉम्रेड आन्ना,

उद्या सकाळी १० वाजता आम्ही दक्षिणेकडे जायला निघत आहोत. माझी चढाई पुढे जोरदार व्हावी यासाठी अंगी ताकद यायला म्हणून सारे काही केले जात आहे. शरदाच्या अखेरीपर्यंत मी सोचीमध्ये राहीन. जेवढा टिकाव धरता येईल तेवढा धरीन."

"माझी चढाई" या त्यांच्या शब्दांचा अर्थ होता – 'अग्निदिव्य' कादंबरीच्या दुसऱ्या भागाचे लेखन. निकोलाय यांनी "माझे काम" असे ज्या अवघड आणि काही वेळा वेदनादायी प्रक्रियेला म्हटले होते ती प्रत्यक्षात एक चढाईच होती...

१९३२ च्या ऑगस्टच्या आरंभी त्यांनी सोचीहून पाठवलेले एक पत्र मला मिळाले. आपल्या स्टेन्सिलच्या मदतीने त्यांनी पेन्सिलीने ते पत्र लिहिले होते. अगदी सरळ रेषा आणि अनैसर्गिक वळणदार अक्षरे पाहताना, ते छोटे पत्र लिहायला त्यांना किती विलक्षण शारीरिक ताण पडला असेल आणि किती निर्धार करावा लागला असेल, त्याची अपरिहार्यपणे जाणीव झाली.

१८ प्रीमोरस्काया, सोची, ५ ऑगस्ट

"प्रिय कॉम्रेड आन्ना,

"मी माझ्या आईबरोबर समुद्रकिनाऱ्याच्या अगदी जवळ राहतो. सुंदर हवेचा जास्तीत जास्त फायदा घेऊन मी सबंध दिवस बागेत एका ओक वृक्षाच्या छायेत पडून राहतो आणि लिहितो... (पुढचे शब्द नीट समजत नाहीत)... माझ्या डोक्यात कल्पना अगदी स्पष्ट आहेत. कॉम्रेड आन्ना, मला जगण्याची घाई लागली आहे, हे दिवस मी वाया घालवले असा पुढं पश्चात्ताप करण्याची माझी इच्छा नाही. माझ्या मूर्ख आजारापायी बंद पडलेली माझी चढाई पुन्हा सुरू होत आहे. तेव्हा माझ्यासाठी सुयश चिंतन कर!"

"मला जगण्याची घाई झाली आहे" या शब्दांमधून केवळ या "चढाई"चा जोर आणि ताण जाणवू शकत होता.

सोचीमध्ये गेल्यानंतर लौकरच त्यांचा आजार उलटला होता आणि हा आजार म्हणजे त्यांच्या दृष्टीने "मूर्ख" काळकाढूपणा होता, खरोखरीच एक असह्य अडथळा होता. आणि जरी त्यांची एकूण प्रकृती आतून कमालीची ढासळलेली होती, तरी आपल्या दुर्दम्य इच्छाशक्तीच्या जोरावर ते या नव्या आजारावर मात करू शकले होते.

त्यांना जरा बरे वाटू लागताच, आपल्या सहनशक्तीची परीक्षा घेण्यासाठी त्यांनी "स्वतःच्या हस्ताक्षरात" मला ते पत्र लिहिले होते. त्या तिथे ओक वृक्षाच्या सावलीत पडून, अजिबात विश्रांती न घेता तासचे तास आपल्या स्वयंसेवक चिटणीसांना तोंडाने मजकूर सांगणारी त्यांची प्रतिमा माझ्या कल्पनेने मी चितारू शकत होते... त्यांचे कपाळ तापले आहे

आणि काळजाचा ठोका अक्षरशः चुकतो – रणांगणाचे चित्र त्यांच्या कल्पनेत उमटले आहे, बेफाम दौडणाऱ्या घोडदळामुळे हादरणारी जमीन त्यांना जाणवते आहे, निर्भय घोडेस्वार तुफान वेगाने दौडत येऊन कामकरी जनतेच्या शत्रूंना कापून काढत असल्याचे ते पहात आहेत. आता त्यांच्या कल्पनेत शांतताकाळातील उभारणीची मॉस्कोतली पहिली वर्षे आहेत, बल्शोय थिएटरमधील कम्सोमोलची कॉंग्रेस त्यांना आठवते, आपल्या सहकाऱ्यांच्या भेटी आठवतात.

"लौकर... लौकर... मला लौकर जगलं पाहिजे..."

'अग्निदिव्य' या निकोलाय अस्त्रोवस्कींच्या कादंबरीच्या दुसऱ्या भागाचे प्रकाशन 'मलादाया ग्वार्दियाने' १९३३ च्या जानेवारी अंकापासून सुरू केले.

त्या काळात निकोलाय यांच्याकडून आलेली पत्रे मला सांगत होती की, त्यांच्या "चढाई" साठी आपल्या रक्ताची आणि मनस्तापाची किती प्रचंड किंमत त्यांना मोजावी लागली होती.

एका पत्रात त्यांनी म्हटले होते :

"...गेले तीन महिने मी काय करीत होतो असं तुम्ही मला विचारलंय. माझ्या साहित्यिक अभ्यासाच्या दृष्टीने राखलेला बराचसा वेळ मी स्थानिक तरुण मंडळींसाठी वापरला. एकाकी लांडग्यामधून माझं 'आनंदी पुढाऱ्या'त रूपांतर झालंय. समितीची ब्यूरो आता आपल्या सभा माझ्या घरात घेते. पक्षाच्या कार्यकर्ता मंडळाचा मी प्रमुख आहे आणि विभागीय सांस्कृतिक वर्धापन मंडळाचा अध्यक्ष आहे. थोडक्यात म्हणजे पक्षाच्या व्यवहारातील कार्याच्या मी अधिक जवळ सरकलो आहे आणि खूपसा उपयुक्त माणूस बनलोय. मला खूप श्रम खर्ची

घालावे लागतात हे खरं आहे, पण मग त्यामुळं जगण्याला आणखी गंमत येथे. मी कम्सामोलच्या मध्यभागी आहे.

"मी एक साहित्य मंडळ स्थापन केलंय आणि जास्तीत जास्त चांगल्या रीतीने ते चालविण्याचा मी प्रयत्न करतो. पक्षाच्या आणि कम्सामोलच्या समित्या माझ्या कामात खूप रस दाखवतात. पक्षाचे कार्यकर्ते वारंवार माझ्या घरी जमा होतात. मला जीवनाचं स्पंदन जाणवतं. आजच्या घडीला महत्त्वाचं काय चाललंय त्याचा अनुभव घेण्यासाठी हा स्थानिक कारभार मला हवा होता व त्यासाठी जाणूनबुजून मी अख्खे तीन महिने घालवले."

कचेरीतल्या माझ्या एका स्नेह्याला हे पत्र मी वाचायला दिले तेव्हा तो अगदी गलबलून गेला.

"काय विलक्षण ताकदीचा माणूस आहे!" तो उद्गारला. "हे पत्र कुणी लिहिलंय याची जर मला माहिती नसती, तर एखादा खणखणीत तब्येतीचा धिप्पाड माणूस आपल्या कामाचा अहवाल लिहितोय असं मला वाटलं असतं."

त्यांच्या कादंबरीची लोकप्रियता वेगाने वाढत होती आणि स्थानिक वाचनालयांमध्ये किंवा पुस्तकांच्या दुकानांमध्ये कादंबरीची प्रत मिळत नाही अशी तक्रारवजा पत्रे अस्त्रोवस्कीना लोकांकडून वाढत्या प्रमाणात येत होती.

१९३४ मध्ये त्यांनी मला लिहिले होते:

"तुम्हाला खरं सांगायचं तर अगदी आत्तासुद्धा माझ्या भेटीला येणाऱ्या अनेक लोकांपेक्षा मी खूपच सुखी जीवन जगतो आहे. केवळ कुतूहलापोटी त्यांच्यातले बरेचसे माझ्या भेटीला येतात. मला त्याचं आश्चर्य वाटत नाही. त्यांची शरीरं निरोगी आहेत, पण ते कमालीचं रटाळ, निर्जीव आयुष्य

जगतात. आपल्या दोन्ही डोळयांनी ते पाहू शकतात, पण त्यांची नजर कंटाळलेली, बेफिकीर असावी असं मला वाटतं. कदाचित ते माझी कीव करीत असावेत आणि विचार करीत असावेत: 'परमेश्वरा, या माणसासारखं जिणं मला कधी देऊ नकोस बाबा!' पण मला ती एवढी बापुडवाणी माणसं वाटतात की, शप्पत सांगतो, त्यांच्याशी आयुष्याची अदला-बदल करायला मी कधीही तयार व्हायचा नाही."

एवढ्या बोलक्या ओळींना पुस्तीजोडायची काही गरज आहे का?

अस्त्रोवस्कींपाशी नेहमी अनेक योजना असायच्या. त्यांची शक्ती अदम्य होती आणि स्वभाव उत्साही होता. अशा मनाच्या अवस्थेत ते आपला प्रत्येक दिवस सुरू करीत. दिवस फार लौकर संपतो एवढी त्यांची एकच तक्रार होती.

मित्र कितीही रागावले तरी कुणाचेही काहीही न ऐकता, दररोज पंधरा तास निकोलाय काम करीत असत, त्यांना असंख्य माणसे भेटायला येत, ते अगदी कमी झोप घेत आणि अंगातली थोडी फार ताकद ते अशी उधळून टाकीत.

ज्याची आम्हा सर्वांना भीती वाटत होती ते घडले. १९३५ च्या ऑगस्टमध्ये त्यांच्या प्रकृतीत अचानक जोरदार बिघाड झाला.

"कितीही धोका असला तरी अर्थातच यावेळीसुद्धा मी मरणार नाही. 'तुफानातून जन्मलेला' हे पुस्तक मला लिहिलंच पाहिजे. एवढंच नाही तर माझ्या काळजातला सारा उत्साह मला त्यात ओतला पाहिजे. 'अग्निदिव्य' ची पटकथा मला लिहिली पाहिजे. पावेल कोर्चागिनच्या लहानपणाचं वर्णन करणारं एक पुस्तक लहान मुलांसाठी मला लिहायचंय.

पावेलच्या सुखाची कहाणी सांगणारं हे पुस्तक अगदी अत्यावश्यक आहे. यासाठी मला पाच वर्षं खूप मेहनत केली पाहिजे. मला किमान पाच वर्षं तरी जगलंच पाहिजे." ते मला म्हणाले होते.

नोव्हेंबरात त्यांच्याकडून मला एक पत्र आले. त्यात त्यांनी म्हटले होते:

"एक-दोन दिवसांत सरकारचे एक प्रतिनिधी माझ्या मानाचं पदक द्यायला इथं येत आहेत. तोपर्यंत इथून मला जाता येत नाही. प्रवासासाठी मला माझ्या डॉक्टरांचीही परवानगी घेतली पाहिजे, कारण मी पुन्हा आजारी आहे. या सगळ्या गोष्टी आटपल्या म्हणजे मी तुम्हाला पत्र लिहीन आणि माझ्या प्रयाणाचा दिवस कळवीन."

मॉस्कोमध्ये ४०, गोर्की रस्ता येथे त्यांचा फ्लॅट सजवण्यात आम्ही गुंतलो होतो. त्यांना ज्या पद्धतीने घर लावलेले आवडत असे त्या पद्धतीने मांडणी करायची धडपड करीत होतो... आमच्या दैनंदिन कामाच्या धावपळीच्या दरम्यान मला फोनवर बोलावणे आले. सोचीहून फोन आला होता. बाहेर बर्फाचे वादळ माजले होते. मी फोन उचलला तेव्हा हिमवादळात घोंघावणाऱ्या वाऱ्याचे आवाज, संगीताचे तुकडे, शिट्ट्या, कडकडाट आणि अनेक ध्वनींचा व आवाजांचा गोंगाट ऐकू आला.

आणि अचानक निकोलाय यांचा घनगंभीर, किंचित कोरडा आवाज माझ्या कानात घुमला. त्यांचा आवाज एवढा स्पष्ट येत होता की, दूर सोचीहून ते बोलत नसून जवळच्याच अर्बात रस्त्यावरून ते माझ्याशी बोलताहेत असे मला क्षणभर वाटले.

"अकरा तारखेला मी मॉस्कोत येतो! ज्या मिनिटाला आमची आगगाडी स्टेशनात येईल त्याच वेळी माझ्या आगगाडीच्या डब्यात आपण 'जनरल-स्टाफ'ची बैठक घेऊ या! तुम्ही तुमच्या सर्व बातम्या सांगायच्या आणि मी माझ्या सांगीन. मी वेड्यासारखा काम करतोय!"

...काही दिवसांनंतर मी निकोलाय यांना भेटायला त्यांच्या फ्लॅटवर गेले.

निकोलाय यांनी कशिदाकाम केलेला युक्रेनी सदरा अंगात घातला होता आणि तो त्यांना शोभून दिसत होता. यापूर्वी इतके चांगले ते मला कधी दिसले नव्हते. त्यांच्या बसलेल्या गालांवर थोडासा रक्तिमा चढला होता आणि एक नवे, दिलखुलास हास्य त्यांच्या मुद्रेवर उमटलेले होते. उशांच्या ढिगावर डोके टेकून ते पडले होते आणि त्यांच्या गडद केसांनी त्यांच्या उभट, पांढऱ्या कपाळाभोवती नाजुक महिरप धरली होती. या माणसावर आत्यंतिक प्रेम करणाऱ्या आम्हा सर्वांनी, त्यांच्या चेहऱ्यावर विलसणाऱ्या अद्भुत, अक्षय उत्साहाला पाहून आनंदाने एकमेकांना नेत्रसंकेत केले.

गप्पा मोठ्या आनंदात आणि जोरजोराने चालल्या होत्या. अचानक एका पाहुण्याला जाणीव झाली की आम्ही आमच्या यजमानाच्या सहनशक्तीचा अंत पहात आहोत, आणि त्याने काळजीच्या सुरात विचारले:

"आम्ही फार मोठ्यानं गोंगाट तर करत नाही ना?"

"छे: छे:, मुळीच नाही," मजेने हसत निकोलाय म्हणाले. "आपण खरीखुरी दणदणीत वास्तुशांती साजरी करू या!"

त्यांचा कामाचा दिवस संपल्यानंतर एका संध्याकाळी मी त्यांना भेटायला गेले होते. सैन्यात देण्यात येणाऱ्या कपड्याचा

नेहमीचा सदरा निकोलाय यांच्या अंगात होता. ते थकलेले दिसत होते. त्या दिवशी किती तासपर्यंत मजकूर ते सांगत होते याची मी विचारणा केली.

"फार नाही, मुळीच जास्त नाही," त्यांनी सांगायला सुरुवात केली आणि एकदम खरे बोलून टाकले: "जवळ जवळ दहा तास. तुम्हाला हे मान्य नाही हे मला समजतंय. पण कामासाठी मी अगदी भुकेला होतो, माझी उपासमार झाली होती! अगदी खरं सांगतो, प्रेमिकांना एकमेकांची जेवढी ओढ वाटत नसेल त्यापेक्षा अधिक मला कामाची ओढ वाटते. आणि कामानंतर माणसाची मनःस्थिती कशी होते ते तुम्हाला ठाऊकच आहे. माझा चिटणीस निघून गेल्यानंतर मी पुढच्या प्रसंगाचा विचार करू लागलो आणि तो इतक्या ठळकपणं माझ्या नजरेसमोर उभा राहिला, की तिथल्या तिथं मी सबंध प्रसंग घडघडा सांगितला असता. अशा क्षणी माझ्याइतका सुखी माणूस या जगात दुसरा कुणी नसतो. काही झालं तरी मी सुदैवी आहे की नाही? सुदैवी तर खराच, पण किती!"

सोचीमध्ये एका अमेरिकन पत्रकार महिलेला दिलेल्या मुलाखतीची त्यांनी आठवण सांगितली.

"मी तिच्या पुरा तावडीत सापडलो होतो. तिला बारिक-सारिक हजार गोष्टी जाणून घ्यायच्या होत्या. कमालीची गोंगाट करणारी बाई होती! मग माझ्या डोक्यात प्रकाश पडला की, एक हुतात्मा म्हणून, एक स्थितप्रज्ञ आणि महात्मा म्हणून माझं चित्र उभं करण्याचा तिचा प्रयत्न चालला होता... तिला अपशब्द बोलायची मला अगदी विलक्षण ऊर्मी आली होती! पण त्याऐवजी मी माझ्या जीवनकहाणीविषयी

तिला अचूक दृष्टिकोन दाखवून दिला आणि मी स्वत:ला समाजाचा एक उपयुक्त घटक का समजतो ते समजावून दिलं." निकोलाय यांना कुणीची करुणा किंवा लीनता अथवा दयेचा उमाळा अजिबात सहन होत नसे.

इतरांना उत्साही करण्यात ते वाकबगार होते. त्यांनी उच्चारलेले शब्द साधेच असायचे, पण सहानुभूतीच्या अनेक भावनावेगी उमाळ्यांपेक्षा त्यांचा अधिक प्रभावी परिणाम घडायचा. एखाद्या अडचणीच्या ते अगदी मूळाशी जायचे आणि त्यांच्या दृष्टीने तिच्यातील कोणत्या गोष्टी कुचकामाच्या आहेत हे हळुवारपणे आणि चतुराईने दाखवून पटकन सल्ला द्यायचे. प्रत्येक गोष्टीच्या अगदी मूळाशी जाऊन ती वस्तुनिष्ठ पद्धतीने आणि आत्यंतिक आपुलकीने करण्याची त्यांच्या अंगची क्षमता, हा त्यांचा एक फार मोठा गुण होता.

निकोलाय अस्त्रोवस्की किती प्रचंड काम करतात याची त्यांच्या ओळखीच्या प्रत्येकाला माहिती होती. त्यांच्या जीवनाच्या अखेरच्या आठवड्यात मी मॉस्कोत नव्हते हे खरोखरीच माझे दुर्दैव. त्या अखेरच्या दिवसात कामाचा किती विलक्षण ताण त्यांनी सोसला होता त्याची हकिकत त्यांच्या चिटणीसांनी मला सांगितली. त्यांचे चिटणीस आळीपाळीने काम करीत होते, दोन किंवा तीन पाळ्यांमध्ये काम करीत होते आणि निकोलाय अखंडपणे मजकूर सांगत होते; 'तुफानातून जन्मलेला' या आपल्या कादंबरीचा पहिला भाग पुरा करण्यासाठी नेटाने रेटा लावीत होते. डिसेंबरच्या मध्यास ते पुस्तक पूर्ण करण्याचे त्यांनी कम्सोमोलच्या मध्यवर्ती समितीला वचन दिले होते. त्यांनी आपला शब्द पाळला.

त्यांचे दिवसाचे काटेकोर वेळापत्रक ठरलेले असे: सकाळी ते आपल्या चिटणीसाला मजकूर सांगत आणि नंतर तो

त्याच्याकडून दोन-तीन वेळा संपूर्ण वाचून घेत. जेवणासाठी छोटी सुटी घेऊन ते पुन्हा कामाला आरंभ करीत. मग वाचनाचा तास – वर्तमानपत्रे, नवी पुस्तके किंवा अभिजात साहित्य वाचून घेत. रसदार वाचन त्यांना आवडे आणि लहान मुलाच्या एकतानतेने ते ऐकत रहात. सायंकाळी रेडिओवरचे संगीत आणि बातम्या ऐकत किंवा अनेकवेळा जुन्या आठवणींना उजाळा देत.

एकदा ते म्हणाले, "तुम्हाला माहीत आहे, मला परवा तोन्या तुमानोवाकडून पत्र आलं. म्हणजे खरी तोन्या नव्हे, पण तोन्याची व्यक्तिरेखा जिच्यावरून घेतली ती मुलगी. कल्पना करू शकता, ती मला विसरली नाही!"

निकोलाय एकाएकी गप्प झाले आणि अनेक मिनिटेपर्यंत आपल्या कपाळावर आठी घालून एकतानतेने विचारात गढून गेले. एकही स्नायू हलत नव्हता, फक्त त्यांच्या दाट काळ्या पापण्यांची किंचित थरथर होत होती. मग त्यांनी स्वतःच्या मानेला झटका दिल्यासारखे केले आणि तोन्या तुमानोवाची कथा मला सांगू लागले. ज्या माणसाच्या प्रेमात पडून तिने लग्न केले होते तो एक इंजिनिअर होता, पण पुढे तो बदफैली निघाला होता. तोन्याने त्याच्यापासून घटस्फोट घेतला होता आणि आपल्या दोन मुलांना घेऊन ती वेगळी रहात होती, चरितार्थासाठी शिकवीत होती.

"ती फार छान, दयाळू मुलगी होती, पण संघर्ष करणं हा तिचा पिंड नव्हता. असं बऱ्याच वेळा घडतं – सामायिक कार्यासाठी जी माणसं लढू शकत नाहीत ती वैयक्तिक सुखासाठीही लढा द्यायला समर्थ नसतात."

"सैनिक," "चढाई," "विजय," "लढाई" अशा

शब्दांबद्दल त्यांना ममत्व होते आणि त्यांच्यावर खास भर देऊन ते उच्चारीत असत. एकदा मी या गोष्टीचा त्यांच्यापाशी उल्लेख केला. त्यांनी स्मित केले आणि हळू हळू आपल्या लांब भुवया आकुंचित केल्या. अत्यंत गहन आणि सुखद विचारांच्या क्षणी असे करण्याची त्यांना सवय होती.

"जीवनाचा मुख्य अर्थ या शब्दांमध्ये सामावलाय, मग त्यांच्याबद्दल मला प्रेम वाटणं साहजिक नाही का?"

संरक्षण खात्याच्या जन-मंत्रालयाकडून त्यांना लष्करी सेवेचे कार्ड मिळाले तेव्हा त्यांना किती मनस्वी आनंद झाला होता, त्याची मला आठवण आहे.

"पाहिलंत, मी अजून लढवय्यांच्या रांकेत आहे!" ते उद्‌गारले होते.

...त्यांना चांगले ओळखणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला जेव्हा जेव्हा त्यांची आठवण होईल तेव्हा तेव्हा कधीही भरून न येणारी हानी झाल्याची कडवट भावना तिला नेहमी जाणवेल, आपल्या काळजाचा एक तुकडा कुणीतरी पिळवटून तोडतेय अशी वेदना अनुभवील. अर्थात काळ वेदना बोथट करील, पण दु:ख मात्र तेवढेच गहिरे राहील.

निकोलाय अस्त्रोवस्कींना विसरणे अशक्य आहे. त्यांचे मित्र आणि त्यांचे वाचक त्यांना कधीही विसरणार नाहीत. समाजसत्तावादाच्या उद्दिष्टासाठी लढणाऱ्या धैर्याचे आणि निष्ठेचे मूर्तिमंत प्रतीक बनलेली त्यांची प्रतिमा आमच्या स्मरणातून कधीही पुसली जाणार नाही. त्यांचे व्यक्तित्व विलक्षण आल्हादक होते, ते अत्यंत निखळ आणि छान होते.

आन्ना कारावायेवा

(निकोलाय अस्त्रोवस्की यांच्याबद्दलच्या आठवणींमधून)

प्रकरण पहिले

"ईस्टरच्या सणापूर्वी परीक्षा द्यायला माझ्या घरी तुमच्यापैकी जे आले होते ते उभे रहा!"

हे शब्द उच्चारणारी व्यक्ती पाद्रयाच्या वेषातील एक गलेलठ्ठ माणूस होती. त्या व्यक्तीच्या गळयात एक जाडजूड क्रूस लोंबत होता आणि आपल्या दुष्ट नजरेने ती समोरचा वर्ग न्याहाळीत होती.

आपल्या जागांवरून उठून उभ्या राहिलेल्या आणि लांब पायघोळ अंगरख्यातील या माणसाकडे धास्तावल्या नजरेने पाहणाऱ्या सहा मुलांवर–त्यातील चार मुलगे होते आणि दोन मुली होत्या–त्या पाद्रयाने आपले बारिक कठोर डोळे रोखले.

"तुम्ही खाली बसा," मुलींना खूण करीत पाद्रीबाबा म्हणाले.

सुटकेचा निश्वास टाकीत मुली घाईघाईने खाली बसल्या.

फादर वासीली यांचे पिचके डोळे इतर चौघांवर खिळले.

"माझ्या शहाण्या बाळांनो, इकडं या बघू!"

फादर वासीली उठले, आपली खुर्ची त्यांनी मागे ढकलली आणि एकमेकांशेजारी दाटीने उभ्या राहिलेल्या त्या चार मुलांजवळ ते गेले.

"तुम्हा पोरांपैकी कोणते गुंड तंबाखू ओढतात?"

"फादर, आम्ही तंबाखू पीत नाही," चौघांनी घाबरट आवाजात उत्तर दिले.

पाद्रीबाबांचा चेहरा संतापाने लालबुंद झाला.

"डांबिस पोरांनो, तुम्ही तंबाखू ओढत नाही काय? मग माझ्या पिठात तंबाखू कुणी घातली? सांगा! तुम्ही तंबाखू ओढता किंवा नाही हे आता आपण पाहूच! तुमचे खिसे उलटे करा बघू! चला, उलटे करा तुमचे खिसे!"

आपल्या खिशांमधील वस्तू टेबलावर काढून ठेवण्यासाठी तीन मुले पुढे झाली.

त्या मुलांच्या खिशांच्या शिवणींची पाद्रीबाबांनी बारकाईने पाहणी केली. तंबाखूचे कण तेथे अडकले आहेत किंवा नाहीत याची त्यांना खात्री करून घ्यायची होती. पण तसे काहीही आढळले नाही. मग करडचा रंगाचा सदरा व गुडघ्यावर ठिगळे लावलेली निळी विजार घातलेल्या गडद डोळयांच्या चौथ्या मुलाकडे ते वळले.

"एखाद्या बाहुल्यासारखा तिथं उभा काय राहिलायस?"

प्रश्न करणाऱ्याकडे त्या मुलाने एक तिरस्काराचा कटाक्ष फेकला.

"मला खिसेच नाहीत," आपल्या विजारीच्या दोन्ही बाजूंना हात फिरवीत वाकडे तोंड करून तो उत्तरला.

"खिसे नाहीत काय? माझ्या पिठाची नासाडी करण्याचा हलकटपणा कुणी केला ते मला माहीत नाही असं वाटतंय काय तुला? तुला मी पुन्हा सोडून देईन असं वाटलं काय? नाही बेटा, याचा जाब तुला द्यावा लागेल. मागल्या वेळी तुझ्या आईनं विनवणी केली म्हणून मी तुला या शाळेत राहू

दिलं, पण आता मी तुला पुरा विटलोय. चालता हो!" त्यांनी त्या मुलाचा कान जोराने पिरगाळला आणि त्याला बाहेर व्हरांड्यात ढकलून देऊन धाडदिशी वर्गाचे दार लावून घेतले.

सगळा वर्ग घाबरून गप्प बसला. पावेल कोर्चागिनला वर्गातून का हाकलून लावले होते ते सेर्गेई ब्रुझ्झाक या पावेलच्या अगदी जवळच्या मित्राशिवाय कुणाही मुलाला अथवा मुलीला समजले नव्हते. अभ्यासात मागे पडलेली सहा मुले जेव्हा परीक्षा देण्यासाठी पाद्रीबाबाच्या स्वयंपाकघरात वाट पहात उभी होती, तेव्हा ईस्टरच्या केकच्या पिठात मूठभर घरगुती तंबाखू पावेलने मिसळलेली त्याने पाहिली होती.

आता पावेल शाळेच्या इमारतीच्या अगदी खालच्या पायरीवर बसला होता आणि काय घडले ते आईला कसे सांगावे याचा कमालीच्या निराशेने विचार करीत होता. बिचारी त्याची आई! एका जकात तपासनीस अधिकाऱ्याच्या घरी स्वैपाकीण म्हणून सकाळपासून रात्रीपर्यंत राबत होती.

त्याला रडे दाटून आले.

"काय करू मी? त्या हलकट पाद्र्यामुळं हे सगळं घडलं! त्याच्या पिठात कशाला मी तंबाखू मिसळली? खरीं ती सेर्योझ्काची कल्पना. 'दुष्ट म्हाताऱ्याची गंमत करू या' म्हणाला. तशी गंमत केली आम्ही. आता सेर्योझ्का सहीसलामत सुटला आणि मला शाळेतून डिच्चू बसायची वेळ आली."

फादर वासीली यांच्याबरोबरचे त्याचे वैर फारा दिवसांपासूनचे होते. मीश्का लेवचुकोव याच्याबरोबर त्याचे भांडण जुंपले होते म्हणून त्याला जेवण देण्यात आले नाही. रिकाम्या

वर्गात या पोराने काही वात्रटपणा करू नये म्हणून मास्तरांनी त्याला दुसरीच्या वर्गातल्या धड्याला नेऊन बसवले होते. पावेल मागच्या बाकावर बसला होता.

काळ्या कोटातले सुरकुतल्या चेहऱ्याचे छोटुकले मास्तर पृथ्वीसंबंधी आणि आकाशातल्या ग्रह-ताऱ्यांसंबंधी माहिती सांगत होते. पृथ्वी कोटच्यवधी वर्षे अस्तित्वात होती आणि तारे पृथ्वीसारखेच आहेत, हे जेव्हा त्यांच्या तोंडून पावेलने ऐकले तेव्हा आश्चर्याने चकित होऊन त्याने आ वासला होता. जे काही त्याने ऐकले होते त्यामुळे त्याला एवढा प्रचंड धक्का बसला होता की, "बायबलमध्ये असं म्हटलं नाही!" असे ओरडण्याचा मोह त्याने मोठ्या कष्टाने आवरला होता. तसे करण्याने आपल्यावर आणखीच आफत कोसळेल अशी त्याला भीती वाटत होती.

बायबल या विषयाला पाद्रीबाबाने पावेलला नेहमी सगळेच्या सगळे गुण दिले होते. पावेलला प्रार्थनेचे अख्खे पुस्तक तोंडपाठ होते, तसेच 'जुना' व 'नवा' करार तोंडपाठ होता. आठवड्याच्या प्रत्येक दिवशी परमेश्वराने काय निर्माण केले त्याची नेमकी माहिती त्याला होती. आता त्याला पडलेले कोडे त्याने फादर वासीली यांच्यासमोर मांडायचे ठरवले. पुढच्याच धड्याच्या वेळी, पाद्रीबाबा आपल्या खुर्चीत विराजमान होतात न होतात तोच पावेलने आपला हात वर केला आणि बोलायची परवानगी मिळताच तो उठून उभा राहिला.

"फादर, दुसरीचे मास्तर म्हणतात की पृथ्वी कोटी कोटी वर्षांची आहे, पण बायबलमध्ये तर म्हटलंय की, ती पाच हजार..." फादर घोगऱ्या आवाजात त्याच्यावर एकदम

एवढ्या जोरात खेकसले, की त्याचे बोलणे अर्ध्यावरच थांबले.

"गाढवा, काय म्हणालास? असा बायबलचा अभ्यास करतोस होय?"

काय होते ते कळायच्या आतच पाद्रीबाबांनी पावेलचा कान खेचला आणि दणादणा त्याचे डोके भिंतीवर आपटले. भीतीने आणि वेदनांनी थरथर कापणाऱ्या पावेलला काही मिनिटांनंतर आपण बाहेर व्हरांड्यात पडल्याचे आढळून आले.

त्याची आईसुद्धा त्यावेळी त्याला सपाटून रागावली होती.

दुसऱ्या दिवशी शाळेत जाऊन, पावेलला परत वर्गात घेण्याची तिने फादर वासीली यांच्यापाशी विनवणी केली होती. त्या दिवसापासून पावेल मनोमन पाद्र्याचा द्वेष करीत होता. त्याला त्याचा तिटकारा वाटत होता आणि भीतीही वाटत होती. कोणत्याही अन्यायाविरुद्ध, मग तो कितीही लहान असला तरी, त्याचे बालमन बंड करून उठत होते. निष्कारण मारल्याबद्दल पाद्र्याला तो क्षमा करू शकत नव्हता. तो दुर्मुखला आणि कडवट बनला.

त्यानंतर अनेक बारिकसारिक गोष्टींवरून पावेलने फादर वासीली यांच्या हातचा मार खाल्ला होता. पाद्रीबाबा सतत त्याला वर्गाबाहेर हाकलून लावीत; छोट्या छोट्या कारणांसाठी दिवसांमागून दिवस अनेक आठवडेपर्यंत ते त्याला कोपऱ्यात उभा करीत राहिले, प्रश्नांची उत्तरे द्यायला कधीही बोलाविनासे झाले. परिणामी, ईस्टर सणाच्या सुटीच्या आधी, अभ्यासात मागासलेल्या मुलांबरोबर पुन्हा परीक्षा देण्यासाठी पावेलला पाद्र्याच्या घरी जावे लागले होते. तिथे स्वयंपाकघरात त्याने पिठामध्ये तंबाखू मिसळली होती.

ते कृत्य करताना त्याला कुणीही पाहिले नव्हते, पण तो कुणाचा कारभार असावा याबद्दल पाद्रीबाबांनी तात्काळ तर्क केला होता.

शेवटी एकदाचा तास संपला आणि गंभीरपणे मुकाट बसून राहिलेल्या पावेलभोवती मुलांनी आवारात कोंडाळे केले. सेर्गेई ब्रुझ्झाक मागे वर्गातच घुटमळत राहिला. आपणही दोषी आहोत असे त्याला वाटत होते, पण आपल्या मित्राला तो अजिबात मदत करू शकला नव्हता.

शिक्षकांच्या खोलीच्या उघडचा खिडकीतून शाळेच्या हेडमास्तरांनी—येफ्रेम वासील्येविचनी – मुंडके बाहेर काढले आणि ते ओरडले :

"कोर्चागिनला ताबडतोब माझ्याकडं पाठवून द्या!" हेड-मास्तरांच्या त्या जाड खर्जातल्या आवाजासरशी पावेलने दचकून उडी मारली आणि धडधडत्या काळजाने त्याने त्यांची आज्ञा पाळली.

रेल्वे स्टेशनवरील रेस्तराँच्या मालकाने – फिकट चेहऱ्याच्या, मध्यम वयाच्या, निर्जीव डोळ्यांच्या त्या माणसाने – पावेलकडे एक ओझरता दृष्टिक्षेप टाकला.

"काय वयाचा आहे?"

"बारा."

"ठीक आहे, राहू दे त्याला इथं. महिन्याला त्याला आठ रूबल मिळतील आणि ज्या दिवशी काम करत असेल तेव्हा जेवायला मिळेल. दर दिवसाआड सलग चोवीस तासपर्यंत त्याला काम करावं लागेल. पण लक्षात ठेव, चोरी-लबाडी चालणार नाही."

"नाही साहेब, तो चोरी करणार नाही. त्याला मी जबाबदार राहीन," धास्तावून घाईघाईने आईने मालकाला खात्री दिली.

"आजपासूनच त्याला कामाला लागू दे," मालकाने हुकूम ठोकला आणि काऊंटरमागच्या बाईकडे वळून म्हणाला: "झीना, या पोराला भटारखान्यात घेऊन जा आणि ग्रीश्का-ऐवजी याला कामाला लावायला फ्रोस्याला सांग."

डुकराच्या मांसाच्या चकत्या कापण्याचे काम त्या बाईने थांबवले, हातातली सुरी बाजूला ठेवली, पावेलला मानेनेच आपल्यामागे यायला खुणावले आणि दालन ओलांडून धुण्या-भांड्याच्या खोलीकडे जाणाऱ्या बाजूच्या दाराच्या दिशेने ती निघाली. पावेल तिच्या मागोमाग चालू लागला. त्याची आई घाईघाईने त्याच्या पाठोपाठ गेली व हळूच त्याच्या कानात कुजबुजली: "पाव्लुश्का, बेटा, मन लावून काम कर. स्वतःला कमीपणा येईल असं वागू नको."

पाठमोऱ्या पावेलकडे तिने खिन्न नजरेने पाहिले आणि तेथून ती निघून गेली.

धुण्या-भांड्याच्या खोलीत काम मोठे जोरात चालले होते. एका टेबलावर बशांचा, काटे व सुऱ्या यांचा प्रचंड ढीग पडला होता आणि खांद्यावर फडकी टाकलेल्या अनेक बायका बशा पुसण्याचे काम करीत होत्या.

कपाळावर पिंगट केसांचा झुपका रुळविणारा पावेलपेक्षा किंचित मोठ्या वयाचा एक मुलगा दोन प्रचंड समोवारांची देखभाल करीत होता.

एका उकळत्या पाण्याच्या भल्या मोठ्या घंगाळयात बशा विसळल्या जात होत्या, पाण्यातून निघणाऱ्या वाफांच्या लोटांनी

मारी खोली भरून गेली होती व त्यामुळे पावेलला प्रथम त्या बायकांचे चेहरे स्पष्टपणे दिसले नाही. कुणीतरी आपल्याला काम सांगेल अशा अपेक्षेने अनिश्चित मनःस्थितीत वाट पहात तो तेथे उभा राहिला.

रेस्तराँमधील ती झीना नांवाची सेविका बशा विसळणाऱ्या बायकांपैकी एकीजवळ गेली आणि तिच्या खांद्याला स्पर्श करीत म्हणाली :

"फ्रोस्या, ग्रीश्काच्या जागी काम करायला मी एका नव्या पोराला घेऊन आलेय. काय करायचं ते त्याला सांग."

फ्रोस्या म्हणून ज्या बाईला हाक मारली होती तिच्याकडे मानेने इशारा करून दाखवीत झीना पावेलला म्हणाली, "ती सांगील." एवढे बोलून ती मागे फिरली आणि उपहारगृहाकडे निघून गेली.

"ठीक आहे," पावेल हळूच उत्तरला आणि फ्रोस्याकडे त्याने प्रश्नार्थक नजरेने पाहिले. भुवईवर साचलेला घाम पुशीत तिने त्याला अंगठ्यापासून डोक्यापर्यंत बारकाईने न्याहाळले. तिला तो आवडला. मग कोपरावर सुटलेली बाही तिने गुंडाळून वर घेतली आणि भरदार व कमालीच्या मधुर आवाजात ती म्हणाली :

"बाळा, तसं काही फार काम नाही, पण तुला गुंतून रहायला पुरेसं आहे. ते तांब्याचं भांड सकाळीच तापवायचं, म्हणजे सगळा वेळ पाणी उकळत राहील; शिवाय सर्पणाला लाकडं फोडली पाहिजेत आणि समोवारांची काळजी घेतली पाहिजे. काहीवेळा तुला काटे-सुऱ्या साफ कराव्या लागतील आणि सांडपाणी काढावं लागेल. तसं काम खूप करायला लागेल मुला," ती म्हणाली. तिच्या बोलण्यात कोस्त्रोमा

प्रदेशातली ढब स्पष्टपणे जाणवत होती. तिथली माणसे ‘आ’ स्वर उच्चारताना त्यावर जोर देतात. तिच्या बोलण्याची ती तऱ्हा आणि अपऱ्या नाकाचा तिचा लालबुंद झालेला चेहरा पाहून पावेलला जरा बरे वाटले.

“ही खूपच सभ्य दिसतेय,” त्याने मनातल्या मनात तिच्याविषयी आपले मत बनविले. मग आपल्या लाजरेपणावर मात करीत तो म्हणाला: “मावशी, मी आत्ता काय करायचं?”

त्याच्या त्या शब्दांसरशी बशा विसळणाऱ्या बायकांमध्ये हसण्याचा जोरदार कल्लोळ उसळला.

“बाई ग बाई! फ्रोस्याला भाचरू मिळालं...”

इतर सगळ्याजणींपेक्षा खुद्द फ्रोस्या जास्त मनापासून हसली.

वाफेच्या लोटांमुळे पावेलच्या नीटसे ध्यानात आले नव्हते की, फ्रोस्या अगदी तरुण मुलगी होती. तिचे वय अठरापेक्षा अधिक नव्हते.

तो कमालीचा शरमिंदा झाला. त्या दुसऱ्या मुलाकडे वळून त्याने विचारले:

“आता मी काय करू?”

पण तो मुलगा केवळ गालातल्या गालात हसला. “तू तुझ्या मावशीला विचार, ती सारं सांगील तुला. इथं मी तात्पुरता कामाला आहे.” एवढं बोलून भटारखान्याकडे जाणाऱ्या दाराकडे तो वेगाने पसार झाला.

“इकडं ये आणि काटे कोरडे करायला मदत कर,” बशा विसळणाऱ्यांपैकी एक मध्यमवयीन बाई म्हणाली.

“खिदळायचं थांबवा ग,” इतरांना तिने दटावले. “पोरगं एवढं काही विचित्र बोललेलं नाही. हे घे रे.” तिने पावेलच्या

हाती बशा पुसायचा एक फडका दिला. "एक टोक तुझ्या दातात पकड आणि दुसरं टोक गच्च ओढून धर. हा काटा घे आणि फडक्याच्या खालून वरून घासून काढ. काट्यांच्या मधल्या भागात घाण अडकून राहणार याची काळजी घे. तेवढ्या बाबतीत इथं फार कडक आहे. गिऱ्हाईकं नेहमी काटे तपासून पाहतात आणि जरा त्यात घाण अडकलेली त्यांना दिसली तर गोंधळ माजवतात. मग मालकीण तुला एका मिनिटात इथून भिरकावून देईल."

"मालकीण?" पावेलने तोच शब्द प्रश्नार्थक सुरात उच्चारला. "मला वाटलं, ज्या मालकांनी मला कामावर घेतला तेच इथले मुख्य आहेत."

ती बाई हसली.

"पोरा, मालकाला इथं काडीची किंमत नाही. खरी सत्ता मालकिणीची. आज ती इथं नाहीय. पण इथं काही दिवस काम केलंस म्हणजे भेट होईलच तुझी."

धुण्या-भांड्याच्या खोलीचे दार उघडले गेले आणि खरकट्या बशांचे उंच ढीग रचलेले ट्रे हातात घेऊन तीन वेटर आत आले.

त्यांच्यातला एक रुंद खांद्याचा, चकण्या डोळ्यांचा व सणसणीत आडव्या तोंडाचा वेटर म्हणाला: "तुम्ही जरा झटपट कामं करा. आता कुठल्याही क्षणाला बाराची गाडी येईल आणि तुमच्या नुसत्या कुचाळक्या चालल्यात."

त्याने पावेलकडे नजर टाकली. "हा कोण?" त्याने विचारले.

"तो नवा पोरगा," फ्रोस्या म्हणाली.

"अच्छा, हा नवा पोरगा," तो म्हणाला. "ऐक पोरा,"

पावेलच्या खांद्यावर त्याने आपला भलाभक्कम पंजा रोवला आणि त्याला समोवारांकडे ढकलत नेत तो पुढे म्हणाला, "यांना सगळा वेळ उकळत ठेवणं हे तुझं काम आहे. आणि हे बघ, त्यातला एक आत्ता पुरता विझलाय, दुसरा जेमतेम पेटतोय. पुन्हा असं होऊ देऊ नको, नाहीतर तुझा भुगा करीन!"

एकही शब्द न बोलता पावेलने समोवार तापवण्याची खटपट सुरू केली.

अशा रीतीने त्याचे कष्टकरी आयुष्य सुरू झाले. त्या पहिल्या दिवशी पाव्काने जेवढे खडतर श्रम केले तेवढे पूर्वी कधीही केले नव्हते. आपल्या घरी तो आईची अवज्ञा करू शकला असता, पण हे ठिकाण म्हणजे घर नव्हे याची त्याला पक्की जाणीव होती. त्या चकण्या वेटरने त्याला सज्जड दम देऊन सांगितले होते, की सांगितल्याप्रमाणे त्याने काम केले नसते तर त्याची कणीक तिंबली गेली असती.

धुराड्यावर आपला एक बूट ठेवून त्याचा भात्यासारखा उपयोग करून, पावेलने लौकरच त्या ढेरपोट्या समोवारांखाली जाळ पेटवला. खरकट्याने भरलेली बादली त्याने उकिरड्यावर नेऊन वेगाने मोकळी केली, पाण्याच्या बंबाखाली लाकडे सारली, गरम समोवारांवर बशा पुसून ओली झालेली फडकी वाळवली. थोडक्यात म्हणजे त्याला सांगितलेली सर्व कामे त्याने केली. त्या रात्री खूप उशिरा जेव्हा तो थकल्या-भागल्या अवस्थेत भटारखान्याकडे गेला तेव्हा त्याच्यामागे बंद होणाऱ्या दारावर नजर टाकीत बशा विसळणारी अनीस्या नांवाची मध्यमवयीन बाई म्हणाली: "हा पोरगा काही

वेगळाच दिसतो. कामाला कसा धावून जातो पहा. त्याला कामाला जुंपायला तसंच काही कारण असावं."

"कष्टाला चांगला आहे," फ्रोस्या म्हणाली. "त्याला दामटावं लागत नाही."

"लौकरच थंडावेल," लूशाने आपले मत दिले. "सुरुवातीला सगळेच जोसात असतात..."

सबंध रात्र उभ्याने काम करून पार शिणलेल्या पावेलने दुसऱ्या दिवशी सकाळी सात वाजता, त्याच्या जागी काम करायला आलेल्या मुलाच्या हाती उकळते समोवार सोपवले. फुगीर चेहऱ्याच्या त्या नव्या पोराने खवचट नजरेने उकळत्या समोवारांची एकदा पाहणी केली आणि सर्व काही ठीक असल्याची खात्री करून घेतल्यानंतर आपल्या खिशांमध्ये हात खुपसले व आपले श्रेष्ठत्व दाखविण्यासाठी तुच्छतेने दातांच्या फटीं-मधून तो पचकन थुंकला.

"ए शेंबड्या!" आपले रंगहीन डोळे पावेलवर रोखीत मग्रूर आवाजात तो म्हणाला. "उद्या सकाळी ठीक सहा वाजता इथं कामावर हजर झालं पाहिजे!"

"सहा वाजता का म्हणून?" पावेलला जाणून घ्यायचे होते. "पाळी सात वाजता बदलते ना?"

"पाळी केव्हा बदलते त्याच्या पंचायती तुला कशाला? तू इथं सहा वाजता ये. आणि जास्त वटवट करू नको, नाहीतर कवटी शेकून काढीन तुझी! आला मोठा शहाणा! आज नाही कामाला लागला तर एवढ्यात मिजास दाखवतो!"

बशा विसळणाऱ्या बायकांनी आपली कामाची पाळी नुकतीच संपवली होती आणि या दोन मुलांमधले संभाषण त्या मोठ्या कुतूहलाने ऐकत होत्या. त्या दुसऱ्या मुलाचा चढेल सूर आणि

धमकावण्याची रीत पाहून पावेल संतापला. त्याला छळणाऱ्या त्या मुलाच्या दिशेने त्याने एक पाऊल पुढे टाकले आणि आपल्या बुक्क्यांनी त्याला धोपटून काढायच्या बेतात तो होता, पण नव्याने मिळालेली नोकरी गमावण्याच्या भीतीने त्याने स्वत:ला आवरले.

"तुझा आवाज बंद कर," संतापाने निळाकाळा चेहरा झालेला पावेल त्या मुलाला म्हणाला, "आणि जरा जपून रहा, नाहीतर मामला महागात पडेल तुला. उद्या मी इथं सात वाजता येईन आणि तुझ्यासारख्या मलाही माझ्या हाताच्या मुठी चांगल्या वापरता येतात. चाखायचीय तुला गंमत? मी तयार आहे."

पावेलचा प्रतिस्पर्धी पावेलच्या या आक्रमक पवित्र्याने घाबरून बंबाच्या पाठीमागे सरला व आश्चर्याने त्याने आ वासला. असा जबरदस्त प्रतिटोला बसेल अशी त्याची अपेक्षा नव्हती.

"ठीक आहे, बघून घेऊ," तो गुरगुरला.

कोणतीही दुर्घटना न घडता कामाचा पहिला दिवस पार पाडून, खरीखुरी विश्रांती घेण्याचा आज आपला हक्क आहे अशा भावनेने पावेल घाईघाईने घरी परतला. आता तोसुद्धा कामगार होता आणि बांडगुळासारखा तो ऐतखाऊ जगतोय असा आरोप त्याच्यावर कुणी करू शकले नसते.

लाकूड कापण्याच्या गिरणीच्या लांबलचक पसरलेल्या इमारतींवर एव्हाना सकाळचा सूर्य चढला होता. लेश्चीन्स्की बागेच्या पाठच्या बाजूला पावेल ज्या छोट्याशा घरकुलात रहात होता ते आता दृष्टीस पडले असते.

"आई आत्ताच उठली असेल आणि मी कामावरून घरी



परततोय," पावेलच्या मनात विचार आला आणि शीळ घालत चालताना त्याच्या पावलांचा वेग वाढला. "शाळेतून हकालपट्टी झाली ते काही तितकंसं वाईट झालं नाही. त्या बेट्या पाद्र्यानं नाहीतरी मला कधी निवांतपणा दिला नसताच. आता जहन्नममध्ये का जाईना, मला त्याची पर्वा नाही. आणि त्या पिंगटकेशाचं..." घराच्या फाटकाचे दार उघडताना तो स्वतःशीच म्हणाला, "त्याचं थोबाड एकदा तरी चांगलं सडकून काढीन."

अंगणात समोवार पेटवीत असलेल्या त्याच्या आईने आपल्या मुलाला येताना पाहिले आणि अधीऱ्या स्वरात विचारले:

"कसं काय बाबा?"

"झकास," पावेल उत्तरला.

त्याची आई काहीतरी बोलण्याच्या बेतात होती तेवढ्यात उघड्या खिडकीमधून पावेलला आपल्या मोठ्या भावाच्या —आर्त्योमच्या— रुंद पाठीचे ओझरते दर्शन झाले.

"आर्त्योम घरी आलाय?" चिंतेच्या सुरात त्याने विचारले

"होय, काल रात्री तो आलाय. आता तो इथंच राहणाराय आणि रेल्वे यार्डात काम करणाराय."

काहीशा गोंधळल्या मनःस्थितीतच पावेलने पुढचे दार उघडले.

पावेलने घरात प्रवेश करताच दाराला पाठमोऱ्या बसलेल्या टेबलाजवळच्या माणसाने आपला प्रचंड देह वळवला. त्याच्या दाट काळ्या भुवयांखालचे डोळे कठोर दिसत होते.

"अरे वा, तंबाखूवाले चिरंजीव आले का! कसं काय घडलं?"

आगामी मुलाखतीची पावेलला धास्ती वाटत होती.

"म्हणजे आर्त्योमला सारं आधीच समजलंय तर," त्याच्या मनात विचार आला. "आता हा मला जोडयानं बडवून काढणार." आपल्या मोठ्या भावाला किंचित भिऊनच पावेल उभा राहिला.

पण त्याला चोपून काढण्याचा आर्त्योमचा इरादा दिसला नाही. टेबलावर दोन्ही हातांचे कोपरे टेकून तो स्टुलावर बसून पावेलचा चेहरा निरखीत राहिला. कुतूहल आणि तिट-कारा अशा दोन्ही भावनांचे चमत्कारिक मिश्रण आर्त्योमच्या मुद्रेवर उमटले होते.

"अच्छा, विद्यापीठातून शिकून बाहेर पडलास काय? तिथं काय शिकायचं ते शिकून संपलं म्हणून आता खरकटी काढतोस काय?"

तक्तपोशीमधून वर आलेल्या एका खिळ्याकडे टक लावून पहात पावेल उभा राहिला. आर्त्योम टेबलापासून उठला आणि स्वयंपाकघरात गेला.

"आज अजिबात मार मिळणार नाही असं दिसतंय," सुटकेचा निश्वास टाकीत पावेलने विचार केला.

नंतर चहा पिताना आर्त्योमने पावेलला शाळेतील घटने-बद्दल विचारले. जे काही घडले होते ते सर्व पावेलने त्याला सांगितले.

"मोठेपणी असा उनाडटप्पू निघालास तर कसं होईल तुझं?" आई खिन्नपणे म्हणाली. "या मुलाचं काय करावं बरं? हा कोण होईल काही समजत नाही बाई! परमेश्वरा, या मुलापासून मी किती मनस्ताप सोसला!" तक्रारीच्या सुरात ती म्हणाली.

आर्त्योमने आपला रिकामा कप दूर सारला आणि तो पावेलकडे वळला.

"हे बघ बंधू," तो म्हणाला. "जे केलं ते केलं. आता यापुढं तरी काळजी घे आणि माकडचेष्टा न करता आपलं काम व्यवस्थित कर. जर तुला कामावरून डिच्चू मिळाला तर तुझी पाठ सोलून काढीन. लक्षात ठेव. आधीच तू आईला भरपूर त्रास दिला आहेस. नेहमी काही ना काही भानगड करून ठेवतोस. आता हे सारं थांबवलं पाहिजे. वर्षभर काम केलंस म्हणजे रेल्वे यार्डात उमेदवार म्हणून तुला काम मिळवून द्यायचा मी प्रयत्न करीन, कारण आयुष्यभर खरकटी भांडी धूत बसलास तर कुठंच पोचणार नाहीस. तुला काहीतरी धंदा शिकला पाहिजे. आत्ता तू वयानं फार लहान पडतोस, पण वर्षाभरात काय करता येईल ते पाहतो. कदाचित ते तुला घेतील. आता मी इथंच काम करणार आहे. आईला आता कुठं कामासाठी जायची गरज पडणार नाही. सगळ्या प्रकारच्या डुकरांसाठी ती आत्तापर्यंत भरपूर राबलीय. पावेल, आता यापुढं पुरुषासारखं वाग."

तो उभा राहिला तेव्हा त्याच्या धिप्पाड आकृतीपुढे सारे काही थिटे भासू लागले. खुर्चीवर लोंबकळणारे जाकीट त्याने अंगात चढवले आणि आपल्या आईला तो म्हणाला: "मला काही कामासाठी तासभर बाहेर गेलं पाहिजे," आणि दारातून वाकून तो बाहेर गेला.

फाटकाकडे जाताना खिडकीपाशी जेव्हा तो पोचला तेव्हा त्याने आत पाहिले व पावेलला उद्देशून तो म्हणाला: "तुला बुटांची जोडी आणि एक चाकू आणलाय. आई देईल तुला त्या वस्तू."

स्टेशनवरचे रेस्तराँ रात्रंदिवस उघडे असायचे.

त्या जंक्शनपाशी पाच वेगवेगळे लोहमार्ग येऊन मिळत होते आणि स्टेशनात लोकांची कायम गर्दी खचलेली असायची. फक्त रात्रीचे दोन-तीन तास दोन गाड्यांच्या दरम्यानचा वेळ तेवढा थोडा निवांत असायचा. या स्टेशनामधून शेकडो गाड्या आल्या-गेल्या होत्या. त्यांनी आघाडीवरून पंगू आणि लंगडी माणसे आणली होती व एकसारख्या दिसणाऱ्या करड्या रंगाच्या मोठ्या पायघोळ कोटांमधल्या नव्या माणसांचा सतत ओघ आघाडीकडे घेऊन जात होत्या.

पावेलने तेथे दोन वर्षे काम केले. त्या दोन वर्षांत धुण्या-भांड्याची खोली आणि भटारखाना यांच्याशिवाय त्याने दुसरे काहीही पाहिले नाही. तळघरातल्या त्या प्रचंड भटारखान्या-मध्ये काम करणारी सुमारे वीस माणसे अखंड घाईत राबत असत. रेस्तराँ आणि भटारखाना यांच्या दरम्यान दहा वेटर सतत पुढे-मागे धावपळ करीत असत.

एव्हाना पावेलला महिन्याला आठाऐवजी दहा रूबल मिळू लागले होते. या दोन वर्षांत तो अधिक उंच आणि थोराड बनला होता. अनेक अवघड प्रसंग त्याच्यावर गुदरले होते. अर्धे वर्ष त्याने भटारखान्यात काम केले, पण तिथे सर्व अधिकार गाजविणाऱ्या मुख्य भटाऱ्याची त्याच्यावर गैरमर्जी झाली आणि पावेलची परत धुण्या-भांड्याच्या खोलीत पाठवणी झाली. बंडखोर छाव्याला तुम्ही सतत मारपीट करीत राहिलात तर कधी तो तुमच्या छातीत सुरा खुपशील ते काय सांगता येतंय! खरे म्हणजे पावेलच्या रागीट स्वभावामुळे त्याची नोकरी केव्हाच त्याने गमावली असती, पण अफाट कष्ट करण्याच्या त्याच्या गुणामुळे तो टिकून राहिला

होता. इतर कुणाहीपेक्षा तो अधिक काम करायचा आणि कधीही दमलेला दिसायचा नाही.

गर्दीच्या वेळी भरलेले ट्रे घेऊन भटारखान्याच्या जिन्यावरून एखाद्या भिरभिऱ्यासारखा तो वेगाने वर-खाली फेऱ्या करायचा, एकेका ढांगेत अनेक पायऱ्या पार करायचा.

रात्रीच्या वेळी रेस्तराँच्या दोन्ही दालनांमधली गर्दी ओसरली म्हणजे खालच्या मजल्यावरील भटारखान्याच्या कोठीच्या खोलीत सगळे वेटर एकत्र गोळा व्हायचे आणि बेफाम पत्त्यांचे डाव सुरू व्हायचे. टेबलांवर पैशाचे मोठमोठे ढीग पडलेले पावेल काही वेळा पहायचा. पण त्याचे त्याला आश्चर्य वाटत नसे, कारण रूबल-अर्धा रूबल करीत कामाच्या एका पाळीत तीस ते चाळीस रूबलपर्यंत एक एक वेटर बक्षिसी मिळवीत असे, हे त्याला माहीत होते. ते वेटर हा पैसा दारू पिण्यात व जुगारात उधळीत. पावेलला त्यांच्याबद्दल तिरस्कार वाटे.

"डुक्कर आहेत साले!" त्याच्या मनात विचार येई. "आर्त्योमसारख्या उत्तम मेकॅनिकला तिकडे अख्ख्या महिन्याला फक्त अठ्ठेचाळीस रूबल पगार मिळतो आणि मला दहा मिळतो. आणि हे लेकाचे नुसते ट्रे नेण्या-आणण्यासाठी एका दिवसात तेवढे पैसे उकळतात नि दारू-जुगारात सगळेच्या सगळे उधळून टाकतात."

पावेलच्या दृष्टीने त्याच्या मालकांप्रमाणेच हे वेटरही तेवढेच परके होते आणि त्याचे वैरी होते. "डुक्कर साले इथं लाचारासारखे पोटांवर सरपटतात आणि तिथं त्यांची बायका-मुलं श्रीमंताची ऐट आणून मिरवतात."

काही वेळा त्या वेटर लोकांची मुले जिम्नाशियमचे रुबाबदार

गणवेष घालून यायची, तर सुखवस्तू जीवनामुळे गुबगुबीत आणि गोंडस दिसणाऱ्या त्यांच्या बायका काही वेळा यायच्या. "हे वेटर ज्या लोकांची सेवा बजावतात त्या लोकांपेक्षा यांच्याकडं नक्की जास्त पैसे असले पाहिजेत," पावेलच्या मनात विचार येई. रात्रीच्या वेळी भटारखान्याच्या किंवा कोठीच्या अंधाऱ्या कोपऱ्यांमध्ये जे काही चालत असे, त्याचाही आता या मुलावर परिणाम होईनासा झाला. ज्यांच्या हाती तेथे सत्ता होती त्यांच्यासाठी काही रूबलना शरीरविक्रय केल्याविना एकाही भांडी धुणारीला किंवा सेविकेला आपली नोकरी फार काळ टिकवता येत नाही, हेसुद्धा त्याला माहीत झाले होते.

जीवनाबद्दल कुतूहल असणाऱ्या पावेलला त्याच्या अगदी खालच्या तळाचे ओझरते दर्शन घडले; त्याचे कुरूप डबके नेमके पहायला मिळाले; तिथली कुबट, बुरसटलेली दुर्गंधी, तिथल्या दलदलीतल्या घाणीचा वास त्याच्यापर्यंत येऊन पोचला.

रेल्वे यार्डात शिकाऊ उमेदवार म्हणून पावेलची नेमणूक करून घेणे आर्त्योमला जमले नाही. पंधरा वर्षांच्या आतल्या मुलांना तेथे घेत नव्हते. पण रेल्वे यार्डाच्या त्या प्रचंड काजळी धरलेल्या विटकरी इमारतीकडे पावेल आकर्षित झाला होता व रेस्तराँमधून बाहेर पडण्याच्या संधीची वाट पहात होता.

आर्त्योमला भेटायला तो वारंवार यार्डामध्ये जात असे. त्याच्याबरोबर तो आगगाडीचे डबे पहायला जाई, कधीमधी जमेल त्याप्रमाणे त्याला मदत करी.

फ्रोस्या काम सोडून गेल्यानंतर तर त्याला फारच एकाकी वाटू लागले. ती आनंदी, हसरी मुलगी तेथून जेव्हा गेली तेव्हा तिच्या मैत्रीचे खरे मोल त्याला कळून आले होते. आता

सकाळच्या वेळी तो जेव्हा धुण्या-भांड्याच्या खोलीत कामाला येत असे आणि निर्वासित बायकांची कर्कश्य सुरातली भांडणे ऐकत असे तेव्हा त्याला रितेपणाची व एकाकीपणाची भावना अधिक तीव्रतेने बोचू लागे.

रात्रीच्या वेळी थोडा निवांतपणा लाभला तेव्हा त्याने बंबाखाली थोडी लाकडे टाकली व त्यांच्या ज्वालांकडे टक लावून तो बघत बसला. बंब छान तापला होता. धुण्या-भांड्याच्या खोलीत कुणीही नव्हते. फ्रोस्याबद्दलचे विचार त्याच्या मनात येऊ लागले आणि अलिकडेच घडलेला प्रसंग त्याच्या मनःचक्षूंसमोर उभा राहिला.

शनिवारी रात्री विश्रांतीच्या वेळात पावेल खाली भटारखान्याच्या दिशेने निघाला होता. पण जाता जाता सर्पणाच्या लाकडांच्या ढिगावरून खालच्या माळ्यावरच्या कोठीत डोकावून पहायची त्याला सहज इच्छा झाली. जुगारी बहुधा तिथे जमा होत असत.

तिथे डाव रंगात आला होता. उत्तेजित झाल्यामुळे तांबडा-बुंद झालेला झालिवानोव तेथे पैसे सांभाळीत होता.

तेवढ्यात जिन्यावर कुणाचीतरी पावले वाजली. पावेलने वळून पाहिले तेव्हा प्रोखोश्का खाली येत असलेला त्याला दिसला. तो भटारखान्यात जाईपर्यंत पावेल चटकन जिन्यामागे दडला. पायऱ्यांखाली अंधार होता आणि प्रोखोश्काच्या नजरेला तो पडला नाही.

जिन्याच्या वळणावरून प्रोखोश्का पुढे गेला तेव्हा पावेलला त्याची रुंद पाठ आणि भलेमोठे डोके ओझरते दिसले. इतक्यात त्या वेटरपाठोपाठ कुणाची तरी हलकी पावले चटचट

वाजली व पावेलच्या कानी परिचित आवाज ऐकू आला :

"प्रोखोश्का, थांब!"

प्रोखोश्का थांबला आणि त्याने मागे जिन्यावर वळून पाहिले.

"काय पाहिजे तुला?" तो गुरगुरला.

झरझर पायऱ्या उतरल्याचा आवाज आला व लौकरच फ्रोस्या दृष्टिपथात आली.

तिने वेटरच्या दंडाला धरले व ती दबत्या, घुसमटत्या आवाजात बोलू लागली.

"लेफ्टनंटनं तुला दिलेले पैसे कुठं आहेत प्रोखोश्का?"

त्या वेटरने झटका मारून आपला दंड तिच्यापासून सोडवून घेतला.

"कसले पैसे? मी तुला दिले नाहीत का?" त्याचा स्वर तिखट आणि दुष्टाव्याने भरलेला होता.

"पण त्यानं तुला तीनशे रूबल दिले होते," फ्रोस्या हुंदके दाबत रडवेल्या आवाजात म्हणाली.

"किती दिले त्यानं? तीनशे!" प्रोखोश्का उपहासाने उद्गारला. "तुला सगळे पैसे पाहिजेत काय? माझ्या लाडके, बशा विसळणारीला ही जरा वरची उडी नाही काय? तुला मी पन्नास दिले तेच रग्गड होते. तुझ्यापेक्षा चांगल्या थोबाडाच्या आणि शिकल्यासवरलेल्या पोरीसुद्धा जास्त घेत नाहीत. तुला जे मिळालं त्यातच समाधान मानायला पाहिजे होतंस— एका रात्रीला रोख पन्नास रूबल म्हणजे काही वाईट नाही. ठीक आहे, मी तुला आणखी दहा-वीस जास्त देईन, बस्स! आणि मूर्ख नसलीस तर आणखी कमावशील. मी तुला मदत करीन." एवढे बोलून प्रोखोश्का वळला आणि भटारखान्यात गायब झाला.

"नीचा! हलकट डुकरा!" किंचाळत फ्रोस्या त्याच्यामागे धावली आणि लाकडांच्या ढिगाशी टेकून हमसाहमशी हुंदके देऊ लागली.

लाकडाच्या ओंडक्यांवर फ्रोस्या आपले कपाळ बडवून घेत होती तेव्हा जिन्याखाली अंधारात उभे राहून तिच्याकडे पाहणाऱ्या पावेलला काय वाटत होते त्याचे वर्णन करणे अवघड आहे. पण तो पुढे झाला नाही. फक्त त्याच्या थरथरणाऱ्या हाताच्या बोटांनी जिन्याचा लोखंडी कठडा गच्च आवळून धरला होता.

"म्हणजे लेकाच्यांनी हिलासुद्धा विकलं तर! हरामखोर साले! बिच्चारी फ्रोस्या..."

प्रोखोश्काबद्दल त्याला वाटणारा तिटकारा अधिकच वाढला. भोवतालच्या सर्व गोष्टींबद्दल त्याला जबरदस्त घृणा वाटू लागली. "जर अंगी बळ असतं तर त्या पाजी माणसाला मरेपर्यंत पिटला असता! आर्त्योमसारखा मी का मोठा आणि भक्कम नाही?"

बंबाखालच्या ज्वाला भडकल्या होत्या. त्यांच्या लवलवत्या लाल जिभांच्या आलिंगनांमधून निळसर वेटोळी उमटत होती. जणू कुणी खिजवणारे, चिडवणारे भूत आपली जीभ वेडावून दाखवीत आहे असे पावेलला वाटले.

खोलीत शांतता होती. फक्त पेटणाऱ्या लाकडांचा कडकड आवाज होत होता आणि ठराविक वेळेच्या अंतराने नळामधून पाणी ठिपकत होते.

अगदी चकचकीत होईपर्यंत घासलेले भांडे क्लीम्‌काने फडताळावर ठेवले आणि आपले हात पुसले. भटारखान्यात दुसरे कुणीही नव्हते. कामावरचा आचारी आणि त्याचा मदतनीस

सामानाच्या खोलीत झोपले होते. आता रात्रीचे तीन तासपर्यंत भटारखान्यात शांतता नांदणार होती. हे तीन तास क्लीम्का वरच्या मजल्यावर पावेलबरोबर घालवीत असे. भटारखान्यात काम करणाऱ्या या पोरात आणि बंब तापवणाऱ्या काळया डोळयांच्या पावेलमध्ये मैत्री निर्माण झाली होती. खुल्या शेकोटीपढे पावेल उकिडवा बसलेला वरच्या मजल्यावर क्लीम्काला आढळला. भिंतीवर त्याची परिचित वेडीवाकडी सावली पडलेली पावेलने पाहिली आणि मागे वळून न पाहताच तो म्हणाला:

"बैस क्लीम्का."

क्लीम्का लाकडाच्या ढिगावर चढला, त्याच्यावर त्याने अंग पसरले व गप्प बसून राहिलेल्या पावेलकडे पाहिले.

"आगीत बघून भविष्य पाहतोयस?" त्याने हसत विचारले.

आगीच्या लवलवत्या जिभांवर रोखलेली आपली नजर कष्टाने वळवून पावेलने क्लीम्काकडे पाहिले. त्याच्या दोन्ही टपोऱ्या चकचकत्या डोळयांमध्ये दुःख काठोकाठ भरले होते. क्लीम्काने आपल्या मित्राला एवढे उदास कधी पाहिले नव्हते.

"पावेल, काय झालं रे आज?" थोडा वेळ थांबून त्याने विचारले: "काही घडलं का?"

पावेल उठला आणि क्लीम्काजवळ बसला.

"काहीही घडलं नाही," खालच्या आवाजात तो उत्तरला. "पण क्लीम्का, मला इथं राहणं आता सहन होत नाही." पायाच्या ढोपरांवरच्या त्याच्या हातांच्या मुठी वळल्या.

"आज झालंय काय तुला?" हाताच्या कोपरांवर ओणवे होत क्लीम्काने पुन्हा खोदून विचारले.

"आज? मला काम मिळाल्या दिवसापासून हे असंच चाललंय. जरा बघ तरी या जागेकडं! आपण घोड्यांसारखं राबतोय आणि चार चांगल्या शब्दाऐवजी मिळतात दणके! कुणीही तुम्हाला बडवू शकतो आणि अशावेळी कुणीही मदतीला धावत नाही. मालक लोक आपल्या सेवेसाठी आम्हाला नोकरीवर ठेवतात, पण कुणीही आडदांड आपल्याला पिटू शकतो. तुम्ही अगदी गरीब कोकरासारखं वागला तरी प्रत्येकालाच खूष ठेवू शकत नाही आणि ज्यांना तुम्ही खूष करीत नाही ते तुमच्यावर वचपा काढतात. कुणीही तुमच्यात खोड काढू नये म्हणून तुम्ही कितीही चोख वागायचा प्रयत्न केलात, तरी कुणालातरी तुमची सेवा थोडी उशीरा मिळते आणि तुम्ही त्याबद्दल थपडा खाता..."

"असा ओरडू नको," घाबरून क्लीम्काने त्याला मध्येच अडवले. "कुणीतरी इथं येईल आणि तुझं बोलणं ऐकील."

पावेल झटकन उडी मारून उभा राहिला.

"खुशाल ऐकू देत. नाहीतरी मी इथून काम सोडून जाणारच आहे. इथं रखडण्यापेक्षा फावड्यानं रस्त्यावरचा बर्फ साफ करीन... इथल्या बिळात सगळे नंबरी चोर भरलेत. त्यांना मिळणारा पैसा बघ! आपल्याला ते उकिरड्यावरच्या घाणीसारखं वागवतात आणि पोरींशी मनाला येईल तसं वागतात. त्यांच्या मनासारखं न वागणाऱ्या चांगल्या मुलींना कामावरून हाकलून लावतात आणि ज्यांना कुठं जायला थारा नाही अशा उपाशीपोटी राहणाऱ्या निर्वासितांना त्यांच्या जागी कामावर घेतात. आणि तशा मुली इथं राहतात कारण त्यांना निदान काहीतरी खायला मिळतं. त्यांची एवढी हलाखी

असते की, भाकरीच्या चतकोर तुकड्यासाठी काय वाट्टेल ते करायची त्यांची तयारी असते."

पावेल मोठ्या आवेशाने बोलत होता. त्याचे तावातावाने चाललेले बोलणे पलिकडे कुणाच्या कानी पडेल या भीतीने क्लीम्काने धावत जाऊन भटारखान्याकडचे दार चटकन लावून घेतले. पावेल आपल्या मनातली मळमळ भडाभडा ओकून टाकत होता.

"आणि क्लीम्का, तू मुकाट बसून सारा मार खातोस. उलटून कधी बोलत का नाहीस?"

टेबलाशेजारच्या एका स्टुलावर पावेल धपकन बसला आणि थकून जाऊन आपल्या हाताच्या पंजावर त्याने डोके टेकवले. क्लीम्काने आगीत थोडी लाकडे टाकली आणि तोही टेबलाशी बसला.

"आज आपण वाचायचं नाही?" त्याने पावेलला विचारले.

"वाचायला काही शिल्लक नाही," पावेल उत्तरला. "पुस्तकाचं दुकान बंद आहे."

"आज का बरं बंद आहे?" नवल करीत क्लीम्काने विचारले.

"पुस्तकं विकणाऱ्याला पोलिस घेऊन गेले. त्याच्याजवळ काहीतरी सापडलं," पावेल उत्तरला.

"घेऊन गेले? कशाला?"

"राजकारणासाठी म्हणे!"

पावेलचे बोलणे न समजल्यामुळे क्लीम्का त्याच्याकडे आ वासून एकटक बघत राहिला.

"राजकारण? हे काय असतं?"

पावेलने खांदे उडवले.

"कुणास ठाऊक! झारच्या विरुद्ध वागलात म्हणजे त्याला राजकारण म्हणतात."

क्लीम्का दचकला.

"माणसं असलं काही करतात?"

"मला ठाऊक नाही," पावेल उत्तरला.

दरवाजा उघडला गेला आणि झोपेने पेंगुळलेल्या डोळयांच्या पापण्या सुजलेली ग्लाशा भांडी धुण्याच्या खोलीत आली.

"तुम्ही दोघं झोपत का नाही? आगगाडी यायला अजून तासभर अवकाश आहे. पावेल, तू थोडी विश्रांती घे. तोपर्यंत बंबाकडं मी पाहते."

अपेक्षेपेक्षा खूपच लौकर आणि अगदी वेगळयाच प्रकारे पावेलने नोकरी सोडली.

जानेवारीतल्या कडाक्याच्या थंडीतला तो दिवस होता. पावेलने आपली कामाची पाळी पुरी केली होती आणि तो घरी जायच्या तयारीत होता. पण तेवढ्यात त्याला आढळले की, त्याला कामातून मोकळे करणारा मुलगा आलाच नव्हता. पावेल मालकिणीकडे गेला आणि त्याने सांगितले की, कोणत्याही परिस्थितीत तो घरी जाणार होता. मालकीण त्याचे काही केल्या ऐकेना. अख्खा दिवस आणि अख्खी रात्र काम केल्यामुळे पावेल कमालीचा शिणला होता. पण काम पुढे चालू ठेवण्याविना त्याच्यापुढे दुसरा पर्याय नव्हता. संध्याकाळच्या सुमाराला तर तो अतिश्रमांनी खाली कोसळायच्या बेतात होता. रात्रीच्या फुरसतीच्या वेळात त्याला पाण्याचे बंब भरून तीन वाजताच्या आगगाडीसाठी पाणी उकळून ठेवणे भाग होते.

पावेलने नळाची तोटी फिरवली पण त्याला पाणीच नव्हते. पंप चालत नव्हता हे उघड होते. तोटी तशीच उघडी ठेवून तो शेजारच्या लाकडाच्या ढिगावर थोडासा लवंडला, पण त्याला एवढे विलक्षण श्रम झाले होते की, तात्काळ त्याला झोपेने घेरले.

काही मिनिटांनंतर नळामधून घरघराट आणि फुसफुसाट झाला व बंबात पाणी पडू लागले. लौकरच बंब पूर्ण भरून पाणी खाली वाहू लागले आणि त्या घटकेला चिटपाखरू नसलेल्या धुण्या-भांड्याच्या खोलीच्या फरशीवरून पाण्याचे ओघळ धावू लागले. सारी फरशी पाण्याने झाकली गेली व दाराच्या फटीतून पाणी पलिकडच्या रेस्तराँमध्ये झिरपू लागले.

घोरणाऱ्या प्रवाशांच्या पिशव्यांखाली आणि गाठोड्यांखाली पाण्याची थारोळी साचली, पण कुणालाच काहीही पत्ता नव्हता. अखेरीस फरशीवर झोपलेल्या एका प्रवाशाच्या अंगाखाली पाणी गेले तेव्हा दचकून त्याने उडी मारली व तो ओरडू लागला. सामान उचलण्यासाठी प्रवाशांची एकच धांदल उडाली. एकच दंगा माजला.

तरी अजून पाण्याचा लोंढा वहातच होता.

दुसऱ्या दालनात प्रोखोश्का त्यावेळी टेबले साफ करीत होता. गोंधळ ऐकून तो धावत आला. पाण्याच्या ओहोळां-मधून उड्या मारीत त्याने दार गाठले व जोराने त्यावर धक्का मारला. त्यासरशी दारामागे अडून राहिलेल्या पाण्याचा जोरदार लोट दालनात घुसला.

आणखीच ओरडा वाढला. कामावरचे वेटर धुण्या-भांड्याच्या खोलीत धावले. प्रोखोश्काने झोपलेल्या पावेलवर झडप घातली.

त्या मुलाच्या डोक्यावर बुक्क्यांचा वर्षाव झाला. त्याला काय घडले ते उमजेना.

अजूनही अर्धवट झोपेत असल्यामुळे तेथे काय घडले होते त्याची त्याला कल्पनाच येत नव्हती. डोक्यावरच्या जोरदार प्रहारांमुळे त्याच्या डोळ्यांसमोर काजवे मात्र चमकत होते आणि त्याच्या शरीरामधून असह्य वेदनांच्या कळा जात होत्या.

पावेलला एवढे भयंकर मारले होते की आपल्या घरापर्यंत तो कसाबसा खुरडत गेला.

गंभीर चेहरा केलेल्या व कपाळाला संतापाने आठ्या घातलेल्या आर्त्योमने आपल्या भावाला काय काय घडले त्याची सकाळी विचारणी केली.

पावेलने त्याला इत्थंभूत वृत्तांत सांगितला.

"तुला कुणी मारलं?" घोगऱ्या आवाजात आर्त्योमने विचारले.

"प्रोखोश्कानं."

"ठीक आहे. आता गप्प पडून रहा."

त्यानंतर एकही शब्द न उच्चारता आर्त्योमने आपले जाकीट अंगात घातले व तो बाहेर गेला.

"प्रोखर वेटर मला कुठं भेटेल?" बशा विसळणाऱ्या मुलींपैकी ग्लाशाला आर्त्योमने विचारले.

"आत्ता इथं येईल तो," ती उत्तरली.

दाराच्या खांबाला आपले भव्य शरीर टेकवून आर्त्योम उभा राहिला.

"ठीक आहे, मी थांबतो."

ट्रे वरील बशांचा डोंगर पेलीत प्रोखर लाथेने दार उघडून आत आला.

"तो बघ," ग्लाशाने मानेनेच वेटरकडे इशारा केला.

आर्त्योमने एक पाऊल पुढे टाकले आणि आपल्या भक्कम पंजाची प्रोखरच्या खांद्यावर पकड घालून थेट त्याच्या नजरेला नजर भिडवली.

"पाव्‌काला, माझ्या भावाला तू कशासाठी मारलंस?"

प्रोखरने आपला खांदा सोडवून घ्यायचा प्रयत्न केला, पण एका जबरदस्त गुद्द्याने तो जमिनीवर आडवा झाला. त्याने उठायचा प्रयत्न केला, पण पहिल्याहूनही जबरदस्त असा दुसरा प्रहार होताच तो पालथा पडला.

बशा विसळणाऱ्या मुली घाबरून सैरावैरा धावल्या.

आर्त्योम मागे फिरला आणि बाहेर निघून गेला.

प्रोखोश्का जमिनीवर पालथा पडला होता आणि त्याच्या फुटलेल्या तोंडातून रक्त वहात होते.

त्या संध्याकाळी आर्त्योम रेल्वे यार्डातून घरी परत आला नाही.

त्याला पोलिसांनी पकडल्याचे त्याच्या आईला समजले.

सहा दिवसांनंतर आर्त्योम रात्रीचा खूप उशिरा परत आला. आई तेव्हा झोपलेली होती. बिछान्यात उठून बसलेल्या पावेल-पाशी तो गेला आणि हळुवारपणे म्हणाला:

"आता बरं वाटतंय का रे मुला?"

आर्त्योम पावेलच्या शेजारीच बसला. "याहूनही वाईट घडलं असतं." क्षणाच्या स्तब्धतेनंतर तो पुढे म्हणाला: "काही काळजी करू नको. वीज केंद्रात काम करायला जा. त्यांना



मी तुझ्याबद्दल बोललोय. तुला तिथं खरं कसब शिकायला मिळेल."

आर्त्योमच्या भक्कम हाताला पावेलने आपल्या दोन्ही हातांनी गच्च पकडले.

प्रकरण दुसरे

त्या छोट्या गावात एखाद्या वावटळीसारखी बातमी पसरली: "झारला उलथून टाकलं होतं!"

गावकऱ्यांचा या बातमीवर विश्वास बसत नव्हता.

मग एका वादळी हिवाळी दिवशी स्टेशनात एक आगगाडी हळूहळू आली. लष्करी मोठ्या कोटातले, खांद्यावर रायफली लटकावलेले दोन विद्यार्थी आणि दंडाला तांबड्या फिती बांधलेली क्रांतिकारक सैनिकांची एक तुकडी फलाटावर उतरली. त्यांनी स्टेशनवरच्या रक्षकांना, एका म्हाताऱ्या कर्नलला व ठाणबंद सेनेच्या प्रमुखाला अटक केले. आता मात्र गावकऱ्यांचा बातमीवर विश्वास बसला. बर्फभरल्या रस्त्यांवरून हजारो लोकांची शहरातल्या चौकाकडे रीघ लागली.

स्वातंत्र्य, समता, बंधुता हे नवे शब्द त्यांनी उत्सुकतेने जाणून घेतले.

त्यानंतरचे दिवस मोठे खळबळीचे होते. वातावरण उत्तेजक बनले होते, उत्सव साजरा होत होता. मग एक प्रकारची शांतता पसरली. टाऊन हॉलवर फडकणारा लाल झेंडा तेवढा झालेल्या स्थित्यंतराची आठवण देणारी एकमेव खूण होता. मेन्शेविकांनी आणि बुंदच्या अनुयायांनी टाऊन हॉलमध्ये

आपले ठाण मांडले होते. बाकी सर्व काही पूर्वीप्रमाणेच राहिले होते.

हिवाळ्याच्या अखेरीस घोडदळी शिपायांच्या एका रेजिमेंटने शहरात मुक्काम टाकला. सकाळच्या प्रहरी ते गटा-गटांनी फेरफटक्याला बाहेर पडत आणि नैऋत्य आघाडीवरून पळून आलेल्या सैनिकांचा रेल्वे स्टेशनावर शोध घेत.

ते शिपाई चांगले भले मोठे धिप्पाड बांध्याचे आणि गुबगुबीत चेहऱ्यांचे होते. त्यांचे बहुतेक अधिकारी उमराव किंवा जहागीरदार होते. त्यांच्या खांद्यांवर सोनेरी पट्टे होते आणि तुमानींवर चंदेरी सळ्या होत्या. हा वेष थेट झारच्या काळातलाच होता. जगाच्या दृष्टीने जणू काही क्रांती घडलीच नव्हती.

१९१७ साल उलटले. पावेल, क्लीम्का आणि सेर्गेई ब्रुझ्झाक यांच्या दृष्टीने काहीच बदलले नव्हते. मालक अद्याप तेथेच होते. पण नोव्हेंबरच्या दरम्यान काहीतरी वेगळे घडायला आरंभ झाला. नव्या प्रकारची माणसे स्टेशनावर उतरली आणि त्यांनी वातावरण हलवायला आरंभ केला. सतत वाढत चाललेल्या त्यांच्या संख्येत युद्धआघाडीवरचे सैनिक जास्त होते आणि "बोल्शेविक" असे काहीसे नवीनच नांव त्यांनी घेतले होते.

ते दुमदुमणारे, वजनदार नांव कुठून आले त्याची कुणालाच माहिती नव्हती.

लष्करातून पळालेल्यांना अडकवून ठेवणे शिपायांना जास्त जास्त अवघड जाऊ लागले. रायफलींचा कडकडाट आणि फुटलेल्या काचांचा खळखळाट स्टेशनाच्या आवारात वारंवार ऐकू येऊ लागला. युद्धआघाडीवरून सैनिक गटा-गटांनी परतत

होते व त्यांना अडवल्यास बागनेटांनिशी लढत होते. डिसेंबरच्या आरंभी तर आगगाड्या भरभरून त्यांचे लोंढे येऊ लागले.

पळून आलेल्या सैनिकांना अडवण्याच्या हेतूने शिपाई मोठ्या जोरात स्टेशनावर येत, पण त्यांच्यावर मशिनगनमधून भडिमार होत असे. रेल्वेच्या डब्यांमधून बाहेर पडणारे लोक प्राणांतिक जखमा झालेले असत.

युद्धआघाडीवरचे करड्या कोटांमधले सैनिक शिपायांना परत शहरात पिटाळून लावीत, मग स्टेशनकडे परतत आणि आपला पुढचा मार्ग धरीत. अशा आगगाड्या एका पाठोपाठ भरभरून जात होत्या.

१९१८ च्या वसंतामधला एक दिवस. सेर्गेई ब्रुझ्झाकच्या घरून ती तीन पोरे पत्ते कुटून निघाली आणि वाटेत कोर्चागिनच्या बागेत गवतावर लोळण घेऊन हुंदडत होती. त्यांना विलक्षण कंटाळा आला होता. नेहमीच्या सर्व उद्योगांचा अगदी वीट आला होता आणि काहीतरी खास मजेने दिवस कसा घालवायचा याचा ती तिघे विचार करीत होती तोच पाठीमागच्या बाजूस त्यांना घोड्याच्या टापांचा खडखडाट ऐकू आला व एक घोडेस्वार रस्त्यावरून दौडत येत असलेला त्यांनी पाहिला. एकाच झेपेत घोड्याने रस्ता व बागेचे छोटे कुंपण यांच्या दरम्यानचा नाला ओलांडला. त्या घोडेस्वाराने पावेल व क्लीम्काच्या दिशेने चाबूक हलवून जवळ येण्याचा इशारा केला.

"ए पोरांनो, इकडं या!"

पावेल आणि क्लीम्का टणकन उडी मारून उठले व

कुंपणाकडे धावले. घोडेस्वार संपूर्ण धुळीने माखला होता. डोक्यावर त्याने मागे सारलेल्या टोपीवर व त्याच्या खाकी सदऱ्यावर आणि तुमानीवर धुळीचा करडा जाड थर बसला होता. त्याच्या भक्कम सैनिकी कमरपट्ट्यामधून एक अनेकबारी पिस्तूल व दोन जर्मन हातबाँब लटकत होते.

"पोरांनो, मला प्यायला पाणी देता?" घोडेस्वाराने त्यांना विचारले. पाण्यासाठी पावेल जेव्हा सुसाट घरात धावला तेव्हा सेर्गेई टक लावून घोडेस्वाराला पहात बसला. घोडेस्वाराने सेर्गेईला विचारले: "मुला, तुमच्या गावात प्रमुख कोण आहे सांग बघू?"

सेर्गेईने एका दमात सर्व स्थानिक बातम्या त्या नवागताला सांगितल्या.

"दोन आठवडे गावात प्रमुख कुणीच नाही. होमगार्डांचं आता नवं सरकार आहे. रात्रीच्या वेळी गावचे लोकच आळी-पाळीनं गस्त घालतात. तुम्ही कोण आहात हो?" सेर्गेईने त्याला उलट प्रश्न विचारला.

"अरे एवढ्या चौकशा करू नकोस, नाहीतर लौकर म्हातारा होशील," घोडेस्वार हसून म्हणाला.

पाण्याचे भांडे हाती घेऊन पावेल घरातून धावत आला.

घोडेस्वाराने घाईघाईने एका घोटात भांडे रिकामे केले आणि पावेलला परत केले. मग लगाम खेचून त्याने टाच मारली व देवदाराच्या जंगलाकडे तो दौडत गेला.

"कोण होता तो?" पावेलने क्लीम्काला विचारले.

"मला काय ठाऊक?" खांदे उडवीत क्लीम्का उत्तरला.

"सरकार पुन्हा बदलणार असं दिसतंय. म्हणून लेश्चीन्स्की कुटुंब काल गांव सोडून गेलं. आणि श्रीमंत माणसं पळायला

लागलीत याचा अर्थ गनिमी सैनिक येताहेत," राजकीय प्रश्नाचा ठामपणे निकाल लावण्याचा आव आणीत सेर्गेई म्हणाला.

त्याचा तर्क एवढा पटण्यासारखा होता, की पावेल आणि क्लीम्का असे दोघेही ताबडतोब त्याच्याशी सहमत झाले.

या प्रश्नावरील चर्चा ती मुले पुरी करतात न करतात तोच हमरस्त्यावर टापांचा खडखडाट ऐकू आला म्हणून तिघेही कुंपणाकडे परत धावले.

झाडांमधून अस्पष्ट दिसणाऱ्या जंगलच्या राखणदाराच्या झोपडीपलिकडे काही माणसे व गाड्या जंगलातून बाहेर येत असलेली त्यांना दिसली. तसेच जवळच्या हमरस्त्यावरून सुमारे पंधरा घोडेस्वारांची तुकडी खोगीरांवर रायफली आडव्या टाकून येत होती. त्या घोडेस्वारांच्या पुढे खाकी जाकीट घातलेला, अधिकाऱ्याचा पट्टा बांधलेला व गळ्यात दुर्बीण लटकावलेला एक वयस्क माणूस घोड्यावरून येत होता. आणि त्याच्या शेजारीच आत्ता मुले ज्याच्याशी बोलली होती तो घोडेस्वार होता. वयस्क माणसाने छातीवर लाल फीत लावली होती.

"काय सांगितलं होतं मी तुला?" सेर्गेई पावेलच्या कुशीत ढुशी देत म्हणाला. "ती लाल फीत बघितली? गनिमी सैनिक. मी पैजेवर सांगतो ते गनिमी सैनिक आहेत..." आणि आनंदाने आरोळी ठोकीत त्याने कुंपणावरून रस्त्यावर उडी घेतली.

बाकीच्या दोघांनी त्याचे अनुकरण केले आणि जवळ येणाऱ्या घोडेस्वारांची वाट पहात तिघेही रस्त्याच्या कडेला उभे राहिले.

घोडेस्वार जेव्हा खूप जवळ आले तेव्हा मुलांना आधी भेटलेल्या माणसाने ओळख दाखविण्यासाठी मान झुकवली आणि चाबूक लेश्चीन्स्कीच्या घराकडे दाखवीत विचारले :

"तिथं कोण राहतं?"

घोडेस्वाराच्या थोडे पुढे राहण्याचा प्रयत्न करीत धावता धावता पावेल म्हणाला :

"लेश्चीन्स्की वकील. ते काल पळाले. बहुतेक तुम्हाला घाबरून..."

"आम्ही कोण आहोत हे तुला कसं कळलं?" स्मित करीत वयस्क माणसाने विचारले.

"त्यात काय अवघड आहे?" पावेलने फितीकडे बोट दाखवीत म्हटले. "कुणीही सांगू शकेल..."

शहरात प्रवेश करणाऱ्या तुकडीकडे उत्सुकतेने टक लावून पहात लोकांनी रस्त्यावर गर्दी केली. धुळीने माखलेले, दमलेले लाल रक्षक घोड्यावरून जात असलेले पहात आपले तीन छोटे मित्रही उभे राहिले. जेव्हा फरसबंदी रस्त्यावर तुकडीची एकमेव तोफगाडी आणि मशिनगन लादलेल्या गाड्या खडखडू लागल्या तेव्हा मुले गनिमी सैनिकांच्या मागोमाग धावली. शहराच्या मुख्य चौकात तुकडी जेव्हा थांबली आणि मुक्काम टाकायला सुरुवात झाली तेव्हा कुठे मुले आपापल्या घरी परतली.

लेश्चीन्स्कीच्या घराच्या प्रशस्त दिवाणखान्यातील कोरीव पायांच्या प्रचंड मेजाभोवती त्या संध्याकाळी चार माणसे बसली होती. वयस्क, केसांना किंचित पांढरी झाक आलेले,

तुकडीचे प्रमुख कॉम्रेड बुल्गाकोव आणि तुकडीमधील तीन वरिष्ठ अधिकारी.

बुल्गाकोवनी त्या गुबेर्नियाचा नकाशा मेजावर पसरला होता व त्यावरून आता ते बोट फिरवीत होते.

"आपण इथं थांबून झुंज द्यावी असं तुम्ही म्हणता कॉम्रेड येरमचेन्को," रुंद नाका-डोळ्यांच्या आणि भक्कम दातांच्या एका माणसाला उद्देशून ते म्हणाले, "पण मला वाटतं आपण सकाळी इथून चालू लागावं. रात्रीच पुढं जाऊ शकलो असतो तर अधिक चांगलं, पण आपल्या माणसांना विश्रांतीची गरज आहे. जर्मन इथं पोचण्यापूर्वी काझातीनपर्यंत माघार घेणं, ही आपली जबाबदारी आहे. आपल्या आत्ताच्या सामर्थ्यानिशी प्रतिकार करणं मूर्खपणाचं ठरेल. दारूगोळ्याच्या तीस फैरी असलेली एक तोफ, दोनशे पायदळ सैनिक आणि साठ घोडेस्वार. पोलादी वादळासारखं पुढं सरकणाऱ्या जर्मनांसमोर केवढी प्रचंड सेना ठरेल नाही आपली! माघार घेणाऱ्या इतर लाल रक्षक तुकड्यांना आपण जाऊन मिळेपर्यंत आपण लढत देऊ शकत नाही. शिवाय कॉम्रेडहो, जर्मनांशिवाय वाटेत आपल्याला सर्व तऱ्हेच्या असंख्य प्रतिक्रांतिकारक टोळ्यांबरोबर दोन हात करावे लागणार आहेत याची आठवण ठेवली पाहिजे. मी असं सुचवतो की, स्टेशनपलिकडचा आगगाडीचा पूल सकाळी प्रथम उडवून मग आपण माघार घ्यावी. तो दुरुस्त करायला जर्मनांना दोन-तीन दिवस लागतील आणि तोपर्यंत रेलमार्गावरची त्यांची पुढची वाटचाल थोपवली जाईल. कॉम्रेडहो, तुम्हाला काय वाटतं? आपल्याला निर्णय घेतला पाहिजे..." मेजाभोवतालच्या इतरांकडे वळून ते म्हणाले.

बुल्गाकोव यांच्या विरुद्ध दिशेला समोर बसलेल्या स्त्रुझ्कोवनी आपले ओठ आवळले व प्रथम नकाशाकडे नजर टाकून नंतर बुल्गाकोव यांच्याकडे पाहिले.

"बुल्गाकोव यांच्याशी मी सहमत आहे," अखेरीस ते कष्टाने म्हणाले.

कामगाराचा डगला घातलेल्या त्यांच्यातील सर्वांत लहान माणसानेही संमतीदर्शक मान हलवली.

"बुल्गाकोव यांचं म्हणणं बरोबर आहे," तो म्हणाला.

पण येरमचेन्को यांनी – त्या दिवशी थोडा वेळ आधी मुलांशी बोललेल्या त्या माणसाने – डोके नापसंतीने हलवले.

"तुकडी एकत्र गोळा करण्याची एवढी यातायात आपण कशासाठी केली? झुंज न देता जर्मनांपासून माघार घ्यायला? इथं त्यांच्याशी आपल्याला दोन हात करणं भागच आहे असं मला वाटतं. मला पळत रहायचा अगदी वीट आलाय, चीड आलीय... जर माझ्यावर अवलंबून असतं तर इथं मी नक्कीच सामना केला असता..." खुर्ची जोरात मागे लोटून ते उठले आणि खोलीत येरझाऱ्या घालू लागले.

बुल्गाकोव यांनी त्यांच्याकडे नाराजीने पाहिले.

"येरमचेन्को, आपण आपली डोकी वापरली पाहिजेत. जिथं पराभव आणि नाश होणार आहे अशा लढाईत आपण आपली माणसं लोटू शकत नाही. शिवाय तसं करणं अगदी वेडेपणा ठरेल. अगदी आपल्या मागं अवजड तोफखाना आणि चिलखती गाड्यांनी सुसज्ज अशी आख्खी डिव्हिजन आहे... शाळकरी मुलांसारखे पराक्रम गाजवण्याची ही वेळ नाही कॉम्रेड येरमचेन्को..." इतरांना उद्देशून ते पुढे म्हणाले: "तर मग ठरलं... उद्या सकाळी आपण इथून निघून

जायचं... आता पुढचा प्रश्न, संपर्क राखण्याचा. इथून जाणारे आपण अखेरचे आहोत तेव्हा जर्मन पिछाडीत कामाची योजना करणं ही आपली जबाबदारी आहे. हे रेल्वेचं मोठं जंक्शन आहे आणि शहरात दोन स्टेशनं आहेत. रेल्वेमध्ये कार्य चालवू शकेल असा खात्रीलायक कॉम्रेड आपण शोधला पाहिजे. काम चालू ठेवायला कुणाला मागं ठेवायचं ते आपल्याला ठरवलं पाहिजे. कुणी ठाऊक आहे तुम्हाला?"

"मला वाटतं खलाशी फ्योदर झुखराय यांनी मागं थांबलं पाहिजे," मेजापाशी येत येरमचेन्को म्हणाले. "पहिली गोष्ट म्हणजे ते इथलेच रहिवासी आहेत. दुसरी म्हणजे ते फिटर आणि मेकॅनिक असल्यानं स्टेशनात त्यांना काम मिळू शकेल. आपल्या तुकडीबरोबर फ्योदरना कुणीही पाहिलेलं नाही—आज रात्रीपर्यंत ते इथं पोचणार नाहीत. डोकं वापरून काम करायचं कसब त्यांच्यापाशी आहे आणि योग्य रीतीनं ते काम पुढं चालवतील. या कामासाठी ते सर्वांत लायक माणूस आहेत असं मला वाटतं."

बुल्गाकोवनी मानेने संमती दाखवली.

"मी तुमच्याशी सहमत आहे येरमचेन्को. कॉम्रेडहो, कुणाची हरकत आहे?" इतरांकडे वळून त्यांनी विचारले. "कुणाचीही हरकत नाही. मग ठरलं तर. झुखराय यांच्यासाठी आपण थोडे पैसे आणि त्यांच्या कामाला आवश्यक ती ओळखपत्रं मागं ठेवू... आता तिसरा आणि शेवटचाच प्रश्न. शहरात साठवून ठेवलेल्या शस्त्रास्त्रांबद्दलचा. झारच्या वेळच्या लढाईतून मागं राहिलेल्या वीस हजार रायफलींचा इथं साठा आहे आणि सारेजण ही गोष्ट पार विसरून गेलेत. एका शेतकऱ्याच्या पडवीत त्यांचा ढीग रचून ठेवलाय. ही बातमी

मला त्या पडवीच्या मालकाकडूनच मिळालीय आणि ही ब्याद टळावी म्हणून तो अगदी उत्सुक आहे. आपण काही जर्मनांसाठी त्या रायफली शिल्लक ठेवणार नाही. मला असं वाटतं की, आपण त्या सगळ्या एकदम जाळून टाकाव्या, म्हणजे सकाळपर्यंत सारा मामला संपेल. पण भोवतीच्या झोपड्यां-मध्ये आग पसरायचा धोका आहे. शहराच्या टोकाला गरीब शेतकऱ्यांची वस्ती आहे तिथं हा साठा आहे."

स्त्रुझ्कोव आपल्या खुर्चीत चुळबुळले. ते चांगले धिप्पाड बांध्याचे होते. त्यांच्या दाढी वाढलेल्या चेहऱ्याला बराच काळपर्यंत वस्तऱ्याचा स्पर्श झाला नव्हता.

"रायफली जाळायच्या कशाला? त्यापेक्षा गावच्या लोकांमध्ये त्या वाटून टाकणं चांगलं नाही का?"

बुल्गाकोवनी झटकन त्यांच्याकडे चेहरा वळवला.

"वाटून टाकायच्या म्हणता?"

"झकास कल्पना आहे!" येरमचेन्कोनी उत्साहाने प्रतिसाद दिला. "कामगारांना आणि दुसऱ्या कुणाला पाहिजे त्यांना देऊन टाका. जर्मन आयुष्य असह्य करतील तेव्हा उलट उत्तर द्यायला त्यांच्यापाशी काहीतरी राहील. जर्मन वाईट वागण्याची पराकाष्ठा करतील. आणि अगदी गळ्यापर्यंत गोष्टी पोचतील तेव्हा माणसं हाती शस्त्र उचलू शकतील. स्त्रुझ्कोव यांचं बरोबर आहे: रायफली वाटल्याच पाहिजेत. खेड्यांमध्ये त्यांपैकी काही नेल्या तरी बिघडणार नाही. शेतकरी त्यांना लपवून ठेवतील आणि जर्मन जेव्हा सगळ्या चीजवस्तूंचा ताबा घ्यायला लागतील तेव्हा रायफली उपयोगी पडतील."

बुल्गाकोव हसले.

"ते ठीक आहे, पण सर्व शस्त्रं परत करावी असा हुकूम

जर्मन नक्की ठोकणार आणि प्रत्येकजण त्या आज्ञेचं पालन करणार."

"प्रत्येकजण नाही करायचा," येरमचेन्कोनी आक्षेप घेतला. "काही करतील, पण बाकीचे नाही करणार."

बुल्गाकोवनी मेजाभोवतालच्या लोकांकडे प्रश्नार्थक नजरेने पाहिले.

"रायफली वाटाव्यात असं माझं मत आहे," येरमचेन्को आणि स्त्रुझ्कोवना तरुण कामगाराने पाठिंबा दिला.

"ठीक आहे तर, हे ठरलं," बुल्गाकोवनी होकार भरला. "आत्तापुरतं एवढं पुरे," खुर्चीवरून उठत ते म्हणाले. "आपण सकाळपर्यंत विश्रांती घेऊ शकतो. झुखराय आले म्हणजे त्यांना माझ्याकडं पाठवा. त्यांच्याशी मला बोलायचंय. येरमचेन्को, तुम्ही पहाऱ्याच्या चौक्यांची तपासणी करा."

इतर निघून गेले तेव्हा दिवाणखान्याशेजारच्या झोपण्याच्या खोलीत बुल्गाकोव गेले, गादीवर त्यांनी आपला मोठा कोट पसरला आणि त्यावर ते पडले.

दुसऱ्या दिवशी सकाळी पावेल वीज केंद्रातल्या कामावरून परत येत होता. आता जवळ जवळ वर्षभर तो तिथे कोळसे मारणाऱ्याचा मदतनीस म्हणून काम करीत होता. वातावरणात काहीतरी वेगळाच मामला सुरू झाल्याचे त्याला जाणवले. सारे शहर उत्तेजित बनले होते. तो रस्त्याने जात होता तेव्हा माणसे प्रत्येकी एक किंवा दोन किंवा काहीवेळा तीन-तीन रायफली घेऊन जात असलेली त्याने पाहिली. काय चालले होते ते त्याला उमगेना म्हणून तो लगबगीने घरी

आला. लेश्चीन्स्की यांच्या बागेत काल ओळख झालेली माणसे घोडयांवर स्वार होत असलेली त्याने पाहिली.

पावेल घरात धावत गेला, त्याने चटकन हात-पाय आणि तोंड धुतले. आर्त्योम अजून घरी आला नव्हता हे आईकडून समजताच तो पुन्हा घराबाहेर पळाला आणि शहराच्या दुसऱ्या टोकाला राहणाऱ्या सेर्गेई ब्रुझ्झाकच्या घरी गेला.

सेर्गेईचे वडील इंजिन ड्रायव्हरचे मदतनीस होते आणि एक छोटेसे घर व जमिनीचा लहानसा तुकडा त्यांच्या मालकीचा होता.

सेर्गेई घरात नव्हता. गुबगुबीत अंगाच्या, फिकट चेहऱ्याच्या त्याच्या आईने पावेलला थोडयाशा नाराजीनेच न्याहाळले.

"मेला कुठं गेलाय कुणास ठाऊक! अगदी सक्काळी सक्काळीच झपाटल्यासारखा बाहेर धावला! कुठंतरी रायफली देताहेत म्हणत होता. मला वाटतं तो तिथंच असावा. तुम्हा शेंबडया वीरांची पाठ चांगली शेकून काढली पाहिजे. तुम्ही कारटी अगदी हाताबाहेर गेलायत. आत्ता कुठं लाळेरी काढलीत आणि मारे धावतायत बंदुका घ्यायला. त्या उडाणटप्पूला सांग-म्हणावं एक काडतूस या घरात आणलंस तर उभा सोलून काढीन. कुठली नसती ब्याद घरात घेऊन येईल आणि मग मला निस्तरता निस्तरता नाकी नव येतील. तूसुद्धा तिथं चालला नाहीस ना?"

पण सेर्गेईच्या आईने खरडपट्टी पुरी करण्याच्या आतच पावेल रस्त्यावरून धावत सुटला होता.

एक माणूस दोन खांद्यांवर दोन रायफली लटकावून हमरस्त्यावरून चालत येत असलेला त्याला दिसला. पावेल त्याच्यापाशी धावला.

"काका, या तुम्हाला कुठं मिळाल्या?"

"तिकडं वेर्खोवीनापाशी."

आपले पाय जेवढ्या जास्त वेगाने नेतील तेवढ्या वेगाने पावेल धावला. बागनेट जोडलेली एक अवजड पायदळी रायफल फरपटत नेणारा एक मुलगा त्याला दोन गल्ल्यांनंतर भेटला. पावेलने त्याला थांबवले.

"तुला कुठं मिळाली?"

"शाळेसमोर गनिमी सैनिक वाटत होते. पण आता तिथं शिल्लक नाहीत. सगळ्या संपल्या. सबंध रात्रभर वाटत होते. आता तिथं रिकामी खोकी तेवढी पडलीत. ही माझी दुसरी," तो पोरगा फुशारकी मारीत म्हणाला.

या बातमीने पावेल कमालीचा निराश झाला.

"च्यायला, मी सरळ तिकडं जायला पाहिजे होतं," खंत करीत तो स्वतःशी म्हणाला. "आता खूप उशीर झालाय!"

एकदम त्याच्या डोक्यात एक कल्पना चमकली. गिरकी घेऊन दोन-तीन ढांगांमध्ये त्याने त्या पोराला गाठले व रायफल त्याच्या हातून हिसकावून घेतली.

"तुला एक पुरेशी आहे. ही माझी," तो अशा काही स्वरात बोलला की, त्यावर कोणताही विरोध त्याला मान्य नव्हता असे जाणवावे.

दिवसाढवळ्या अशी वाटमारी केलेली पाहून तो पोरगा चिडला आणि त्याने पावेलवर झेप घेतली. पण पावेल चटकन मागे सरला आणि आपल्या प्रतिस्पर्ध्याविरुद्ध त्याने बागनेट रोखले.

"सांभाळ, नाहीतर जखमी होशील!" पावेल ओरडला.

आपल्या असाहाय्यतेची त्या मुलाला चीड आली आणि त्याच्या डोळ्यात अश्रू तरारले. तो तिथून धावत गेला आणि जाताना त्याने पावेलवर शिव्यांची लाखोली वाहिली. स्वतःवर कमालीचा खूष झालेला पावेल टणटणा उड्या मारीत घरी आला. कुंपणावर चढून तो पडवीत गेला, छपराखालच्या तुळयांवर त्याने आपली लूट लपवून ठेवली आणि आनंदाने शीळ घालीत तो घरात शिरला.

युक्रेनमधल्या उन्हाळ्यातल्या सायंकाळी फार सुंदर असतात. विशेषतःगांवच्या सीमेवर खेड्याप्रमाणे भासणाऱ्या शेपेतोवकासारख्या छोट्या युक्रेनी शहरांमधल्या सायंकाळी तर फारच मनोहर असतात. अशा निवांत उन्हाळी रात्री तरुण मंडळी हमखास घराबाहेर पडतात. व्हरांड्यात, घरांसमोरच्या छोट्या बागांमध्ये, किंवा रस्त्यालगतच्या लाकडांच्या ढिगांवर गटा-गटांनी अथवा जोडी-जोडीने तरुण मंडळी बसलेली तुम्हाला नक्की आढळतील. संध्याकाळच्या निःस्तब्ध वातावरणात त्यांचे आनंदी हसणे आणि गाणे घुमत राहते.

फुलांच्या घमघमाटाने हवा धुंद आणि तरल बनली आहे. आकाशाच्या खोल पोकळीत चांदण्या अंधुक लुकलुकताहेत आणि आवाज दूर दूर ऐकू येत आहेत...

पावेलचे आपल्या ॲकॉर्डियनवर फार प्रेम होते. ते नादमयी वाद्य तो हलकेच आपल्या गुडघ्यांवर तोलून धरायचा आणि त्याच्या दुहेरी चाव्यांवरून त्याची चपळ बोटे खाली-वर फिरताच प्रथम एक खर्जातून निःश्वास उमटायचा व पाठोपाठ मधुर सुरांची कारंजी उसळायची...

नागमोडी भाता आत-बाहेर होत असताना आणि

अ‍ॅकॉर्डियनमधून मधुर सुरावली बाहेर पडत असताना एका जागी स्वस्थ बसणे अवघड व्हायचे. तुम्हाला स्वत:ला कळायच्या आतच तुमचे पाय त्या सुरांशी ताल धरायचे. असे मस्त जगण्यात किती मजा होती!

त्या संध्याकाळी आनंदाला विशेष उधाण आले होते. पावेलच्या घराबाहेरच्या लाकडाच्या ओंडक्यांवर तरुणांचा आनंदी घोळका जमला होता. त्या सर्वांमध्ये जास्त आनंदी होती गालोच्का—पावेलच्या शेजारी राहणाऱ्या पाथरवटाची मुलगी. मुलांबरोबर नाच करायला आणि गाणी म्हणायला गालोच्काला खूप आवडायचे. तिच्या आवाजात मुलायम गहिरेपणा होता.

पावेल तिला थोडासा टरकून असायचा. कारण गालोच्काची जीभ फार तिखट होती. पावेलच्या शेजारी ती फतकल मारून बसली आणि मजेने खळखळून हसत तिने त्याच्याभोवती आपल्या हातांची मिठी घातली.

"अरे सुंदर अ‍ॅकॉर्डियनवाल्या! माझ्यापेक्षा थोडा लहान आहेस रे, नाहीतर माझा छान नवरा झाला असतास! अ‍ॅकॉर्डियन वाजवणारे पुरुष मला फार आवडतात. माझं बिच्चारं काळीज एकदम वितळायला लागतं!" ती म्हणाली.

पावेल लाजून पुरता चूर झाला. सुदैवाने खूप अंधार पडल्याने त्याचे लाजणे कुणाला नीट दिसले नाही. त्या कैदाशिणीपासून तो थोडा दूर सरकला, पण तिने त्याला आणखीच गच्च मिठी मारली.

"अरे, तू आता माझ्यापासून पळून जाणार नाहीस, नाही ना? कित्ती छान आहेस रे माझ्या लाडक्या," ती हसून म्हणाली.

पावेलच्या खांद्याला तिच्या स्तनाचा स्पर्श होत होता आणि नकळत त्याचे शरीर पुलकित झाले होते. इतरांच्या जोरदार हसण्याने त्या आळीतली नेहमीची शांतता भंगत होती.

"जरा सरक, मला वाजवायला जागा पुरत नाही," तिच्या खांद्याला हलकासा धक्का देऊन पावेल म्हणाला.

त्यावर आणखीच हशा उसळला, विनोद आणि थट्टा-मस्करी झाली.

मारूस्या पावेलच्या मदतीला धावून आली. "काहीतरी दु:खी गाणं वाजव पावेल, काळीज पिळवटून आलं पाहिजे असं."

हळूच भाता विस्तारला, पावेलची बोटे चाव्यांवरून हलकेच फिरली आणि परिचित, सर्वांच्या आवडीचे सूर वातावरणात भरले. सर्वांत प्रथम गालोच्का गाऊ लागली, मग मारूस्या आणि इतरही सामील झाले.

सारे सारे बुर्लाकी *
आपल्या खोपटात जमले,
तिथं वाटतंय छान
तिथं वाटतंय गोड
काळजातल्या दु:खाला गायले...

गाणाऱ्यांचे तरुण कंपायमान आवाज दूर जंगलापर्यंत पसरत जात होते.

"पाव्का!" आर्त्योमची हाक आली.

---

* वोल्गा नदीवरच्या बोटी दोराने खेचून किनाऱ्याला लावणारे लोक. – **अनु.**

पावेलने ॲकॉर्डियनचा भाता आवळला आणि त्यावर पट्टे बांधले.

"मला घरी बोलावताहेत. गेलं पाहिजे."

"आणखी थोडा वेळ वाजव ना. एवढी काय घाई आहे?" मारूस्या त्याला थांबवायचा प्रयत्न करीत होती.

पण पावेल ऐकायला तयार नव्हता.

"शक्य नाही. उद्या पुन्हा आपण गाणी वाजवू. पण आत्ता मला गेलं पाहिजे. आर्त्योम बोलावतोय." असे म्हणून तो रस्त्यापलिकडच्या छोटया घराकडे धावला.

खोलीत आर्त्योमशिवाय आणखी दोघे होते: आर्त्योमचा मित्र रोमान आणि एक अनोळखी. ते मेजापाशी बसले होते.

"तू मला बोलावलंस?" पावेलने विचारले.

आर्त्योमने मानेनेच हो म्हटले आणि अनोळखी माणसाकडे वळून तो म्हणाला: "हा माझा भाऊ. त्याच्याबद्दल आपण बोलत होतो."

अनोळखी माणसाने आपला गाठाळ हात पावेलपुढे धरला.

"हे बघ पाव्का," आर्त्योम आपल्या भावाला म्हणाला. "वीज केंद्रातला इलेक्ट्रिशियन आजारी आहे असं तू म्हणाला होतास. त्याच्या जागी त्यांना दुसरा चांगला माणूस पाहिजे आहे का, याची उद्या चौकशी कर. त्यांना पाहिजे असला तर तू आम्हाला कळव."

अनोळखी माणसाने त्याला मध्येच अडवले.

"तसं करायची गरज नाही. त्यापेक्षा मी याच्याबरोबर जाईन आणि मालकाशी स्वतःच बोलीन."

"अर्थात त्यांना कुणीतरी पाहिजे. स्तन्कोविच आजारी असल्यामुळं आज वीज कारखाना चालला नाही. मालक

दोनदा आले होते. कुणाची तरी बदली नेमणूक करायला त्यांनी खूप शोधाशोध केली. पण त्यांना कुणी सापडलं नाही. फक्त एकच कोळसे मारणारा असताना कारखाना चालू करायची त्यांना भीती वाटत होती. आणि इलेक्ट्रिशियन विषमज्वरानं आजारी आहेत."

"मग ठरलं तर," अनोळखी म्हणाला. "मी उद्या तुझ्याकडं येईन आणि आपण तिथं बरोबर जाऊ."

"ठीक."

पावेलची नजर त्या अनोळखी माणसाच्या शांत, राखी रंगाच्या डोळ्यांना भिडली. तो अनोळखी त्याच्याकडे बारकाईने निरखून पहात होता. त्या ठाम, निश्चल शोधक नजरेने त्याला किंचितसे अस्वस्थ केले. त्या नवागताने राखी रंगाचे जाकीट घातले होते व त्याला खालपासून वरपर्यंत बटणे लावलेली होती. त्याला ते घट्ट होत होते हे उघड होते, कारण त्याच्या रुंद, भक्कम पाठीवर शिवण ताणली होती. त्याचे डोके आणि खांदे बैलासारख्या पिळदार मानेने जोडलेले होते. त्याचा एकूण बांधा ओकच्या जुन्या भक्कम झाडासारखा जाणवत होता.

"बरं आहे झुखराय, तुम्हाला यश लाभो," दारापर्यंत सोबत करीत आर्त्योम म्हणाला. "उद्या माझ्या भावाबरोबर जा आणि तुमच्या कामाचं जमवून टाका."

ती तुकडी निघून गेल्यानंतर तीन दिवसांनी जर्मनांचा शहरात प्रवेश झाला. त्यांच्या आगमनाची वर्दी स्टेशनातल्या एका इंजिनाने शिट्टी वाजवून दिली. ते इंजिन अलिकडच्या काळात स्टेशनात एकाकी पडले होते.

"जर्मन येत आहेत," ही बातमी शहरात वाऱ्यासारखी पसरली.

एखाद्या उसळलेल्या मुंग्यांच्या वारुळाप्रमाणे शहर गजबजले होते. जर्मन शहरात येणार याची नगरवासियांना जरी आधी जाणीव होती, तरी त्यावर त्यांनी पुरेसा विश्वास ठेवला नव्हता. आणि आता ते महाभयंकर जर्मन कुठेतरी वाटेवर नव्हते तर प्रत्यक्ष त्यांच्या शहरात होते.

नगरवासी आपल्या घरांसमोरच्या बागांच्या कुंपणांआड आणि लहान फाटकांमागे उभे होते. रस्त्यात जायची त्यांना भीती वाटत होती.

हमरस्त्याच्या दोन्ही कडांना एकेकाच्या रांगेने संचलन करीत जर्मन आले. हिरवटभुरकट रंगाने गणवेष त्यांनी घातले होते व हातातल्या रायफली सज्ज ठेवल्या होत्या. त्यांच्या रायफलींच्या टोकांना रुंद सुऱ्यासारखी बागनेटे होती. त्यांनी अवजड पोलादी शिरस्त्राणे घातली होती व त्यांच्या पाठींवर प्रचंड आकाराची बोचकी होती. स्टेशनपासून शहरापर्यंत त्यांचा अखंड ओघ लागला होता. ते अत्यंत सावधपणे येत होते, कोणत्याही क्षणी हल्ला झाल्यास त्याला प्रतिकार करण्याच्या तयारीत होते. पण त्यांच्यावर हल्ला चढविण्याचे कुणाच्या ध्यानीमनीसुद्धा नव्हते.

अग्रभागी दोन अधिकारी हातात मॉसर पिस्तुले धरून चालत होते आणि रस्त्याच्या मधोमध दुभाष्या चालत होता. निळा युक्रेनी कोट आणि उंच केसाळ टोपी घातलेला तो सार्जंट-मेजर हेत्मनांच्या सैन्यातला होता.

शहराच्या मध्यभागी असलेल्या चौकात जर्मन रांगेने उभे राहिले. पडघम वाजले. थोड्या अधिक धीट लोकांचा छोटा

जमाव तिथे जमला. तो युक्रेनी कोटातला हेल्मन केमिस्टच्या दुकानाच्या व्हरांड्यात चढून उभा राहिला आणि कमांडंट मेजर कोर्फ याचे हुकूम त्याने मोठ्यांदा वाचून दाखवले.

§ १

सर्व नागरिकांना हुकूम करण्यात येत आहे की, त्यांनी आपल्या ताब्यातील बंदुका अगर इतर शस्त्रे चोवीस तासांच्या आत आणून हजर करावीत. या हुकूमाचा भंग करणाऱ्यास गोळी घालून ठार मारण्यात येईल.

§ २

शहरात लष्करी अंमल पुकारण्यात आला आहे आणि संध्याकाळी ८ वाजल्यानंतर रस्त्यांवर फिरण्यास नागरिकांना मनाई आहे.

मेजर कोर्फ, शहराचे कमांडंट.

पूर्वी नगरशासनासाठी आणि क्रांतीनंतर कामगार प्रतिनिधींच्या सोविएतसाठी जी इमारत वापरली जात होती, तेथे जर्मन कमांदातुरने* आपले ठाणे टाकले. प्रवेशद्वारापाशी एक पहारेकरी उभा करण्यात आला. त्याच्या कवायती शिरस्त्राणावर अवाढव्य आकाराचे शाही गरुडचिन्ह होते. त्याच इमारतीच्या मागील बाजूस लोकांनी आणून दिलेली शस्त्रास्त्रे साठवण्याचे आवार होते.

---

*लष्करी कचेरी. – **अनु.**

गोळी घातली जाईल या दहशतीने घाबरलेले नागरिक अख्खा दिवसभर शस्त्रे परत आणून देत होते. मोठी माणसे स्वतः येत नव्हती. तरुणांमार्फत आणि लहान मुलांमार्फत शस्त्रे पाठवण्यात येत होती. जर्मनांनी कुणालाही अडकवून ठेवले नाही.

ज्यांना वैयक्तिकरीत्या शस्त्रे आणून द्यायची इच्छा नव्हती त्यांनी रात्रीच्या वेळी आपली शस्त्रे रस्त्याच्या कडेला फेकून दिली. सकाळी जर्मन गस्तवाल्यांनी ती एकत्र गोळा करून लष्करी गाडीत भरली आणि कमांदातुरमध्ये वाहून नेली.

दुपारी एक वाजता जेव्हा दिलेली वेळमर्यादा संपली तेव्हा जर्मन सैनिकांनी आपल्या लुटीच्या मालाची मोजदाद सुरू केली: चौदा हजार रायफली. याचा अर्थ सहा हजार परत करण्यात आल्या नव्हत्या. त्यांच्या धसमुसळ्या शोधांमधून फारशी निष्पत्ती निघाली नाही.

दुसऱ्या दिवशी पहाटे ज्या दोन रेलकामगारांच्या घरांमध्ये लपवलेल्या रायफली सापडल्या होत्या त्यांना शहराबाहेर जुन्या यहुदी स्मशानाजवळ गोळ्या घालून ठार करण्यात आले.

कमांडंटचा हुकूम ऐकल्याक्षणी आर्त्योम घाईघाईने घरी आला. अंगणातच त्याला पावेल भेटला. त्याने त्याच्या बखोटीला धरले आणि शांत परंतु खंबीर आवाजात विचारले.

"तू घरी काही शस्त्रं आणलीस?"

रायफलबद्दल काही बोलण्याचा पावेलचा इरादा नव्हता, पण आपल्या भावापाशी तो खोटे बोलू शकत नव्हता. म्हणून त्याने सारी हकिकत सांगून टाकली.

पडवीत ते बरोबरच गेले. तुळयांवर लपवून ठेवलेल्या

ठिकाणामधून आर्त्योमने रायफल बाहेर काढली, बोल्ट आणि बागनेट बाजूला काढले व नळीला धरून सगळ्या ताकदीनिशी कुंपणाच्या खांबाच्या दिशेने त्याने रायफल भिरकावून दिली. रायफलीचा दांडा पिचला. रायफलीचे अवशेष बागेपलिकडच्या दूरच्या उकिरड्यावर फेकून देण्यात आले. बागनेट आणि बोल्ट आर्त्योमने एका खड्ड्यात फेकून दिले.

हे काम पुरे केल्यानंतर आर्त्योमने आपल्या भावाकडे मोर्चा वळविला.

"पाव्का, तू आता लहान कुक्कुलं बाळ नाहीस. बंदुकींशी खेळत नाहीत हे तुला समजायला पाहिजे. असल्या काहीही गोष्टी तू घरात आणता कामा नयेत. ही फार गंभीर बाब आहे. आजकाल अशा गोष्टींसाठी स्वतःचे प्राण गमावून बसशील. आणि असले खेळ पुन्हा करू नकोस, कारण तू तसं काही केलंस आणि त्यांना ती वस्तू सापडली तर पहिल्यांदा ते मला गोळी घालतील. तुझ्यासारख्या पोराला ते हात लावणार नाहीत. सध्या जंगली कायदे चालू आहेत. समजलास?"

तसे काहीही न करण्याचे पावेलने वचन दिले.

अंगण ओलांडून ते दोघे भाऊ घराकडे जात होते तेवढ्यात लेश्चीन्स्कींच्या फाटकापाशी एक बग्गी थांबली. वकीलसाहेब, त्यांची पत्नी आणि दोन मुले – नेल्ली व विक्तर – बग्गीतून खाली उतरली.

"सुंदर पाखरं आपल्या घरट्यात परतली म्हणायची," ओठ चावीत आर्त्योम संतापाने पुटपुटला. "आता धिंगाणा सुरू होईल, किडे पडोत साल्यांना!" आणि तो घरात गेला.

रायफलबद्दलचे विचार साऱ्या दिवसभर पावेलच्या मनात

येत होते आणि तो उदास होत होता. दरम्यान त्याचा मित्र सेर्गेई एका जुन्या, ओसाड पडवीत जोराने कामाला लागला होता. भिंतीशेजारीच तो एक खड्डा खणत होता. शेवटी खड्डा तयार झाला. फाटक्या कपड्यांमध्ये काळजीपूर्वक गुंडाळलेल्या त्या तीन रायफली सेर्गेईने त्या खड्ड्यात ठेवल्या. लाल रक्षकांच्या तुकडीने लोकांना शस्त्रे वाटली होती तेव्हा त्याने त्या रायफली पैदा केल्या होत्या. जर्मनांना त्या परत करण्याचा त्याचा मुळीच इरादा नव्हता व त्यांना सुरक्षितपणे लपविण्यासाठी त्याची रात्रभर खटपट चालली होती.

त्याने खड्डा बुजवला, त्यावरची माती सपाट होईपर्यंत दाबली आणि पुन्हा तिच्यावर कचरा पसरला. आपल्या उद्योगाच्या फलितांकडे त्याने एकदा बारकाईने निरखून पाहिले व परिस्थिती समाधानकारक आहे याची खात्री पटल्यानंतर डोक्यावरची टोपी उचलून कपाळावरचा घाम पुसला.

"आता खुशाल त्यांना शोध घेऊं दे. आणि जरी त्यांना या रायफली सापडल्या तरी इथं त्या कुणी ठेवल्या हे त्यांना कधीच समजायचं नाही, कारण ही पडवी कुणाच्याच मालकीची नाही." त्याच्या मनात विचार आला.

वीज केंद्रात आता महिनाभर काम करणारा गंभीर चेहऱ्याचा इलेक्ट्रिशियन आणि पावेल यांच्यामध्ये दाट मैत्री जमली होती. जनित्र कसा बांधतात आणि तो कसा चालतो त्याची माहिती झुखरायने कोळसे मारणाऱ्याच्या या मदतनीसाला सांगितली.

या चुणचुणीत पोराचा खलाशाला लळा लागला. सुटीच्या दिवशी झुखराय अनेकदा आर्त्योमच्या घरी जायचे. तिथे

आर्त्योमच्या आणि पावेलच्या आईच्या घरगुती अडचणी व कटकटी गप्प राहून ऐकायचे. आपल्या धाकट्या मुलाच्या वांड कृत्यांबद्दल आई जेव्हा बोलू लागे तेव्हा झुखराय विशेष ध्यान देऊन ऐकत असत. विचारी आणि गंभीर स्वभावाच्या झुखरायांच्या उपस्थितीत मरीया याकोवलेवनांचे मन शांत होई, त्या आपल्या कटकटी विसरत आणि अधिक आनंदी होत.

वीज केंद्राच्या आवारातल्या लाकडांच्या ढिगाऱ्यांमधून एक दिवस पावेल चालला होता तेव्हा झुखरायनी त्याला हटकले.

"तुला मारामारी करायची हौस आहे असं तुझी आई मला सांगत होती," स्मित करीत ते म्हणाले. "ती म्हणते 'तो अगदी झुंजीच्या कोंबड्यासारखा वांड आहे.'" झुखराय खुषीने गालातल्या गालात हसले. "खरं म्हणजे लढवय्या होण्यात काही वाईट नाही, पण कुणाशी आणि कशासाठी लढायचं ते मात्र माहीत पाहिजे."

झुखराय गंमत करीत होते का गंभीरपणे बोलत होते याची पावेलला खात्री नव्हती.

"मी उगीचच्या उगीच कधीच मारामारी करत नाही," त्याने प्रत्युत्तर केले. "योग्य आणि चांगल्या गोष्टीसाठीच मी नेहमी लढतो."

"रीतीनं लढायला शिकवू तुला?" झुखरायनी अचानक प्रश्न टाकला.

"रीतीनं म्हणजे काय?" चकित होऊन पावेलने विचारले.

"समजेल."

मुष्टियुद्धाबाबत पावेलने एक बारकेसे व्याख्यान ऐकले.

पावेलला ते काही सोपे गेले नाही. पुन्हा पुन्हा तो जमिनीवर आडवा कोसळायचा, झुखरायच्या मुठीच्या प्रहारासरशी त्याच्या पायांखालची जमीन निसटायची. पण तो निष्ठेने आणि चिकाटीने शिकत राहिला व अखेरीस त्याने मुष्टियुद्धाची कला अवगत केली.

एके दिवशी पावेल क्लीम्काच्या घरून नुकताच परत आला होता. वातावरण उबदार होते. काहीतरी चांगला उद्योग करण्याच्या इराद्याने आपल्या आवडत्या जागी चढून बसण्यासाठी घरामागच्या बागेच्या कोपऱ्यातल्या पडवीकडे पावेल गेला. परसदार ओलांडून तो बागेत गेला व पातळ तक्त्याच्या त्या खोपटाच्या छपरावर चढला. त्या खोपटावर लोंबणाऱ्या चेरीच्या झाडाच्या दाट फांद्या बाजूला सारीत तो छपराच्या मध्यभागापर्यंत गेला आणि ऊन खाण्यासाठी आडवा पडला.

खोपटाची एक बाजू लेश्चीन्स्कींच्या बागेत पुढे घुसली होती. छपराच्या टोकावरून सबंध बाग आणि घराची एक बाजू दिसायची. कडेशी डोकावून अंगणाचा काही भाग व तेथे उभी असलेली बग्गी पावेल पाहू शकत होता. लेश्चीन्स्कींच्या घरात मुक्काम केलेल्या जर्मन लेफ्टनंटचा नोकर आपल्या धन्याच्या कपड्यांवर ब्रश फिरवून ते स्वच्छ करीत होता.

कवायतीच्या मैदानाकडे निघालेल्या लेफ्टनंटला पावेलने अनेकदा फाटकाशी पाहिले होते. तो ठेंगणा, तुकतुकीत चेहऱ्याचा, बारीक कोरलेल्या मिशा राखलेला, नाकारला सोनेरी चष्मा लावणारा व लाखेच्या चकचकीत टोकाची टोपी घालणारा माणूस होता. तो एका बाजूच्या खोलीत राहतो आणि त्या खोलीची खिडकी बागेच्या दिशेला असून ती खोपटाच्या छपरावरून दिसते हे पावेलला ठाऊक होते.

या क्षणाला लेफ्टनंट मेजाशी बसून काहीतरी लिहीत होता. जे काही त्याने लिहिले ते कागद उचलून तो खोलीच्या बाहेर गेला. नोकरापाशी त्याने तो कागद दिला व फाटकाकडे जाणाऱ्या बागेतल्या रस्त्यावरून तो चालत निघून गेला. बागेतल्या विश्रामघराशी किंचित थांबला व आतल्या कुणाशी तरी बोलला. क्षणभरानंतर नेल्ली लेश्चीन्स्काया बाहेर आली. लेफ्टनंटने तिच्या दंडाला धरले व ती दोघे फाटकामधून रस्त्यावर गेली.

आपल्या सोयीस्कर ठिकाणावरून पावेल या सगळ्या हालचाली निरखीत होता. ऊन खाल्ल्यामुळे आता त्याला थोडी गुंगी येत होती व तो डोळे मिटून झोपणार एवढ्यात लेफ्टनंटच्या खोलीत त्याचा नोकर प्रवेश करताना त्याने पाहिला. त्याने गणवेश टांगला, खोलीची बागेकडची खिडकी उघडली व खोली साफ केली. मग तो बाहेर गेला व पाठीशी त्याने दरवाजा लावून घेतला. दुसऱ्याच क्षणी तो तबेल्यात गेल्याचे पावेलच्या दृष्टीस पडले.

उघड्या खिडकीमधून पावेलला खोलीतल्या सर्व वस्तू स्पष्टपणे दिसत होत्या. मेजावर एक पट्टा व चकाकणारी वस्तू पडली होती.

कमालीचे कुतूहल जागे झाल्यामुळे पावेल हळूच आवाज न करता छपरावरून चेरीच्या झाडावर उतरला व तेथून सुळकन् लेश्चीन्स्कींच्या बागेत त्याने खाली उडी मारली. ओणव्याने खाली वाकून त्याने बाग पार केली व खिडकीमधून खोलीत डोकावला. मेजावर खांद्यावरच्या पट्ट्यासकटचा कमरपट्टा पडला होता व सुरेख बारा-बारी "मानलिशर" चामडी पिशवीत होते.

पावेलने श्वास रोखून धरला. काही सेकंद तो घुटमळला, पण दुसऱ्याच क्षणी अविचारी धाडसाने त्याचा ताबा घेतला. तो झटकन खोलीत घुसला, चामडी पिशवी उचलून त्याने आतील नवेकोरे निळे पोलादी पिस्तूल खेचून बाहेर काढले व बाहेर जमिनीवर उडी घेतली. झटकन त्याने सभोवार सावध नजर टाकली, आपल्या खिशात पिस्तूल सरकवले आणि बागेमधून चेरीच्या झाडाकडे धाव घेतली. माकडाच्या चपळाईने तो छपरावर चढला आणि मागे वळून पहायला थांबला. नोकर अजूनही मोतद्दाराशी मजेने गप्पा मारीत होता. बागेत शांतता होती आणि चिटपाखरू नव्हते. पावेल दुसऱ्या बाजूने घसरत खाली उतरला आणि त्याने घराकडे धूम ठोकली.

त्याची आई स्वैपाकघरात जेवण तयार करण्यात गुंतली होती. तिने त्याच्याकडे लक्ष दिले नाही.

त्याने ट्रंकेमागून एक फडके खेचून काढले, आपल्या खिशात खुपसले, मग कुणाला नकळत हळूच तो बाहेर निसटला, आवार धावत पार करून कुंपणावर चढला आणि जंगलाकडे जाणाऱ्या रस्त्यावर उतरला. मांडीवर ते अवजड पिस्तूल आपटू नये म्हणून त्याने एका हात खिशावर धरून ठेवला होता व जंगलातल्या ओस पडलेल्या विटांच्या भट्टीच्या दिशेने जास्तीत जास्त वेगाने तो धावत सुटला होता.

त्याचे पाय जमिनीवर ठरत नव्हते आणि त्याच्या कानांशी वारे भणाणत होते.

जुन्या विटांच्या भट्टीपाशी सारे काही शांत होते. तेथील दृश्य मोठे उदास करणारे होते. लाकडी छप्पर वेडेवाकडे कोसळून पडले होते, फुटक्या विटांचे ढीग पडले होते आणि

भट्ट्या कोसळून पडलेल्या होत्या. त्या जागेत गवताचे रान माजले होते. पावेल आणि त्याचे दोन मित्र इथे कधीमधी खेळायला येत. पण बाकी कुणीही या दिशेला फिरकत नसे. चोरलेला खजिना कुठे सुरक्षितपणे लपवून ठेवायचा त्या जागा पावेलला माहीत होत्या.

एका भट्टीच्या मधल्या फटीतून तो आत चढला. सावध नजरेने त्याने आजूबाजूला पाहिले, पण कुणीही दृष्टीपथात नव्हते. फक्त देवदाराची झाडे सळसळत होती व हलकासा वारा रस्त्यावरची धूळ उडवीत होता. हवेत राळेचा उग्र दर्प सुटला होता.

फडक्यात गुंडाळलेले पिस्तूल पावेलने भट्टीच्या तळाशी एका कोपऱ्यात ठेवले व त्यावर जुन्या विटांचा छोटा पिरामिड रचून त्याला झाकले. बाहेर पडताना त्याने जुन्या भट्टीची फट सुट्ट्या विटकरींनी भरून काढली, नक्की ठिकाण लक्षात ठेवले आणि हळूहळू घराच्या दिशेने तो निघाला. आपले गुडघे थरथर कापत असल्याचे त्याला जाणवत होते.

"आता काय घडेल?" त्याच्या मनात विचार आला आणि भावी घटनांच्या कल्पनेने त्याच्या छातीवर मोठा भार पडल्यासारखे त्याला वाटले.

घरी जाण्याचे टाळण्यासाठी तो वीज केंद्रावर नेहमीपेक्षा लौकर गेला. वॉचमनजवळून त्याने चावी घेतली आणि वीज केंद्राचा मोठा दरवाजा उघडला. राखेचा ढिगारा साफ करताना, बंबात पंपाने पाणी भरताना आणि आग पेटवीत असताना त्याच्या मनात लेश्चीन्स्कींच्या घरात त्यावेळी काय चालले असेल याबद्दलचे विचार येत होते.

सुमारे अकराच्या सुमाराला झुखराय आले व त्यांनी पावेलला बाहेर बोलावले.

"आज तुझ्या घरी झडती कशाबद्दल घेतली?" त्यांनी खालच्या आवाजात विचारले.

पावेल दचकला.

"झडती ?"

"मला एकूण लक्षण काही ठीक दिसत नाही," थोडा वेळ थांबून झुखराय पुढे म्हणाले. "ते काय शोधताहेत याची खरंच तुला काही कल्पना नाही?"

ते काय शोधत होते याची पावेलला पुरेपूर कल्पना होती, पण पिस्तूल चोरल्याची हकिकत झुखरायना सांगण्याचा धोका पत्करायला तो तयार नव्हता. थरथर कापत त्याने विचारले:

"त्यांनी आर्त्योमला पकडलं?"

"कुणालाही पकडलं नाही, पण त्यांनी घरातलं सगळं सामान उलथंपालथं केलं."

हे ऐकून पावेलला किंचित धीर आला. पण तरीही चिंता त्याचा पिच्छा सोडत नव्हती. काही मिनिटेपर्यंत तो आणि झुखराय असे दोघेही आपापल्या विचारांमध्ये गुरफटून उभे होते. त्यांच्यापैकी एकाला झडतीचे कारण माहीत होते व पुढील परिणामांबाबत तो चिंताग्रस्त होता; दुसऱ्याला काहीच माहीत नव्हते म्हणून तो सावध बनला होता.

"साल्यांना कदाचित माझा सुगावा लागला असावा," झुखराय यांच्या मनात विचार आला. "आर्त्योमला माझ्याबद्दल काहीच माहिती नाही, पण त्याच्या घराची झडती कशाला घेतली त्यांनी? थोडं जास्त सावध राहिलं पाहिजे."

दोघांनी काही न बोलता एकमेकांचा निरोप घेतला व आपापल्या कामाच्या जागी ते परतले.

लेश्चीन्स्कींच्या घरात एकच कल्लोळ माजला होता.

पिस्तूल गायब झालेले लेफ्टनंटच्या जेव्हा लक्षात आले तेव्हा त्याने आपल्या नोकराला बोलावून विचारणा केली. पिस्तूल चोरीला गेले असले पाहिजे असे नोकर म्हणाला. त्यासरशी अधिकाऱ्याचा संयम सुटला आणि त्याने नोकराच्या तोंडावर जोरदार ठोसा मारला. ठोशाच्या आघाताने नोकर झेलपाटला, पण तरीही डोळ्यांची उघडझाप करीत तो ताठ उभा राहिला व पुढील घडामोडींना तोंड द्यायला आज्ञाधारकपणे सज्ज झाला.

वकीलसाहेबांना आत बोलावून खुलासा विचारण्यात आला. चोरी झाल्याबद्दलचा संताप त्यांनी आरडाओरडा करून व्यक्त केला आणि आपल्या घरात अशी घटना घडल्याबद्दल त्यांनी लेफ्टनंटची माफी मागितली.

पिस्तुलाची शेजाऱ्यांनी चोरी केली असावी, विशेषत: धाकटा गुंड पोरगा पावेल कोर्चागिन याने चोरी केली असावी, असे सर्वांत प्रथम विक्तर लेश्चीन्स्कीने बोलून दाखवले. आपल्या मुलाचा तर्क वकीलसाहेबांनी तात्काळ लेफ्टनंटच्या कानी घातला व त्याने ताबडतोब झडतीची आज्ञा दिली.

शोध अपयशी ठरला आणि पिस्तूल गायब होण्याच्या प्रसंगाने पावेलला समजून आले, की असे धोकेबाज उद्योगही काही वेळा यशस्वी ठरतात.

प्रकरण तिसरे

उघड्या खिडकीपाशी तोन्या उभी होती आणि झुळुझुळू वाहणाऱ्या वाऱ्याच्या लहरींबरोबर किंचित थरथरणाऱ्या उंचनिंच चिनारांकडे विचारमग्न होऊन पहात होती. तिला

परिचित असलेल्या बागेच्या किनारीला ते चिनार उभे होते. या ठिकाणी तिचे बालपण व्यतीत झाले होते आणि इथे येऊन तिला पुरते वर्ष झाले होते या वस्तुस्थितीवर तिचा स्वत:चाच विश्वास बसत नव्हता. असे भासत होते की, जणू कालच तिने घर सोडले होते आणि आज सकाळच्या आगगाडीने ती परत आली होती.

काहीही बदल घडला नव्हता. राझ्बेरीची झुडुपे नेहमीप्रमाणे काळजीपूर्वक छाटलेली होती आणि आईच्या आवडत्या पॅन्झी फुलांची झाडे बागेतल्या वाटांच्या कडांनी त्याच आखीव-रेखीव पद्धतीने लावलेले होती. बागेतली प्रत्येक वस्तू जेथल्या तेथे आणि स्वच्छ होती. वनरक्षकाचा कुशल हात तेथे फिरत असल्याची ती साक्ष होती. त्या अतिस्वच्छ, रेखीव वाटांचे दृश्य तोन्याच्या मनाला मरगळ आणीत होते.

ती वाचत होती ती कादंबरी तिने उचलली, व्हरांड्याकडे जाणारा दरवाजा उघडला व पायऱ्या उतरून ती बागेत गेली. रंगवलेले छोटे फाटक तिने ढकलून उघडले आणि स्टेशनाजवळच्या पंपघराशेजारच्या तळ्याकडे ती सावकाशपणे निघाली.

तिने पूल ओलांडला व ती झाडीच्या रस्त्याला आली. तिच्या उजव्या बाजूला वाळुंजी व आल्डरची झाडे असलेला तळ्याचा किनारा होता. डाव्या बाजूला जंगल सुरू होत होते.

दगडाच्या जुन्या खाणीजवळच्या तळ्यांकडे ती निघाली होती, पण पाण्यावर आडव्या पडलेल्या गळाची छडी पाहून ती थबकली.

वाकलेल्या वाळुंजीच्या बुंध्यावर ओणवून तिने फांद्या विलग केल्या तेव्हा उन्हाने रापलेल्या चेहऱ्याचा एक अनवाणी मुलगा विजार गुडघ्यांपर्यंत गुंडाळून उभा असलेला तिने

पाहिला. त्याच्या शेजारी एका गंजक्या डब्यात गांडुळे होती. तो मुलगा आपल्या कामात एवढा दंग होता, की त्याला तिची मुळीच चाहूल लागली नाही.

"इथं मासे सापडतील असं तुम्हाला वाटतं?"

पावेलने मान मागे फिरवून एक रागीट कटाक्ष टाकला.

पट्ट्या-पट्ट्यांची निळी कॉलर असलेला पांढरा स्वच्छ पोलका व फिकट राखी रंगाचा आखूड स्कर्ट घातलेली एक मुलगी वाळुंजीच्या झाडाला धरून किनाऱ्यावर उभी होती व पाण्यावर डोकावून पहात होती. ऊन्हात रापलेल्या तिच्या घाटदार पायांवर रंगीत किनारीचे पांढरे मोजे गच्च चिपकून बसले होते. आपल्या तांबूस पिंगट केसांची तिने जाड वेणी घातली होती.

गळाची छडी धरलेल्या हाताला एक नाजुकसा हिसका बसला, पिसाच्या काडीने पाण्यात डुबकी मारली आणि तलम पाण्यावर वाटोळ्या लहरी उमटल्या.

"अरे बघा, मासा लागला!" पावेलच्या मागे उत्तेजित आवाज किणकिणला.

आता त्याची समाधी पुरती भंगली आणि त्याने एवढ्या जोराने गळाला हिसका मारला की, वळवळणाऱ्या गांडुळासकटचा आकडा चक्क पाण्याबाहेर येऊन आपटला.

"आता मासा मिळायची काही शक्यता नाही! छ्या ऽ! कशाला ही कारटी इथं कडमडली?" पावेलच्या मनात संतापाने विचार आला व आपला बावळटपणा लपविण्यासाठी त्याने अधिक लांब गळ फेकला. पण तो नेमका नको त्या ठिकाणी – दोन काटेरी झुडुपांच्या मध्ये – पडला. तेथे गळ सहज अडकून बसला असता.



काय घडले त्याची त्याला जाणीव झाली आणि मागे न वळता वरच्या किनाऱ्यावर बसलेल्या मुलीवर तो फूत्कारला:

"गप्प राहता येत नाही का? अशानं सगळ्या माशांना पळवून लावाल!"

वरून खवचट आवाज आला:

"तुम्हाला एकदाच बघून मासे केव्हाच पळून गेलेत. दुपारच्या वेळी कुणी शहाणा कधी मासे मारायला जातो का?"

सभ्यपणे वागण्याची पावेलने पराकाष्ठा केली होती, पण आता मात्र हे फारच झाले होते. तो उठून उभा राहिला आणि त्याने आपली टोपी डोळ्यांवर खाली खेचली. तो संतापला म्हणजे नेहमी असे करायचा.

"हे बघा बाई, तुम्ही बऱ्या बोलानं आपल्या वाटेनं चालू पडा," जास्तीत जास्त सभ्य शब्दांचा वापर करीत दात आवळून तो पुटपुटला.

तोन्याचे डोळे किंचित आकुंचन पावले आणि त्यांच्यात मिस्कीलपणाची लहर नाचली.

"मी खरंच ढवळाढवळ करतेय?"

तिच्या आवाजातला खवचटपणा गेला होता आणि मैत्रीचा, समझोत्याचा स्वर उमटला होता. कुठूनतरी अचानक उपटलेल्या या "पोट्टी" बरोबर उद्धट बोलायच्या तयारीत बसलेला पावेल एकदम अवाक् झाला.

"पाहिजे असेल तर थांबा आणि बघा. माझं काय जातंय," तो नाखुषीने म्हणाला आणि गळाच्या पिसावर पुन्हा लक्ष ठेवायला खाली बसला. ते काटेरी झुडुपाला अडले होते आणि आकडा मुळांमध्ये अडकून बसला होता हे स्पष्ट होते.

त्याला खेचायला पावेल भीत होता. जर तो अडकला असेल तर सोडवणे त्याला शक्य होणार नव्हते. आणि ती मुलगी नक्की खिदळली असती. तिने तिथून निघून जावे असे त्याला फार फार वाटत होते.

पण तोन्या मात्र आता किंचितशा झुलणाऱ्या वाळुंजीच्या खोडावर जास्त आरामशीरपणे बसली होती व पुस्तक गुडघ्यांवर धरून त्या उन्हाने रापलेल्या, काळया डोळयांच्या, तुसडचा वागणाऱ्या मुलाकडे टक लावून पहात होती. त्या मुलाने तिचे अगदी वाईट स्वागत केले होते व आत्ता तो मुद्दाम तिच्याकडे दुर्लक्ष करीत होता.

तळयाच्या आरशासारख्या चकचकीत पृष्ठभागावरच्या त्या मुलीच्या प्रतिबिंबाकडे पावेलने पाहिले आणि ती पुस्तक वाचण्यात गढलेली पाहून हळून त्याने अडकलेल्या गळाला हिसका मारला. पिसाने पाण्यात डुबकी मारली व दोरा ताणला गेला.

"अडकला साला!" त्याच्या मनात विचार चमकला आणि त्याचवेळी पाण्यातून त्याच्याकडे वर पाहणाऱ्या मुलीचा हसरा चेहरा त्याने तिरप्या डोळयांनी पाहिला.

नेमक्या त्याच वेळी, जिम्नाशियममध्ये सातवीत शिकणारे दोन तरुण विद्यार्थी पुलावरून पंपघराकडे येत होते. त्यांच्यापैकी एक होता रेल्वे यार्डाचे प्रमुख अभियंते सुखार्को यांचा मुलगा. शुंभासारख्या वागणाऱ्या, फिकट पांढऱ्या केसांच्या, तोंडावर ठिपके असणाऱ्या त्या बेअकली मुलाला त्याच्या शाळासोबत्यांनी 'देवीचे वणवाला शूरका' असे टोपणनांव ठेवले होते. त्याच्या हातात एक ढंगदार नखरेल गळाची छडी होती व आपल्या तोंडाच्या कोपऱ्यात त्याने सिगारेट खुपसली होती.

त्याच्या सोबतीला लंबू, बायकी वागणारा विक्तर लेश्चीन्स्की होता.

"ही पोरगी मोठी फक्कड पाखरू आहे, तिच्यासारखी इथं दुसरी कुणीही नाही," सूचकपणे डोळा घालून सुखार्को आपल्या मित्राच्या कानात सांगत होता. "माझ्यावर विश्वास ठेव, ही पोरगी भ-भ-भलतीच र-र-रोमँटिक आहे. ती कीव्हमध्ये सहावीत शिकतेय. आता उन्हाळ्यात ती आपल्या वडलांकडं सुट्टी घालवायला इथं आलीय. ते इथं मुख्य वनरक्षक आहेत. माझी बहीण लीझा तिला ओळखते. एकदा मी तिला एक भावुक पत्रही लिहिलं होतं. 'मी तुझ्यावर खूप खूप प्रेम करतोय'—वगैरे वगैरे. तुला ठाऊकच आहे तसली पत्रं म्हणजे काय ते. 'आणि धडधडत्या काळजानं उत्तराची वाट पाहतोय...' इत्यादि. त्यासाठी नादसनच्या कवितेच्या काही योग्य ओळीसुद्धा शोधून काढल्या."

"मग पुढं काय झालं?" विक्तरने उत्सुकतेने विचारले.

"ती त्यावर भलतीच आखडली," थोडयाशा नेभळटपणे सुखार्को पुटपुटला. "अशी पत्रं लिहिण्यात कागदाची नासाडी करू नको म्हणाली. पण सुरुवातीला नेहमी हे असंच असतं. अशा बाबतीत मी पक्का अनुभवी आहे. खरं म्हणजे तो रोमँटिक मूर्खपणा करणं मला काही जमत नाही. वर्षानुवर्षं नुसते उसासे टाकत बसणं, कल्पनांमध्ये तरंगणं... त्यापेक्षा संध्याकाळी दुरुस्तीवाल्यांच्या बराकींकडं एक चक्कर मारली तर अवघ्या तीन रूबलमध्ये मस्त चटकचांदणी उचलता येते. आणि फुक्कटची बडबड नाही. मी वाल्का तीखनोवबरोबर जायचा. तुला ठाऊक आहे तो? रेल्वेतला फोरमन."

विक्तरने शिसारून कपाळाला आठ्या घातल्या.

"शूरा, तू तसल्या घाणेरड्या पोरींकडं जातोस?"

शूराने आपली सिगारेट चघळली, तो थुंकला आणि उपहासाने म्हणाला :

"फार पवित्रपणाचा आव आणू नको. तू कुठं जातोस ते आम्हाला माहीत आहे."

विक्तरने त्याचे बोलणे मध्येच अडवून विचारले :

"या तुझ्या फक्कड पाखराची ओळख करून देतोस?"

"अर्थात. लौकर चल, नाहीतर ती आपल्याला गुंगारा द्यायची. काल सकाळी ती एकटीच मासे धरायला गेली होती."

ते दोघे मित्र जेव्हा तोन्यापाशी आले तेव्हा सुखार्कोने तोंडातून सिगारेट काढली व आदबीने झुकून त्याने तिला अभिवादन केले.

"नमस्ते मॅडमॉझेल तुमानोवा. तुम्हीसुद्धा मासे धरायला आलात?"

"नाही, मी नुसती पाहतेय," तोन्या उत्तरली.

"तुमची दोघांची पूर्वी कधी भेट झालीय?" सुखार्कोने घाईघाईने विक्तरचा दंड धरून विचारले. "हा माझा मित्र विक्तर लेश्चीन्स्की."

विक्तरने लाजत हस्तांदोलनासाठी तोन्यापुढे हात धरला.

"तुम्ही का आज मासे पकडत नाही?" संभाषण चालू ठेवण्यासाठी सुखार्कोने चौकशी केली.

"मी गळ आणायला विसरले," तोन्या उत्तरली.

"मी आत्ता दुसरा घेऊन येतो," सुखार्को म्हणाला. "तोपर्यंत तुम्ही माझा घ्या. मी एका मिनिटात परत येतो."

विक्तरची या मुलीशी ओळख करून देण्याचे आश्वासन

त्याने पुरे केले होते व आता त्या दोघांना एकांत मिळावा म्हणून त्याची धडपड चालली होती.

"नको बाई, आपण कुणाच्या तरी वाटेत आडवं आल्यासारखं होईल. तिथं कुणी तरी आधीच मासे धरतंय," तोन्या म्हणाली.

"कुणाच्या वाटेत?" सुखार्कोने विचारले. "अरेच्चा, त्याच्या म्हणता?" झुडुपाखाली बसलेल्या पावेलकडे त्याचे आता प्रथमच लक्ष गेले. "त्याला दोन दणक्यात बाजूला करतो."

तोन्याने त्याला अडविण्याच्या आधीच तो गळाशी व आकड्याशी खटपट करणाऱ्या पावेलपर्यंत पोचला.

"तुझा गळ खेचून घे आणि इथून चालता हो," सुखार्को पावेलला म्हणाला. "आटप लौकर..." पावेल गळ टाकून शांतपणे बसून राहिला तेव्हा तो पुढे म्हणाला.

पावेलने मान वर केली आणि सुखार्कोकडे एक तिखट कटाक्ष फेकला.

"चूप बैस. समजतोस कोण स्वत:ला?"

"क-क-काय?" सुखार्को ओरडला. "फत्रूड भिकारड्या, उलट उत्तर द्यायची हिंमत करतोस? चालता हो इथून!" त्याने गांडुळांच्या डबड्यावर जोराने लाथ हाणली. डबा हवेत उडाला व तळ्यात पडला तेव्हा पाण्याचे तुषार तोन्याच्या चेहऱ्यावर उडाले.

"सुखार्को, असं वागताना शरम वाटायला पाहिजे तुला!" ती ओरडली.

पावेल ताडकन उठून उभा राहिला. सुखार्को हा रेल्वे यार्डाच्या प्रमुखांचा मुलगा होता हे त्याला माहीत होते व

आर्त्योम तेथेच नोकरी करीत होता. या लठ्ठ्या बुद्धूला बडवले तर तो आपल्या वडिलांकडे तक्रार करील आणि आर्त्योमला त्रास सहन करावा लागेल, एवढ्या एकच विचारामुळे त्या मामल्याचा तेथल्या तेथे निकाल लावण्याचा मोह त्याने आवरला.

दुसऱ्याच क्षणी पावेल आपल्याला मारील याची जाणीव होऊन सुखार्को पुढे धावला आणि त्याने दोन्ही हातांनी पावेल-च्या छातीत धक्का मारला. पाण्याच्या काठाशी उभ्या असलेल्या पावेलचा एकदम झोक गेला, पण हातांची जोरदार हालचाल करून त्याने आपला तोल सावरला आणि पाण्यात पडण्यापासून त्याने स्वत:ला बचावले.

सुखार्को पावेलपेक्षा दोन वर्षांनी मोठा होता आणि मारामाऱ्या उकरून काढण्याबद्दल व धमक्या देण्याबद्दल कुप्रसिद्ध होता.

छातीतल्या दणक्यामुळे पावेल संतापून लालबुंद झाला.

"अच्छा, तुला हे पाहिजे तर! घे!" आणि विजेच्या चपळाईने त्याने सुखार्कोच्या तोंडावर ठोसा हाणला. सुखार्कोला पुन्हा सावरण्यासाठी वेळ मिळायच्या आत पावेलने त्याच्या गणवेषाच्या डगल्याला गच्च धरले व पाण्यात खेचत नेले.

सुखार्कोचे चकचकीत पॉलिश केलेले बूट आणि विजार चिप्प भिजली होती. गुडघाभर पाण्यात तो पावेलच्या मगर मिठीतून सुटण्याची धडपड करीत होता. आपला हेतू साध्य होताच पावेल उडी मारून किनाऱ्याला आला. चिडलेला सुखार्को खाऊ का गिळू अशा आवेशाने त्याच्यावर धावून गेला.

प्रतिस्पर्ध्याला तोंड देण्यासाठी पावेल मागे वळला तेव्हा त्याला आठवले :

"डाव्या पावलावर शरीराचा भार द्या, उजवा पाय ताठ ठेवा आणि उजवा गुडघा वाकवा. ठोशामागे सबंध शरीराचे वजन घाला आणि हनुवटीच्या दिशेने वरच्या बाजूला ठोसा मारा."

थडाड!

पावेलचा ठोसा बसताच सुखार्कोचे दात वाजले. हनुवटीमधून सणसणत गेलेल्या असह्य वेदनेमुळे व दातांच्या मध्ये जीभ सापडल्यामुळे सुखार्को जोराने किंचाळला आणि तोल जाऊन धप्पदिशी पाण्यावर उताणा पडला.

वरती किनाऱ्यावर तोन्याची हसून हसून मुरकुंडी वळली.

"शाब्बास! शाब्बास! भली खोड जिरवली!" ती टाळ्या पिटून ओरडत होती.

अडकलेला गळ पावेलने एवढ्या जोरात खेचला की, ती झटकन वर उडाला व वरच्या किनाऱ्याच्या रस्त्यावर पडला.

"तो पावेल कोर्चागिन, अट्टल गुंड आहे," विक्तर तोन्याला सांगत होता ते शब्द जाता जाता पावेलच्या कानांवर पडले.

स्टेशनवरचे वातावरण खदखदत होते. रेलमार्गावरचे कामगार आपली हत्यारे खाली ठेवणार अशी कुणकुण होती. शेजारच्या मोठ्या स्टेशनामधील यार्ड-कामगारांनी काहीतरी मोठ्या गोष्टीला आरंभ केला होता. घोषणापत्रके वाळगल्याच्या संशयावरून दोघा इंजिन ड्रायव्हरना जर्मनांनी अटक केली होती. खेड्यांशी संबंध असलेल्या कामगारांमध्येही गंभीर

स्वरूपाची रूळबळ माजली होती, कारण लष्करी वापरासाठी मालमत्ता जप्त होत होत्या व जमीनदार आपल्या इस्टेटींकडे परतले होते.

हेत्मनांच्या रक्षकांच्या आसूडांचे वळ शेतकऱ्यांच्या पाठींवर उमटत होते. गुबेर्नियामध्ये गनिमी चळवळ आकार घेत होती. एव्हाना डझनभर गनिमी तुकड्या बोल्शेविकांनी संघटित केल्या होत्या.

झुखरायना आजकाल अजिबात उसंत मिळत नव्हती. शहरातल्या मुक्कामात त्यांनी खूप काही साध्य केले होते. अनेक रेलकामगारांशी त्यांनी ओळख करून घेतली होती, तरुणांच्या मेळाव्यांना ते हजर राहिले होते, रेलयार्डातल्या मेकॅनिकांचे आणि लाकूड गिरणीतल्या कामगारांचे भक्कम गट त्यांनी बांधले होते. आर्त्योमचे मन जाणून घेण्याचा त्यांनी प्रयत्न केला होता व बोल्शेविक पक्षासंबंधी आणि त्याच्या उद्दिष्टासंबंधी त्याचे काय मत होते ते अजमावून घेतले होते.

"या पक्षांबद्दल मला फारशी काही माहिती नाही फ्योदर," धिप्पाड मेकॅनिक उत्तरला होता. "पण मदतीची गरज असेल तर तू माझ्यावर खात्रीनं विसंबू शकतोस."

फ्योदर यांचे तेवढ्यावर समाधान झाले होते, कारण आर्त्योमची घडण त्यांना माहीत होती व त्याच्या शब्दावर ते विसंबू शकत होते. "पक्षात दाखल होण्याइतपत मात्र आर्त्योमची अद्याप तयारी झाली नव्हती." झुखरायनी विचार केला होता, "काही बिघडत नाही. अशा काळात तो आपोआपच योग्य ते शिकेल."

फ्योदरनी वीज केंद्रातील नोकरी सोडली व रेलयार्डात

ते रुजू झाले. येथे त्यांना आपले कार्य चालविणे अधिक सोपे होते. वीज केंद्रामध्ये असताना त्यांचा रेल्वेशी अजिबात संबंध तुटला होता.

रेल्वेवर वाहतुकीचा जबरदस्त ताण होता. युक्रेनमधून राय, गहू, गुरे यांची हजारोंनी लूट करून आगगाडीचे डबे भर-भरून जर्मन लोक मायदेशाकडे त्यांची रवानगी करीत होते.

एक दिवस हेत्मन रक्षकांनी स्टेशनवरच्या पनामारेन्को या तार-मास्तरला अटक केली. त्याला रक्षकघरात बेदम मारहाण करण्यात आली. आर्त्योमच्या सहकाऱ्याला – रोमान सिदरेन्कोला – त्याच्यामुळे पकडण्यात आले होते हे स्पष्ट होते.

काम चालू असतानाच दोन जर्मन आणि हेत्मनांचा रक्षक असलेला स्टेशन उपप्रमुख रोमानचा शोध करीत आले. एकही शब्द न बोलता स्टेशन उपप्रमुख रोमानच्या बाकड्यापाशी गेला आणि आपल्या चाबकाच्या फटकाऱ्याने त्याने रोमानचे तोंड फोडले.

"भडव्या, चल आमच्या बरोबर!" तो खेकसला. "तुला काही खुलासा करावा लागेल!" दुष्ट नजरेने पहात त्याने रोमानचा दंड धरला व जोरात पिरगाळला. "चळवळीचं काम कसं करायचं ते आम्ही तुला शिकवू!"

रोमानशेजारी शेगड्याजवळ काम करणाऱ्या आर्त्योमने आपल्या हातातील कानस खाली टाकली व तो स्टेशन उपप्रमुखापाशी आला. त्याचा धिप्पाड देह आक्रमक पवित्र्यात उभा राहिला.

"अक्करमाशा, त्याला हात लावशील तर याद राख!" आपला वाढता राग आवरण्याची पराकाष्ठा करीत आर्त्योम घोगऱ्या आवाजात म्हणाला.

स्टेशन उपप्रमुख मागे सरला आणि त्याचवेळी त्याने आपली पिस्तुलाची चामडी पिशवी खोलली. एका बुटक्या जर्मनाने आपली रुंद पात्याच्या बागनेटाची रायफल चटकन खांद्यावरून काढून हातात धरली आणि खटकन चापावर बोट ठेवले.

"थांब!" कोणत्याही क्षणी रायफल झाडण्याचा पवित्रा घेऊन तो ओरडला.

तो उंच, बळकट मेकॅनिक त्या बारकुळ्या सैनिकापुढे अगतिक होऊन उभा राहिला. त्याला काहीही करता येत नव्हते.

रोमान आणि आर्त्योम अशा दोघांनाही अटक झाली. एका तासाने आर्त्योमची सुटका झाली, पण रोमानला सामानाच्या खोलीत तळघरात बंद करून ठेवण्यात आले.

अटक झाल्यानंतर दहा मिनिटांच्या अवधीत एकही माणूस काम करेनासा झाला. रेलयार्डातले कामगार स्टेशनच्या बागेत जमा झाले. स्विचमेन आणि पुरवठा करणाऱ्या गुदामांमधले कामगार त्यांना येऊन मिळाले. भावना शिगेला पोचल्या होत्या. रोमान आणि पनामारेन्को यांच्या सुटकेची लेखी मागणी करणारा आराखडा कुणीतरी तयार केला.

रक्षकांच्या गटाला सांगाती घेऊन पिस्तूल रोखून आरडाओरड करीत उपप्रमुख जेव्हा बागेत घुसला तेव्हा कामगारांचा संताप अधिकच वाढला.

"सगळे कामावर परत चला, नाहीतर इथल्या इथं प्रत्येकाला आम्ही अटक करू! आणि तुमच्यापैकी काहींना भिंतीशी उभे करू!" तो ओरडला.

संतापलेल्या कामगारांनी एकसमयावच्छेदेकरून एवढ्या जोरदार गर्जनेने त्याला उत्तर दिले, की आडोशासाठी तो

स्टेशनाकडे धावला. दरम्यान स्टेशन प्रमुखांनी शहरातून जर्मन शिपायांना बोलावणे धाडले होते व ट्रक भरभरून जर्मन शिपाई स्टेशनच्या दिशेने रस्त्यांवरून येत होते.

कामगार पांगले आणि घाईघाईने घरी गेले. स्टेशनमास्तर-मुद्धा कामावर राहिले नाही. झुखराय यांच्या कामाचा पडताळा मिळत होता. स्टेशनवरच्या कामगारांची ही पहिली सामूहिक कृती होती.

जर्मनांनी फलाटावर एक अवजड मशिनगन चढवली. सावज सापडल्यानंतर निशाण धरतात त्याप्रमाणे ती उभी केली होती. तिच्या शेजारी एक जर्मन कार्पोरल बसला होता व त्याचा हात चापावर ठेवलेला होता.

स्टेशन ओस पडले.

रात्रीच्या वेळी अटकसत्र चालू झाले. आर्त्योमला त्यात अटक झाली. त्या रात्री घरी जाण्याचे टाळून झुखराय निसटले.

अटक केलेल्या सर्वांना माल ठेवण्याच्या एका प्रचंड शेड-मध्ये एकत्र गोळा करण्यात आले. त्यांनी कामावर परतावे अथवा लष्करी कोर्टापुढे त्यांच्यावर खटला भरण्यात येईल, असा निर्वाणीचा इशारा देण्यात आला.

सबंध लोहमार्गावरचे जवळ जवळ सर्व रेलकामगार संपावर होते. एक दिवस आणि एक रात्रभर एकही आगगाडी गेली नव्हती. एकशेवीस किलोमीटर अंतरावर गनिमी सैनिकांच्या एका मोठ्या तुकडीने लोहमार्ग तोडला होता, पूल उडवून लावले होते आणि ती लढत होती.

रात्रीच्या वेळी जर्मन शिपायांनी भरलेली एक आगगाडी स्टेशनात आली, पण इंजिन ड्रायव्हर, त्याचा मदतनीस

आणि फायरमन पसार झाल्यामुळे ती अडकून पडली. स्टेशनच्या साइडिंगला आणखी दोन आगगाड्या निघण्याची वाट पहात होत्या.

माल ठेवण्याच्या शेडची प्रचंड अवजड दारे सताड उघडण्यात आली. स्टेशन प्रमुख, एक जर्मन लेफ्टनंट, त्याचा साहाय्यक आणि इतर जर्मनांचा एक गट आत आले.

स्टेशन उपप्रमुख म्हणाला: "कोर्चागिन, पलितोवस्की, ब्रुझ्झाक – तुम्ही इंजिन चालवायचं आणि आत्ताच्या आत्ता आगगाडी घेऊन जायची. जर नकार दिलात तर जागच्या जागी गोळ्या घालून तुम्हाला ठार करण्यात येईल. यावर तुम्हाला काही म्हणायचंय?"

तीनही कामगारांनी दुर्मुखलेपणाने मूक होकार दिला. त्यांना पहाऱ्यात इंजिनाकडे नेण्यात आले. दरम्यान दुसऱ्या आगगाडीसाठी ड्रायव्हर, मदतनीस आणि फायरमनची नांवे पुकारायला उपप्रमुखाने सुरुवात केली होती.

इंजिनाने रागाने डरकाळी फोडली आणि ठिणग्यांचा फवारा वर उडवला. त्याने एक दीर्घ नि:श्वास टाकला आणि रूळा-वरून रात्रीच्या अंधाराला कवटाळीत ते पुढे निघाले. आर्त्योमने भट्टीत कोळसे सारले, लाथ मारून दरवाजा बंद केला, अवजारांच्या पेटीवरच्या नपटचा तोंडाच्या चहादाणीतल्या पाण्याचा घोट घेतला व म्हातारा इंजिन ड्रायव्हर पलितोवस्की-कडे वळून तो म्हणाला:

"मग उस्ताद, आपण आगगाडी घेऊन जायची का?"

पलितोवस्कीच्या लोंबणाऱ्या जाडजूड भुवयांखालच्या डोळ्यांची त्रासदायक उघडझाप झाली.

"पाटीला बागनेट लावल्यानंतर झक्कत नेली पाहिजे."

इंजिनाच्या मागच्या भागात बसलेल्या जर्मन सैनिकाकडे तिरप्या नजरेने पहात ब्रुझ्झाकने सुचविले, "आपण हे सगळं टाकून पळून जाऊ शकू."

"मलाही तसंच वाटतं," दात रगडीत आर्त्योम पुटपुटला. "पण हा लेकाचा डोमकावळा आपल्या पाठीशी बसलाय."

"तेही बरोबर आहे म्हणा," खिडकीबाहेर मुंडके काढून पहात ब्रुझ्झाक गुळमुळीतपणे म्हणाला.

पलितोवस्की आर्त्योमच्या अधिक जवळ सरकला.

"आपण काही आगगाडी शेवटपर्यंत नेणार नाही, समजलास?" तो अस्फुट आवाजात म्हणाला. "पुढं लढाई चालू आहे. आपल्या लोकांनी रूळ उडवून लावलेत. आणि त्यांना गोळ्या घालून ठार मारलं जावं म्हणून आपण या डुकरांना तिथपर्यंत घेऊन जायचं? हे बघ पोरा, अगदी झारच्या काळात सुद्धा जेव्हा संप असायचा तेव्हा मी इंजिनाला हात लावलेला नव्हता. आणि आतासुद्धा मी काम करणार नाहीय्. आपल्याच लोकांवर आपण गदा आणली तर जन्माची तोंडाला काळोखी लागेल. इंजिन चालवणारी दुसरी माणसं पळून गेली की नाही? त्यांनी आपले जीव धोक्यात घातले, पण ते पळाले. आपण काही ही गाडी शेवटापर्यंत न्यायची नाही. तुमचं काय मत आहे?"

"उस्ताद तुमचं म्हणणं पटतं, पण त्याचं काय करायचं?" नजरेनेच त्याने सैनिकाकडे इशारा केला.

इंजिन ड्रायव्हरने रागाने कपाळाला आठ्या घातल्या. आपले घामेजलेले कपाळ त्याने चिंध्यांच्या बोळ्याने पुसले आणि आपल्या लालभडक डोळ्यांनी तो प्रेशर मीटरकडे टक

लावून पहात राहिला. जणू त्याला छळणाऱ्या प्रश्नाचे तो एकाग्रतेने उत्तर शोधू पहात होता. मग रागाने आणि निराशेने त्याने शिव्या हासडल्या.

आर्त्योम पुन्हा चहादाणीतले पाणी प्यायला. दोघेही एकाच गोष्टीचा विचार करीत होते, पण त्या ताणलेल्या शांततेचा त्यांच्यापैकी कुणीही भंग करीत नव्हते. आर्त्योमला झुख्रायच्या प्रश्नाची आठवण झाली: "बंधू, बोल्शेविक पक्षाबद्दल आणि कम्युनिस्ट विचारसरणीबद्दल तुला काय वाटतं?" आणि त्याने उत्तर दिले होते: "मी मदतीला नेहमी तयार आहे, तुम्ही माझ्यावर विसंबून राहू शकता..."

"काय पण मदतीची ही तऱ्हा!" त्याच्या मनात आले. "शत्रूच्या फौजा घेऊन चाललोय..."

आर्त्योमशेजारच्या अवजारांच्या पेटीवर पलितोवस्की ओणवे झाले व घोगऱ्या आवाजात म्हणाले:

"या बेटच्या सैनिकाची आपण वासलात लावली पाहिजे. समजलं?"

आर्त्योम दचकला. आवळलेल्या दातांमधून पलितोवस्की पुढे म्हणाले:

"दुसरा काही मार्ग नाही. त्याच्या टाळक्यावर दणका मारायचा, वाफनियंत्रक आणि तरफा आगीच्या भट्टीत फेकून द्यायच्या, वाफ बंद करायची आणि धूम ठोकायची."

खांद्यावरचे जणू भलेमोठे ओझे खाली टाकल्यासारखे आर्त्योमला वाटले आणि तो उद्‍गारला:

"ठीक आहे!"

ब्रुझ्झाकच्या दिशेला झुकून आर्त्योमने त्याला त्यांचा निर्णय सांगितला.

ब्रुझ्झाकने तात्काळ उत्तर दिले नाही. ते सारेच फार मोठा धोका पत्करीत होते. प्रत्येकाला आपल्या कुटुंबाचा विचार करणे भाग होते. पलितोवस्कीचे कुटुंब सर्वांत मोठे होते. त्यांच्यावर नऊ तोंडे अवलंबून होती. पण आगगाडी मुक्कामाला नेणे त्यांना शक्य नव्हते याची त्या तिघांनाही जाणीव होती.

"ठीक, मी तुमच्याबरोबर आहे," ब्रुझ्झाक म्हणाला. "पण त्याचं काय करायचं? कोण त्याला..." त्याने वाक्य पुरे केले नाही, पण त्याचा अर्थ आर्त्योमला पुरेसा स्पष्ट झाला होता.

ब्रुझ्झाक आपल्याशी सहमत आहे हे दाखविण्यासाठी आर्त्योमने पलितोवस्कीकडे वळून मानेने इशारा केला. पलितोवस्की वाफनियंत्रकाशी खटपट करीत होते. आर्त्योमला अजून एका प्रश्नाचा निर्णय लावता येत नव्हता. अस्वस्थपणे तो म्हाताऱ्या इंजिन ड्रायव्हरपाशी सरकला.

"पण कसं करायचं?"

पलितोवस्कीने आर्त्योमकडे पाहिले.

"तू सुरुवात कर. तू सगळ्यात जास्त बलवान आहेस. पहारीने आपण त्याला ठेचायचा आणि मामला खतम." म्हातारा विलक्षण अस्वस्थ झाला होता.

आर्त्योमने आठ्या घातल्या.

"मला नाही जमायचं. छे: छे: मला शक्य नाही. तसा विचार केला तर त्या बिचाऱ्याचा काय दोष? त्यालासुद्धा बागनेटाचा धाक दाखवून असं वागायला लावलंय."

पलितोवस्की डोळे संतापाने चकाकले.

"त्याचा काय दोष म्हणून विचारतोस? तसंच हे काम

आपल्यावर लादलं त्यात आपला काय दोष होता? पण ही गाडी नेऊन आपण शत्रूला मदत करतोय हे विसरू नको. हे गरीब निष्पाप वाटणारे सैनिक गनिमांना गोळ्या घालणार आहेत. मग गनिमांना दोष द्यायचा? नाही पोरा, अंगात तुझ्या अस्वलाचं बळ आहे, पण वरच्या मजला रिकामा..."

"असूं दे, असूं दे," आर्त्योमचा आवाज चिरकला. त्याने पहार उचलली. पण पलितोवस्की अस्फुटपणे त्याला म्हणाला :

"ते काम मी करतो. जास्त खात्रीनं पार पडेल. तू फावडं घेऊन वर चढ आणि मागून कोळसा देण्याचा बहाणा कर. गरजच पडली तर त्याला फावडचाचा एक दणका हाण. मी कोळसा फोडायचा बहाणा करतो."

ब्रुझ्झाकने हे बोलणे ऐकले व संमतीदर्शक मान हलवली. "उस्तादांचं बरोबर आहे," तो म्हणाला आणि वाफ-नियंत्रकाशी त्याने आपली जागा घेतली.

तांबडचा फितीची गवती टोपी घातलेला तो जर्मन सैनिक मागच्या बाजूला कोळशाच्या डब्याच्या टोकाशी दोन्ही पायां-मध्ये रायफल धरून बसला होता आणि सिगार ओढीत होता. इंजिनात काम करणाऱ्या त्या तिघांकडे तो अधून मधून सारखे कटाक्ष टाकीत होता.

कोळशाच्या डब्यावर आर्त्योम चढला तेव्हा पहारेकऱ्याने त्याच्याकडे फारसे लक्ष दिले नाही. कोळशाच्या डब्याजवळचे दगडी कोळशाचे मोठे मोठे तुकडे आपल्याला हवेत असा बहाणा करून पलितोवस्कीने त्याला वाटेतून दूर होण्याची खूण केली, तेव्हा तो जर्मन ताबडतोब इंजिनाच्या दाराच्या दिशेने निघाला.

पहारीच्या फटक्यासरशी त्या जर्मनाची कवटी फुटली तेव्हा

तापल्या लोखंडाचा चटका बसावा त्याप्रमाणे आर्त्योमने आणि ब्रुझ्झाकने दचकून उड्या मारल्या. इंजिनात पायांपाशी त्या जर्मनाचे शरीर लोळागोळा होऊन पडले.

गरम गोल टोपीमधून रक्ताची धार वेगाने झिरपत गेली आणि कोळशाच्या डब्याच्या लोखंडी कडेशी रायफल खडखड आपटू लागली.

"अस्सं," पहार खाली टाकीत पलितोवस्की पुटपुटला. चेहऱ्याच्या चमत्कारीक हालचाली करीत तो पुढे म्हणाला: "आता आपल्याला माघार घेता येणार नाही."

त्याचा आवाज फाटला आणि त्या तिघांवर पसरलेल्या अवजड शांततेचा भंग करीत तो ओरडला:

"वाफ-नियंत्रक लौकर सुट्टा करा!"

दहा मिनिटांच्या आत सारे काम पार पाडण्यात आले. नावा नाहीशा झालेल्या इंजिनाचा वेग आता हळूहळू कमी होत होता.

इंजिनाभोवतालच्या प्रकाशाच्या पट्ट्यात कडेच्या झाडांच्या अजस्त्र सावल्या झेपावत होत्या आणि गडद अंधारात गुडुप होत होत्या. इंजिनाचे पुढचे दिवे अंधाराचा पडदा फाडण्याचा व्यर्थ प्रयत्न करीत होते, पण दहा-बारा मीटरपलिकडे त्यांचा प्रकाश पोचत नव्हता. इंजिनाची जोरजोराने घोरण्यासारखी चाललेली फासफूस हळूहळू थांबत गेली. जणू त्याचे शेवटचे बळ संपले होते.

"पोरा, टाक उडी!" पाठीमागून पलितोवस्कीचा आवाज आर्त्योमने ऐकला आणि त्याने लोखंडी कठडा सोडला. आगगाडीच्या गतीमुळे त्याच्या अवाढव्य शरीराचा एकदम पुढच्या बाजूला झोक गेला. शेवटी खालच्या जमिनीवर त्याचे पाय

टेकले आणि त्याला एकदम जबरदस्त हादरा बसला. एक-दोन पावले तो धावला आणि खाली डोके वर पाय अशा अवस्थेत उतारावरून गडगडत गेला.

दोन इतर आकृतींनी इंजिनाच्या दोन्ही बाजूंनी एकाच वेळी खाली उड्या टाकल्या.

ब्रुझ्झाकच्या घरावर दुःखाची छाया पसरली होती. सेर्गेईची आई, अन्तोनीना वासील्येवना, गेले चार दिवस शोकाने अखंड झुरत होती. तिच्या नवऱ्याकडून काही बातमी नव्हती. कोर्चागिन आणि पलितोवस्की यांच्याच बरोबर इंजिन चालवायला त्याला जर्मनांनी भाग पाडले होते, एवढेच तिला माहीत होते. काल हेत्मनांचे तीन रक्षक घरी आले होते आणि अत्यंत उर्मट, उद्धट पद्धतीने त्यांनी तिला प्रश्न विचारले होते.

त्या प्रश्नांवरून तिला एवढेच अंधुकपणे जाणवले होते की, काहीतरी भानगड झाली होती. ती कमालीची अस्वस्था झाली होती. रक्षक निघून जाताच तिने डोक्यावर रूमाल बांधला आणि आपल्या नवऱ्याबद्दल आणखी काही बातमी मिळविण्याच्या उद्देशाने ती मरीया याकोवलेवनाकडे लगबगीने निघाली.

तिची सर्वांत मोठी मुलगी वाल्या स्वैपाकघर साफ करीत होती. आई बाहेर चाललेली पाहताच तिने विचारले.

"कुठं निघालीस आई?"

"कोर्चागिनच्या घरी," अश्रूंनी डबडबलेल्या डोळ्यांनी मुलीकडे ओझरता कटाक्ष टाकीत अन्तोनीना वासील्येवना उत्तरली. "कदाचित तुझ्या बाबांबद्दल त्यांना काही ठाऊक

असेल. सेर्गेई घरी आला म्हणजे त्याला म्हणावं, स्टेशनावर जाऊन पलितोवस्कींकडं चौकशी कर."

वाल्याने आपल्या आईभोवती मिठी घातली. आईला दारापर्यंत पोचवीत ती म्हणाली:

"आई, काही काळजी करू नको."

मरीया याकोवलेवनाने नेहमीप्रमाणे अन्तोनीना वासील्येवनाचे प्रेमाने स्वागत केले. त्या दोघींना आशा वाटली होती की एकमेकींजवळ काहीतरी बातमी असेल. पण बोलायला आरंभ करताच त्या दोघींचीही आशा मावळली.

रात्रीच्या वेळी कोर्चागिनच्या घराचीही झडती घेण्यात आली होती. सैनिक आर्त्योमच्या शोधात होते आणि मारीया याकोवलेवनाला त्यांनी सांगितले होते की, त्यांचा मुलगा घरी परतताच ताबडतोब कमान्दान्तुरला वर्दी द्यावी.

गस्तीच्या शिपायांना पाहताच पावेलच्या आईच्या तोंडचे पाणी पळाले होते. घरात ती एकटीच होती, कारण पावेल नेहमीप्रमाणे वीज केंद्रात रात्रपाळीला काम करीत होता.

सकाळी पावेल कामावरून घरी परतला आणि आईकडून जेव्हा त्याला झडतीची बातमी समजली तेव्हा तो खूप अस्वस्थ झाला. आपल्या भावाच्या सुरक्षिततेबद्दल त्याला भीती वाटत होती. त्या दोघांचे स्वभाव जरी भिन्न होते आणि आर्त्योम वरकरणी जरी कडक वाटायचा, तरी त्या दोघा भावांना एकमेकांविषयी खूप प्रेम वाटत होते. ही प्रेमाची भावना संयत होती, तिची अभिव्यक्ती जाहीररीत्या केली जात नव्हती, पण आपल्या भावासाठी आपण काय वाट्टेल तो त्याग करू शकू याची पावेलला जाणीव होती.

विश्रांती घ्यायलासुद्धा न थांबता झुखरायना भेटायला पावेल स्टेशनकडे धावला. झुखराय त्याला कुठेही सापडेनात. त्याला माहीत असलेले इतर कामगार गायब व्यक्तींविषयी त्याला अधिक काही सांगू शकत नव्हते. इंजिन ड्रायव्हर पलितोवस्की यांचे कुटुंबही पूर्ण अंधारात होते. पलितोवस्कींचा सर्वांत धाकटा मुलगा बरीस त्याला यार्डातच भेटला. त्यांचेही घर रात्री तपासण्यात आले होते एवढेच पावेलला समजले. सैनिक बरीसच्या वडिलांना शोधत होते.

पावेल घरी परतला तेव्हा आईला सांगण्याजोगी त्याच्या-जवळ काहीही नवी बातमी नव्हती. दमून तो बिछान्यावर आडवा झाला आणि ताबडतोब त्याला गाढ झोप लागली.

दारावर टकटक होताच वाल्याने मान वर केली. दाराची साखळी काढीत तिने विचारले:

"कोण आहे?"

उघडलेल्या दारामधून क्लीम्का मार्चेन्कोचे विस्कटलेल्या तांबडचा केसांचे डोके आत डोकावले. तो धावत आला होता हे स्पष्टपणे जाणवत होते, कारण त्याला जोरात धाप लागली होती व धावण्याच्या श्रमांमुळे त्याचा चेहरा लालबुंद झाला होता.

"तुझी आई घरात आहे?" त्याने वाल्याला विचारले.

"नाही. ती बाहेर गेलीय."

"कुठं?"

"मला वाटतं, कोर्चागिनांकडं". वाल्याने पटकन क्लीम्-काची बाही पकडली, कारण तो मुलगा परत धावायच्या बेतात होता.

घुटमळल्या नजरेने क्लीम्काने वाल्याकडे पाहिले.

"मला तुझ्या आईला भेटलंच पाहिजे," तो धीर करून म्हणाला.

"कशासाठी?" वाल्या त्याचा हात सोडायला तयार नव्हती. "बोल लौकर, ए लाल अस्वला, मला उगीच कोड्यात ठेवू नकोस. सांग काय ते," तिने त्याला दम भरला.

अन्तोनीना वासील्येवनाच्या हातातच फक्त चिठी द्यायची झुखरायची सक्त ताकीद क्लीम्का विसरला आणि आपल्या खिशातला मळका चुरगाळलेला कागदाचा कपटा काढून त्याने वालेन्तीनाच्या हाती ठेवला. सेर्गेईच्या त्या सुंदर, रूपेरी केसाच्या बहिणीला कोणताही नकार देणे त्याला जड होते, कारण तिच्याविषयी त्याला काळजाच्या कप्प्यात कुठेतरी प्रेम वाटत होते. पण या प्रेमाची स्वतःची स्वतःला कबुली द्याय-लाही तो घाबरत होता. त्याने दिलेली चिठी त्या मुलीने चटकन वाचली.

"प्रिय तोन्या! काळजी करू नको. सारं काही ठीक आहे. ते सुरक्षित आहेत. लौकरच तुला आणखी बातमी समजेल. सारं काही व्यवस्थित आहे असं इतरांनाही कळव. म्हणजे त्यांना काळजी करत बसावं लागणार नाही. चिठी फाडून टाक.

झखार."

वाल्याने क्लीम्कावर झडप घालीत विचारले:

"माझ्या लाडक्या लाल अस्वला, तुला ही चिठी कुठं मिळाली? कुणी दिली तुला?" तिने क्लीम्काला एवढ्या जोराने गदागदा हलाविले की त्याचा मनावरचा तोल सुटला

आणि त्याने स्वत:ला समजायच्या आतच दुसरी घोडचूक केली.

"स्टेशनावर झुखरायनी मला दिली." मग आपण हे बोलायला नको होते याची त्याला आठवण झाली आणि तो पुढे म्हणाला: "पण तुझ्या आईशिवाय कुण्णा कुण्णाला ती द्यायची नाही असं त्यांनी मला बजावलं होतं."

"असू दे," वाल्या हसत म्हणाली. "मी नाही कुणाला सांगायची. आता शहाण्या छोटुकल्या अस्वलासारखा पावेलच्या घरी पळत जा. आई तुला तिथं भेटेल." तिने क्लीमकाच्या पाठीत हळूच बुक्का मारला.

दुसऱ्याच क्षणी क्लीम्काचे तांबडे डोके बागेतल्या फाटकापलिकडे दिसेनासे झाले.

त्या तीन रेलकामगारांपैकी कुणीही घरी परतले नाही. संध्याकाळी झुखराय कोर्चागिनच्या घरी आले व आगगाडीत काय प्रकार घडला त्याची हकिकत त्यांनी मरीया याकोवलेवनाला सांगितली. घाबरून गेलेल्या आईला शांत करण्याची त्यांनी पराकाष्ठा केली आणि एका आडवळणाच्या खेडेगावी ब्रुझ्झाकच्या काकांच्या घर तिघेही सुरक्षित रहात असल्याचे सांगितले. अर्थात ते आत्ताच परत येऊ शकत नव्हते, पण जर्मन चांगलेच पेचात सापडले होते व कुठल्याही दिवशी परिस्थिती पालटली असती.

त्या तिघांच्या अदृश्य होण्यामुळे ती तीन कुटुंबे अधिकच एकमेकांच्या जवळ आली. त्यांच्याकडून क्वचित येणाऱ्या चिठ्या मोठ्या आनंदाने वाचल्या जात, पण त्यांच्याविना घर ओकेबोके आणि भयाण वाटायचे.

एके दिवशी झुखराय सहज म्हणून पलितोवस्कीच्या

बायकोला भेटायला गेले आणि त्यांनी तिला थोडे पैसे दिले.

"तुमचा खर्च भागावा म्हणून तुमच्या यजमानांनी हे पाठवलेत," ते म्हणाले. "मात्र हे कुणापाशी बोलू नका."

त्या वृद्धेने कृतज्ञतेने त्यांचा हात दाबला.

"मोठे उपकार केलेत. आम्हाला फार गरज होती. मुलांना खायला घालायला काहीही नव्हतं."

वस्तुतः ते पैसे बुल्गाकोवनी ठेवून दिलेल्या निधीतले होते.

"आता पुढं काय होतंय बघू या," स्टेशनकडे परत जाताना झुखराय स्वतःशीच म्हणाले. "गोळ्या घालायच्या धमक्या देऊन जरी संप मोडला असला, कामगार जरी कामावर परतले असले, तरी आता आग पेटली आहे आणि ती आता विझणार नाही. त्या तिघांच्या बाबतीत बोलायचं तर ते भक्कम, खरेखुरे कामगार आहेत."

वोरोब्योवा वाल्का खेड्याच्या वेशीजवळच्या रस्त्याशी काजळलेल्या दरवाजाच्या एका छोटया लोहारशाळेमध्ये पलितोवस्की उभे होते. आगीच्या धगीमुळे त्यांचे डोळे किलकिले झाले होते. लोखंडाच्या तापलेला लालभडक तुकडा त्यांनी लांब दांडयांच्या चिमटयांनी परतला.

उभ्या-आडव्या तुळयांवर अडकवलेला भाता आर्त्योम चालवीत होता.

"आजकाल कसबी कामगार खेडयांमधून उपाशी मरणार नाही. पाहिजे तेवढं रग्गड काम आहे," गालातल्या गालात हसत दाढी वाढवलेला इंजिन ड्रायव्हर गंमतीने म्हणाला. "असे आणखी एक-दोन आठवडे काम केलं की घरी आपल्या

माणसांसाठी थोडी चरबी आणि पीठ पाठवता येईल. पोरा, शेतकरी लोहाराचा नेहमी मान राखतो. आपण भांडवलदा-रांसारखं खाऊ-पिऊ, तू बघशीलच! हॉ-हॉ-हॉ! झखार आपल्यापेक्षा थोडा वेगळा आहे. तो शेतकऱ्यांना चिकटून राहतो. त्याची मूळं या जमिनीत आहेत. त्याचा तो काका शेतकरी आहे ना इथला. मी त्याला दोष देतो असं नाही. आर्त्योम, तुझ्या-माझ्यापाशी ना नांगर ना कुळव. आपल्या-पाशी आहे भक्कम पाठ आणि हातांची जोडी. त्यांच्या भाषेत सांगायचं तर सदाचे कामगार आपण! हॅ-हॅ! पण त्या झखारसारखे बेटे दोन्ही डगरींवर पाय ठेवायला बघतात. एक आगगाडीच्या इंजिनात आणि दुसरा खेड्यात." तांबडालाल धातूचा तुकडा त्याने चिमट्यांनी वळवला आणि अधिक गंभीर सुरात तो पुढे म्हणाला: "पण पोरा, आपली लक्षणं काही ठीक नाहीत. जर्मनांचा जर लौकर फडशा पडला नाही, तर आपल्याला येकातेरीनोस्लावला किंवा रोस्तोवला जावं लागेल. नाहीतर आपण अचानक पकडले जाऊ आणि आकाश-जमिनीच्या मध्ये टांगले जायचो."

"तुमचं बरोबर आहे," आर्त्योम अस्फुर्टपणे म्हणाला.

"तिथं घरच्या माणसांचं कसं चाललंय ते समजलं असतं तर बरं वाटलं असतं. हैदामाकी त्यांना छळत तर नसतील ना?"

"उस्ताद, आपण चांगलेच गोत्यात आलोय. घरी परत जायचा विचारच आपण सोडला पाहिजे."

निळ्या-जांभळ्या धातूचा धगधगता तुकडा इंजिन ड्रायव्हरने भट्टीतून बाहेर काढला आणि मोठ्या पटाईतपणे ऐरणीवर ठेवला.

"घाल घण पोरा!"

आर्त्योमने घण पकडला, डोक्याच्या वरपर्यंत उचलला आणि ऐरणीवर घाव घातला. स्स आवाज करीत चारी दिशांना लाल चकचकीत ठिणग्यांचे कारंजे उसळले व क्षणभर लोहारशाळेचे अगदी अंधारे कोपरेही उजळून उठले.

त्या जबरदस्त घणाच्या घावांखाली तांबडीलाल लादी पलितोवस्की उलट-सुलट फिरवीत होते आणि अगदी मऊ मेणाप्रमाणे ते लोखंड आज्ञाधारकपणे सपाट होत चालले होते.

लोहारशाळेच्या उघड्या दरवाजांमधून रात्रीच्या वातावरणाचे उबदार निःश्वास आत येत होते.

खाली अथांग काळयाभोर पाण्याचे तळे पसरले होते. त्याच्या चारी बाजूंना वेढणारे देवदार आपली उंच डोकी डोलवीत होते.

"कसे अगदी जिवंत माणसांसारखे," त्या झाडांकडे वर पाहताना तोन्याच्या मनात विचार आला. वज्रतुंड दगडांच्या किनाऱ्याशी गवताने आच्छादलेल्या एका खोलगट पट्ट्यावर ती पहुडली होती. तिच्या डोक्याच्या वरच्या भागाच्या घळीपलिकडे रान सुरू होत होते आणि त्या सुळक्याच्या पायथ्याशी तळे होते. त्या तळयावर डोकावणाऱ्या कड्यांच्या सावल्यांमुळे त्या तळयाच्या काळसर पाण्याला आणखीच गडद काळी छटा आली होती.

स्टेशनपासून फार दूर नसलेली ही जुनी दगडाची खाण म्हणजे तोन्याचे आवडते एकांतस्थळ होते. खाणीचे काम सोडून दिलेल्या खोल खड्ड्यांमधून झरे फुटले होते आणि आता तिथे तीन सरोवरे निर्माण झाली होती. किनाऱ्यावरून पाण्यात

काहीतरी धप्पकन पडल्याचा आवाज ऐकून तोन्याने मान उंचावली. आपल्या समोरच्या फांद्या बाजूला सारून तिने आवाजाच्या दिशेने पाहिले. एक चपळ, उन्हाने भाजून खरपूस तांब्यासारखे दिसणारे शरीर जोरजोराने हात मारीत किनाऱ्या-पासून दूर जात होते. त्या पोहणाऱ्याची तांबूस-लालसर पाठ आणि काळे केस तोन्याला ओझरते दिसले. पाणघोड्यासारखा तो पाण्याच्या चुळा फेकत होता, जलद हालचालींनी पाणी कापीत होता, कोलांट्या उड्या घेऊन सूर मारीत होता. मग तो पाठीवर उताणा पडून तरंगू लागला. चकाकत्या सूर्याकडे डोळे मिचमिचे करून तो पहात होता. त्याने हात ताठ पसरले होते व शरीराला किंचित बाक दिला होता.

तोन्याने फांदी परत सोडली. "असं बघणं बरं नव्हे," ती स्वतःशीच हसली आणि पुन्हा पुस्तक वाचू लागली.

लेश्चीन्स्कीने दिलेले पुस्तक वाचण्यात ती एवढी गर्क झाली होती, की देवदाराच्या जंगलाला घळीपासून वेगळे करणाऱ्या वज्रतुंडी खडकांवर कुणी चढून आल्याचेही तिला समजले नाही. नवागताकडून अनवधानाने ढकलला गेलेला एक गुळगुळीत वाटोळा खडा नेमका तिच्या पुस्तकावर घरंगळत आला. तिने दचकून वर पाहिले. पावेल कोर्चागिन तिच्या-समोर उभा होता. या अचानक भेटीने तोही गांगरला आणि गोंधळून मागे जायला वळला.

"पाण्यात हाच पोहत असावा," त्याच्या ओल्या केसांकडे पाहताना तोन्याच्या मनात विचार आला.

"मी तुम्हाला दचकवलं काय? तुम्ही इथं होता ते मला ठाऊक नव्हतं. मी योगायोगानं इथं आलो." खडकाच्या

कपारीवर हात टेकवीत पावेल म्हणाला. त्याने तोन्याला ओळखले होते.

"तुम्ही मुळीच व्यत्यय आणला नाही. हवं तर आपण कशावर तरी थोड्या गप्पा मारू."

पावेलने तोन्याकडे चकित होऊन पाहिले.

"कशावर गप्पा मारायच्या आपण?"

तोन्याने स्मित केले.

"असे उभे काय राहता? इथं बसा ना" तिने एका दगडाकडे खूण केली. "तुमचं नांव काय?"

"पाव्का कोर्चागिन."

"माझं नांव तोन्या. तर मग आता आपली ओळख झाली."

शरमून पावेलने टोपीच्या चोळामोळा केला.

"तर तुमचं नांव पाव्का?" तोन्याने शांततेचा भंग केला. "पण पाव्का का म्हणून? ते बरं नाही वाटत ऐकायला. त्यापेक्षा पावेल खूप छान वाटेल. मी तुम्हाला तशीच हाक मारीन—पावेल. तुम्ही इथं नेहमी येता..." तिला खरे "पोहायला येता का" असे विचारायचे होते. पण आपण त्याला पाण्यात पाहिले त्याची कबुली द्यायची तिची इच्छा नव्हती. म्हणून त्याऐवजी ती म्हणाली: "फिरायला?"

"नाही, नेहमी नाही. मला वेळ मिळतो तेव्हाच फक्त," पावेल उत्तरला.

"म्हणजे तुम्ही कुठं काम करता?" तोन्याने त्याला पुढचा प्रश्न टाकला.

"वीज केंद्रात. कोळसे मारायचं."

"मला सांगा, एवढी छान मारामारी करायला तुम्ही कुठं शिकलात?" तोन्याने अचानकपणे विचारले.

"माझ्या मारामाऱ्यांशी तुम्हाला काय करायचंय?" नकळत पावेल गुरगुरला.

"कोर्चागिन, असं रागावू नका बाई," आपला प्रश्न त्याला आवडला नाही असे पाहून तोन्या घाईघाईने म्हणाली. "मला फक्त उत्सुकता होती एवढंच. काय मस्त ठोसा मारलात त्या दिवशी! पण एवढं निर्दय होणं चांगलं नाही." आणि ती खो खो हसत सुटली.

"त्याच्याबद्दल दया वाटते का?" पावेलने विचारले.

"मुळीच नाही. उलट सुखार्कोला चांगली अद्दल घडली. मला ते खूप खूप आवडलं. तुम्ही खूप वेळा मारामाऱ्या करता असं मी ऐकते."

"कोण म्हणतं असं?" पावेलने कान टवकारले.

"विक्तर लेश्चीन्स्की म्हणत होता, तुम्ही पट्टीचे मारामारी करणारे आहात."

पावेलचा चेहरा काळवंडला.

"विक्तर लेकाचा डुक्कर आहे—बायकी! त्याला त्यावेळी प्रसाद मिळाला नाही म्हणून त्यानं स्वतःला सुदैवी मानलं पाहिजे. तो काय बोलला होता ते मी ऐकलं होतं, पण माझे हात विटाळायची मला इच्छा नव्हती."

"पावेल, अशी भाषा वापरू नका. चांगलं नाही ते," तोन्या त्याला अडवीत म्हणाली.

पावेलच्या डोक्यावरचे केस ताठ झाले.

"या पोरटीशी मी कशाला बोलायला सुरुवात केली?" त्याच्या मनात विचार आला. "मोठी आज्ञा करतेय मला: पहिल्यांदा काय तर म्हणे 'पाव्का' तिला आवडत नाही आणि आता माझ्या बोलण्यातले दोष काढतेय."

"लेश्चीनुस्कीवर तुमचा का राग आहे?" तोन्याने विचारले.

"तो अगदी बायक्या आहे, आईनं लाडावलेला बुळोबा! अशा लोकांना नुसतं पाहिलं तरी माझे हात शिवशिवायला लागतात. नेहमी तुमच्यावर कुरघोडी करायला बघतो, त्याला वाटतं तो श्रीमंत आहे तेव्हा काय हव्वं ते करू शकतो. पण त्याच्या श्रीमंतीची मला कवडीइतकी किंमत वाटत नाही. जरा माझ्या अंगाला हात तर लावू दे, तिंबून काढीन त्याला. अशा पोरांना थोबाडलं पाहिजे," संतापलेला पावेल फडाफडा बोलत राहिला.

लेश्चीनुस्कीचा उल्लेख केल्याबद्दल तोन्याला पश्चात्ताप झाला. त्या बायकी विद्यार्थ्याबरोबर या तरुणाला जुने हिशेब चुकते करायचे आहेत हे तिच्या लक्षात आले. संभाषणाची गाडी अधिक सुरळीत मार्गावर आणण्यासाठी पावेलला त्याच्या घरच्यांबद्दल व त्याच्या कामाबद्दल प्रश्न विचारायला तिने आरंभ केला.

नकळतपणे पावेल त्या मुलीच्या प्रश्नांना तपशीलवार उत्तरे देऊ लागला. आपल्याला जायचे होते हे तो विसरून गेला.

"तुम्ही शाळेचं शिक्षण पुरं का नाही केलं?" तोन्याने विचारले.

"मला हाकलून दिलं."

"का?"

पावेल लाजला.

"पाद्रयाच्या पिठात मी थोडी तंबाखू मिसळली, म्हणून त्यांनी मला शाळेतून हाकललं. तो पाद्री फार खत्रूड होता.

फार छळायचा" आणि पावेलने तिला संपूर्ण कहाणी सांगितली.

तोन्या उत्सुकतेने ऐकत होती. लौकरच पावेलचा पहिला बुजरेपणा नाहीसा झाला आणि अगदी जुनी ओळख असल्या-प्रमाणे तो तिच्याशी गप्पा मारू लागला. बोलण्याच्या ओघात त्याने आपल्या भावाच्या नाहीसे होण्याचाही उल्लेख केला. मैत्रीच्या भावनेने गप्पा मारीत ती दोघे त्या खोलगट भागात खूप वेळ बसली होती. कितीतरी वेळ उलटून गेला होता याचे त्या दोघांपैकी कुणालाही भान नव्हते. अखेरीस पावेल चटकन उठून उभा राहिला.

"माझी कामावर जायची वेळ झालीय. इथं गप्पा हाणत बसलो, तिथं मला बंब पेटवायला पाहिजे होते. दनीलो आज नक्की ओरडणार." पुन्हा एकदा तो घुटमळला आणि पुढे म्हणाला: "बराय्, चलतो मिस्. मला आता शहराकडं धावलं पाहिजे."

तोन्या उडी मारून उठली आणि तिने जाकीट अंगात चढवले.

"मलाही गेलं पाहिजे. चला, आपण बरोबरच जाऊ या."

"छे: छे: मला जमणार नाही. मला अक्षरश: पळत गेलं पाहिजे."

"ठीक आहे. मी तुमच्याशी शर्यत लावते. बघू कोण पहिलं येतं."

पावेलने तिच्याकडे तुच्छतेने कटाक्ष टाकला.

"माझ्याशी शर्यत खेळणार? तुम्हाला जिंकायची आशा नाही!"

"बघू या. प्रथम इथून निघू या."

पावेलने दगडाच्या कडेवर उडी मारली, मग त्याने आधाराला तोन्याला हात दिला आणि जंगलातून उड्या मारीत मारीत दोघे मोकळ्या मैदानावर उतरले. तिथून स्टेशनकडे रस्ता जात होता.

तोन्या रस्त्याच्या मधोमध थांबली.

"चला आता. एक, दोन, तीन पळा ऽऽ! पकडा बघू मला!" ती वाऱ्याच्या वेगाने धावली. तिच्या बुटाचे तळवे चमकत होते आणि तिच्या निळ्या जाकीटाची टोके वाऱ्या-बरोबर फडफडत होती.

पावेल तिच्या पाठोपाठ धावला.

"दोन ढांगात तिला गाठीन," त्या उडत्या जाकीटामागे धावताना पावेलच्या मनात विचार आला. पण त्या गल्लीच्या अगदी टोकाशी, स्टेशनच्या अगदी जवळपासच तो तिला गाठू शकला. शेवटचा जोर करून त्याने तिला गाठले आणि आपल्या बळकट हातांनी तिचा खांदा पकडला.

"हे! पकडलं पाखरू!" धापा टाकीत तो आनंदाने ओरडला.

"सोडा ना! दुखलं मला!" तोन्या खांदा सोडवून घ्यायचा प्रयत्न करीत कळवळली.

ती दोघे धापा टाकीत उभी होती. त्यांच्या धमन्या थाड-थाड उडत होत्या. त्या जोरदार शर्यतीमुळे दमलेली तोन्या ओझरत्या क्षणभर पावेलच्या अंगावर किंचित रेलली. तिची ती गोड जवळिक त्याला पुढे कितीतरी काळपर्यंत आठवत राहिली.

"यापूर्वी मला कुणीही कधीही गाठलं नव्हतं," त्याच्या-पासून दूर सरकत ती म्हणाली.

त्याचवेळी ते एकमेकांपासून अलग झाले. पावेलने टोपी हलवून तिचा निरोप घेतला आणि तो शहराच्या दिशेने धावला .

बंबाच्या खोलीचे दार ढकलून पावेल आत आला तेव्हा कोळसे मारणारा दनीलो एव्हाना बंब पेटवण्याच्या कामात गुंतला होता.

"आणखी थोडं उशीरा नाही का यायचं ?" तो खेकसला. "तुझं कामसुद्धा मीच करायचं का ?"

पावेलने आपल्या सहकाऱ्याला शांत करण्यासाठी त्याच्या खांद्यांवर थोपटले.

"अरे मित्रा, आत्ता एका मिनिटात धडधडून जाळ पेटवू या," आनंदी सुरात तो म्हणाला आणि लाकडे उचलू लागला.

मध्यरात्रीच्या सुमाराला दनीलो लाकडाच्या ढिगावर मस्त घोरत पडला तेव्हा पावेलने इंजिनाला तेलपाणी करण्याचे काम संपवले होते. त्याने हात चिंध्यांना पुसून साफ केले, हत्यारांच्या पेटीतून "झुझेप्पे गरिबाल्दी'चा बासष्टावा भाग खेचून काढला आणि नेपल्समधील त्या "लाल सदरेवाल्यां"च्या अद्भुत पुढाऱ्याच्या विलक्षण साहसकथा वाचण्यात तो रमून गेला.

"तिने आपल्या सुंदर निळया डोळयांनी ड्यूककडे रोखून पाहिले..."

"तिचेही डोळे निळे आहेत," पावेलच्या मनात विचार आला. "आणि ती वेगळी आहे. इतर श्रीमंतांसारखी नाही. आणि पळते काय भन्नाट."

दिवसा तोन्याबरोबर घडलेल्या भेटीच्या आठवणीत पावेल

इतका गुंगला की, वाफेच्या आत्यंतिक दाबाखाली थडथडणाऱ्या इंजिनाचा वाढता घरघराट त्याला ऐकूच आला नाही. प्रचंड चाक गरगरा फिरत होतें आणि कांक्रीटचा फलाट हादरत होता..

पावेलने दाबमापकावर नजर टाकली तेव्हा धोक्याच्या लाल रेषेवर अनेक आकड्यांपर्यंत काटा थरथरत गेला होता.

"च्यायला!" पावेल सुरक्षा झडपेकडे धावला आणि त्याने दोन वळणे झटकन मारली. दबलेली वाफ फसफसत नळ्यांमधून निघून गेली. बंबांच्या खोलीच्या बाहेर तिचा मोठा फसफस आवाज झाला. तरफ खेचून पावेलने पंपाच्या कप्पीवर पट्टा टाकला.

त्याने दनीलोकडे दृष्टिक्षेप टाकला. पण दनीलो गाढ झोपला होता, त्याने तोंड सताड उघडे पडले होते आणि त्याच्या नाकामधून विलक्षण भयानक आवाज उमटत होते.

अर्ध्या मिनिटानंतर दाबमापकाचा काटा नेहमीच्या पातळीवर उतरला.

पावेलचा निरोप घेतल्यानंतर तोन्या आपल्या घराच्या दिशेने निघाली. त्या काळयाभोर मुलाबरोबरच्या भेटीच्या विचारांनी तिचे मन व्यापले होते. तिला खूप छान वाटत होते, पण त्या वाटण्याचे कारण उमगत नव्हते.

"किती तेजस्वी आहे, किती हिंमत आहे त्याच्यात! मला वाटलं होतं त्याप्रमाणं तो अजिबात गुंड नाही. काही झालं तरी इतर शाळकरी मुलांप्रमाणं तो मुळीच आचरट नाही..."

पावेलची घडण अगदी वेगळी होती. तोन्याला पूर्णत: अपरिचित अशा वातावरणात त्याची वाढ झाली होती.

"त्याला माणसाळता येईल," तिच्या मनात विचार आला. "त्याच्याशी मैत्री करण्यात खूप गंमत येईल."

ती घराच्या जवळ पोचली तेव्हा लीझा सुखार्को व नेल्ली आणि विक्तर लेश्चीन्स्की बागेत बसलेले तिने पाहिले. विक्तर वाचत होता. ते सारे तिची वाट पहात होते हे स्पष्ट होते.

त्यांनी एकमेकांना नमस्कार-चमत्कार केले आणि ती एका बाकड्यावर बसली. त्या बाष्कळ बडबडीच्या दरम्यान केव्हा-तरी विक्तर तिच्याशेजारी बसला आणि त्याने विचारले:

"मी तुम्हाला दिलेली कादंबरी वाचलीत?"

"कादंबरी?" तंद्रीतून बाहेर येत तोन्याने विचारले. "अं... मी..." पुस्तक तळयाच्या किनारी ती विसरली होती, पण तिने तसे त्याला सांगितले नाही.

"तुम्हाला ती प्रेमकहाणी आवडली?" विक्तरने प्रश्नार्थक चयने पाहिले.

तोन्या क्षणभर विचारात गढली. मग आपल्या बुटाच्या अंगठ्याने पायवाटेच्या वाळूवर तिने हळूहळू काहीतरी आकृती रेखाटली आणि मान उचलून विक्तरकडे पाहिले.

"नाही, त्यापेक्षा फार रंजक प्रेमकहाणी मी सुरू केलीय."

"खरंच?" दुखावल्या स्वरात विक्तर म्हणाला. "कोण आहे लेखक?"

तोन्याने त्याच्याकडे चकाकत्या, मिस्कील डोळयांनी पाहिले.

"त्या गोष्टीला लेखक नाही..."

"तोन्या, तुझ्या मित्रमंडळींना आत बोलाव. चहा तयार

झालाय," तोन्याच्या आईने गच्चीतून हाक मारून सांगितले.

दोन्ही मुलींना दोन बाजूंना हाताशी धरून तोन्या घरात नेली. त्यांच्या पाठोपाठ जाताना गोंधळलेला विक्तर तोन्याच्या शब्दांचा अर्थ लावण्याचा प्रयत्न करीत होता.

नकळतपणे ताबा घेणाऱ्या या भावनेमुळे पावेल कमालीचा बेचैन झाला होता. त्याला ती भावना आकलन होत नव्हती आणि त्याचा बंडखोर स्वभाव त्यामुळे अस्वस्थ झाला होता.

तोन्याचे वडील प्रमुख वनरक्षक होते आणि पावेलच्या दृष्टीने पाहता लेश्चीन्स्की वकीलांच्या वर्गातच त्यांची गणना होत होती.

दारिद्र्यात आणि अपुरेपणात पावेल लहानाचा मोठा झाला होता. त्याच्या दृष्टीने सुस्थित अशा माणसांबद्दल त्याला त्यामुळे तिटकारा वाटत असे. तोन्याबद्दलच्या त्याच्या भावनांनाही भीतीची आणि गैरसमजुतींची झालर होती. तोन्या त्याच्या भोवतीच्या माणसांपैकी एक नव्हती. उदाहरणादाखल सांगायचे तर पाथरवटाची मुलगी गालोच्का, हिच्यासारखी ती समजायला सरळ-सोपी नव्हती. तोन्याबरोबर तो सतत सावधपणे वागत होता. त्याच्यासारख्या सामान्य कोळसे मारणाऱ्या कामगाराबाबत तिच्यासारख्या सुंदर आणि सुसंस्कृत मुलीने किंचित जरी हेटाळणीचा सूर काढला किंवा कीव दाखवली तर प्रतिटोला हाणण्याच्या सज्जतेत तो होता.

सबंध आठवडाभर तो तिला भेटला नव्हता आणि आज त्याने तळयावर जाण्याचे ठरवले. तिची भेट होईल या आशेने त्याने मुद्दाम तिच्या घरावरून जाणारा रस्ता निवडला. कुंपणापलिकडून सावकाश चालत जाताना बागेच्या टोकाशी

परिचित खलाशी पोलका त्याच्या नजरेस ओझरता दिसला. रस्त्यावर पडलेले देवदाराचे सुकलेले फळ त्याने उचलले आणि पांढऱ्या पोलक्याच्या दिशेने नेम धरून फेकले.

तोन्याने मागे वळून पाहिले. तो दृष्टीस पडताच प्रेमळ हास्य करीत दोन्ही हात पसरून ती कुंपणाकडे धावली.

"शेवटी आलात एकदाचे," ती म्हणाली. तिच्या आवाजातला आनंद लपत नव्हता. "एवढे दिवस होता तरी कुठं? तळ्याच्या काठाशी मी पुस्तक विसरले होते ते आणायला गेले होते. मला वाटलं तुम्ही तिथं असाल. आत नाही येणार?"

पावेलने मान नकारार्थी हलवली.

"नाही,"

"का?" आश्चर्याने तिच्या भुवया उंचावल्या.

"मला खात्री आहे, तुमच्या वडलांना ते आवडायचं नाही. माझ्यासारख्या गुंडाला बागेत येऊ दिल्याबद्दल तुम्हाला भरपूर बोलणी खावी लागतील.

"पावेल, तुम्ही काहीतरीच बोलता," तोन्या रागाने म्हणाली. "ताबडतोब आत या पाहू. माझे वडील तसलं काही कधीही बोलणार नाहीत. तुम्ही स्वतः बघालच. आता या बघू आत."

फाटक उघडायला ती धावली आणि काहीशा अनिश्चित मनाने पावेल तिच्यापाठोपाठ आत आला.

बागेतल्या गोलाकार टेबलापाशी ती बसली तेव्हा तिने त्याला विचारले: "तुम्हाला पुस्तकं आवडतात?"

"खूप," पावेल चटकन उत्तरला.

"कुठलं पुस्तक तुम्हाला सर्वांत जास्त आवडलं?"

उत्तर देण्यापूर्वी पावेलने तिच्या प्रश्नावर काही क्षण विचार केला : "झुझेप्पा गरिबाल्दी."

"झुझेप्पे गरिबाल्दी," त्याचा उच्चार सुधारीत तोन्या म्हणाली. "तर तुम्हाला ते पुस्तक विशेष आवडतं?"

"हो. मी सगळे अडुसष्ट भाग वाचून काढलेत. दर पगाराला मी पाच भाग विकत घेतो. काय माणूस होता गरिबाल्दी!" पावेल उद्गारला. "खरा नायक! मला असली पुस्तकं आवडतात. त्याला किती लढाया लढाव्या लागल्या आणि प्रत्येकीत शेवटी तो जिंकला. शिवाय त्यानं सबंध जगभर प्रवास केला! आज जर तो जिवंत असता तर नक्की मी त्याच्याबरोबर गेलो असतो. शप्पत! तरुण कामगारांना तो आपल्या टोळीत सामील करून घ्यायचा आणि गरीबांसाठी ते सारे लढले."

"आमची पुस्तकं तुम्हाला पहायचीत?" तोन्याने विचारले आणि त्याचा दंड धरला.

"नाही नाही, मी घरात जाणार नाही," पावेलने नकार दिला.

"एवढे हट्टी का? घाबरण्यासारखं काय आहे त्यात?" आपल्या अस्वच्छ अनवाणी पायांकडे पावेलने खाली वाकून एकदा पाहिले आणि डोक्याच्या मागील बाजूस कराकरा खाजवले.

"तुमची आई किंवा तुमचे वडील मला घराबाहेर फेकून देणार नाहीत ना?"

"असं बोलणं आता थांबवलं नाही तर मात्र खरंच मला तुमचा राग येईल हं," तोन्या फणकारली.

"लेश्चीन्स्की आमच्यासारख्यांना त्याच्या घरात कधीही

घेत नाही. तो नेहमी आमच्याशी स्वैपाकघरात बोलतो. मला एकदा काही कामासाठी त्यांच्याकडं जावं लागलं तर नेल्ली मला खोलीतसुद्धा घेईना. तिचा गालिचा किंवा आणखी काही मी खराब करीन अशी तिला भीती वाटली असावी," हसून पावेल म्हणाला.

"चला, चला," त्याच्या खांद्याला धरून तिने त्याला आग्रह केला आणि व्हरांड्याच्या दिशेने हळूच त्याला लोटले.

जेवणघरामधून ती त्याला दुसऱ्या एका खोलीत घेऊन गेली. तिथे ओकच्या लाकडाचे प्रचंड कपाट होते. तिने जेव्हा त्याची दारे उघडली तेव्हा शेकडो पुस्तके हारीने रचून ठेवलेली पावेलच्या दृष्टीस पडली. आपल्या आयुष्यात त्याने एवढी संपदा कधी पाहिली नव्हती.

"आता तुमच्यासाठी एखादं खास पुस्तक शोधू या. आणखी पुस्तकं घ्यायला तुम्ही नेहमी याल असं मला वचन दिलं पाहिजे. द्याल ना?"

पावेलने आनंदाने मान डोलावली.

"मला खूप आवडतात पुस्तकं," तो म्हणाला.

त्या दिवशी त्या दोघांनी अनेक रम्य तास एकत्र घालवले. तिने त्याची आपल्या आईशी ओळख करून दिली. म्हणजे ती बाब काही भयंकर दिव्य नव्हते हे त्याला जाणवले. खरे म्हणजे त्याला तोन्याची आई आवडली.

तोन्या पावेलला स्वतःच्या खोलीत घेऊन गेली आणि तिने स्वतःची पुस्तके त्याला दाखवली.

प्रसाधन-टेबलावर एक छोटा आरसा होता. तोन्या पावेलला त्याच्यापाशी घेऊन गेली आणि किंचित हसून म्हणाली:

"तुम्ही केसांचं एवढं जंगल का वाढवलंय? त्यांना कापत नाही किंवा विंचरत नाही कधी?"

"ते फार वाढतात तेव्हा मी सरळ तुळतुळीत गोटा करतो. दुसरं काय करणार मी?" शरमून पावेल म्हणाला.

तोन्या हसली आणि प्रसाधन-टेबलावरचा कंगवा उचलून त्याच्या बंडखोर बटांमधून तिने त्याला चार-पाच वेळा फिरवला.

"आता जरा जास्त बरं दिसतंय," आपली करामत न्याहाळून पहात ती म्हणाली. "केस नेहमी व्यवस्थित कापले पाहिजेत. अशा वेड्यासारख्या झिंज्या वाढवून फिरणं बरं नाही दिसत."

त्याच्या विटलेल्या तपकिरी सदऱ्याकडे आणि त्याच्या मळक्या विजारीकडे तिने एक नापसंतीचा कटाक्ष टाकला, पण त्यावर पुढे भाष्य मात्र केले नाही.

तिच्या कटाक्षाचा अर्थ पावेलला उमजला आणि आपल्या कपड्यांची त्याला लाज वाटली.

निरोप घेताना तोन्याने त्याला पुन्हा येण्याचे निमंत्रण दिले. दोन दिवसांच्या आत तिला भेटण्याचे आणि मासे धरायला तिच्याबरोबर जाण्याचे आश्वासन तिने त्याच्याकडून घेतले.

खिडकीमधून उडी मारून घरातून बाहेर जाण्याचा सोपा मार्ग पावेलने पत्करला. इतर खोल्या पार करण्याची आणि तोन्याच्या आईला पुन्हा भेटण्याची तसदी त्याने घेतली नाही.

आर्त्योम गेल्यापासून कोर्चागिनांच्या घरची स्थिती अवघड बनली होती. पावेलचा पगार पुरा पडत नव्हता.

आपण पुन्हा कामाला जातो, असे मरीया याकोवलेवनाने पावेलला सुचवून पाहिले. विशेषतः लेश्चीन्स्कीच्या घरात

सध्या एका स्वैपाकिणीची गरज होती. पण पावेलने ठाम विरोध केला.

"नाही आई, मी आणखी जादा काही काम शोधून काढतो. लाकडं भरायला त्यांना लाकूडगिरणीत माणसांची गरज आहे. मी तिथं अर्धा दिवस काम करीत जाईन. आपल्याला जगण्यापुरते पैसे मिळायला लागतील. तू कामावर मुळीच जायचं नाही. त्याशिवाय घर चालवता आलं नाही तर आर्त्योम मला बोल लावील."

त्याच्या आईने कामावर जाण्याचा आग्रह पुन:पुन्हा धरला, पण पावेलने निग्रहाने तिला तसे करू दिले नाही.

दुसऱ्या दिवशी पावेल लाकूडगिरणीत कामावर दाखल झालासुद्धा. ताजी कापलेली फळकुटे वाळवण्यासाठी साठवून ठेवण्याच्या कामावर त्याची नेमणूक झाली होती. तेथे त्याच्या माहितीची अनेक मुले त्याला भेटली. त्यात मीशा लेवचुकोवसारखा जुना शाळूसोबती आणि वान्या कुलिशोव होते. मीशाने आणि त्याने आपली जोडी जमवली व उक्त्या कामावर ते चांगले पैसे मिळवू लागले. पावेल दिवसा लाकूडगिरणीत काम करायचा आणि संध्याकाळी वीज केंद्रात आपल्या नेहमीच्या कामावर जायचा.

दहाव्या दिवशी संध्याकाळी पावेलने आपली कमाई आईपाशी आणली.

त्याने पैसे तिच्या हातावर ठेवले, अस्वस्थपणे त्याने चुळबूळ केली व अखेरीस लाजत लाजत तो म्हणाला:

"बरं का आई, मला एक सॅटिनचा सदरा विकत घे — गेल्या वर्षी माझा होता तसा — आठवतं? यातले निम्मे पैसे त्याला खर्च होतील, पण काळजी करू नको. मी आणखी

पैसे मिळवीन. माझा हा सदरा फारच जुनकट झालाय," आपल्या मागणीचा खुलासा करण्यासाठी शेवटचे वाक्य तो अपराधी सुरात बोलला.

"मी नक्की आणते तुला तसला सदरा," त्याची आई म्हणाली. "पावलूशा, आजच मी कापड आणते आणि उद्या शिवते. खरंच तुला नवा सदरा घेतला पाहिजे." आपल्या मुलाकडे ती प्रेमळपणे टक लावून पहात राहिली.

न्हाव्याच्या दुकानापाशी पावेल थांबला आणि खिशातला रूबल चाचपून पाहिल्यावर तो आत शिरला.

एका रुबाबदार तरुण न्हाव्याने पावेलला आत येताना पाहिले व रिकाम्या खुर्चीवर बसण्याची त्याने मानेनेच खूण केली.

"बसा."

त्या खोलगट मऊ मऊ खुर्चीत स्थानापन्न झाल्यानंतर पावेलने पुढच्या आरशात पाहिले तेव्हा त्याला स्वतःचा गांगरलेला, गोंधळलेला चेहरा दिसला.

"मशीन फिरवायची?" न्हाव्याने विचारले.

"हो, म्हणजे नाही– मला केस कापून घ्यायचेत... काय म्हणता तुम्ही त्याला?" पावेल अडखळत बोलला आणि शब्द सापडेनात तेव्हा त्याने हातवारे करून दाखवले.

"समजलं," न्हाव्याने स्मित केले.

सुमारे पंधरा मिनिटांनंतर, केस कापण्याच्या दिव्यातून पार पडलेला पावेल घामाघूम आणि दमल्या अवस्थेत न्हाव्याच्या दुकानातून बाहेर पडला. पण त्याचे केस व्यवस्थितपणे कापून विंचरलेले होते. त्याच्या कुरळ्या बंडखोर झुलपांवर

न्हाव्याने बरीच मेहनत घेतली होती. अखेरीस पाण्याचा व कंगव्याचा विजय झाला होता आणि राठ केसांची खुंटं व्यवस्थित जागच्या जागी बसली होती.

बाहेर रस्त्यावर आल्यानंतर पावेलने सुटकेचा एक निश्वास टाकला आणि आपल्या डोळ्यांवर टोपी खेचली.

"आई जेव्हा मला बघील तेव्हा काय म्हणेल?" त्याच्या डोक्यात विचार आला.

पावेलने आपल्याबरोबर मासे धरायला जाण्याचे आश्वासन पाळले नाही तेव्हा तोन्या संतापली.

"तो कोळसे मारणारा पोरगा काही शब्दाचा धड दिसत नाही," चिडून ती स्वतःशी म्हणाली होती. पण जेव्हा अनेक दिवस उलटले आणि पावेल फिरकलाच नाही तेव्हा मात्र त्याच्या सहवासासाठी ती झुरू लागली.

एके दिवशी ती फिरायला बाहेर जाण्याच्या तयारीत असतानाच तिची आई तिच्या खोलीत डोकावून म्हणाली:

"तोन्या, तुला कुणीतरी भेटायला आलंय. त्याला आत पाठवू?"

पावेल उंबरठ्याशी येऊन उभा राहिला. त्याचा नूर एवढा बदलला होता की तोन्याने प्रथम त्याला ओळखलेच नाही.

त्याने नवा निळा सॅटिनचा सदरा व काळी विजार घातली होती. अगदी चकाकेपर्यंत त्याने बुटांना पॉलिश केले होते. त्याचे केरसुणीसारखे राठ केस कापलेले होते हे तोन्याच्या चटकन ध्यानात आले. मळक्या कोळसे मारणाऱ्या पोराचा अवतार संपूर्ण बदलून गेला होता.

तोन्या आपले आश्चर्य प्रकट करणार होती, पण वेळीच तिने स्वतःला आवरले. आधीच गोंधळलेल्या त्या मुलाला

आणखी शरमिंदे करायचो तिची इच्छा नव्हती. म्हणून त्याच्यातील दर्शनी फरक आपल्या लक्षातच आला नाही असे भासवून, त्याऐवजी त्याची खरडपट्टी काढायला तिने सुरुवात केली.

"तुम्ही मासे धरायला का नाही आला? तुम्हाला स्वतःची लाज वाटली पाहिजे! आपली वचनं तुम्ही अशी पाळता वाटतं?"

"मी हे सगळे दिवस लाकडाच्या गिरणीत काम करत होतो. कामातून वेळच मिळाला नाही."

स्वतःला सदरा आणि विजार विकत घेता यावी यासाठी गेले काही दिवस त्याला मरेस्तोवर काम करावे लागले होते, हे तो तिला सांगू शकला नाही.

पण तोन्याने तर्काने सारे जाणले आणि पावेलबद्दलचा तिच्या मनातील राग कुठच्याकुठे पळाला.

"तळ्यावर फिरायला जाऊ या," तिने सुचवले आणि बागेमधून ती दोघे रस्त्यापर्यंत गेली.

थोडा वेळ जातो न जातो तोपर्यंत गप्पांच्या ओघात, लेफ्टनंटचे पिस्तूल आपण कसे चोरले त्याची हकिकत पावेलने तोन्याला सांगून टाकली होती. एखाद्या जिवलग मित्राप्रमाणे तिला मानून त्याने आपले सर्वांत मोठे गुपित तिला सांगितले होते व लौकरच एखाद्या दिवशी पिस्तूल झाडायचा सराव करायला आपण दोघे दूर जंगलात जाऊ, असे तिला आश्वासन दिले होते.

"पण मला कुणाच्या ताब्यात मात्र देऊ नको हं," एकदम पावेल म्हणाला.

"मी तुला कधीही कुणाच्याही ताब्यात देणार नाही," तोन्याने मनःपूर्वक शपथ घेतली.

प्रकरण चौथे

प्रखर आणि कठोर वर्गलढ्याने युक्रेनला ग्रासले होते. अधिकाधिक माणसे हाती शस्त्र धरीत होती व प्रत्येक संघर्षाबरोबर नवे लढवय्ये पुढे येत होते.

क्षुद्र प्रवृत्तीच्या नागरिकाच्या दृष्टीने शांततेचे आणि निवांतपणाचे दिवस सरले होते.

तोफांच्या धडधडाटांच्या हादऱ्यांखाली छोटी मोडकळीला आलेली घरे थरथरत होती आणि क्षुद्रबुद्धी नागरिक आपल्या तळघराच्या भिंतींशी चिपकून बसत होता किंवा परसातल्या खंदकात आडोशाला धावत होता.

सर्व छटांच्या आणि सर्व रंगाच्या पेत्ल्युरा टोळयांच्या झुंडींनी गुबेर्नियात थैमान घातले होते. लहान-मोठे सरदार त्यांचे नेतृत्व करीत होते; सर्व प्रकारच्या गोलुब, अर्खांगेल, आन्गेल, गोर्दीयचा व इतर असंख्य गुंडांचा सुळसुळाट झाला होता.

झारच्या सैन्यातले माजी अधिकारी, उजवे आणि डावे युक्रेनी समाजवादी-क्रांतिकारक – गळेकापूंच्या टोळक्याला आपल्या नेतृत्वाखाली एकवटू शकणारा कुणीही क्रूरकर्मा स्वतःला आतामन म्हणून जाहीर करू लागला. काहींनी पिवळा-निळा पेत्ल्युरा झेंडा फडकावला आणि त्यांच्या ताकदीनुसार व त्यांना मिळणाऱ्या संधींनुसार जो प्रदेश त्यांच्या तावडीत आला त्यावर त्यांनी आपला अधिकार प्रस्थापित केला.

कुलकांनी बळकट बनवलेल्या या वेगवेगळया टोळयांमधून आणि आतामान कोनोवालेत्स याच्या वेढयाच्या कोअरमधील गालिशिअन रेजिमेंटांमधून "मुख्य आतामान पेत्ल्युरा" याने

स्वतःच्या रेजिमेंटा आणि डिव्हिजना तयार केल्या होत्या. जेव्हा लाल गनिमी तुकड्यांनी ह्या समाजवादी-क्रांतिकारक आणि कुलक बाजारबुणग्यांवर आघात केला तेव्हा हजारो घोड्यांच्या टापांखाली व मशिनगन गाड्यांच्या आणि तोफ-गाड्यांच्या चाकांच्या घरघराटाखाली धरणी कंपायमान होऊ लागली.

खळबळत्या १९१९ सालाच्या त्या एप्रिल महिन्यात प्रतिष्ठित नागरिक सुन्न आणि घाबरल्या अवस्थेत आपल्या खिडकीच्या झडपा सकाळच्या प्रहरी उघडायचा व आपल्या झोपेने जडावलेल्या डोळयांनी बाहेर डोकावून पहात शेजाऱ्याला अभिवादन करून धास्तावला प्रश्न टाकायचा :

"आवतोनोम प्येत्रोविच, आज सत्तेवर कोण आहे माहीत आहे तुम्हाला ?"

आवतोनोम प्येत्रोविच आपली विजार वर खेचून घ्यायचे व सभोवार एक भित्रा दृष्टिक्षेप टाकायचे.

"काही सांगणं अवघड आहे बुवा अफनास किरीलोविच. रात्रीच्या वेळी गावात कुणीतरी प्रवेश केला हे खरं. तो कोण होता ते आपण लौकरच शोधून काढू. त्यांनी यहुद्यांना लुटायला सुरुवात केली, की ते पेत्ल्युराचे लोक आहेत हे समजायचं. जर ते "कॉम्रेड" असले तर त्यांच्या बोलण्यावरून आपल्याला पटकन समजेल. कोणतं चित्र टांगायचं ते माहीत व्हावं म्हणून मी डोळयात तेल घालून पहात बसलोय. शेजारच्या गेरासिम लेओन्त्येविचसारखं संकटात सापडायची आपली इच्छा नाही. त्याचं काय झालं, त्यांनी नीट काळजीपूर्वक पाहिलं नाही आणि सरळ जाऊन लेनिनचा फोटो टांगला. तेवढ्यात तीन माणसं घरात घुसली – ती पेत्ल्युराची माणसं

होती. त्यांनी एकदा त्या फोटोकडं पाहिलं आणि त्यांची मानगूट पकडली. तब्बल वीस फटके मारले. 'भडव्या कम्यु-निस्टा, आम्ही तुला जिवंत सोलून काढू' म्हणून आरोळ्या ठोकत होते. त्या बापड्यानं त्यांना किती समजावून सांगितलं, कितीही मोठ्यांदा तो ओरडत राहिला, पण त्याचा काहीही उपयोग झाला नाही."

रस्त्यावरून सशस्त्र माणसे येत आहेत हे समजताच क्षुद्रबुद्धी नागरिक आपली खिडकी बंद करायचा आणि तो लपून बसायचा. आधी काळजी घेणे जास्त चांगले...

कामगार मात्र पेत्ल्युरा ठगांच्या पिवळ्या-निळ्या झेंड्यांकडे तिरस्काराने बघत. त्यांचा दबलेला संताप खदखदत असे. या युक्रेनी भांडवलदारी अंधराष्ट्रवादाच्या लाटेपुढे ते हतबल होते. पण चारी बाजूंनी धावून येणाऱ्या त्या पिवळ्या-निळ्या झेंडेवाल्यांविरुद्ध प्रखरतेने लढणाऱ्या लाल तुकड्या जाता जाता ओझरतेपणे गावातून वाट काढीत जात, तेव्हा मात्र त्यांना पाहून कामगारांच्या चित्तवृत्ती उल्हसित होत. कामगारांच्या अंतःकरणाला अत्यंत प्रिय असे ते निशाण टाऊन हॉलवर एखाददुसरा दिवस फडकत राही. पण नंतर ती तुकडी पुन्हा वाटचाल सुरू करी व वेढून टाकणारी निराशा परत येई.

आत्ता गाव कर्नल गोलुब याच्या ताब्यात होते. झीपरपार डिव्हिजनचा तो "आशास्थान" होता, "अभिमानस्थान" होता.

दोन हजार खुनशी माणसांच्या त्याच्या टोळीने कालच गावात विजयी प्रवेश केला होता. माननीय कर्नलसाहेब तुकडीच्या अग्रभागी एका सुंदर काळ्या अश्वावर आरूढ होऊन चालत होते. एप्रिलमधील रणरणता सूर्य असूनदेखील त्यांनी

कॉकेशिअन बुर्का घातला होता, रासबेरीसारख्या लाल गोंडयाची मेंढकातडी झापोरोझ्ये कझाक टोपी डोक्यावर होती, चिर्कासिअन पद्धतीचा लांब कोट अंगात चढवला होता आणि या सरंजामाला अनुरूप असा शस्त्रसंभार – चांदीच्या मुठीची कटचार व तलवार – ते मिरवीत होते. वाकडया दांडयाचा पाईप त्यांनी दातांमध्ये धरला होता.

माननीय कर्नल गोलुब राजबिंडया रूपाचे होते. त्यांच्या भुवया काळ्याभोर होत्या, फिकट कांती होती आणि अखंड मद्यपानामुळे त्या कांतीवर थोडी हिरवट छटा आली होती!

क्रांतीपूर्वी माननीय कर्नलसाहेब एका साखर कारखान्याच्या साखरकंद लागवडींवर कृषितज्ज्ञ म्हणून काम करीत होते. पण आतामान स्थानापुढे ते जीवन अगदीच अळणी होते. तेव्हा मुलखात जेव्हा काळ्या शक्तींच्या लाटा सुसाट फुटल्या तेव्हा त्यांच्यावर आरूढ होऊन हा कृषितज्ज्ञ माननीय कर्नल गोलुब म्हणून मिरवू लागला.

नवागतांच्या सन्मानार्थ गावातल्या एकमेव नाटयगृहात एक मोठा समारंभ आयोजित केला होता. पेत्ल्युरा बुद्धिमंत-वर्गातली "वेचक मंडळी" पूर्ण संख्येने हजर होती: युक्रेनी शिक्षिका होत्या, पाद्रयाच्या दोन्ही मुली – सुंदर आन्या आणि तिची धाकटी बहीण दीना – होत्या, काही थोडया कमी प्रतिष्ठित घरातील महिला, काऊंट पतोत्स्की घराण्याच्या सेवेतील काही माजी मानकरी, थोडेसे मध्यमवर्गीय आणि स्वतःला "मुक्त कझाक" म्हणवून घेणारे युक्रेनी समाजवादी-क्रांतिकारकांमधील उरलेले लोक हजर होते.

नाटयगृह गच्च भरले होते. झगमगीत रंगाच्या फुलांची किनार लावलेला युक्रेनी राष्ट्रीय पोषाख घातलेल्या व बहुरंगी

मण्यांनी आणि फितींनी सजलेल्या शिक्षिकांभोवती, पाद्रयाच्या मुलींभोवती आणि नगरवासियांच्या गृहिणींभोवती लष्करी अधिकारी पिंगा घालीत होते. त्यांच्या बुटांच्या टाचा खाडखाड वाजत होत्या आणि झापोरोझ्येच्या कझाकांच्या जुन्या चित्रांची जणू ते हुबेहूब नक्कल भासत होते.

रेजिमेंटचा बँड बडवला जात होता. 'नझार स्तोदोली'च्या संध्याकाळच्या प्रयोगाची रंगमंचावर जोरदार पूर्वतयारी चालू होती.

पण विजेचा पत्ता नव्हता आणि माननीय कर्नलसाहेबांना मुख्य ठाण्यावर योग्य वेळी ही खबर पोचवण्याची दक्षता त्यांचा अॅडज्युटंट, सबलेफ्टनंट पाल्यानीत्सा याने घेतली होती. आपल्या नांवाचे आणि दर्जाचे त्याने आता युक्रेनीकरण केले होते व स्वतःला तो खोरून्झी पाल्यानीत्सा असे म्हणवून घेत होता. सायंकाळी आपल्या उपस्थितीने समारंभास शोभा आणण्याचा इरादा मनी बाळगणाऱ्या कर्नलसाहेबांनी पाल्यानीत्साचे बोलणे ऐकून घेतले आणि अगदी सहज सुरात पण दिमाखाने म्हटले :

"वीज येईल अशी व्यवस्था करा. कुणी इलेक्ट्रिशियन शोधून वीज केंद्र चालू करा. मेलास तरी चालेल, पण वीज आली पाहिजे."

खोरून्झी पाल्यानीत्साला आपले प्राण न गमावता इलेक्ट्रिशियन शोधता आले. एक तासाच्या आत दोन पेत्ल्युरा सशस्त्र रक्षकांनी पावेलला आणि इतर दोन कामगारांना वीज केंद्रात हजर केले.

"सात वाजेपर्यंत तुम्ही वीज चालू केली नाहीत तर तुम्हा तिघांनाही फासावर चढवीन," डोक्यावरच्या लोखंडी तुळईकडे बोट दाखवीत पाल्यानीत्सा तिखट सुरात म्हणाला.

परिस्थितीच्या या नागड्या सत्याची जाणीव होताच ठरल्या वेळी दिवे पेटले.

संध्याकाळचा कार्यक्रम ऐन रंगात आला होता तेव्हा माननीय कर्नलसाहेब तेथे उपस्थित झाले. त्यांच्या समवेत विपुलस्तनी, सुवर्णकेशा तरुणी होती. ज्याच्या घरात ते राहिले होते त्या कलालाची ती मुलगी होती. बापाजवळ रग्गड पैसा असल्यामुळे गुबेर्नियाच्या शहरातल्या जिम्नाशियममध्ये तिने शिक्षण घेतले होते.

सन्माननीय पाहुणे म्हणून त्यांच्यासाठी राखून ठेवलेल्या पहिल्या रांगेतील आसनांवर ती दोघे स्थानापन्न झाली. माननीय कर्नलसाहेबांनी खूण करताच पडदा एवढ्या चटकन वर उचलला गेला, की रंगमंचावरून विंगेत पळणाऱ्या दिग्दर्शकाच्या पाठीचे ओझरते दर्शन प्रेक्षकांना झाले.

नाटक चालू असताना लष्करी अधिकारी आपल्या मैत्रिणींना बरोबर घेऊन उपाहारगृहात वेळ काढीत होते. सर्वव्यापी पाल्यानीत्साने पुरविलेली हातभट्टीची दारू ते पीत होते आणि जबरदस्तीने पैदा केलेल्या मिष्टान्नांचा समाचार घेत होते. नाटकाच्या अखेरच्या वेळापर्यंत ते सारे चांगलेच झिंगले होते.

अखेरचा पडदा पडताच पाल्यानीत्साने रंगमंचावर उडी घेतली आणि हाताची नाटकी हालचाल करीत तो ओरडला: "सभ्य स्त्री-पुरुषहो, आता नाच लौकरच सुरू होईल."

सर्वांनी टाळ्या वाजवल्या आणि पाहुण्यांचे रक्षण करण्यासाठी पहाऱ्यावर ठेवलेल्या पेत्ल्युरा सैनिकांना खुर्च्या उचलून नृत्यदालन मोकळे करण्यास वाव मिळावा यासाठी प्रेक्षक नाट्यगृहाबाहेरच्या आवारात गेले.

सुमारे अर्ध्या तासानंतर नाट्यगृहाला जंगली धिंगाण्याचे रूप प्राप्त झाले होते.

आपले सारे ताण विसरून जाऊन पेत्ल्युरा अधिकारी स्थानिक मुलींबरोबर बेभानपणे गपाक् नाच नाचत होते. उकाड्यामुळे त्या मुलींचे चेहरे लालबुंद झाले होते आणि नाट्यगृहाची खिळखिळी झालेली जुनी इमारत लष्करी अधिकाऱ्यांच्या दणदणीत बुटांच्या आघातांनी हादरत होती.

या दरम्यान पिठाच्या गिरणीच्या दिशेने सशस्त्र घोडेस्वारांची एक पलटण शहराकडे येत होती. शहराच्या वेशीपाशी उभ्या केलेल्या पेत्ल्युरा चौकीवरच्या पहारेकऱ्यांनी सावध होऊन मशिनगनच्या चापांवर हात ठेवला. रात्रीच्या शांततेत खटके मोकळे केल्याचा आवाज झाला. अंधारातून आरोळी उमटली :

"थांब! कोण आहे तिथं?"

काळोखातून दोन आकृती पुढे आल्या. त्यातली एक आकृती पाऊलभर पुढे सरकून घोगऱ्या बसक्या आवाजात गरजली :

"आतामन पावल्यूक आणि त्याची तुकडी. तुम्ही कोण? गोलुबची माणसं?"

"होय," अधिकारी उत्तरला. तोसुद्धा पाऊलभर पुढे झाला होता.

"माझ्या माणसांचा मुक्काम कुठं टाकू?" पावल्यूकने विचारले.

"मी मुख्य ठाण्याला ताबडतोब फोन करतो," अधिकारी उत्तरला आणि रस्त्याकडेच्या एका खोपटात नाहीसा झाला.

मिनिटभरानंतर तो बाहेर आला आणि आज्ञा देऊ लागला :

"मशिनगन रस्त्यामधून बाजूला करा! माननीय आता-मानना जाऊं द्या!"

विजेचा झगमगाट केलेल्या नाटचगृहाच्या समोर पावल्यूकने आपल्या घोड्याचा लगाम खेचला. नाटचगृहाभोवती अनेक माणसे मोकळी हवा खाण्यासाठी फिरत होती.

"इथं काहीतरी मौजमजा चाललेली दिसतेय," शेजारून घोड्यावरून चालणाऱ्या कप्तानाकडे वळून पावल्यूक म्हणाला. "चल गुक्माचु उतर घोड्यावरून. आपणही मौजेत सामील होऊ या. दोन बायका आपण निवडून घेऊ. या ठिकाणी त्यांचं पेव फुटल्यासारखं दिसतंय. अरं ए स्तालेझको" तो ओरडला. "गावातल्या घरांमध्ये तू आपल्या लोकांची मुक्कामाची सोय कर. आम्ही इथं थांबतो. पहारेकऱ्यांनो, तुम्ही माझ्यामागून चला." आणि त्याने घोड्यावरून धपदिशी खाली उडी मारली.

नाटचगृहाच्या प्रवेशद्वारापाशी दोन सशस्त्र पेत्ल्युरा पहारेकऱ्यांनी पावल्यूकला अडवले.

"तिकीटं?"

पावल्यूकने त्यांच्याकडे उपहासाने एक कटाक्ष टाकला आणि एका पहारेकऱ्याला खांद्याचा धक्का देऊन बाजूला सारले. त्याच्या पाठोपाठ त्याचे डझनभर अनुयायी आत घुसले. बाहेर कुंपणाला त्यांनी आपल्या घोड्यांना बांधून ठेवले होते.

नवागतांकडे सर्वांचे ताबडतोब लक्ष गेले. विशेषत: पावल्यूकची धिप्पाड आकृती ठसठशीतपणे उठून दिसत होती. त्याने चांगल्या कापडाचा अधिकाऱ्याचा कोट घातला होता, शिपायांची निळी तुमान चढवली होती आणि डोक्यावर केसाळ टोपी होती. त्याच्या खांद्यावरच्या पट्ट्याला मॉसर पिस्तूल

लटकत होते आणि खिशामधून हातबाँब डोकावत होता.
"कोण आहे तो?" नृत्यदालनाभोवतालच्या गर्दीतून अस्फुट चौकशा सुरू झाल्या. त्यावेळी गोलुबचा उजवा हात पाल्यानीत्सा बेभानपणे नाच करत होता.
पाद्र्याची मोठी मुलगी त्याची नाचातली जोडीदारीण होती. ती एवढ्या बेहोशीने गिरक्या मारीत होती की, तिचा घागरा चांगला वरपर्यंत उडत होता आणि आंबटषोकी पुरुषांना तिच्या रेशमी अंतर्वस्त्रांचे झकास दर्शन घडत होते.
गर्दीतून रेटून वाट काढीत पावल्यूक सरळ नाचाच्या ठिकाणी गेला.
पाद्र्याच्या मुलीच्या पायांकडे पावल्यूकने धुंद डोळ्यांनी टक लावून पाहिले, आपल्या कोरड्या ओठांवरून जीभ फिरवली, मग आडवे चालत तो वाद्यवृंदापाशी जाऊन थांबला आणि चाबूक फडकावीत ओरडला:
"चला, गपाक वाजवा!"
वाद्यवृंदाच्या संचालकाने त्या हुकुमाकडे लक्ष दिले नाही.
पावल्यूकच्या हाताची वेगाने हालचाल घडली आणि चाबकाचा सणसणीत फटकारा वाद्यवृंदाच्या संचालकाच्या पाठीवर बसला. कडकडून दंश झाल्याप्रमाणे त्याने उडी मारली, संगीत एकदम बंद पडले आणि संपूर्ण दालनात शांतता पसरली.
"काय हा उर्मटपणा!" कलालाची मुलगी फणकारली. शेजारी बसलेल्या गोलुबच्या दंडाला पकडीत ती किंचाळली: "तुम्ही त्याला असं कसं वागू देता?"
गोलुब फूत्कारत उठला, लाथेने त्याने खुर्ची उडवून दिली, तीन पावले पुढे चालत गेला आणि पावल्यूकच्या समोरासमोर उभा राहिला. या नवागताला त्याने ताबडतोब ओळखले होते

व स्थानिक सत्तेवर हक्क सांगण्यासाठी आलेल्या या प्रतिस्पर्ध्याबरोबर त्याला पूर्वीचे अनेक हिशेब चुकते करायचे होते. अगदी एक आठवड्यापूर्वीच पावल्यूकने माननीय कर्नलसाहेबांविरुद्ध अत्यंत हलकट वर्तन केले होते. गोलुबच्या तुकडीला अनेकदा पिंजून काढणाऱ्या लाल सेनेच्या एका तुकडीबरोबर गोलुबची घनघोर लढाई चालू असताना, बोल्शेविकांवर पिछाडीकडून हल्ला चढविण्याऐवजी पावल्यूकने शहरात मुसंडी मारली होती, तेथे उरलेल्या लाल सैनिकांच्या किरकोळ चौक्यांचा प्रतिकार मोडून काढला होता, आपल्या बचावासाठी शहराभोवती सैन्याला उभे केले होते आणि नंतर प्रचंड लूटमार केली होती. अर्थात तो हाडाचा पेत्ल्युरा असल्यामुळे यहुदी लोकांची प्रामुख्याने लूटमार व कत्तल होईल अशी तजवीज त्याने केली होती. दरम्यान लाल सैनिकांनी गोलुबच्या उजव्या फळीचा धुव्वा उडवला होता व ते पुढे गेले होते.

आणि आता हा घोडदळाचा उर्मट कप्तान इथे बळजबरीने घुसला होता व माननीय कर्नलसाहेबांच्या खाशा बँडमास्तरला त्यांच्या डोळ्यांदेखत चाबकाने फटकारण्याचे औद्धत्य त्याने दाखविले होते. हा अगदी अतिरेक झाला होता. या बढाईखोर उपटसुंभाला वेळीच त्याची लायकी दाखवून दिली नाही तर आपली रेजिमेंटमधील प्रतिष्ठा नाहीशी होईल याची गोलुबला जाणीव होती.

अनेक सेकंदपर्यंत ते दोघे पुरुष काहीही न बोलता एकमेकांच्या नजरेला नजर भिडवून उभे राहिले.

एका हाताने आपल्या तलवारीची मूठ गच्च पकडून आणि दुसऱ्या हाताने खिशातील पिस्तूल चाचपून गोलुब गरजला:

"हरामखोरा, माझ्या माणसांच्या अंगावर हात टाकायची तुला हिंमत कशी झाली?"

पावल्यूकचा हात त्याच्या मॉसर पिस्तुलाच्या मुठीकडे सरकला.

"जरा सबूरीनं घ्या गोलुबमहाशय, नाहीतर चुकून पाय घसरेल तुमचा. उगाच माझ्या मनाला दुखवू नका. नाहीतर माझा तोल सुटेल."

हा प्रकार गोलुबच्या सहनशक्तीपलिकडचा होता.

"त्यांना बाहेर फेकून द्या आणि प्रत्येकाला पंचवीस फटके मारा!" तो ओरडला.

शिकारी कुत्र्यांच्या झुंडीप्रमाणे अधिकारी पावल्यूकवर आणि त्याच्या माणसांवर तुटून पडले.

विजेचा दिवा फरशीवर आपटून फुटावा तसा काहीसा आवाज उमटला आणि भांडखोर कुत्र्यांच्या दोन गटांनी झुंजावे तशी त्या दालनभर लोकांची मारामारी जुंपली. त्या तुफान दंगलीत लोक एकमेकांवर तलवारीचे वार करीत होते, केस उपटत होते, नरडी दाबीत होते, तर अडकून पडलेल्या गावठी डुकरांच्या कळपाप्रमाणे चीं चीं किंचाळया फोडीत घाबरलेल्या बायका सैरावैरा धावत होत्या.

काही मिनिटांच्या अवधीत पावल्यूक आणि त्याचे साथीदार नि:शस्त्र बनले. त्यांना बेदम मारहाण करून दालनाच्या बाहेर फरपटत नेण्यात आले आणि रस्त्यावर फेकून देण्यात आले.

त्या झटापटीत पावल्यूकने आपली केसाळ टोपी गमावली होती, त्याच्या चेहऱ्यावर जखमा झाल्या होत्या, त्याची शस्त्रे काढून घेतली गेली होती. संतापाने तो फणफणला होता.

त्याने आणि त्याच्या साथीदारांनी घोड्यांवर उड्या टाकल्या व दौडत ते निघून गेले.

समारंभाचा विरस झाला होता. जे काही घडले होते त्यानंतर कुणालाही मौज-मजा करायचा उत्साह राहिला नव्हता. नृत्य करायला बायकांनी नकार दिला व आपल्याला घरी पोचवावे असा त्या आग्रह करू लागल्या. पण गोलुब आता कुणाचेही ऐकायला तयार नव्हता.

"पहारे बसवा," त्याने आज्ञा केली. "कुणीही हा हॉल सोडून जायचं नाही."

या हुकुमांची अंमलबजावणी करायला पाल्यानीत्सा घाई-घाईने पुढे सरसावला.

चारी बाजूंनी निषेधाचे उद्‌गार उसळू लागले. पण गोलुब हट्टाग्रहाने उत्तरला: "सभ्य स्त्री-पुरुषहो, सकाळपर्यंत नाच चालू राहील. पहिलं वॉल्त्झ नृत्य मी स्वतः करणार आहे."

वाद्यवृंदाने पुन्हा संगीताचे सूर छेडले, पण त्या रात्री आणखी नाचणे-बजावणे होणे नव्हते.

पाद्र्याच्या मुलीबरोबर कर्नलने नृत्याची पहिली फेरी पुरी केली असेल नसेल तोच पहारेकरी हॉलमध्ये धावत ओरडत आले:

"पावल्यूकनं थिएटरला वेढा घातला!"

त्याच क्षणाला रस्त्याकडच्या खिडकीची काच फुटली व त्या फुटक्या चौकटीमधून मशिनगनची चपटी नळी आत घुसली. सैतानापासून दूर पळावे त्याप्रमाणे त्या नळीपासून दूर पळून हॉलच्या मध्यभागी सैरावैरा धावणाऱ्या आकृतींना टिपून काढण्यासाठी त्या नळीच्या वेड्यावाकड्या हालचाली घडत होत्या.

पाल्यानीत्साने छतावरचा हजार कँडल पॉवरचा दिवा गोळी मारून फोडला. त्या दिव्याचा बाँबसारखा स्फोट झाला आणि हॉलमध्ये असणाऱ्या लोकांवर फुटलेल्या काचांचा पाऊस पडला.

सबंध हॉल काळोखात बुडाला. कुणीतरी आवारात ओरडले: "सारेजण बाहेर या!" त्या पाठोपाठ अभद्र शिव्यांची लाखोली उमटली.

बायकांच्या कर्कश्य किंचाळ्या, भान सुटून पिसाट धावणाऱ्या आपल्या अधिकाऱ्यांना एकवटण्यासाठी गोलुबने उच्चारलेले संतापी आवाजातले हुकूम, आवारातील गोळीबाराचे आणि आरोळ्यांचे आवाज या सर्व गोष्टींचा मिळून जो एक महाकल्लोळ माजला होता त्याचे वर्णन करणे अशक्य होते. मागच्या दाराने हळूच बाहेर पडून बाजूच्या निर्जन रस्त्याने गोलुबच्या मुख्य ठाण्यापर्यंत जिवाच्या कराराने धावत सुटलेल्या पाल्यानीत्साकडे त्या घबराटीच्या गोंधळात कुणाचेही लक्ष गेले नाही.

अर्ध्या तासानंतर सबंध शहरभर चांगलीच लढाई जुंपली. रायफलींच्या अखंड कडकडाने रात्रीची शांतता पार भंगली. मधून मधून मशिनगनच्या फैरीही उडत होत्या. स्तंभित झालेले नगरवासी आपापल्या उबदार बिछान्यांमधून उड्या मारून उठले होते व खिडक्यांच्या तावदानांना चेहरे चिकटवून बाहेरचा कानोसा घेत होते.

अखेरीस गोळीबार मंदावला. शहराच्या सीमेवर दूर कुठेतरी एकच मशिनगन एखाद्या भुंकणाऱ्या एकाकी कुत्र्याप्रमाणे आवाज करीत होती.

क्षितिजावर उषेची आभा पसरली तेव्हा लढाई थंडावली...

पग्रोम* होणार असल्याच्या अफवा शहरातून हळूहळू पसरत यहुद्यांच्या छोटचा, बुटक्या छपरांच्या झोपडपट्टीपर्यंत पोचल्या होत्या. नदीकडे जाणाऱ्या गलिच्छ घळीच्या टोकावर वेडचा-वाकडचा खिडक्यांच्या घरांची ती वस्ती कशीबशी ओठंगून उभी होती. ज्यांना घरे म्हणून संबोधले जात होते अशा त्या कमालीच्या छोटचा खोपटांमध्ये गरीब यहुदी रहात होते.

सेर्गेई ब्रुझ्झाक एक वर्षाहून अधिक काळ ज्या छापखान्यात काम करीत होता तेथील जुळारी आणि इतर कामगार यहुदी होते. त्यांच्या आणि सेर्गेईमध्ये मैत्रीचे घट्ट बंध निर्माण झाले होते. एखाद्या एकत्र कुटुंबाप्रमाणे त्यांच्यात एकी होती व आपल्या शिष्ट, गुबगुबीत मालकाविरुद्ध-श्रीमान ब्ल्यूमस्टाईन यांच्याविरुद्ध—ते सारे मिळून लढा देत. मालक आणि कामगार यांच्यात अखंड लढा चालू होता. आपल्या कामगारांकडून जास्तीत जास्त पिळून काम करवून घेऊन ब्ल्यूमस्टाईन त्यांना कमीत कमी मोबदला देत असे. कामगारांनी अनेक वेळा संप केले होते व छापखाना सलग दोन-तीन आठवडे बंद राहिला होता. छापखान्यात चौदा कामगार होते. सेर्गेई त्यांच्यात वयाने सर्वांत लहान होता आणि हातछपाईच्या यंत्राचे चाक दररोज बारा तास फिरवीत होता.

आज कामगारांमध्ये काहीतरी अनिष्टसूचक अस्वस्थता माजल्याचे सेर्गेईला जाणवले. गेले कित्येक महिने कमालीच्या अशांततेचे गेले होते आणि "मुख्य आतामान"—मार्फत मधून

---

*यहुद्यांच्या घरांची लुटालूट करून त्यांच्यावर अत्याचार करण्याचा कार्यक्रम.—अनु.

मधून प्रसृत करण्यात येणाऱ्या घोषणा छापण्याचे काम सोड-ल्यास, छापखान्याला इतर काम फारसे नव्हते.

क्षयाने आजारी असलेल्या मेन्देल नांवाच्या एका जुळाऱ्याने सेर्गेईला एका कोपऱ्यात बोलावले.

"पग्रोम करणार आहेत हे तुला माहीत आहे?" आपल्या खिन्न नजरेने त्या मुलाकडे पहात मेन्देलने विचारले.

सेर्गेईने चकित होऊन वर पाहिले.

"नाही, मला अजिबात कल्पना नाही."

मेन्देलने आपला बारकुळा, पिवळसर हात सेर्गेईच्या खांद्या-वर ठेवला आणि विश्वासाच्या वडीलधाऱ्या सुरात तो म्हणाला :

"पग्रोम होणार आहे हे नक्की. यहुद्यांना खूप मारझोड करणार आहेत. मला एवढंच जाणून घ्यायचंय–या संकटात तू आपल्या सहकाऱ्यांना मदत करशील किंवा नाही?"

"अर्थात मला करता येईल तेवढी सारी मदत मी करीन. मेन्देल, मी काय करू सांग."

बाकीचे जुळारी त्या दोघांचे संभाषण आता ऐकत होते.

"सेर्योझा तू फार चांगला मुलगा आहेस आणि आमचा तुझ्यावर विश्वास आहे. काही झालं तरी तुझा बाप आमच्या-सारखाच एक कामगार आहे. आता पळत घरी जा आणि तुमच्या घरात काही म्हाताऱ्या बायका-पुरुषांना लपवून ठेवायला ते तयार होतील का, असं त्यांना विचार. जर ते हो म्हणाले तर मग कुणाला तिथं पाठवायचं ते आम्ही ठरवू. अशीच माणसं लपवायला आणखी दुसरे कुणी तयार असले तर तुझ्या घरच्यांना विचारायला सांग. या गुंडांपासून तूर्तास तरी रशियन

लोकांना काही त्रास होणार नाही. लौकर पळ सेर्योझा, वाया घालवायला वेळ उरला नाही."

"माझ्यावर विश्वास ठेव मेन्देल. मी आत्ताच पाव्का आणि क्लीम्काला भेटतो. त्यांच्या घरची माणसं आपल्याला नक्की मदत करतील."

"एक मिनिट थांब," जायला निघालेल्या सेर्गेईला मेन्देलने घाबरून थांबवले. "हे कोण पाव्का आणि क्लीम्का? तू त्यांना चांगलं ओळखतोस काय?"

सेर्गेईने ठामपणे होकार भरला.

"अर्थात. ते माझे जिवलग मित्र आहेत. पाव्का कोर्चागिनचा भाऊ मेकॅनिक आहे."

"अच्छा अच्छा, कोर्चागिन," मेन्देलने सुटकेचा निश्वास टाकला. "मला माहीत आहे–एकाच घरात रहात होतो. कोर्चागिन कुटुंबाला जरूर भेट. आता लौकर जा सेर्योझा आणि झटपट उत्तर आण."

सेर्गेई धूम पळत निघाला.

पावल्यूकची तुकडी व गोलुबची माणसे यांच्यामध्ये घनघोर लढाई झाल्यानंतरच्या तिसऱ्या दिवशी पग्रोम सुरू झाला.

शेपेतोवकामध्ये पराभूत झालेल्या आणि तेथून हाकलून लावलेल्या पावल्यूकने शेजारचेच एक छोटे गाव जिंकले होते. त्या रात्री शेपेतोवकामधील लढाईत त्याने आपली बरीच माणसे गमावली. गोलुबचीही तेवढीच माणसे मारली गेली.

मृतांना गाड्यांमध्ये घालून घाईघाईने दफनभूमीत नेण्यात आले व काहीही गाजावाजा न करता त्याच दिवशी पुरण्यात आले, कारण त्या एकूण मामल्यात बढाई मारण्यासारखे

काही घडलेच नव्हते. दोन भटक्या कुत्र्यांप्रमाणे त्या दोघा आतामानांनी एकमेकांच्या नरडीचा घोट घ्यायचा प्रयत्न केला होता आणि अशा प्रसंगी दफनविधीबाबत गोंधळ घालणे फारसे उचित ठरले नसते. त्या घटनेचा फायदा घेऊन, पावल्यूकला लाल दरोडेखोर म्हणून जाहीर करण्याचा पाल्यानीत्साचा मानस होता हे खरे, पण पाद्री वासीली यांच्या पुढारीपणाखालच्या समाजवादी-क्रांतिकारकांनी त्याला आक्षेप घेतला.

त्या झटापटीमुळे गोलुबच्या रेजिमेंटमध्ये काहीसे असमाधान निर्माण झाले होते. विशेषत: त्याच्या अंगरक्षकांमध्ये जास्त असंतोष पसरला होता, कारण त्यांची सर्वांत अधिक हानी झाली होती. हा असंतोष नाहीसा करण्यासाठी आणि लोकांना उत्साही करण्यासाठी, त्यांना "किंचित थारेपालट" घडविण्यासाठी पग्रोम करावा, अशी दुष्टाव्याने भरलेली योजना पाल्यानीत्साने गोलुबपुढे मांडली. तुकडीतील कुरबुर थांबवण्यासाठी हे आवश्यक होते असा त्याने युक्तिवाद मांडला. कलालाच्या मुलीबरोबर विवाह करण्याच्या आधी शहरातील शांततेचा भंग करण्यास कर्नल जरी फारसा राजी नव्हता, तरी त्याने शेवटी पग्रोमला परवानगी दिली.

या लुटालुटीला आक्षेप घेण्यास माननीय कर्नलसाहेबांपाशी आणखी एक कारण होते. समाजवादी-क्रांतिकारक पक्षात त्यांना नुकताच प्रवेश मिळाला होता. "पग्रोमवाला" म्हणून त्याच्यावर शिक्का मारून त्याच्या शत्रूंनी पुन्हा एकदा त्याच्याविरुद्ध काहूर उठवले असते आणि "मुख्य आतामान" पाशी नक्की त्याच्याविरुद्ध चुगली केली असती. तसे पाहता आतापर्यंत गोलुब "मुख्या" वर फारसा अवलंबून नव्हता, कारण

स्वतःच्या हिंमतीवरच तो येथेपर्यंत पोचला होता. शिवाय कोणत्या प्रकारची बेणी आपल्या पदरी नोकरी करीत आहेत याची "मुख्या"ला चांगलीच कल्पना होती. तसेच, संचालक मंडळाच्या गरजा भागवण्यासाठी, आपल्या ताब्यातील तथा-कथित मुलखामधून पैसा गोळा करण्याची त्यानेच वारंवार मागणी केलेली होती. पग्रोमवाला म्हणून गोलुबने आधीच भरपूर कीर्ती मिळवली होती. त्या गौरवात आणखी भर घालण्यास त्याने आता फारशी जागा ठेवली नव्हती.

भल्या सकाळीच पग्रोम सुरू झाला.

शहर अद्याप पहाटेच्या राखाडी धुक्यात गुरफटले होते. योजकता न बाळगता बांधलेल्या यहुदी वस्तीच्या भोवतालचे ओल्या चादरींसारखे लपेटलेले अरुंद रस्ते निर्मनुष्य आणि निर्जीव होते. खिडक्यांवर जाड पडदे सोडलेले होते व ताव-दाने घट्ट लावून घेतलेली होती.

बाह्यतः ती सारी वस्ती पहाटेच्या साखरझोपेत बुडाल्या-सारखी वाटत होती, पण प्रत्यक्ष घरांमध्ये मात्र कुणालाच झोप नव्हती. सारी कुटुंबेच्या कुटुंबे संपूर्ण पोषाख करून एकाच खोलीत दाटीवाटीने बसून होती आणि आगामी संकटाला तोंड देण्याची मानसिक तयारी करीत होती. या घडामोडींची काहीच जाणीव नसलेली लहान मुले मात्र आपल्या मातांच्या कुशीत शांतपणे झोपली होती.

गोलुबच्या साहाय्यकाला — पाल्यानीत्साला झोपेतून जागे करण्यासाठी गोलुबचा अंगरक्षकप्रमुख सालोमीगा याला त्या सकाळी फार श्रम पडले. जिप्सीप्रमाणे काळा वर्ण असलेल्या आणि गालावर तलवारीच्या घावाची आडवी खूण असलेल्या सालोमीगाने महाप्रयासाने पाल्यानीत्साला उठवले. वेडेवाकडे

चेहरे करणारा कुबडा सैतान आपल्या नरडीचा घोट घेऊ पाहतोय, असे स्वप्न पाल्यानीत्सासबंध रात्रभर पिच्छा पुरवीत होते. त्या स्वप्नाला झटकून जागे होणे त्याला खूप जिकीरीचे गेले. अखेरीस ठणकणारे आपले डोके त्याने वर उचलेले तेव्हा सालोमीगा त्याच्यावर ओणवा झालेला त्याने पाहिला.

"ए पटकीच्या, जागा हो," त्याचे खांदे घुसळीत सालोमीगा म्हणाला. "उद्योगाला सुरुवात करायची वेळ झालीय. काल जरा कमी दारू ढोसायची होतीस!"

आता पाल्यानीत्सा पुरता जागा झाला. वेदनेने तोंड वेडेवाकडे करीत तो उठून बसला आणि तोंडात जमलेली कडवट लाळ त्याने थुंकली.

"कसला उद्योग?" सालोमीगाकडे मख्खपणे पहात त्याने विचारले.

यहुद्यांची घरं साफ करण्याचा! तू विसरला तर नाहीस ना?"

आत्ता कुठे पाल्यानीत्साच्या डोक्यात लख्ख प्रकाश पडला. तो खरेच सारे काही विसरला होता. माननीय कर्नलसाहेबांनी आपल्या प्रेयसीसमवेत आणि मूठभर उत्साही मित्रांसमवेत मळ्यावर रंगवलेली ओली मेजवानी चांगलीच भारी ठरली होती.

पग्रोमच्या काळात शहरापासून दूर राहण्याचा बेत गोलुबने फार दूरदर्शीपणाने आखला होता. आपल्या अनुपस्थितीत गैरसमजुतीमुळे लुटालूट घडली असा देखावा तो पुढे करू शकला असता. दरम्यान पाल्यानीत्साला हात धुवून घ्यायला भरपूर सवड मिळाली असती. "थारेपालट" घडवून आणण्यात पाल्यानीत्सा पटाईत होता.

नशेतून शुद्धीवर येण्यासाठी पाल्यानीत्साने पाण्याची अख्खी बादली डोक्यावर उपडी केली. लौकरच तो मुख्य ठाण्यात आज्ञा देत भिरी भिरी फिरू लागला.

शंभर अंगरक्षकांची तुकडी स्वार होऊन सज्ज होती. गुंतागुंती टळाव्यात म्हणून दूरदर्शी पाल्यानीत्साने मुख्य शहर आणि कामगारवस्ती व स्टेशन यांच्या दरम्यान चौक्या बसविण्याचे हुकूम दिले होते. पग्रोममध्ये अडथळा आणण्याचा जर कामगारांनी प्रयत्न केला तर त्यांची गोळयांनी चाळण करण्यासाठी, लेश्चीन्स्की यांच्या बागेत रस्त्याकडे तोंड करून एक मशिनगन उभी करण्यात आली होती.

अशा तऱ्हेने सर्व तयारी पूर्ण झाल्यानंतर पाल्यानीत्साने आणि सालोमीगाने घोडयांवर मांडी टाकल्या.

"अरे जरा थांब, मी विसरलोच," ते जवळ जवळ निघाले असताना पाल्यानीत्सा म्हणाला. "गोलुबला लग्नाचा आहेर करण्यासाठी दोन गाडया आणा! हा ऽ हा ऽ हा ऽ! रिरस्त्याप्रमाणं पहिली लूट कमांडरला आणि पहिली पोरगी त्याच्या मदतनीसाला—म्हणजे मला! समजलं अकलेच्या कांद्या?"

शेवटचे शब्द त्याने सालोमीगाला उद्देशून उच्चारले होते. आपल्या पिवळसर रंगाच्या डोळयांनी सालोमीगा पाल्यानीत्साकडे रोखून पहात होता.

"सगळयांना सारं काही भरपूर मिळेल."

घोडयांना टाच मारून ते हमरस्त्यावरून दौडू लागले. घोडेस्वारांच्या त्या बेशिस्त झुंडीच्या आघाडीवर पाल्यानीत्सा आणि सालोमीगा होते.

"फूक्स, कापडाचे व्यापारी" अशी गंजलेली पाटी अडक-

वळलेल्या दुमजली घरापाशी पाल्यानीत्साने आपल्या घोड्याचे लगाम खेचले तेव्हा धुके वितळले होते.

सडपातळ पायांची त्याची राखाडी रंगाची घोडी अस्वस्थपणे आपला खूर फरसबंदीवर आपटत राहिली.

"देवाच्या मदतीनं आपण इथून सुरुवात करू या," घोडीवरून खाली उडी घेत पाल्यानीत्सा म्हणाला.

"मंडळी, उतरा खाली," सोबतीच्या लोकांकडे वळून तो म्हणाला. "खेळाला सुरुवात झालीय. कुणाची टाळकी फोडू नका, त्याला अजून वेळ आहे. आणि पोरींच्या बाबतीत सुद्धा, शिकार जर खास नसेल तर संध्याकाळपर्यंत कळ काढा."

झुंडीतल्या एका माणसाने आपले भक्कम दात विचकले आणि आक्षेप घेतला :

"पण खोरून्झीसाहेब, एकमेकांच्या संमतीनं झालं तर?"

सर्वांमध्ये जोरदार हशा उमटला. जो माणूस बोलला होता त्याच्याकडे पाल्यानीत्साने कौतुकाचा दृष्टिक्षेप टाकला.

"तसं असलं तर गोष्टच वेगळी! पोरी राजी असल्या तर बेधडक जा! त्याला कोण बंदी घालणार!"

पाल्यानीत्सा दुकानाच्या बंद दारापर्यंत गेला आणि त्याने जोराने त्यावर लाथ हाणली. पण ओकच्या लाकडाच्या त्या भक्कम फळ्या किंचित थरथरल्यासुद्धा नाही.

आरंभ करण्याच्या दृष्टीने हे खासच चुकीचे स्थळ होते. पाल्यानीत्साने घराच्या कोपऱ्याला वळण घातले आणि फूक्सच्या राहत्या जागेच्या दरवाजाच्या दिशेने तो निघाला. एका हाताने त्याने तलवार सावरून धरली होती. सालोमीगा त्याच्या पाठोपाठ निघाला.

घरातल्या लोकांनी बाहेर रस्त्यावर वाजलेल्या टापांची खडखड ऐकली होती. दुकानच्या समोर टापांचा आवाज थांबला आणि भिंतीमधून माणसांचे आवाज ऐकू येऊ लागले तेव्हा मात्र त्यांच्या हृदयांचे ठोके थांबले आणि भीतीने त्यांची शरीरे ताठरली.

धनवान फूक्सने आपल्या बायकोला आणि मुलींना बरोबर घेऊन आदल्याच दिवशी शहर सोडले होते. आपल्या मालमत्तेची देखरेख करायला रीवा नांवाच्या एकुणवीस वर्षांच्या सुस्व-भावी, भित्र्या मोलकरणीला त्याने मागे ठेवले होते. घरात एकटयाने रहायला ती घाबरत होती म्हणून फूक्सने तिला सुचवले होते की, तो परत येईपर्यंत तिने आपल्या म्हाताऱ्या आई-बापांना सोबतीला आणून ठेवावे.

रीवाने जेव्हा विरोध करण्याचा दुबळा प्रयत्न केला होता तेव्हा त्या धूर्त व्यापाऱ्याने तिची समजूत घातली होती की, बहुतकरून पग्रोम होण्याची शक्यता कमीच होती, कारण भिकाऱ्यांना लुटून त्यांना काय मिळणार होते? आपण परत आल्यावर तिला झग्यासाठी कापड बक्षीस म्हणून देऊ, असेही त्याने आश्वासन दिले होते.

आता ती तिघेही भीतीने थरथर कापत उभी होती. घोडेस्वार पुढे निघून जातील अशी वेडी आशा उगीचच त्यांच्या मनात रेंगाळत होती. कदाचित चुकीने ते थांबले असावेत, कदाचित घरापुढे घोडे थांबल्याचा त्यांना केवळ भासच झाला असावा! पण दुकानच्या दारावर बसलेल्या त्या अस्पष्ट दणक्याने त्यांच्या आशांचा चक्काचूर झाला होता.

म्हातारा, रूपेरी केसाचा पेइसाख दारापाशी उभा होता,

त्याचे निळे विस्फारलेले डोळे घाबरलेल्या लहान मुलाप्रमाणे दिसत होते आणि कट्टर धर्मश्रद्धाची सर्व शक्ती एकवटून तो सर्वश्रेष्ठ येगोवा देवाची करुणा भाकीत होता. या घराचे संकटांपासून रक्षण कर अशी तो देवापाशी प्रार्थना करीत होता. त्याच्या प्रार्थनेच्या पुटपुटीमुळे त्याच्या शेजारी उभ्या असलेल्या त्याच्या म्हाताऱ्या बायकोला जवळ येणाऱ्या पावलांचा आवाज क्षणभर ऐकू आला नाही.

रीवा सर्वांत लांबच्या खोलीकडे पळाली आणि ओकच्या लाकडाच्या एका मोठ्या कपाटामागे दडली.

दारावरच्या जबरदस्त प्रहारासरशी त्या दोन म्हाताऱ्या माणसांच्या शरीरांमधून भीतीचा शहारा गेला.

"दार उघडा!" पहिल्यापेक्षा अधिक जोरदार प्रहार दारावर झाला आणि त्यापाठोपाठ शिव्यांची सरबत्ती उमटली.

पण त्या घराच्या आत असलेली माणसे भीतीने एवढी बधीर झाली होती, की दाराची कडी काढायला त्यांना हात-सुद्धा वर उचलता येत नव्हता.

कड्या निखळून पडेपर्यंत बाहेर रायफलींच्या दस्त्यांचे प्रहार होत राहिले आणि शेवटी फळ्या पिंजून दार सताड उघडे पडले.

सशस्त्र लोक घरात भराभरा घुसले. त्यांनी घराचा कोपरा न् कोपरा तपासला. दुकानाकडे जाणारा दरवाजा रायफलीच्या दांड्याने फोडण्यात आला आणि दुकानाच्या पुढच्या दाराच्या कड्या आतून उघडण्यात आल्या.

लुटीला आरंभ झाला.

कापड, पादत्राणे आणि इतर लुटीने गाड्या जेव्हा शिगो-शीग भरल्या तेव्हा ती लूट गोलुबच्या ठाण्याकडे पाठविण्याची

सालोमीगाने व्यवस्था केली. तो परतत होता तोच घरामधून कुणीतरी घाबरून फोडलेली किंचाळी त्याला ऐकू आली.

आपल्या लोकांना दुकान लुटण्याच्या कामगिरीत गुंतवून पाल्यानीत्सा मालकाच्या घरात गेला होता. तेथे म्हातारा-म्हातारी आणि एक तरुण मुलगी उभी असलेली त्याने पाहिली. आपले रानमांजरासारखे हिरवेगार डोळे त्यांच्यावर रोखून तो म्हाताऱ्या जोडप्यावर खेकसला:

"चालते व्हा इथून!"

पण आई किंवा बाप यांपैकी कुणीही जागेवरून हलले नाही.

पाल्यानीत्सा एक पाऊल पुढे सरला आणि त्याने सावकाशपणे तलवार म्यानातून बाहेर खेचली.

"आई ग ऽ!" मुलीने काळीज भेदून टाकणारी किंकाळी फोडली. हीच किंकाळी सालोमीगाने बाहेर ऐकली होती.

त्या किंचाळीमुळे धावत तेथे आलेल्या आपल्या माणसांकडे वळून पाल्यानीत्सा गरजला:

"या म्हाताऱ्यांना फेकून द्या बाहेर!" लोकांनी तात्काळ हुकुमाची अंमलबजावणी सुरू केली. दरम्यान तेथे येऊन पोचलेल्या सालोमीगाला पाल्यानीत्सा म्हणाला: "या रांडेशी मी जरा गप्पा मारतो तोपर्यंत तू इथं दारात उभा राहून लक्ष ठेव."

मुलीने पुन्हा किंकाळी फोडली. म्हातारा पेइसाख खोलीच्या दाराकडे धावत आला, पण त्याच्या छातीवर एवढा जोरात प्रहार झाला, की वेदनेने कळवळत तो भिंतीवर जाऊन मागे आपटला. नेहमी शांत आणि नम्र असणारी म्हातारी तोईबा

आता आपल्या पिलाचे रक्षण करणाऱ्या लांडगिणीसारखी चवताळली होती. तिने सालोमीगावर झेप घेतली.

"मला आत जाऊं द्या! माझ्या मुलीचं तुम्ही काय करताय?"

ती दाराशी जायला धडपडत होती आणि प्रयत्नांची शर्थ करूनही सालोमीगाला तिची आपल्या कोटावरची गच्च पकड सोडवता येत नव्हती.

धक्क्यातून आणि वेदनेतून एव्हाना सावरलेला पेइसाख तोईबाच्या मदतीला धावला.

"आम्हाला आत जाऊ दे! आत जाऊ दे! माझ्या पोरी ऽऽ!"

त्या झटापटीत सालोमीगाला दारापासून दूर ढकलण्यात म्हाताऱ्या जोडप्याला यश आले. संतापून त्याने पट्ट्यामधून रिवॉल्वर उपसून बाहेर काढले व त्याची पोलादी मूठ म्हाताऱ्याच्या पांढऱ्या डोक्यावर हाणली. पेइसाख खाली कोसळला.

खोलीत रीवा किंचाळत होती.

दुःखाने वेड्यापिशा झालेल्या तोईबाला घरामधून फरफटत खेचून बाहेर नेण्यात येत होते आणि तिच्या आर्त किंकाळ्यांचे व मदतीच्या विनवण्यांचे पडसाद सबंध रस्ताभर उमटत होते.

घरात मात्र संपूर्ण शांतता पसरली होती.

पाल्यानीत्सा खोलीमधून बाहेर आला. दाराच्या मुठीवर आधीच हात ठेवलेल्या सालोमीगाकडे न बघताच तो म्हणाला:

"आता जाऊन काही उपयोग नाही–तिला गप्प करण्यासाठी मी तिच्या तोंडावर उशी दाबून धरली तेव्हा गुदमरून ती मेली." पेइसाखच्या शरीराला ओलांडून त्याने पलिकडे

पाय ठेवला तेव्हा काळसर चिकट द्रवात त्याचे पाऊल पडले.

"वाईट सुरुवात झाली," बाहेर जाता जाता तो पुटपुटला.

इतरही लोक चकार शब्द न बोलता त्याच्या पाठोपाठ बाहेर गेले. घरातल्या फरशीवर आणि पायऱ्यांवर रक्तात माखलेले त्यांच्या पायाचे ठसे तसेच मागे राहिले होते.

शहरात लुटालुटीला ऊत आला होता. लुटीच्या वाटणीसाठी पुंडांमध्ये छोट्या मोठ्या चकमकी झडत होत्या, मधून मधून तलवारींची पाती चमकत होती. गुद्द्यांचा तर सर्रास वापर चालला होता. बीरच्या कोठारातून पंचवीस गॅलनची अनेक पिंपे रस्त्यावर आणण्यात आली.

त्यानंतर लुटारूंनी यहुद्यांची घरे फोडायला सुरुवात केली. प्रतिकार झालाच नाही. ते खोल्या खोल्यांमधून हिंडले, घाईघाईने त्यांनी सर्व सामानाची उलथापालथ केली, नेता येईल तेवढी लूट आपल्याबरोबर नेली व विस्कटलेल्या कपड्यांचे आणि फाडलेल्या पिसाच्या गाद्यागिरद्यांचे ढीग मागे टाकून गेले. पहिल्या दिवशी फक्त दोन बळी पडले होते: रीवा आणि तिचा बाप. पण येणारी रात्र मृत्यूचा अपरिहार्य धोका घेऊनच येत होती.

सायंकाळच्या सुमाराला लुटारूंचे अस्ताव्यस्त जमाव पिऊन तर्रर्र झाले होते. पिसाट बनलेले पेत्ल्युरा सैनिक रात्र पडायची वाट पहात होते.

अंधाराबरोबर त्यांचा शेवटचा धरबंध सुटला. रात्रीच्या अंधारात माणसाला ठार मारणे अधिक सोपे जाते. कोल्हासुद्धा अंधाऱ्या वेळा हल्ल्यासाठी पसंत करतो, आणि तोसुद्धा दुर्बलांवर आघात करणे जास्त पसंत करतो.

त्या दोन महाभयानक रात्रींची आणि तीन दिवसांची आठवण फारच थोडे लोक विसरू शकतील. त्या काळात किती प्राणांचा चुराडा झाला आणि किती जीव छिन्नभिन्न झाले, त्या रक्तपाती काळात किती तरुण क्षणार्धात म्हातारे बनले, किती दुःखाश्रूंचे शिंपण झाले! हृदय भग्न झालेल्या अवस्थेत, लज्जेच्या आणि अपमानाच्या वेदनांमध्ये होरपळत, आपल्या प्रियजनांच्या कायमच्या विरहयातनेमध्ये कुढत मागे जिवंत राहिलेले लोक अधिक सुदैवी होते असे म्हणणे अवघड आहे. अरुंद गल्ल्या-बोळांमधून तरुण मुलींचे बलात्कारीत, अत्याचार केलेले, कुस्करलेले मृत देह विखुरले होते. अतीव वेदनेपायी त्या मुलींचे हात मागील बाजूस फेकलेल्या अवस्थेत पसरलेले होते.

पण नदीकाठच्या नाऊम लोहाराच्या घरात त्याच्या सारा नांवाच्या तरुण बायकोवर कोल्ह्यांनी झडप घातली तेव्हा तिथे मात्र त्यांना कडवा प्रतिकार झाला. अवघ्या चोवीस वर्षांच्या ऐन जवानीमधल्या आणि पोटाच्या धंद्यासाठी घणाचे घाव घातल्यामुळे पिळदार पोलादी स्नायू बनलेल्या त्या लोहाराने आपल्या बायकोला गुंडांच्या ताब्यात देण्यास नकार दिला.

त्या छोटचाशा झोपडीत झालेल्या अल्पकालीन पण जबरदस्त संघर्षात दोन पेत्ल्युरा सैनिकांची डोकी कुजक्या कलिंगडांसारखी फुटली होती. निराशेच्या अतिरेकापोटी संतापलेला तो लोहार जिवाच्या निकराने दोन प्राणांच्या रक्षणार्थ लढत होता. नदीच्या काठावर बराच वेळपर्यंत रायफलींचे कोरडे बार ऐकू येत होते आणि तेथे धोका निर्माण झाल्याची जाणीव झालेले लुटारू मोठ्या गर्दीने त्या दिशेला धावत होते. दारूगोळ्याची अवघी एक फैर शिल्लक राहिली तेव्हा लोहाराने

दयामाया न राखता आपल्या बायकोला गोळी घातली आणि हातात बागनेट धरून तो स्वत:च्या मृत्यूला सामोरा गेला. त्याच्यावर गोळ्यांचा वर्षाव झाला आणि आपल्या खोपटाच्या दाराशीच त्याचा धिप्पाड देह चाळण होऊन खाली कोसळला.

आसपासच्या खेड्यांमधून धनिक शेतकरी आपापल्या गाड्या घेऊन शहरात आले. त्यांच्या गाड्यांना चांगले धष्टपुष्ट घोडे जुंपलेले होते. त्यांना आवडल्या त्या वस्तू त्यांनी आपल्या घोडागाड्यांमध्ये भरल्या आणि गोलुबच्या सैन्यात नोकरी करणाऱ्या आपल्या मुलांच्या किंवा नातलगांच्या संरक्षणाची मदत घेऊन घाईघाईने आपापल्या घरी परतले. काहींनी तर शहराकडे दोन-दोन तीन-तीन खेपा केल्या.

तळघरात आणि पोटमाळ्यावरच्या खोलीत छापखान्यातल्या आपल्या निम्म्या सहकाऱ्यांना सेर्योझा ब्रुझ्झाकने आपल्या वडिलांच्या मदतीने लपवले होते. आता तो बाग ओलांडून आपल्या घराच्या दिशेने परतत होता तेव्हा ठिगळे लावलेला लांब कोट घातलेला एक माणूस जोरजोराने हात नाचवीत रस्त्यावरून धावत जात असलेला त्याने पाहिला.

तो एक यहुदी म्हातारा होता आणि मरणाच्या भयाने गलितगात्र बनलेल्या त्या धापा टाकणाऱ्या माणसामागे करड्या घोड्यावर स्वार होऊन एक पेत्ल्युरा सैनिक दौडत होता. त्या दोघांमधील अंतर वेगाने कमी होत होते आणि आपल्या बळीवर घाव घालण्यासाठी घोडेस्वार पुढच्या बाजूस खाली झुकला होता. मागे टापांचा आवाज ऐकू येताच जणू प्रहार टाळण्यासाठी म्हाताऱ्याने हात वर उंचावले. त्याच क्षणी सेर्योझाने रस्त्यावर उडी घेतली आणि स्वत:ला घोड्यासमोर झोकून दिले.

"हरामखोर कुत्र्या, थांब!"

घोडेस्वाराने तलवारीचा घाव घालण्यासाठी खाली आणलेला हात आवरण्याचे कष्ट घेतले नाही आणि त्या तरुण सोनसळी केसांच्या डोक्यावर आडवे पाते आदळले!

प्रकरण पाचवे

"मुख्य आतामान"च्या पेत्ल्युरा फौजांना लाल सेना जोरदारपणे चेपत होती आणि गोलुबच्या रेजिमेंटला युद्धआघाडीवर बोलावणे आले. शहरात आता पिछाडीच्या रक्षकांची छोटीशी तुकडी व कर्मेदातुर शिल्लक राहिले.

लोक हालचाल करू लागले. या तात्पुरत्या शांततेचा फायदा घेऊन यहुद्यांनी आपल्या मृतांचे दफनविधी घाईघाईने उरकले व यहुदी वस्तीतल्या छोट्या झोपडपट्टीतले जीवन पुनश्च नेहमीप्रमाणे सुरू झाले.

सायंकाळच्या निवांत प्रहरी दूरवरून कुठूनतरी अस्पष्ट गडगडाट ऐकू येत. याचा अर्थ नजीकच्या परिसरात कोठे तरी लढाई चालू होती.

स्टेशनावरील रेलकामगार आपल्या नोकऱ्या सोडून खेडोपाडी काम मिळविण्यासाठी हिंडत होते.

जिम्नाशियम बंद होते.

शहरात लष्करी अंमल जारी होता.

ती भयाण अंधारी रात्र होती. अशा काळोख्या रात्री कितीही डोळे फाडून पाहिले तरी पलिकडचे काहीही दिसत नाही. माणसाला अक्षरश: आंधळ्यासारखे चाचपडत फिरावे

लागते आणि कोणत्याही क्षणी खड्ड्यात कोसळून त्याची मान मोडण्याची भीती असते.

अशा वेळी आपल्या घरात अंधारात बसून राहणे अधिक सुरक्षित असते याची प्रतिष्ठित नागरिकाला जाणीव असते. शक्य असेल तर तो दिवा पेटवणार नाही, कारण उजेडामुळे कदाचित अप्रिय पाहुणे त्याच्याकडे येण्याची शक्यता असते. त्यापेक्षा अंधार खूप बरा. तो अधिक सुरक्षित असतो. अर्थात सदैव अस्वस्थ असलेली काही माणसे असतात. पण त्यांना हवे असेल तर खुशाल संचार करू दे, त्यांच्याशी प्रतिष्ठित नागरिकाला काहीही कर्तव्य नाही. पण तो स्वत: मात्र बाहेर जाण्याचा धोका पत्करणार नाही. अगदी काहीही झाले तरी!

तर ती अशी एक भयाण काळोखी रात्र होती आणि तरीही एक व्यक्ती बाहेर संचार करीत होती.

त्या व्यक्तीने कोर्चागिन कुटुंबाच्या घराकडे आपला मोर्चा वळवला आणि सावधपणे खिडकीवर टिचक्या मारल्या. प्रत्युत्तर मिळाले नाही तेव्हा तिने अधिक जोराने आणि सततपणे खिडकी ठोठावली.

माणसाव्यतिरिक्त कुणी अजब प्राणी आपल्यावर मशिनगनचा नेम धरतोय असे स्वप्न पावेलला पडत होते. त्याला धूम पळावेसे वाटत होते, पण जायला कुठेच जागा नव्हती आणि मशिनगनमधून थाडथाड गोळ्या उडू लागल्या.

खिडकीच्या थडथड आवाजाने तो जागा झाला. कुणीतरी ठोकत होते.

पावेल बिछान्यातून उडी मारून उठला आणि कोण आहे ते पाहण्यासाठी खिडकीपाशी गेला. पण एका काळसर आकृतीपलिकडे त्याला आणखी काही बोध होईना.

घरात तो एकटा होता. त्याच्या सर्वांत मोठ्या बहिणीच्या घरी त्याची आई गेली होती. त्या बहिणीचा नवरा साखर कारखान्यात मेकॅनिक होता. आणि आर्त्योम शेजारच्या खेड्यात पोटाच्या उद्योगासाठी लोहाराचे घण बडवीत होता.

तरीसुद्धा ती बाहेरची व्यक्ती म्हणजे फक्त आर्त्योम असण्याची शक्यता होती.

पावेलने खिडकी उघडण्याचा निर्णय घेतला.

"कोण आहे?" त्याने अंधारातच प्रश्न केला.

खिडकीच्या बाहेर हालचाल झाली आणि दबता खर्जातला आवाज उत्तरला:

"मी, झुखराय."

खिडकीच्या चौकटीवर दोन हात टेकले गेले आणि पावेलच्या चेहऱ्याशी समांतर पातळीत फ्योदर यांचा चेहरा डोकावला.

"आजची रात्र तुझ्याकडं रहायला आलोय. मित्रा, काही हरकत आहे तुझी?" झुखरायनी अस्पष्ट आवाजात विचारले.

"हरकत कसली विचारताय! हे काय बोलणं झालं? मारा खिडकीतून आत उडी!" पावेल स्निग्ध आवाजात म्हणाला.

फ्योदरनी आपला भलामोठा देह खिडकीमधून कसाबसा आत कोंबला.

त्यांनी खिडकी बंद केली, पण खिडकीपासून ते चटकन दूर झाले नाही. कान देऊन ते लक्षपूर्वक ऐकत राहिले आणि चंद्र जेव्हा ढगाआडून बाहेर आला व रस्ता स्पष्ट दिसू लागला तेव्हा त्यांनी काळजीपूर्वक चौफेर निरखून पाहिले. मगच ते पावेलकडे वळले.

"आपण तुझ्या आईला जागं करायचं का? बहुतेक ती झोपली असेल ना?"

आपल्याशिवाय घरात दुसरे कुणीही नसल्याचे पावेलने त्यांना सांगितले. आता त्या खलाशाला अधिक मोकळे वाटू लागले आणि थोड्या मोठ्या आवाजात तो बोलू लागला.

"मित्रा, ते मुडदेफरास आता माझ्या मागं अगदी हात धुवून लागलेत. स्टेशनवर जे काही घडलं त्यानंतर त्यांना माझा सुगावा लागलाय. आपल्या माणसांनी आणखी थोडी एकी दाखवली असती तर पग्रोमच्या वेळी त्या राखी कोट-वाल्यांना चांगला इंगा दाखवला असता. पण तुला माहीतच आहे की, आगीत उडी घ्यायला लोकांची अजून तेवढी तयारी झालेली नाही. त्यामुळं काहीच निष्पन्न झालं नाही. आता ते माझ्या पाठलागावर आहेत. दोनदा त्यांनी फासा टाकला, पण मी सहीसलामत सटकलो. आज मात्र माझी शंभर वर्षं भरली होती. नेहमीप्रमाणं मागच्या वाटेनं मी माझ्या घराकडं निघालो होतो. चारी बाजूंना नजर टाकायला मी पडवीपाशी जरासा थांबलो, तर एका झाडाच्या बुध्यामागून बागनेट डोकावताना मला दिसलं. मी तिथून पसार झालो आणि सरळ तुझ्या घरचा रस्ता धरला. तुझी काही हरकत नसेल तर काही दिवस इथंच नांगर टाकीन म्हणतो. काय मित्रा, चालेल ना? छान."

झुखराय यांना अजूनही धाप लागलेली होती. आपले चिखलाने माखलेले बूट ते पायातून काढू लागले.

ते आल्याचा पावेलला खूप आनंद झाला होता. गेल्या काही दिवसात वीज कारखाना चालत नव्हता आणि रिकाम्या घरात पावेलला एकटे एकटे वाटत होते.

ते बिछान्यावर आडवे झाले. पावेल तात्काळ झोपला, पण फ्योदर मात्र धूम्रपान करीत बराच वेळपर्यंत जागे होते. आता ते उठले आणि अनवाणी पावलांनी चवड्यावर चालत खिडकीपर्यंत गेले व बराच वेळपर्यंत रस्त्यावर टक लावून पहात राहिले. अखेरीस थकून ते बिछान्यावर पडले आणि झोपी गेले. तरीही उशीखालच्या अवजड कोल्ट रिवॉल्वरच्या मुठीवर त्यांचा हात कायम होता.

त्या रात्री झुखराय यांचे अनपेक्षित झालेले आगमन आणि त्यांच्या सहवासात त्यानंतर घालवलेले आठ दिवस यांचा पावेलच्या संपूर्ण जीवनक्रमावर परिणाम घडला. त्या खलाशाकडून पावेल खूप काही नवे शिकला आणि त्याच्या अंतरंगात प्रचंड खळबळ माजली.

लपून रहावे लागल्यामुळे सक्तीने लादलेली निष्क्रीयता झुखरायनी कारणी लावली आणि त्या प्रदेशाची कोंडी करणाऱ्या युक्रेनी राष्ट्रवाद्यांविरुद्धचा आपला भावनोद्दीपक राग आणि जळता तिटकारा त्यांनी श्रवणोत्सुक पावेलच्या मनावर बिंबवला.

झुखराय यांचे बोलणे अगदी स्पष्ट, प्रवाही आणि साधे होते. त्यांच्या मनात शंका नव्हत्या. आपल्यासमोरील मार्ग त्यांना स्पष्ट दिसत होता. पावेलला स्पष्टपणे उमजले की, समाजवादी क्रांतिकारक, सामाजिक-लोकशाहीवादी, पोलिश समाजवादी अशा मोठ्या मोठ्या नांवांच्या पक्षांचा गुंता म्हणजे कामगारांच्या अतिदुष्ट शत्रूंचा एक अड्डा होता व धनिकांविरुद्ध खंबीरपणे क्रांतिकारक लढा देणारा एकटा बोल्शेविक पक्ष होता.

पूर्वी पावेलच्या मनात यासंबंधी अमाप गोंधळ होता.

अशा रीतीने, सागरी वादळवारे सोसून भक्कम काळीज बनलेल्या या बाल्टिकच्या खलाशाने, रशियन सामाजिक-लोकशाही मजूर पक्षाचा (बोल्शेविक) १९१५ पासून सभासद असलेल्या या कट्टर बोल्शेविकाने पावेलला जीवनातील कठोर सत्यांची शिकवण दिली. कोळसे मारण्याचे काम करणारा तो तरुण मुलगा मंत्रमुग्ध होऊन झुखराय यांचे बोलणे ऐकत होता.

"मित्रा, मी तरुण होतो तेव्हा काहीसा तुझ्यासारखाच होतो," झुखराय म्हणाले. "माझ्या ताकदीचं काय करावं ते मला समजायचं नाही. मर्यादा ओलांडायला सदा तयार असलेला असा मी अशांत तरुण होतो. माझं बालपण गरिबीत गेलं. काही काही वेळा तर शहरातल्या श्रीमंतांच्या लाडावलेल्या गुबगुबीत मुलांना नुसतं पाहिलं तरी माझं रक्त खवळून उठायचं. अनेकदा मी त्यांना चोप द्यायचा. पण त्या बदल्यात माझे वडील मला जबर शिक्षा करायचे. शेवटी एकट्यानं लढून परिस्थिती कुणीही बदलू शकत नाही. पाव्लुशा, कामगारांच्या भल्यासाठी लढणाऱ्याच्या अंगी लागणारे सगळे गुण तुझ्यात थोड्याफार प्रमाणात आहेत, पण तू अजून खूपच लहान आहेस आणि वर्गलढ्याबद्दल तुला फारशी माहिती नाही. मित्रा, मी तुला योग्य रस्त्याला लावीन, कारण त्याचं तू चीज करशील हे मला ठाऊक आहे. मला आळशी, आढ्यताखोर माणसं सहन होत नाहीत. आता सारं जग पेटून उठलंय. गुलामांना जाग आलीय आणि जुन्या आयुष्याला मूठमाती दिलीच पाहिजे. पण त्यासाठी आम्हाला खंबीर माणसं पाहिजेत. लढाई सुरू झाली म्हणजे झुरळांप्रमाणं फटी-

मध्ये लपून बसणाऱ्या शेळपटांची आम्हाला गरज नाही, तर दयामाया न ठेवता प्रतिटोला हाणण्याची धमक असणारे शूर लोक पाहिजेत."

त्यांच्या हातांच्या मुठी मेजावर दणदिशी आदळल्या.

कपाळाला आठ्या घालीत ते उठले व खिशात जोरात हात खुपसून खोलीत येरझाऱ्या घालू लागले.

आपल्या निष्क्रीयतेमुळे त्यांच्या मनावर निराशा दाटली होती. या शहरात मागे राहिल्याचा त्यांना कमालीचा खेद होत होता आणि इतःपर तेथे राहणे निरर्थक आहे अशी त्यांची धारणा बनल्यामुळे, युद्धआघाडीवरच्या लाल तुकड्यांना जाऊन मिळण्याचा त्यांचा निर्धार पक्का बनला होता.

कार्य पुढे चालू ठेवण्यासाठी पक्षाच्या नऊ सभासदांचा गट मागे राहणार होता.

"माझ्याशिवाय ते कामं पार पाडतील. काहीही न करता नुसतं बसून राहणं यापुढं मला जमणार नाही. आधीच मी दहा महिने वाया घालवलेत," चिडलेल्या झुखरायांच्या मनात विचार येत होते.

"फ्योदर, तू नक्की कोण आहेस?" पावेलने एकदा त्यांना विचारले होते.

झुखराय उठले होते आणि त्यांनी आपले हात खिशात कोंबले होते. त्या प्रश्नाचा अर्थ त्यांना प्रथम समजला नव्हता.

"तुला माहीत नाही?"

"मला वाटतं तू बोल्शेविक किंवा कम्युनिस्ट आहेस," खालच्या आवाजात पावेल म्हणाला होता.

झुखरायना जोराने हसू फुटले होते आणि चट्टयापट्टयाचा जर्सी गच्च ताणून बसलेल्या आपल्या विशाल छातीवर त्यांनी स्वतःच बुक्क्या मारल्या होत्या.

तुझं बरोबर आहे मित्रा! बोल्शेविक आणि कम्युनिस्ट म्हणजे एकच आहे, हे अगदी पूर्ण सत्य आहे." एकदम ते गंभीर झाले होते. "पण आता हे तुला माहीत झालंय तर ही गोष्ट कुणापाशीही आणि कुठेही बोलायची नाही, हे ध्यानात ठेव. नाहीतर ते मला पकडून तुरुंगात टाकतील. समजलं?"

"समजलं," पावेल ठामपणे उत्तरला.

आवारात काही बोलण्याचे आवाज ऐकू आले आणि कोण-तेही औपचारीक ठोठावणे न घडता पुढचा दरवाजा एकदम ढकलला गेला. झुखराय यांचा हात चटकन खिशात गेला, पण तसाच परत बाहेर आला. हडकुळा, फिकट चेहऱ्याचा, डोक्याला पट्टी गुंडाळलेला सेर्गेई ब्रुझ्झाक खोलीत शिरला आणि त्याच्या पाठोपाठ वाल्या व क्लीम्का आत आले.

"काय, कसा काय आहेस रे," हसऱ्या चेहऱ्याने पावेलचा हात हलवीत सेर्गेई म्हणाला. "आम्ही तिघांनी तुझ्याकडं यायचं ठरवलं. वाल्या मला एकट्याला बाहेर जाऊ देत नव्हती आणि क्लीम्का तिला एकटीला बाहेर सोडायला घाबरतो. हा आहे लेकाचा लालकेशा, पण कुठं कुणाला एकट्याला सोडणं धोक्याचं ते बरोब्बर समजतं बेट्याला!"

वाल्याने गंमतीने चटकन त्याच्या तोंडावर आपला तळहात ठेवला.

"बडबड्या कुठला" ती हसून म्हणाली. "आज काही हा क्लीम्काला निवांत जगू देणार नाही."

आपले पांढरेशुभ्र दात दाखवीत क्लीम्का मनमोकळा हसला.

"आजारी माणसाला काय सांगायचं? त्याच्या मेंदूला धक्का बसलेला तुम्हाला दिसतोच आहे."

यावर ते सारेच हसले.

तलवारीच्या घावामधून अजून पुरता बरा न झालेला सेर्गेई पावेलच्या बिछान्यावर बैठक जमवून बसला आणि लौकरच त्या तरुण मंडळींच्या गप्पा रंगात आल्या. पेत्ल्युरा गुंडाबरोबरच्या आपल्या भेटीची कहाणी झुखरायना निवेदन करीत असताना नेहमी हसतमुख आणि आनंदी असणारा सेर्गेई गप्प व निराश वाटत होता.

त्या तिघा तरुण मंडळींना झुखराय ओळखत होते, कारण ब्रुझ्झाकच्या घरी ते अनेकवेळा गेले होते. ही मुले त्यांना आवडायची. संघर्षाच्या आवर्तात त्यांना आपली जागा अजून गवसली नव्हती, पण त्यांच्या वर्गाच्या आकांक्षा त्यांच्यामधून ठळकपणे प्रतीत होत होत्या. पग्रोममधून वाचवण्यासाठी यहुद्यांना या तरुणांनी कशी मदत केली होती त्याची हकिकत त्यांनी मोठ्या उत्सुकतेने ऐकली. त्या सायंकाळी झुखरायनी त्या मुलांना बोल्शेविकांबद्दल, लेनिनबद्दल खूप माहिती सांगितली आणि जे काही घडत होते ते जाणून घ्यायला मदत केली.

पावेलचे पाहुणे निघून गेले तेव्हा बराच उशीर झाला होता

झुखराय रोज सायंकाळी बाहेर जात आणि रात्री उशिरा परतात. कोणते कॉम्रेड गावात राहतील आणि त्यांनी काय कार्य करावयाचे, याची चर्चा शहरातून निघून जाण्यापूर्वी त्यांना करावयाची होती.

आजच्या विशिष्ट रात्री झुखराय परतले नाही. सकाळी पावेल जागा झाला तेव्हा एका दृष्टिक्षेपात त्याने जाणले की, खलाशाच्या बिछान्यात रात्री कुणी झोपलेले नव्हते.

कोणत्यातरी अस्पष्ट अंतःप्रेरणेने झपाटून पावेलने घाई-



पावेलने अंगात कपडे चढवले आणि तो घरातून बाहेर पडला. दाराला कुलूप लावून व किल्ली नेहमीच्या जागी ठेवून तो क्लीम्काच्या घरी गेला. फ्योदरबद्दल क्लीम्कापाशी काही बातमी असेल अशी त्याला आशा वाटली होती. बुटक्या बांध्याची, तोंडावर देवीचे वण असलेल्या पसरट चेहऱ्याची क्लीम्काची आई धुणी धूत होती. फ्योदर कुठे होते असा पावेलने तिला प्रश्न केला त्यावर तिखटपणे ती उत्तरली होती:

"मी काही कामधाम न करता तुझ्या फ्योदरवर नजर ठेवून बसावं असं वाटतं काय तुला? तो संपला, सैतान घेऊन गेला त्याला. त्या झझ्लीखाच्या घरातलं सामान मात्र उलटंपालटं झालं. काय काम होतं तुझं त्याच्याशी? तुम्ही सारी विचित्रच आहात. तो क्लीम्का, तू आणि बाकीचे..." रागाने मागे वळून ती पुन्हा धुणे बडवू लागली.

क्लीम्काची आई मोठ्या संतापी स्वभावाची आणि तिखट जिभेची बाई होती...

क्लीम्काच्या घरून पावेल सेर्गेईकडे गेला आणि तेथे त्याने आपली धास्ती बोलून दाखवली.

"तू एवढी कशाला काळजी करतोस?" वाल्या म्हणाली. "कदाचित ते कुणा मित्राकडं राहिले असतील." पण तिच्या शब्दांमध्ये विश्वासाचा अभाव होता.

ब्रुझ्झाकच्या घरी पावेलला फार वेळ गप्प बसवेना. तो कमालीचा बेचैन झाला होता. त्याने जेवायला थांबावे असा ब्रुझ्झाकांच्या घरात खूप आग्रह झाला, पण नकार देऊन तो तेथून निघाला.

झुखराय कदाचित परत आले असतील अशा आशेने तो घरी आला.

दाराला कुलूप तसेच होते. जड अंतःकरणाने पावेल थोडा वेळ बाहेरच उभा राहिला. त्या उजाड घरात जाण्याचा विचार त्याला सहन होत नव्हता.

खूप विचारात गढून काही मिनिटेपर्यंत तो तसाच अंगणात उभा राहिला आणि मग अचानकपणे तो पडवीकडे गेला. छपराखाली चढून कोळिष्टके साफ करीत त्याच्या लपण्याच्या गुप्त ठिकाणापर्यंत तो पोचला आणि फडक्यांमध्ये गुंडाळलेले अवजड "मानलिखेर" रिवॉल्वर त्याने बरोबर घेतले.

तेथून बाहेर पडून तो स्टेशनावर गेला. खिशातल्या रिवॉल्वरच्या जडपणाच्या जाणीवेने त्याच्या चित्तवृत्ती उत्तेजित झाल्या होत्या.

पण स्टेशनावर झुखरायबाबतीत काहीच माहिती मिळाली नाही. परतीच्या वाटेवर आता त्याच्या परिचयाच्या झालेल्या वनरक्षकाच्या बागेपाशी त्याची पावले किंचित मंदावली. अस्पष्ट धुगधुगत्या आशेने त्याने घराच्या खिडक्यांकडे नजर टाकली, पण बागेप्रमाणेच ते घरही निर्जीव होते. बाग ओलांडल्यावर त्याने पुन्हा एकवार नजर मागे फेकली. बागेतल्या पायवाटा गेल्या वर्षीच्या पानाच्या पाचोळ्याखाली झाकल्या गेल्या होत्या. ते ठिकाण ओसाड आणि दुर्लक्षित भासत होते. कुणाच्याही कष्टाळू हातांचा ठसा तेथे उमटलेला दिसत नव्हता. त्या मोठ्या घराच्या निःस्तब्धतेमुळे पावेलला अधिकच खिन्न वाटू लागले.

तोन्याबरोबरचे त्याचे अखेरचे भांडण सर्व भांडणांमध्ये सर्वांत गंभीर स्वरूपाचे होते. सुमारे महिन्यापूर्वी ते अचानकपणे घडले होते.

खिशात हात खुपसून हळूहळू चालत तो शहराकडे परत ... होता तेव्हा पावेलच्या मनात त्यावेळच्या घटनांची पुन्हा ... उजळणी झाली.

...ल्यावर त्यांची अगदी अचानक भेट झाली होती आणि ...च्याने त्याला आपल्या घरी बोलावले होते.

"आई आणि बाबा बल्शानस्कींच्या घरी वाढदिवसाच्या ...वानीला जाणार आहेत. घरात मी एकटीच असेन. पाव्-...शा, तू येतोस का सोबतीला? माझ्यापाशी एक फार छान ...स्तक आहे. आपण दोघं मिळून वाचू. लिओनिद आन्द्रेयेवचं "...श्का झिगुल्योव". तसं मी एकदा वाचून संपवलंय. पण ...झ्याबरोबर पुन्हा वाचायला आवडेल. आपली संध्याकाळ ... छान जाईल. येशील?"

आपल्या दाट तांबूस-पिंगट केसांवर तिने पांढरीशुभ्र टोपी ...तली होती व तिचे टप्पोरे डोळे त्याच्याकडे मोठ्या अपेक्षेने ...हात होते.

"मी येईन."

आणि त्यांनी एकमेकांचा निरोप घेतला होता.

पावेल घाईघाईने आपल्या यंत्रांपाशी कामाला लागला ...ता. अख्खी संध्याकाळ तोन्याच्या सहवासात घालविण्याच्या ...वळ विचारामुळे भट्टीतल्या आगीच्या ज्वाला त्याला अधिक ...जस्वी भासत होत्या आणि पेटणाऱ्या लाकडांचा कडकड ...वाज त्याला नेहमीपेक्षा जास्त मजेदार वाटत होता.

त्या संध्याकाळी त्याने भल्या मोठ्या रुंद दरवाजावर ...ठोठवले तेव्हा काहीशा व्यग्र मनःस्थितीतली तोन्याच त्याला ...सामोरी आली.

"माझ्याकडं आज पाहुणे आलेत. ते येतील अशी मला

कल्पना नव्हती पाव्लुशा. तरी तुला आत आलं पाहिजे," ती म्हणाली होती.

पावेलला तिथून निघून जावेसे वाटले आणि तो मागे वळला.

"ये रे आत," तिने त्याच्या दंडाला धरले. "तुझी ओळख झालेली त्यांच्या दृष्टीनं चांगली." आणि तिने त्याच्या कमरेभोवती आपल्या हातांचा विळखा घालून जेवणघरामधून आपल्या खोलीकडे नेले होते.

खोलीत प्रवेश करताच तेथे बसलेल्या तरुण मंडळींकडे पाहून स्मित करीत ती म्हणाली होती:

"हा माझा मित्र पावेल कोर्चागिन."

खोलीच्या मध्यावर एका छोट्या मेजाभोवती तीन लोक बसलेले होते. त्यातली एक होती सुंदर, किंचित श्यामल रंगाची, ओठ थोडेसे पुढे असलेली आणि मनोहर केशरचना केलेली जिम्नाशियममधील विद्यार्थिनी लीझा सुखार्को. तिच्या पलिकडे सडपातळ उंच अंगयष्टीचा, उत्तम शिवणीचा काळा कोट परिधान केलेला, तेल लावल्यामुळे मऊ केस चकाकत असलेला व करड्या रंगाच्या डोळ्यांमध्ये भकास भाव असलेला एक तरुण होता आणि त्यांच्या मधोमध नखरेबाज शाळकरी जाकीट घातलेला विक्तर लेश्चीन्स्की बसला होता. तोन्याने दार उघडले तेव्हा पावेलच्या नजरेला तोच प्रथम दिसला होता.

लेश्चीन्स्कीनेही कोर्चागिनला ताबडतोब ओळखले होते आणि त्याच्या सुंदर कमानदार भुवया आश्चर्याने उंचावल्या होत्या.

विक्तरकडे उघड उघड खुनशी नजरेने पहात काही सेकंद-पर्यंत पावेल मुकाट दारात उभा राहिला होता. ती चमत्का-

—ह शांतता मोडण्यासाठी तोन्याने घाईघाईने पावेलला आत यायला सांगितले होते आणि लीझाची ओळख करून देण्या- साठी ती तिच्याकडे वळली होती.

नवागताकडे कुतूहलाने पाहणारी लीझा सुखार्को आपल्या खुर्चीतून उठली होती.

पण पावेल ताडदिशी माघारी फिरला होता आणि अर्धवट उजेडाचे जेवणघर पार करून पुढच्या दारी पोचला होता. व्हरांड्यात तोन्याने त्याला धावत येऊन गाठले होते आणि त्याचे खांदे घट्ट पकडून विचारले होते:

"असा पळून का चाललास? तुझी त्यांच्याशी भेट व्हावी अशी माझी खास इच्छा होती."

पावेलने आपल्या खांद्यांवरून तिचे हात बाजूला केले होते आणि तिखटपणे तो उत्तरला होता:

"त्या बाहुल्यासमोर माझं प्रदर्शन मांडायची माझी इच्छा नाही. मी त्या लोकांमधला नाही. तुला ती कदाचित आवडत असतील, पण मला त्यांचा तिटकारा आहे. हे तुझे मित्र आहेत याची मला आधी कल्पना असती तर मी कधीही आलो नसतो."

आपला उफाळणारा राग दाबून तोन्याने त्याला मध्येच अडवले:

"माझ्याशी अशा पद्धतीनं बोलण्याचा तुला काय अधि- कार? तुझे मित्र कोण आहेत आणि कोण कोण तुला भेटायला येतं याच्या चौकशा मी कधी केल्यात?"

"तू कुणाला भेटतेस त्याच्याशी मला काही एक कर्तव्य नाही. पण मी मात्र इथं पुन्हा कधी येणार नाही," पायऱ्या उतरून खाली जाता जाता पावेलने तेवढ्याच जोरदारपणे

तिला प्रत्युत्तर केले. बागेच्या फाटकाकडे तो पळतच गेला.

तेव्हापासून तो तोन्याला भेटला नव्हता. पग्रोमच्या काळात जेव्हा त्याने आणि इलेक्ट्रिशियनने वीज केंद्रात अनेक यहुदी कुटुंबांना लपवून ठेवले होते त्या वेळी हे भांडण तो पार विसरून गेला होता व आज तिला भेटायची त्याला जबरदस्त इच्छा होत होती.

झुखरायचे नाहीसे होणे व घरात दुसरे कुणीही नाही या विचारासरशी पावेल कमालीचा खिन्न झाला. त्याच्या समोरच्या रस्त्याचा करडा पट्टा उजवीकडे वळला होता. वसंतामधला चिखल अजून वाळला नव्हता आणि रस्त्यात अजून तपकिरी दलदलीचे खड्डे डोकावत होते. त्या घराचा कळकट, उकललेला दर्शनी भाग जिथे फुटपाथपाशी पुढे आला होता तिथूनच रस्त्याला दोन फाटे फुटले होते.

"येथे सोडा-लेमन विकतात" अशी पाटी उलटया अवस्थेत टांगलेल्या व दाराच्या चिरफाळया झालेल्या एका बारक्याशा दुकानाच्या समोर रस्त्याच्या चौकात विक्तर लेश्चीन्स्की लीझाचा निरोप घेत होता.

तिच्याशी बोलताना त्याने तिचा हात आपल्या हाती घेतला होता व अत्यंत आर्जवी नजरेने तिच्या डोळयांमध्ये तो पहात होता.

"तुम्ही याल ना? मला फसवणार नाही ना?"

"अर्थात मी येईन. पण तुम्ही माझी वाट पाह्यला हवी," लीझा नखरा करीत उत्तरली.

त्याचा निरोप घेताना तिने स्मित केले. तिच्या धुंद तांबूस-पिंगट डोळयांमध्ये आश्वासन होते.

तेव्हा काही यार्ड अंतर चालून गेली असेल-नसेल तोच त्याच्या कोपऱ्यामागून दोन माणसे आलेली तिने पाहिली. त्यातला पुढचा माणूस भक्कम बांध्याचा, रुंद छातीचा, नागरी वेषातला होता. बटणे सुटलेल्या त्याच्या जाकीटातून आतला पट्ट्यापट्ट्याचा जर्सी दिसत होता. कपाळावर त्याने काळी टोपी ओढून घेतली होती आणि त्याच्या पायात चढणी, बैठ्या टाचांचे बूट होते. त्याच्या डोळ्याखाली निळसर-काळी जखम दिसत होती.

तो माणूस खंबीरपणे झरझर पावले टाकीत चालत होता. त्याच्यामागून तीन पावले अंतर राखून आणि बागनेटाचे टोक पुढच्या जवळ जवळ पाठीला टेकवून करड्या कोटातला एक पेन्ल्युरा सैनिक चालत होता. त्याच्या पट्ट्यामधून काडतुसांच्या दोन पिशव्या लटकावलेल्या होत्या. केसाळ मेंढकातडी टोपी त्याने घातली होती व तिच्यामधून त्याचे दोन पिचपिचे, चकचकीत डोळे आपल्या कैद्याच्या डोक्याच्या मागच्या बाजूवर रोखून ठेवून होते. तंबाखूचे किटण चढलेल्या पिवळ्या रंगाच्या त्याच्या मिशा दोन्ही बाजूंनी पिंजारलेल्या होत्या.

तोझाने आपली चालण्याची गती किंचित कमी केली आणि रस्ता ओलांडून ती दुसऱ्या बाजूला गेली. तेवढ्यात तिच्या मागच्या बाजूने पावेल हमरस्त्यावर आला.

आपल्या घराच्या रस्त्याच्या वळणाशी जेव्हा तो उजवीकडे वळला तेव्हा दोन माणसे त्याच्या दिशेने येत असलेली त्यानेही पाहिली.

जणू काही जमिनीला खिळल्याप्रमाणे दचकून पावेल जागच्या-जागी थबकला. तो अटक झालेला माणूस म्हणजे झुखराय होते.

"अच्छा, म्हणून ते परत आले नव्हते!"

झुखराय जवळ जवळ येत होते. पावेलच्या काळजाचे ठोके एवढे जलद पडत होते की आता कोणत्याही क्षणी आपले काळीज फाटेल असे त्याला वाटले. एकूण परिस्थितीचे आकलन करून घेण्याचा प्रयत्न करताना त्याचे विचार मात्र सैराट धावत होते. निवांत मनन करायला पुरेसा अवधी नव्हता. एकच गोष्ट स्पष्ट होती: झुखराय यांना पकडले होते.

सुन्न आणि गोंधळलेला पावेल त्या दोघांना जवळ येताना पहात होता. "काय करता आले असते?"

अगदी अखेरच्या क्षणी त्याला आपल्या खिशातल्या रिवॉल्वरची आठवण झाली. त्याच्या अंगावरून ते पुढे गेले म्हणजे त्या रायफलवाल्या माणसाच्या पाठीत त्याने गोळी झाडली असती व फ्योदर मोकळे झाले असते. एका क्षणात मनाचा तसा निर्णय होताच त्याच्या डोक्यातला गोंधळ संपला. त्याने आपले दात गच्च आवळले. नाही तरी अगदी कालच फ्योदरनी त्याला सांगितले होते: "आम्हाला दणकट माणसं हवी आहेत..."

पावेलने चटकन आपल्यामागे नजर टाकली. शहराकडे जाणारा रस्ता निर्मनुष्य होता. दृष्टिपथात चिटपाखरू नव्हते. पुढे वासंतिक कोटातली एक बाई घाईघाईने रस्ता ओलांडत होती. तिने काही ढवळाढवळ केली नसती. चौकात येऊन मिळणाऱ्या दुसऱ्या रस्त्यावरचे त्याला काही दिसत नव्हते. फक्त अगदी दूरवरच्या स्टेशनरस्त्यावर तेवढी काही माणसे दिसत होती.

पावेल रस्त्याच्या कडेला सरकला. काही पावले अंतरावर झुखराय यांनी त्याला पाहिले.

झुखरायनी तिरप्या नजरेने त्याच्याकडे पाहिले आणि त्यांच्या दाट भुवया किंचित थरथरल्या. या अचानक भेटीमुळे त्यांची गवले एकदम मंदावली. बागनेट त्यांच्या पाठीत टोचले गेले.

"चल, झटपट पावलं उचल, नाहीतर दस्त्याचा प्रसाद चाखायला मिळेल!" कर्कश्य तारस्वरात तो शिपाई ओरडला.

झुखरायनी आपली चालण्याची गती वाढवली. त्यांना पावेलशी बोलायची इच्छा होती, पण त्यांनी स्वतःला आवरले. जणू काही अभिवादन करावे तसा त्यांनी फक्त हात हलवला.

पिवळ्या मिशावाल्या सैनिकाचे आपल्याकडे लक्ष वेधले जाईल या धास्तीने झुखराय जवळून जात असताना पावेलने दुसरीकडेच तोंड वळवले. जणू काही जे काही चालले होते ते आपल्या गावीच नाही असा त्याने आव आणला.

पण त्याच्या डोक्यात मात्र एकच अस्वस्थ विचार भिर-भिरत होता: "जर माझा नेम हुकला आणि गोळी झुखरायना लागली तर काय करायचे..."

पण विचार करीत बसायला वेळ नव्हता.

तो पिवळ्या मिशावाला सैनिक त्याच्या समोर आला तेव्हा पावेलने अचानक त्याच्यावर झडप घातली आणि रायफलवर पकड धरून तिची नळी खाली वाकवली.

बागनेट फूटपाथवर आपटले आणि त्याचा खरखर आवाज झाला.

अगदी बेसावध असताना हा हल्ला झाल्यामुळे तो सैनिक क्षणभर स्तंभित झाला. मग मात्र त्याने जोराने रायफल स्वतःकडे हिसकली. आपल्या शरीराचे सर्व वजन त्याच्यावर टाकून पावेलने आपली पकड कायम राखली. गोळी उडाली, पण ती दगडावर आपटून सणसणत खड्ड्यात घुसली.

गोळीचा आवाज ऐकताच झुखरायनी बाजूला उडी मारली व मागे गिरकी घेऊन पाहिले. पावेलच्या हातून रायफल हिसकावून घेण्यासाठी सैनिक सारी ताकद पणाला लावून ती पिरगाळत होता. पावेलच्या दंडांना पीळ पडून विलक्षण वेदना झाल्या, पण त्याने पकड सोडली नाही. मग एक जोरदार धक्का मारून त्या संतापलेल्या पेत्ल्युरा सैनिकाने पावेलला खाली पाडले, पण तरीही त्याला रायफल सोडवून घेता आली नाही. त्या कसोटीच्या क्षणाला ती रायफल सोडवून घेणे त्याला पूर्णतया अशक्या ठरले.

दोन झेपांमध्ये झुखराय त्या झगडणाऱ्या जोडीपाशी आले. त्यांची पोलादी मूठ हवेत फिरली आणि सैनिकाच्या डोक्यावर दण्णदिशी आदळली. दुसऱ्या क्षणाला त्या पेत्ल्युरा सैनिकाने पावेलला सोडले होते आणि थोबाडावर दोन सणसणीत प्रहार झाल्यामुळे खाली झुकत त्याचा गलितगात्र देह रस्त्याकडेच्या खड्ड्यात कोसळत होता.

ते प्रहार करणाऱ्या भक्कम हातांनी जमिनीवरच्या पावेलला उचलले होते व त्याच्या पायांवर उभे केले होते.

या दरम्यान त्या रस्त्याच्या फाट्यापासून विक्तर सुमारे शंभर पावले दूर गेला होता. लीझाबरोबर भेट झाल्यामुळे आणि दुसऱ्या दिवशी एका ओसाड कारखान्याच्या जागी भेटण्याचे तिने त्याला वचन दिल्यामुळे त्याच्या चित्तवृत्ती अत्यंत उल्हसित होत्या आणि 'रमणीची प्रीत फिरली' या गाण्याचे सूर शीळेवर वाजवीत तो मजेने चालला होता.

लीझा सुखार्को प्रेमप्रकरणांमध्ये जरा धाडसी होती असा जिम्नाशियमच्या युवकांमध्ये तिच्याबद्दल प्रवाद होता. उमंट

घमेंडखोर सेम्योन झलिवानोव याने एकदा जाहीर केले होते की, लीझा त्याला वश झाली होती. जरी विक्तरने सेम्योनच्या बोलण्यावर विश्वास ठेवला नव्हता तरी लीझाबाबत त्याला आकर्षण निर्माण झाले होते एवढे मात्र खरे. झलिवानोवच्या बोलण्यात कितपत तथ्य होते याचा उद्या तो पडताळा पाहणार होता.

"ती जर आली तर मी मुळीच बुजरेपणानं वागणार नाही. नाही ती आपलं चुंबन घेऊ देतेच. आणि सेम्योन जर खरं सांगत असला..." पण इथेच त्याची विचारमालिका खंडित झाली, कारण दोन पेत्ल्युरा सैनिकांना वाट देण्यासाठी तो बाजूला सरला. त्यातला एक सैनिक एका शेपूट छाटलेल्या घोड्यावर स्वार झाला होता व कॅन्व्हासची बादली त्याच्याबरोबर हेलकावत होती. घोड्याला पाणी पाजण्यासाठी तो चालला होता हे स्पष्ट होते. दुसरा आखूड जाकीटातला आणि ढगळ निळ्या विजारीतला सैनिक त्याच्याबरोबर पायी चालला होता व एक हात घोडेस्वाराच्या गुडघ्यावर टेकवून त्याला काहीतरी विनोदी गोष्ट सांगत होता.

विक्तरने त्यांना जाऊ दिले आणि पुन्हा तो आपल्या वाटेने चालू लागणार तोच हमरस्त्यावर रायफलीचा बार ऐकू आल्यामुळे तो थांबला. त्याने मागे वळून पाहिले तो घोडेस्वार आपल्या घोड्याला त्या आवाजाच्या दिशेने टाच मारीत होता आणि दुसरा सैनिक कमरेच्या तलवारीला हाताचा आधार देत त्याच्या मागोमाग धावत होता.

विक्तर त्यांच्या मागोमाग धावला. तो हमरस्त्यापर्यंत पोचला असेल नसेल तेवढ्यात दुसरा बार ऐकू आला आणि कोपऱ्यावरून तो घोडेस्वार वेड्यासारखा तुफान दौडत आला.

आपल्या टाचांनी टोचून आणि कॅन्व्हासच्या बादलीने घोड्याला मारीत तो त्याला अधिक वेगाने पळवीत होता. पहिल्या गेटापाशी पोचताच त्याने खाली उडी मारली आणि आवारातल्या माणसांना उद्देशून तो ओरडला:

"शस्त्रं घ्या! त्यांनी आपला एक माणूस मारला!"

मिनिटभरानंतर अनेक माणसे आवारातून धावत बाहेर निघाली. धावता धावता ती रायफलीचे खटके उघडीत होती.

विक्तरला पकडण्यात आले.

आता रस्त्यावर अनेक लोक जमा झाले होते. त्यांच्यात विक्तर आणि लीझा होते. त्या दोघांना साक्षीदार म्हणून अडकवून ठेवण्यात आले.

भीतीमुळे लीझा जागच्या जागी खिळून उभी राहिली होती आणि त्यामुळे झुखराय व कोर्चागिन पळून जात असताना ती त्यांना स्पष्टपणे पाहू शकली होती. पेत्ल्युरा सैनिकावर हल्ला चढवणाऱ्या मुलाबरोबरच तोन्या त्या दिवशी आपली ओळख करून देणार होती हे तिच्या ध्यानात आले तेव्हा ती कमालीची चकित झाली.

त्या दोघांनी कुंपणावरून उड्या मारून बागेत पाय ठेवला तोच तो घोडेस्वार दौडत रस्त्यावर आला होता. झुखराय हातात रायफल घेऊन धावतोय आणि मार खाल्लेला सैनिक वर उठायची धडपड करतोय हे दृश्य पाहताच घोडेस्वाराने कुंपणाच्या दिशेने घोड्याला टाच मारली.

पण झुखरायनी मागे वळून रायफल उचलली आणि पाठलाग करणाऱ्यावर गोळी झाडली. तात्काळ घोडेस्वार मागे फिरला आणि घाईघाईने त्याने माघार घेतली.

ओठ फाटलेला तो सैनिक काय घडले ते सांगत होता, नम बोलताना त्याला कमालीचे कष्ट होत होते.

"मूर्खशिरोमण्या, धडधडीत डोळ्यांसमोर कैद्याला हातातून बनावलंस? तुला आता नक्की पंचवीस फटके बसणार."

"मोठा शहाणाच लागून गेलास तू!" जखमी सैनिक संतापाने उत्तरला. "म्हणे कैदी कसा सोडला! तो दुसरा अक्करमाशा एखाद्या वेड्यासारखा माझ्यावर उडी घेईल ते मला काय ठाऊक?"

लीझालासुद्धा प्रश्न विचारण्यात आले. त्या पहारेकऱ्या-प्रमाणेच तिनेही सारा वृत्तांत कथन केला, पण हल्ला करणारा आपल्याला माहीत होता हे मात्र तिने सांगितले नाही. तरीही त्या सर्वांना कमांडंटच्या कचेरीत नेण्यात आले आणि संध्या-काळपर्यंत तेथे अडकवून ठेवण्यात आले.

खुद्द. कमांडंटने लीझाला घरी पोचवण्याची तयारी दाख-वली, पण तिने नकार दिला. त्याच्या तोंडाला वोदकाचा भपकारा येत होता आणि त्याच्या आमंत्रणात निश्चितच चांगला हेतू नेव्हता.

लीझाला विक्तरने घरापर्यंत सोबत केली.

स्टेशनपर्यंतचे अंतर बरेच होते आणि हातात हात घालून ती दोघे चालत होती तेव्हा झाल्या प्रसंगाबद्दल विक्तरला कृतज्ञताच वाटत होती.

"त्या कैद्याला कुणी सोडवलं याची तुम्हाला कल्पना आहे?" तिच्या घराच्या जवळ जसे ते आले तसा लीझाने प्रश्न केला.

"नाही, मला ठाऊक नाही. कसं माहीत असणार?"

"तोन्या त्या दिवशी संध्याकाळी एका तरुणाची आपल्याला ओळख करून देणार होती ते आठवतं?"

विक्तर एकदम थांबला.

"पावेल कोर्चागिन?" त्याने आश्चर्याने विचारले.

"होय, मला वाटतं कोर्चागिनच त्याचं नांव. तो कसा चमत्कारिकपणं निघून गेला होता आठवतं? तर तोच होता."

विक्तर स्तंभित होऊन उभा राहिला.

"तुमची खात्री आहे?" त्याने लीझाला विचारले.

"होय. मला त्याचा चेहरा चांगला आठवतो."

"तुम्ही कमांडंटला सांगितलं का नाही?"

लीझाला चीड आली.

"असला काही नीचपणा मी करीन असं तुम्हाला वाटतं?"

"नीचपणा? पहारेकऱ्यावर कुणी हल्ला चढवला हे सांगणं नीचपणाचं वाटतं?"

"मग काय मोठं सन्मानाचं वाटतं? त्यांनी काय काय केलं ते तुम्ही विसरलेले दिसता. जिम्नाशियममध्ये किती यहुदी अनाथ मुलं आहेत याची कल्पना आहे तुम्हाला आणि तरी मी कोर्चागिनबद्दल त्यांना सांगायला पाहिजे होतं असं वाटलं तुम्हाला? माफ करा, तुमच्याकडून माझी ही अपेक्षा नव्हती."

लीझाच्या उत्तराचे लेश्चीन्स्कीला खूपच आश्चर्य वाटले. पण तिच्याशी वाद घालणे त्याच्या योजनेत नव्हते, म्हणून त्याने विषय बदलण्याचा प्रयत्न केला.

"लीझा, तुम्ही रागावू नका. मी गंमतीनं बोललो. तुम्ही एवढ्या तत्त्वनिष्ठ असाल असं वाटलं नव्हतं मला."

"तुमची गंमत काही चांगल्या दर्जाची नव्हती," शुष्कपणे लीझाने प्रतिटोला हाणला.

सुखार्को यांच्या घरापाशी तो जेव्हा तिचा निरोप घेत होता तेव्हा विक्तरने विचारले:

"मग, तुम्ही याल ना लीझा?"

"मला ठाऊक नाही," संदिग्धपणे ती उत्तरली.

शहराकडे परतताना विक्तरच्या मनात परत मघाचाच विषय घोळत होता. "बाईसाहेब, तुम्हाला माझं बोलणं नीचपणाचं वाटलं असेल, पण माझी विचार करण्याची रीत वेगळी आहे. अर्थात कुणी कुणाला सोडवलं ही बाब माझ्या दृष्टीनं महत्त्वाची नाही."

जुन्या-पुराण्या लेश्चीन्स्की पोलिश कुटुंबातल्या त्या वारसाला दोन्ही बाजू सारख्याच अप्रिय होत्या. फक्त पोलिश उमरावांचे सरकार – रेची पस्पालिता – त्याला मान्य होते आणि पोलिश सेनांबरोबर ते लौकरच तेथे येऊन प्रस्थापित होणार होते. मग त्या हरामखोर कोर्चागिनच्या कचाटयातून सुटण्याची ही नामी संधी आता चालून आली होती. पेत्ल्युरांनी त्याची नंडी नक्की मुरगाळली असती.

लेश्चीन्स्की कुटुंबातला फक्त विक्तर तेवढा शहरात मागे राहिला होता. साखर कारखान्याच्या उप-संचालकाशी विवाह केलेल्या त्याच्या मावशीच्या घरी तो रहात होता. गेला काही काळ त्याचे आई-वडील आणि बहीण वॉर्सामध्ये रहात होते. तेथे त्याचे वडील सिगिझमून्द लेश्चीन्स्की एका महत्त्वाच्या जागेवर काम करीत होते.

विक्तर कमांडंटच्या कचेरीकडे चालत गेला व उघडया दारातून तेथे तो सरळ आत गेला.

त्यानंतरच थोडयाच वेळात चार पेत्ल्युरा सैनिकांना संगतीला घेऊन तो कोचागिनच्या घराच्या दिशेने निघाला होता.

दिव्याचा प्रकाश येत असलेल्या घराकडे बोट दाखवून तो शांतपणे म्हणाला:

"ते घर. आता मी जाऊ खोरून्झी?"

"खुशाल जा. आता आमचं आम्ही बघून घेऊ. मदत केल्याबद्दल धन्यवाद."

विक्तर घाईघाईने तिथून निघून गेला.

पाठीतल्या शेवटच्या दणक्याने पावेल त्या अंधाऱ्या खोलीत फेकला गेला आणि भिंतीवर त्याचे पसरलेले हात थाडदिशी आपटले. आजूबाजूला त्याने चाचपडून पाहिले तेव्हा बाकड्या-सारखे काहीतरी त्याच्या हाताला लागले. तो कसाबसा त्यावर बसला. त्याला खूप जखमा झाल्या होत्या. त्याचे सर्वांग आणि त्याचे मन वेदनांनी ठणकत होते.

अगदी अचानकपणे त्याला अटक झाली होती. त्याच्या-बद्दलची माहिती पेत्ल्युरा सैनिकांना कशी समजली? त्याला कुणीही पाहिले नव्हते याबद्दल त्याची खात्री होती. आता पुढे काय होईल? आणि झुखराय कुठे होते?

त्या खलाशाला त्याने क्लीम्काच्या घरी सोडले होते. तेथून तो सेर्गेईकडे गेला होता, तर शहरातून निसटण्यासाठी झुखराय क्लीम्काच्या घरीच संध्याकाळ होण्याची वाट पहात बसले होते.

"कावळ्याच्या घरट्यात मी रिवॉल्वर लपवून ठेवलं होतं हे किती चांगलं झालं," पावेलच्या मनात विचार आला. "त्यांना जर ते माझ्यापाशी सापडलं असतं तर माझी शंभर वर्षं भरलीच होती. पण त्यांना माझ्याबद्दल समजलं कसं?" त्याला छळणाऱ्या या प्रश्नाचे उत्तर सापडत नव्हते.

कोर्चागिनच्या घराची पेत्ल्युरा सैनिकांनी कसून झडती घेतली होती, पण त्यांना त्यात फारसे काही सापडले नव्हते.

आर्त्योमने आपला सर्वांत चांगला सूट आणि ॲकॉर्डियन आपल्या-बरोबर खेड्यात नेले होते आणि आई आपली ट्रंक स्वतः-बरोबर घेऊन गेली होती. तेव्हा उचल करण्यासारखे घरात काहीसे काही उरलेच नव्हते.

मग पहाऱ्याच्या ठाण्यापर्यंतचा प्रवास पावेलच्या सदैव स्मरणात राहील असा होता. रात्र गडद काळोखी होती, डोक्यावर आकाश ढगांनी भरले होते आणि आंधळ्याप्रमाणे, अर्धवट शुद्धीवर असल्यासारखा तो ठेचकाळत चालला होता. त्याच्या शरीरावर चारी बाजूंनी निर्दयपणे लाथांचे प्रहार होत होते.

कमांडंटच्या पहारेकऱ्यांच्या पलिकडच्या खोलीत त्याला माणसांचे आवाज ऐकू येत होते. दाराखाली प्रकाशाचा झगझगीत पट्टा दिसत होता. पावेल उठला आणि हातांनी भिंत चाचपडत खोलीभर फिरला. बाकड्याच्या समोर मोठे-मोठे भक्कम गज लावलेली एक खिडकी त्याला आढळली. त्याने हाताने गजांचा भक्कमपणा अजमावला. ते पक्के बसवलेले होते. ती गुदामाची जागा होती हे स्पष्ट जाणवत होते.

तो दारापाशी गेला आणि क्षणभर त्याने बाहेरचा कानोसा घेतला. मग त्याने दरवाजाच्या मुठीला हलकेच दाबले. दाराचा एकदम करकर असा मोठा आवाज झाला. पावेलने स्वतःशीच एक गलिच्छ शिवी हासडली.

त्याच्यासमोर उघडल्या गेलेल्या अरुंद फटीतून त्याने पाहिले. वाकड्या अंगठ्याचे दोन राठ पाय बाकड्याच्या टोकापुढे आले होते. पावेलने आणखी एक धक्का दाराला दिला. यावेळी दाराचा मागच्यापेक्षा जास्त मोठ्याने आवाज

झाला. झोपेने चेहरा सुजलेली एक चुरगळलेल्या कपड्यातली आकृती आपले घाणेरडे डोके हाताच्या पाचही बोटांनी करा-करा खाजवीत बाकड्यावरून उठली आणि तिने शिव्यांची लाखोली वाहिली. अभद्र शिव्यांचा ओघ जेव्हा थांबला तेव्हा डोक्यापाशी उभी असलेली रायफल त्या व्यक्तीने हातात घेतली व सुस्त आवाजात ती म्हणाली:

"दार बंद करून घे आणि पुन्हा इथं डोकावून बघताना सापडलास तर तुझी..."

पावेलने दार बंद केले. दुसऱ्या खोलीत हास्याचा गडगडाट झाला.

पावेलने त्या रात्री खूप विचार केला. लढ्यात भाग घेण्याचा त्याचा पहिलाच प्रयत्न असा फसला होता. पहिल्याच पावलात त्याला अटक झाली होती आणि एखाद्या उंदरासारखा तो सापळ्यात अडकला होता.

बसल्या जागीच त्याला अर्धवट, अस्वस्थ डुलकी लागली. झोपेत त्याच्यासमोर त्याच्या प्रिय आईचा सुरकुतलेला चेहरा त्याला दिसत होता. तिचे डोळे त्याला दिसत होते. त्याच-बरोबर एक विचार त्याच्या मनात येत होता: "ती दूर आहे ते चांगलंच झालं – त्यामुळं यातना थोड्या कमी झाल्या."

खिडकीमधून प्रकाशाची फिकट राखी चौकट फरशीवर उमटली.

हळूहळू अंधार विरत चालला होता. पहाट जवळ येत होती.

प्रकरण सहावे

त्या मोठ्या जुन्या घराच्या फक्त एका खिडकीमधून दिव्याचा प्रकाश चमकत होता. खिडकीवर पडदे ओढलेले होते. रात्रीची वेळ होती म्हणून त्रेझोर कुत्र्याला बाहेर साखळीने बांधून ठेवलेले होते. अचानक त्याच्या भुंकण्याचा दणदणीत आवाज घुमला.

अर्धवट झोपेच्या गुंगीत तोन्याने आपल्या आईचे खालच्या आवाजातील बोलणे ऐकले.

"नाही, ती अजून झोपलेली नाही. आत ये ना लीझा."

तिच्या मैत्रिणीच्या हलक्या पावलांच्या आवाजाने आणि तिने अचानक मारलेल्या उबदार मिठीमुळे तोन्याची झोपेची गुंगी पार पळाली.

तोन्याने फिकट स्मित केले.

"लीझा, तू आलीस त्याचा मला खूप खूप आनंद झाला. कालच्या अवघड परिस्थितीमधून बाबा पार पडले. आज सबंध दिवस त्यांना गाढ झोप लागलीय. झोपेशिवाय इतक्या रात्री काढल्यानंतर आईला आणि मलाही थोडी विश्रांती मिळाली. आता मला सगळ्या बातम्या सांग बघू." तोन्याने आपल्या मैत्रिणीला जवळ ओढून शेजारीच कोचावर बसवले.

"बातम्या तशा खूप आहेत, पण काही मात्र फक्त तुझ्या कानांनी ऐकण्यासारख्या आहेत," येकातेरीना मिखाईलोवना यांच्याकडे चोरटा कटाक्ष टाकीत लीझाने स्मित केले.

तोन्याची आईही हसली. छत्तीस वर्षांची ती पोक्त विवाहित स्त्री असली तरी तिच्या जोमदार हालचाली मात्र तरुण मुलीप्रमाणे होत्या, चतुर करड्या रंगाचे डोळे होते आणि चेहरा सुंदर नसला तरी प्रसन्न होता.

"काही मिनिटांतच मी तुम्हा दोघींना इथं एकटं सोडून आनंदानं निघून जाईन. पण त्याआधी सर्वांच्या कानांनी ऐकण्यासारख्या बातम्या मला ऐकायच्या आहेत," कोचापाशी खुर्ची ओढून तिच्यावर बसत त्या विनोदाने म्हणाल्या.

"पहिली बातमी म्हणजे आमची शाळा संपली. सातवी-तल्या विद्यार्थ्यांना उत्तीर्ण झाल्याची प्रमाणपत्रं द्यायचा बोर्डानं निर्णय घेतलाय. मला खूप छान वाटतंय. त्या बीजगणिताचा आणि भूमितीचा इतका वीट आला होता! काय उपयोग आहे त्यांचा? मुलं कदाचित पुढं शिकणं चालू ठेवतील. पण सध्याच्या या लढाईच्या दिवसात कुठं शिकायला जायचं ते त्यांनाही समजेनासं झालंय. फार भयानक परिस्थिती आहे... आमच्यापुरतं बोलायचं तर आम्ही लग्नं करू आणि बायकांना बीजगणिताची गरज नसते," लीझा हसत म्हणाली.

त्या मुलींबरोबर आणखी थोडा वेळ बसल्यानंतर येकातेरीना मिखाईलोवना आपल्या स्वतःच्या खोलीकडे गेल्या.

आता लीझा तोन्याच्या अधिक जवळ सरकली व तिच्या-भोवती आपल्या हातांचा विळखा घालून दबत्या आवाजात तिने रस्त्यावरच्या चौकात घडलेला प्रसंग कथन केला.

"तोन्या, त्या पळणाऱ्या मुलाला मी ओळखलं तेव्हा मला किती आश्चर्य वाटलं म्हणून सांगू! ओळख पाहू तो कोण असावा?"

ती हकिकत मोठ्या कुतूहलाने ऐकणाऱ्या तोन्याने फक्त खांदे उडवले.

"कोर्चागिन!" धाप टाकीत लीझाने पटकन सांगून टाकले.

तोन्या दचकली आणि तिच्या डोळ्यांची वेगाने उघडझाप झाली.

"कोर्चागिन?"

आपल्या निवेदनाचा तोन्यावर अपेक्षित परिणाम झालेला बघून लीझा खूष झाली. नंतर तिने विक्तरबरोबरच्या तिच्या भांडणाचे वर्णन केले.

आपल्या निवेदनाच्या ओघात लीझाच्या लक्षात आले नाही की, तोन्याचा चेहरा फिकट पडला होता आणि तिच्या निळ्या पोलक्यात तिची हाताची बोटे गच्च रुतून बसली होती. तोन्याच्या काळजाचे चिंतेने किती पाणी पाणी झाले होते याची लीझाला कल्पना नव्हती. तसेच तोन्याच्या सुंदर डोळ्यांना आच्छादणाऱ्या लांब पापण्या कशा थरथरत होत्या, याकडेही लीझाचे लक्ष नव्हते.

दारूने झिंगलेल्या खोरून्झीची गोष्ट लीझा सांगत होती तेव्हा तोन्याचे तिच्याकडे अजिबात लक्ष नव्हते. एकाच विचाराने ती कमालीची अस्वस्थ बनली होती: "सैनिकावर कुणी हल्ला चढवला ते विक्तर लेश्चीन्स्कीला माहीत आहे. अरेरे, कशाला लीझानं त्याला हे सांगितलं?" आणि नकळत तिच्या ओठांमधून हे शब्द बाहेर फुटले.

"काय म्हणालीस?" तिच्या बोलण्याचा लीझाला चटकन अर्थ उमगला नाही.

"लेश्चीन्स्कीला तू पाव्लुशाबद्दल... नव्हे कोर्चागिनबद्दल कशाला सांगितलंस? तो त्याचा नक्की घात करणार..."

"छे:, मुळीच नाही!" ताडकन लीझा म्हणाली. "तो असं काही करील असं मला वाटत नाही. आणि कशासाठी त्यानं तसं करावं?"

तोन्या ताडकन उठून बसली आणि तिच्या गुडघ्यांना तिने एवढ्या जोरात मिठी घातली की, पायांमधून कळ गेली.

"तुला काही समजत नाही लीझा! तो आणि कोर्चागिन एकमेकांचे शत्रू आहेत, त्याशिवाय आणखीही एक गोष्ट आहे... विक्तरला तू पाव्लुशाबद्दल सांगितलंस तेव्हा फार मोठी चूक केलीस."

आत्ता कुठे लीझाला तोन्याच्या जिवाची तगमग उमगली. शिवाय तोन्याने जेव्हा कोर्चागिनचा पहिल्या नांवाने उल्लेख केला, तेव्हा आजपर्यंत तोन्याच्या कोर्चागिनबाबतच्या भावनां-बाबत जो तिचा तर्क होता, तो खरा असल्याची तिची खात्री पटली.

तिला कमालीचे अपराधी वाटू लागले व अवघडलेपणाच्या जाणीवेने ती एकदम गप्प झाली.

"म्हणजे हे खरे आहे तर," तिच्या मनात विचार आला. "एका साध्या कामगाराच्या प्रेमात तोन्या पडली हे विलक्षणच म्हणायचे!" लीझाला याबाबत खूप बोलावेसे वाटत होते. पण आपल्या मैत्रिणीच्या भावनांची कदर करून ती गप्प राहिली. कुठल्यातरी रीतीने आपल्या चुकीचे परिमार्जन करण्याच्या हेतूने, तिने चटकन तोन्याचे हात आपल्या हातात पकडले.

"तोन्या, तुला खूप काळजी वाटते का?"

"नाही, कदाचित मला वाटतं त्यापेक्षा विक्तर जास्त सभ्य असण्याची शक्यता आहे," तोन्या विमनस्कपणे उत्तरली.

त्यांच्यामध्ये एक विचित्र शांतता निर्माण झाली. पण देम्यानोव नांवाचा त्यांचा एक लाजरा-बुजरा शाळूसोबती तेवढ्यात तिथे आला आणि ती विचित्र शांतता भंगली.

आपल्या मित्र-मैत्रिणींना निरोप दिल्यानंतर, दिंडी दरवाजापाशी रेलून, शहराकडे जाणाऱ्या रस्त्याच्या काळ्या पट्ट्या-

कडे टक लावून पहात कितीतरी वेळ तोन्या तशीच उभी राहिली. ओलसर चावरा वारा आणि वसंतातल्या मातीचा ओलसर गंध तिच्या चेहऱ्याला स्पर्शत होते. शहरातील घरांच्या खिडक्यांमधले फिकट तांबूस दिवे चमकत होते. तिच्यापासून पूर्णतया वेगळे जीवन जगणारे ते शहर पलिकडे उभे होते आणि त्या शहरात कुठेतरी, एका घराच्या छपराखाली, स्वतःवर लटकणाऱ्या धोक्याची कल्पना नसणारा तिचा बंडखोर मित्र पावेल रहात होता. कदाचित तो तिला विसरूनही गेला होता. त्यांची अखेरची भेट झाल्यानंतर कितीतरी दिवस उलटून गेले होते! त्यावेळी त्याचे वागणे चुकीचे होते, पण आता त्या सर्व गोष्टींचा केव्हाच विसर पडला होता. उद्या जर तो तिला भेटला असता, तर पुन्हा त्यांची मैत्री सुरू झाली असती. पुन्हा त्या प्रेमळ, उबदार मैत्रीच्या भावना उफाळून आल्या असत्या. ही मैत्री पुन्हा जुळून येणार याबाबत तोन्याला तिळमात्र संदेह नव्हता. मात्र या रात्रीत त्याला दगा व्हायला नको होता. ही रात्र त्याच्या दृष्टीने वैऱ्याची होती... तिच्या अंगातून एक जोरदार शहारा गेला आणि रस्त्याकडे एकदा अखेरचा दृष्टिक्षेप टाकून ती घरात गेली. ती झोपत असतानाही "जर रात्रीत त्याला दगा घडला नाही तर..." हा विचार तिच्या मनात अखंड घुमत होता.

दुसऱ्या दिवशी सकाळी दुसरे कुणीही जागे व्हायच्या आत तोन्या अंथरुणातून उठली आणि तिने चटकन कपडे केले. घरातले कुणी जागे होऊ नये म्हणून हळूच ती बाहेर पडली, मोठ्या केसाळ त्रेझोरचा पट्टा तिने सोडला व त्या कुत्र्याला बरोबर घेऊन तिने शहरची वाट धरली. कोर्चागिनच्या घरासमोर ती एक क्षणभर घुटमळली. पण मग तिने निर्धाराने

पुढचे फाटक उघडले आणि ती अंगणात चालत गेली. आपली शेपटी हलवीत त्रेझोर पुढे धावला.

त्याच प्रातःप्रहरी आर्त्योम खेड्यातून घरी परतला होता. ज्या लोहाराकडे तो काम करीत होता, त्याने आपल्या घोडा-गाडीतून आर्त्योमला शहरापर्यंत आणून सोडले होते. आपल्या कमाईतून मिळवलेले पिठाचे पोते खांद्यावर टाकून तो अंगणात शिरला होता आणि त्याची बाकीची चीजवस्त घेऊन त्याच्या पाठोपाठ तो लोहार आला होता. उघड्या दाराच्या बाहेरच आर्त्योमने पोते जमिनीवर खाली ठेवले होते आणि साद घातली होती:

"पाव्का!"

पण उत्तर आले नव्हते.

"अडचण काय आहे? सरळ घरात का जात नाही?" लोहाराने त्याच्यापाशी येत विचारले.

स्वैपाकघरात सारे सामान ठेवून आर्त्योम दुसऱ्या खोलीत गेला. तेथील दृश्य त्याच्या नजरेला पडताच तो स्तंभित झाला. साऱ्या सामानाची उलथापालथ केलेली होती आणि जुन्या कपड्यांचा ढीग फरशीवर विखुरला होता.

"साली आहे काय भानगड?" हताश होत आर्त्योम उद्गारला.

"खरंच खूप गोंधळ करून ठेवलाय," लोहार म्हणाला.

"हा कारटा सापडणार कुठं?" आर्त्योमला आता खरेच राग येऊ लागला होता. पण त्या स्थळी कुणीही नव्हते.

लोहाराने त्याला रामराम करून त्याचा निरोप घेतला.

आर्त्योमने अंगणात जाऊन सभोवार पाहिले.

"मला याचा काही अर्थच समजेनासा झालाय! सगळी दारं सताड उघडी आहेत आणि पाव्काचा पत्ता नाही!"

नेवढ्यात कुणाची तरी पावले मागे वाजलेली त्याने ऐकली. मागे वळून पाहतो तो एक भला मोठा कुत्रा आपले कान टवकारून त्याच्या पुढ्यात उभा होता. एक मुलगी फाटका-तून घराकडे चालत येत होती.

"मला पावेल कोर्चागिनना भेटायचंय्," आर्त्योमला न्याहाळत ती खालच्या आवाजात म्हणाली.

"मलाही त्याला भेटायचंय. पण लेकाचा कुठं गेलाय् कुणास ठाऊक! मी इथं आलो तेव्हा घराला कुलूप नव्हतं आणि पाव्काचा कुठंही पत्ता नव्हता. तुम्हीही त्याला शोध-ताय का?" त्याने त्या मुलीला उद्देशून विचारले.

उत्तरादाखल त्या मुलीने प्रश्न केला:

"तुम्ही कोर्चागिनचे भाऊ आर्त्योम का?"

"होय. का?"

उत्तर देण्याऐवजी त्या मुलीने दचकून उघड्या दाराकडे पाहिले. "काल रात्रीच मी का आले नाही?" तिच्या मनात विचार आला. "तसं घडणं शक्य नाही... शक्य नाही..." तिचे अंतःकरण अधिकच जडावले.

"तुम्ही आलात तेव्हा दार उघडं होतं आणि पावेलचा पत्ता नव्हता?" तिच्याकडे चकित नजरेने टक लावून पाह-णाऱ्या आर्त्योमला तिने विचारले.

"आणि पावेलशी तुमचं काय काम होतं, असं मी विचारू का?"

तोन्या त्याच्या जवळ आली आणि भोवती नजर टाकीत बिचकत बिचकत म्हणाली:

"मला नक्की ठाऊक नाही, पण पावेल जर घरात नसेल, तर त्याला अटक झाली असली पाहिजे."

आर्त्योम घाबरून दचकला. "अटक? कशाबद्दल?"

"आपण आत जाऊ या," तोन्या म्हणाली.

तोन्याला जे काही माहीत होते ते तिने सांगितले तेव्हा आर्त्योम मुकाट बसून ऐकत होता. पण तिची हकिकत संपताच त्याला निराशेचा झटका आला.

"आग लागो या सगळयाला! आधीच काय कमी गोंधळ होता? त्यात आणखी ही भर!" तो कष्टी होत पुटपुटला. "घरात सामानाची अशी उलथापालथ का झाली ते आत्ता मला समजलं. त्या पोराला कशाला या भानगडी करायला पाहिजे होत्या... आता कुठं शोधू त्याला? अरे हो, तुम्ही कोण आहात?"

"जंगल अधिकारी तुमानोव हे माझे वडील. मी पावेलची मैत्रीण आहे."

"अस्सं..." विमनस्कपणे आर्त्योम म्हणाला. "त्या पोराला खाऊ घालण्यासाठी मी पीठ घेऊन आलो होतो आणि आता हे असं..."

तोन्याने आणि आर्त्योमने काही क्षण मूकपणे एकमेकांकडे पाहिले.

"मला आता गेलं पाहिजे," हळूच ती म्हणाली व जागेवरून उठली. "मला वाटतं, तुम्ही त्याला शोधून काढाल. मी नंतर परत येईन."

आर्त्योमने काही न बोलता संमतीदर्शक मान हलवली.

हिवाळी झोपेतून नुकतीच जागी झालेली एक रोड माशी खिडकीच्या कोपऱ्याशी गुणगुणत होती. एका जीर्णशीर्ण कोचाच्या टोकाशी एक तरुण शेतकरी स्त्री आपल्या गुडघ्यांवर

चे कोपरे टेकवून शून्य नजरेने घाणेरड्या फरशीकडे बसली होती.

डाच्या कोपऱ्यात सिगारेटचे थोटुक चघळणाऱ्या कमांडंटने दाच्या तावावरचे लिहिणे संपवले. आपल्या लेखनावर खूष असल्याचे स्पष्ट दिसत होते. "शेपेतोवका शहराचा डट, खोरुन्झी" या नांवाखाली त्याने आपली लपेटदार ठोकली. दाराशी टाचा खाडकन जुळविल्याचा आवाज . कमांडंटने मान वर करून पाहिले.

नाला बँडेज बांधलेला सालोमीगा त्याच्या समोर उभा .

"अरेच्चा, तुमची स्वारी इथं यायला काय कारण घडलं?" डंटने विचारले.

"खबर काही चांगली नाही. एका बोगुनेत्साच्या* तलवा-चा घाव हाताच्या हाडापर्यंत बसला!"

त्या स्त्रीच्या अस्तित्वाकडे दुर्लक्ष करून सालोमीगाने चार शिव्या हासडल्या.

"मग तू इथं काय करतोयस? विश्रांती घेतोस?"

"आता आपल्याला विश्रांती घ्यायला दुसऱ्या जगातच मिळेल. आघाडीवर ते आपल्याला जोरात मागं रेटताहेत."

त्या बाईकडे मानेने इशारा करून कमांडंटने त्याचे बोलणे च अडवले.

---

*बोगुनेत्स – लाल सेनेच्या बोगुन रेजिमेंटमधील सैनिक. व्या शतकातील युक्रेनी जनतेच्या राष्ट्रीय मुक्ती लढ्या-च्या बोगुन नांवाच्या वीराचे नांव या रेजिमेंटला दिले होते. –सं.

"आपण त्याबद्दल नंतर बोलू."

सालोमीगा एका स्टुलावर धप्पदिशी बसला. त्याने डोक्यावरची टोपी उतरवली. काचेचा मुलामा चढवलेल्या एका त्रिशूलावर एक गोंडेदार तुरा त्या टोपीच्या दर्शनी भागी लावलेला होता. युक्रेनी राष्ट्रीय प्रजासत्ताकाची ती निशाणी होती.

"गोलुबनं मला पाठवलंय," खालच्या सुरात तो बोलू लागला. "सैनिकांची एक डिव्हिजन लौकरच इथं आणली जाणार आहे. थोडक्यात म्हणजे शहरात काही कामं पार पाडायला लागणार आहेत आणि सर्व काही सुरळीत राखण्याची जबाबदारी माझ्यावर आहे. खुद्द आपले "प्रमुख" कुणा परदेशी बड्या धेंडाबरोबर इथं यायचे आहेत. तेव्हा कोणत्याही "इतर उद्योगांबाबत" सध्या चर्चा करायची नाही. तू काय लिहितोस?"

कमांडंटने सिगारेटचे थोटुक तोंडाच्या दुसऱ्या कोपऱ्यात धरले.

"इथं एका कारट्यानं मला फार वैताग दिलाय. तो झुखराय नांवाचा माणूस आठवतो? रेलकामगारांना आपल्याविरुद्ध उठवणारा? त्याला स्टेशनावर अटक केलं होतं."

"अटक केलं होतं? बरं, पुढं बोल," स्टूल पुढे ओढून घेत सालोमीगा म्हणाला.

"पुढं काय कप्पाळ! तो स्टेशनावरचा मठ्ठ कमांडंट ओमेलचेन्को... त्यानं एका कझाकाबरोबर झुखरायला इकडं पाठवून दिलं. पण वाटेतच या पोरानं त्या कैद्याला दिवसाढवळ्या पळवलं! तो कारटा आत्ता माझ्या ताब्यात आहे. त्या कझाकाला त्यांनी नि:शस्त्र केलं, त्याचे दात पाडले आणि

= पसार झाले. कझाक बिचारा शिट्टी वाजवत बसला. ईश्वराय निसटला, पण या पोरट्याला मात्र आम्ही पकडलं. ही सगळी हकिकत मी या कागदावर लिहून काढलीय," असे म्हणन त्याने लिहिलेल्या कागदांची चळत सालोमीगाकडे सारली.

सालोमीगाने डाव्या हाताने कागद उलटत तो अहवाल वाचला.

वाचून झाल्यानंतर कमांडंटकडे त्याने पाहिले.

"तर त्याच्यापासून काहीही माहिती काढली नाही?"

कमांडंटने अस्वस्थपणे आपल्या टोपीचे टोक पुढे ओढले.

"गेले पाच दिवस मी त्याच्या खनपटीला बसलोय. पण तो फक्त एवढंच बोलतो... 'मला काही माहीत नाही आणि मी त्याला सोडवलं नाही.' हरामखोर कारटा! त्या कझाक म्हारेकऱ्यानं त्या पोरट्याला ताबडतोब ओळखलं. त्यानं त्याला पाहताच त्याच्यावर झडपच घातली. त्या कझाकाला आवरणं मोठं अवघड झालं मला! त्याला पण एवढं संतापाय-चा कारण होतं, कारण कैद्याला निसटून जाऊ दिल्याबद्दल स्टेशनावर ओमेलचेन्कोनं त्याला दंडुक्याचे पंचवीस फटके मारले होते. त्या पोराला आणखी ठेवून घेण्यात काही अर्थ नाही. म्हणून त्याला खतम करण्याची परवानगी मिळवण्या-साठी हा अहवाल मी मुख्य ठाण्याला पाठवतोय."

सालोमीगा तिरस्काराने थुंकला.

"माझ्या तावडीत सापडला तर त्याला मी नक्की बोलता करीन. चौकशीचं काम तुला फारसं जमत नाही. वेदान्ताच्या विद्यार्थ्यांमधून कधी कमांडंट निर्माण झालाय? दंडुका वापरला होतास का?"

कमांडंट चिडला.

"तू आपली मर्यादा सोडायला लागला आहेस. तुझे टोमणे तुझ्यापाशीच ठेव. इथला कमांडंट मी आहे आणि माझ्या कामात उगाच ढवळाढवळ करू नको."

थरथरणाऱ्या कमांडंटकडे सालोमीगाने एक कटाक्ष टाकला आणि त्याला जोरात हसू कोसळले.

"हो-हो-हो... अरे पाद्र्याच्या पोरा, एवढा फुगून जाऊ नकोस, नाहीतर फटकन फुटशील. तू आणि तुझे प्रश्न गेलात खड्ड्यात! समागोनच्या* दोन बाटल्या कुठं मिळतील सांग!"

कमांडंटने दात विचकले.

"ते अगदी सोपं आहे."

हाताची बोटं त्या कागदांच्या चळतीवर खुपशीत सालोमीगा म्हणाला, "तुला त्या पोराची व्यवस्थित वाट लावायची असेल तर तो सोळाऐवजी अठरा वर्षांचा आहे असं लिही. नाहीतर ते कदाचित मंजुरी द्यायचे नाहीत."

त्या कोठीच्या खोलीत ते तिघे जण होते. फाटून चिंध्या झालेला कोट अंगात घातलेला दाढीवाला म्हातारा लाकडी पेटीवर एका कुशीवर झोपला होता. रुंद विजारीतले आपले बारकुळे पाय त्याने पोटाशी आखडून घेतले होते. पेत्ल्युरा सैनिकांनी त्याच्याकडे सोपवलेला एक घोडा तबेल्यामधून नाहीसा झाला होता, या कारणासाठी त्याला अटक झाली होती. बारक्या, कावेबाज डोळ्यांची आणि अणकुचीदार हनुवटीची एक वयस्क बाई खाली जमिनीवर फतकल घालून

---

*समागोन – हातभट्टीची दारू. – **अनु.**

बनली होती. समागोन विकून ती आपला चरितार्थ चालवीत होती, पण एक मनगटी घड्याळ आणि काही मौल्यवान वस्तू चोरल्याच्या आरोपावरून तिला इथे डांबून ठेवण्यात आले होते. खिडकीखालच्या कोपऱ्यात कोर्चागिन अर्धवट शुद्धीत पडला होता. त्याच्या चुरमडलेल्या टोपीवर त्याने आपले डोके टेकवले होते.

शेतकरी पद्धतीचा रुमाल डोक्याला बांधलेली, भीतीने डोळे विस्फारलेली एक तरुणी त्या कोठीच्या खोलीत आणण्यात आली. एक-दोन क्षण ती तशीच उभी राहिली आणि नंतर त्या समागोनवाल्या बाईशेजारी तिने बैठक मारली.

"काय ग कारटे, का पकडलं तुला?" त्या नवागतेला कुतूहलाने निरखीत वयस्क बाई भरभर बोलली.

उत्तर आले नाही. पण समागोनवाल्या बाईने चिकाटी सोडली नाही.

"कशाला पकडली त्यांनी तुला? समागोन तर विकत नव्हतीस ना?"

ती किसान तरुणी उठली आणि पिच्छा पुरवणाऱ्या त्या जहांबाज बाईकडे तिने कटाक्ष टाकला.

"नाही. माझ्या भावामुळं मला पकडलं," तिने शांतपणे उत्तर दिले.

"कोण आहे तो?" म्हातारीने तुणतुणे पुढे वाजवले.

म्हातारा मध्येच म्हणाला, "गप्प राहू दे की एकटीला! आधीच तिला तिच्या काळज्या भरपूर आहेत. त्यात आणखी तुझ्याशी वटवट कुठं करणार?"

ती बाई झटकन लाकडी पेटीच्या दिशेने वळली.

"मी काय करावं ते सांगणारा तू कोण? मी तुझ्याशी बोलत नाहीय्, बोलतेय का?"

म्हातारा पचकन थुंकला.

"मी तुला सांगतो, तिला एकटीला मुकाट राहू दे."

कोठीच्या खोलीत पुन्हा शांतता पसरली. त्या शेतकरी तरुणीने आपली मोठी शाल खाली अंथरली व हातांवर डोके टेकवून ती स्वस्थ पडून राहिली.

समागोनवाल्या बाईने खायला सुरुवात केली. म्हातारा उठून बसला, आपले पाय त्याने खाली जमिनीवर सोडले आणि एक सिगारेट वळून त्याने ती पेटवली. कडवट धुराचे लोट पसरले.

"अशा धुरकट घाणीत माणसानं शांतपणं कसं खायचं बाई!" मचामचा चघळीत ती म्हातारी कुरकुरली. "सगळ्या खोलीभर धूर करून ठेवलायस!"

म्हाताऱ्याने तिला उपहासाने टोमणा मारला:

"वजन कमी होईल म्हणून घाबरतेस का? लौकरच तुला दारातून बाहेर पडणं अवघड होईल. सगळं स्वतःच हादडते आहेस, थोडं अन्न त्या पोराला का देत नाहीस?"

त्या बाईने संतापाने हातवारे केले.

"मी दिलं त्याला, पण तोच काही घेत नाही. आणि माझ्या खाण्याबद्दल तू बोलू नकोस. तुझं अन्न तर मी खात नाही ना?"

ती तरुणी समागोनवाल्या बाईकडे वळली आणि कोर्चागिनकडे मानेचा इशारा करून तिने विचारले:

"त्याला इथं कशाबद्दल आणलंय?"

आपल्याशी ती मुलगी बोलली याचा त्या बाईला आनंद झाला. तिने तत्परतेने उत्तर दिले :

"तो याच गावातला पोरगा आहे. कोर्चागिनांच्या घरचा धाकटा मुलगा. त्याची आई स्वैपाकिण आहे."

त्या मुलीच्या कानाशी ओणवे होत ती अस्पष्ट आवाजात कुजबुजली :

"त्यानं एका बोल्शेविकाला सोडवलं. माझी शेजारीण झझूलीखा हिच्या घरी तो खलाशी रहायचा."

त्या तरुणीला पूर्वी कानांवर पडलेले शब्द आठवले: "त्याला खतम करायची परवानगी मिळवण्यासाठी हा अहवाल मी मुख्य ऑफिसाला पाठवतोय."

एकापाठोपाठ एक फौजी आगगाड्या जंक्शनावर आल्या आणि सैनिकांच्या बटालियनांचे घोळके त्यांच्यामधून दाटीवाटीने बाहेर पडले. चार डब्यांची 'झापोरोझेत्स' नांवाची चिलखती आगगाडी एका कडेच्या लोहमार्गावर हळूहळू येऊन उभी राहिली. तिच्या दोन्ही अंगांना पोलादी पट्टया खिळे मारून गच्च बसवलेल्या होत्या. तिच्यावरच्या तोफा खाली उतरविण्यात आल्या व मालडब्यांमधून घोडे बाहेर काढण्यात आले. तेथल्या तेथेच घोड्यांना खोगीरे चढविण्यात आली व पायदळी सैनिकांच्या गजबजणाऱ्या घोळक्यांमधून वाट काढीत घोडेस्वार सैनिक स्टेशनाबाहेरच्या आवाराकडे दौडत गेले. तेथे घोडदळी तुकडी एका रांगेत उभी रहात होती.

अधिकाऱ्यांची धावपळ चालू होती व आपापल्या तुकड्यांचे क्रमांक ते पुकारीत होते.

भांधीलमाशांच्या घरट्यासारखी स्टेशनावर बजबज माजली

होती. प्रचंड गजबजाट करणाऱ्या त्या भिरभिरत्या आकारहीन मानवी समूहामधून हळूहळू फौजी शिपायांच्या चौकोनी पलटणी तयार झाल्या आणि लौकरच सशस्त्र सैनिकांचा लोंढा शहराच्या दिशेने वाहू लागला. पार उशिरा संध्याकाळपर्यंत गाड्यांचा खडखडाट चालू होता आणि हमरस्त्यावरून रायफल डिव्हिजनच्या पिछाडीचे लोक तुरळकपणे येत होते.

झटपट संचलन करीत येणाऱ्या मुख्य ठाण्याच्या कंपनीबरोबर अखेर ही मिरवणूक संपली. त्या कंपनीतले एकशेवीस सैनिक बेंबीच्या देठापासून ओरडत होते:

अरे ओरडा कसला?
गोंधळ कसला?
पेत्ल्युराची माणसं
आलीत शहराला! ..

खिडकीमधून डोकावून पाहण्यासाठी पावेल कोर्चागिन उठला. त्या संधिप्रकाशाच्या वेळी रस्त्यावरच्या गाड्यांच्या चाकांचा गडगडाट, अनेक पावलांचा दणकट आवाज आणि रांगडी गाणी त्याला ऐकू येत होती.

त्याच्यामागे एक नाजुक आवाज उमटला:

"शिपाई गावात आलेत."

कोर्चागिनने मागे वळून पाहिले.

बोलणारी व्यक्ती म्हणजे काल तेथे आणून बंदिवान केलेली ती मुलगी होती.

तिची कहाणी त्याने एव्हाना ऐकली होती. समागोनवाल्या बाईने तिच्यापासून ती बाहेर काढून घेतली होती. शहरापासून

नान वेर्स्ता* दूर असलेल्या खेड्यात ती रहात होती. सोविएतांची तेथे सत्ता होती तेव्हा ग्रित्स्को नांवाचा तिचा मोठा भाऊ गरीब शेतकऱ्यांच्या समितीचा प्रमुख होता. आता तो लाल गनिमी सैनिक बनला होता.

लाल सैनिक जेव्हा तेथून निघून गेले तेव्हा ग्रित्स्कोने मशिनगनचा पट्टा कसला आणि तोही त्यांच्याबरोबर गेला. आता त्याच्या घरच्या माणसांचा सतत छळ सुरू झाला. त्याचा एकुलता एक घोडा हिसकावून नेण्यात आला. थोडे दिवस वडिलांना तुरुंगात डांबून त्यांचे हाल करण्यात आले. ग्रित्स्कोने पूर्वी ज्यांना पकडीत ठेवले होते त्यांच्यापैकी गावच्या एक प्रमुखाने, सूडापायी सतत नवख्या माणसांच्या राहण्याची जबाबदारी या घरावर टाकली. या कुटुंबाला वाळीत टाकण्यात आले. आणि आदल्या दिवशी कमांडंट झडतीसाठी आला तेव्हा त्या गावच्या प्रमुखाने त्याला या मुलीच्या घरी आणले. ती त्याला आवडली होती आणि "उलटतपासणीसाठी" तो तिला स्वत:बरोबर शहरात घेऊन आला होता.

कोर्चागिनला अजिबात झोप येत नव्हती. प्रयत्न करूनही त्याचे मन स्वस्थ नव्हते आणि एकाच विचाराचा भुंगा सतत त्याच्या डोक्यात भणभणत होता: "पुढे काय?"

त्याचे जखमी शरीर ठणकत होते. त्या शिपायाने पाशवी संतापाच्या भरात त्याला बेदम मारले होते.

आपल्या मनात गर्दी करणाऱ्या कडवट विचारांपासून सुटका व्हावी म्हणून त्या दोन बायकांचे कुजबुजणे त्याने ऐकले होते.

त्या कमांडंटने त्या मुलीची कशी मनधरणी केली होती,

---

*एक वेर्स्ता – १.०६ कि. मी. – **अनु.**

तिला कशा धमक्या घातल्या होत्या आणि तिने त्याला झिड-कारले तेव्हा तो कसा संतापला होता, ही हकिकत त्या मुलीने हलक्या आवाजात कथन केली होती. "मी तुला तळघरात कोंडून घालीन आणि तिथं तू सडत पडशील," असे त्या कमांडंटने अखेरीस त्या मुलीला सांगितले होते.

कोठडीच्या कोपऱ्यांमधून अंधार पसरला. घुसमटून टाक-णारी, अस्वस्थ करणारी आणखी एक रात्र समोर उभी होती. पुन्हा एकदा अज्ञात उद्याबद्दलचे विचार. बंदिवासातील ती सातवी रात्र होती, पण आपण तेथे महिनोन् महिने पडलो आहोत असे पावेलला वाटत होते. अंगाखालची जमीन कठीण होती आणि वेदनेने अंग तुटत होते. आता ते तिघेच त्या कोठडीत होते. कुठूनतरी वोदका पैदा करण्यासाठी खोरुन्झीने समागोनवाल्या बाईला मोकळे सोडले होते. जणू घरातल्या रशियन चुलाण्यावर झोपावे तशा थाटात म्हातारबाबा लाकडी पेटीवर घोरत होते. आपल्यावरील संकटाचा त्यांनी निर्वि-कल्प मनाने स्वीकार केला होता व रात्रीच्या वेळी ते गाढ झोपत होते. ख्रिस्तीना आणि पावेल अगदी एकमेकांशेजारी जमिनीवर पडून होती. काल पावेलने खिडकीमधून सेर्गेईला पाहिले होते. घरांच्या खिडक्या निरखीत खूप वेळपर्यंत तो दुःखी मनाने रस्त्यावर उभा होता.

"मी इथं आहे हे त्याला माहीत आहे," पावेलच्या मनात विचार आला.

गेले तीन दिवस कुणीतरी ओळीने त्याच्यासाठी काळा आंबट पाव आणून देत होते. कोण देत होते ते मात्र पहारे-करी सांगत नव्हते. आणि दोन दिवस कमांडंटने वारंवार त्याला प्रश्न विचारले होते. या सर्वाचा अर्थ काय होता?

उलटतपासणीच्या वेळी त्याने काहीही माहिती सांगितली नव्हती. उलट त्याने सर्व गोष्टींना नकार दिला होता. तो गप्प का राहिला होता याचे कारण त्याचे त्यालाच माहीत नव्हते. त्याने पुस्तकांमध्ये वाचलेल्या वीरांप्रमाणे त्याला शूरपणे आणि धीटपणे वागायचे होते. पण ज्या रात्री त्याला तुरुंगाकडे नेण्यात येत होते आणि त्याला पकडणाऱ्यांपैकी एकजण जेव्हा म्हणाला होता: "पान खोरुन्झी, कशाला याला फरपटत न्यायचा? पाठीत एक गोळी घातली की खलास!".. तेव्हा मात्र पावेल घाबरला होता. सोळाव्या वर्षी मरण्याचा विचार खरोखरीच भयंकर होता. मरण म्हणजे सर्व गोष्टींची अखेर होती.

ख्रिस्तीनासुद्धा विचार करीत होती. तिच्या शेजारच्या त्या तरुण मुलापेक्षा तिला जास्त माहिती होती. त्याच्या नशीबात काय वाढून ठेवले होते हे कदाचित त्याला ठाऊक नव्हते... पण तिच्या कानांनी ते ऐकले होते.

झोपणे अशक्य झाल्यामुळे तो रात्रीचा या कुशीवरून त्या कुशीवर तळमळत होता. ख्रिस्तीनाचे भवितव्यही काही चांगले नव्हते, पण तरीही पावेलविषयी तिला अनुकंपा वाटत होती. कमांडंटचे धमकावणीचे शब्द तिला आठवत होते: "मी उद्या तुझी व्यवस्था करतो. जर मला स्वीकारला नाहीस तर पहारेकऱ्यांच्या ठाण्यावर तुला पाठवीन. सगळे कझाक खूष होतील तुला घ्यायला! तेव्हा कुणाला निवडायचं ते ठरव!"

"किती अवघड होते सारे आणि कुठूनही दयेची अपेक्षा ठेवता येत नव्हती. ग्रित्स्को लाल सैनिकांना सामील झाला हा काय तिचा दोष होता? आयुष्य किती क्रूर होते?"

एका अस्पष्ट वेदनेने ती कासावीस झाली आणि अगतिक

निराशेपायी व भीतीच्या दु:खाने ती मुकेपणाने हुंदके देऊ लागली. तिचे सारे शरीर गदगदू लागले.

भिंतीपासच्या कोपऱ्यातून एक सावली सरकली.

"तू का रडतेस?"

ख्रिस्तीनाला भावनांचा उमाळा अनावर झाला. त्या कोठडीत अगदी चूप राहणाऱ्या आपल्या सोबत्यापाशी तिने भडाभडा वेदना सांगितल्या. तो काहीही बोलला नाही, पण त्याने हलकेच तिच्या अंगावर आपला हात ठेवला.

"माझे प्राणांतिक हालहाल करतील, दुष्ट मेले! त्यांचा नायनाट होवो!" आपले अश्रु आवरीत भेदरल्या आवाजात ती अस्फुट उद्गारली. "काहीही मला वाचवू शकत नाही."

पावेल त्या मुलीला काय सांगणार? सांगण्यासारखे काहीच नव्हते. एका लोखंडी कड्यामध्ये आयुष्य त्या दोघांचाही चुराडा करीत होते.

उद्या तिला घेऊन जायला ते येतील तेव्हा त्याने झगडा केला तर? त्यांनी त्याला मरेपर्यंत चोप दिला असता किंवा त्याच्या मस्तकावर तलवारीचा एक घाव घालून त्याचा काय-मचा निकाल लावला असता. सैरभैर झालेल्या त्या मुलीचे कसेबसे सांत्वन करावे अशा इराद्याने त्याने तिच्या हातावर हळुवारपणे थोपटले. तिचे हुंदके थांबले. जाणाऱ्या-येणाऱ्याला हटकणारा पहारेकऱ्याचा "कोण आहे तिकडं?" असा सवाल मधून मधून दाराशी ऐकू येत होता. एरवी सारे काही शांत होते. म्हातारबाबा गाढ झोपले होते. न संपणारा काळ अगदी हळू हळू पुढे सरकत होता. आणि अचानक पावेलच्या अंगाभोवती त्या मुलीच्या हातांची मिठी पडली व तिने त्याला आपल्याजवळ खेचले.

"हे बघ," तिचे तप्त ओठ अस्पष्टपणे म्हणाले, "माझी काही सुटका नाही. जर तो अधिकारी नाही, तर ते दुसरे माझी अब्रू लुटणारच! त्याआधी तूच मला घे! म्हणजे त्या कुत्र्याला माझं कौमार्य लुटायचा आनंद तरी लाभणार नाही!"

"ख्रिस्तीना, अगं तू बोलतेस तरी काय?"

पण तिच्या घट्ट बळकट मिठीतून तो सुटू शकला नाही. तिचे धगधगणारे ओठ त्याच्या ओठांवर टेकले होते. त्या ओठांपासून सुटून जाणे अवघड होते. त्या मुलीचे शब्द अगदी सरळ-साधे होते, हळुवार होते. तसे ती का बोलली ते त्याला माहीत होते.

क्षणभर सर्व काही मागे सारल्यासारखे भासले. कडी घातलेले ते दार, लाल केसांचा कझाक, कमांडंट, पाशवी मारहाण, सात घुसमटत्या निद्राहीन रात्री – या सर्व गोष्टी क्षणभर विसरल्या गेल्या. फक्त ते धगधगते ओठ आणि अश्रूंनी ओलावलेला चेहरा यांचेच अस्तित्व त्याला जाणवत होते.

एकाएकी त्याला तोन्याची आठवण झाली.

तो तिला कसा विसरू शकणार? ते आवडते सुंदर डोळे कसे विसरणार?

त्याने आपली सारी ताकद एकवटली आणि ख्रिस्तीनाच्या मिठीतून तो मोकळा झाला. एखाद्या झिंगलेल्या माणसाप्रमाणे तो लटपटत उभा राहिला आणि लोखंडी सळईचा त्याने आधार घेतला. ख्रिस्तीनाने हातांनी चाचपून त्याला धरले.

"काय झालं तुला?"

त्या प्रश्नामध्ये जणू तिचे सारे प्राण एकवटले होते. तो तिच्यापाशी ओणवा झाला आणि तिचे हात दाबून म्हणाला:

"मला शक्य नाही ख्रिस्तीना. तू... तू इतकी चांगली आहेस." तो काय बरळत होता ते त्याचे त्यालाच समजत नव्हते.

त्या असह्य शांततेत तो पुन्हा उभा राहिला आणि लाकडी पेटीकडे गेला. तिच्या कडेशी बसत त्याने म्हाताऱ्याला जागे केले.

"आजोबा, मला सिगारेट द्या."

शालीमध्ये अंगाची मुरकुंडी करून ती मुलगी कोपऱ्यात रडत राहिली.

दुसऱ्या दिवशी काही कझाकांना सांगाती घेऊन कमांडंट आला व ख्रिस्तीनाला घेऊन गेला. जाताना तिच्या डोळ्यांनी पावेलचा निरोप घ्यायचा यत्न केला. तिची नजर त्याला दोषी ठरवीत होती. तिच्यापाठी जेव्हा धाडकन दार बंद झाले तेव्हा त्याचे अंतःकरण अधिकच खिन्न आणि उदास बनले.

सबंध दिवस पावेलच्या तोंडून एक शब्द काढणे म्हाताऱ्याला जमले नाही. पहारेकरी आणि कमांडंटचे रक्षक बदलले. संध्याकाळच्या सुमारास एका नव्या कैद्याला आत आणण्यात आले. पावेलने त्याला ओळखले. साखर कार-खान्यात जॉईनरचे काम करणारा तो दोलीन्नीक होता. बुटक्या, आडव्या अंगाच्या त्या माणसाने फाटक्या कोटाखाली फिकट पिवळसर सदरा घातला होता. चौकस नजरेने त्याने कोठीची खोली न्याहाळली.

क्रांतीचे पडसाद जेव्हा त्यांच्या गावापर्यंत पोचले होते तेव्हा १९१७ च्या फेब्रुवारीत पावेलने त्याला पाहिले होते. त्यावेळच्या गोंगाटी मिरवणुकांमध्ये फक्त एकच बोल्शेविक बोललेला त्याने ऐकला होता व तो बोल्शेविक म्हणजे दोलीन्नीक.

रस्त्याकडेच्या एका कुंपणावर उभे राहून त्याने सैनिकांसमोर भाषण केले होते. त्याचे शेवटचे शब्द पावेलला आठवत होते :

"सैनिकांनो, बोल्शेविकांच्या मागून जा. ते तुमचा घात करणार नाहीत!"

तेव्हापासून या जॉईनरला पावेलने पाहिले नव्हते.

कोठडीत नवा सोबती आला याचा म्हाताऱ्याला आनंद झाला होता, कारण सबंध दिवस तेथे मुकाट बसून राहणे त्याला अवघड होते. दोलीन्नीक म्हाताऱ्याशेजारी पेटीवर बसला, त्याच्याबरोबर त्याने सिगारेट ओढली आणि सर्व काही चौकशी केली.

मग तो नवा कैदी कोर्चागिनपाशी सरकला.

"काय तरुण माणसा, तू कसा काय इथं आला?" त्याने पावेलला विचारले.

पावेलने अगदी तुटक शब्दांमध्ये उत्तरे दिली. हा पोरगा सावधगिरी बाळगीत असल्यामुळे बोलायला राजी नाही हे दोलीन्नीकच्या ध्यानात आले. पावेलविरुद्धचा आरोप जेव्हा त्याला समजला, तेव्हा त्याचे बुद्धिमान डोळे आश्चर्याने विस्फारले व तो त्या मुलापाशी बसला.

"म्हणजे झुखरायला पळून जायला तू मदत केलीस तर? कमाल आहे. त्यांनी तुला इथं डांबून ठेवल्याचं मला माहीत नव्हतं."

एकदम चकित झालेला पावेल हाताच्या कोपऱ्यावर रेलून बसला.

"मला झुखराय वगैरे कुणी माहीत नाही. इथं तुमच्यावर काय वाट्टेल ते आरोप लादतात."

स्मित करीत दोलीन्नीक पावेलच्या आणखी जवळ सरकला.

"ठीक आहे पोरा. माझ्याबरोबर सावधगिरी बाळगायचं काही कारण नाही. तुझ्यापेक्षा मला जास्त माहिती आहे."

म्हाताऱ्याच्या कानांवर पडणार नाही अशा हळू आवाजात तो शांतपणे बोलू लागला:

"मी स्वतः झुखरायना निरोप दिला. एव्हाना ते आपल्या मुक्कामावर पोचले असतील. काय घडलं ते सगळं त्यांनी मला सांगितलंय."

क्षणभर गप्प राहून दोलीन्नीक पुढे म्हणाले:

"पोरा, तू अगदी कठीण पिळाचा बनलेला दिसतोस. अर्थात त्यांनी तुला पकडलंय आणि सारं काही त्यांना माहीत आहे ही गोष्ट फार वाईट!"

त्याने आपला कोट काढून खाली पसरला, त्यावर बैठक मारून पाठ भिंतीला टेकवली आणि नवी सिगारेट वळायला आरंभ केला.

दोलीन्नीकच्या शेवटच्या उद्गाराने पावेलला सारे काही स्पष्ट समजले. दोलीन्नीकवर विश्वास ठेवायला हरकत नव्हती. शिवाय त्याने झुखरायना निरोप दिला होता, याचा अर्थ...

पेत्ल्युरा कझाकांमध्ये आंदोलन घडविण्याचा प्रयत्न केल्याबद्दल दोलीन्नीकला अटक झाली होती, असे त्या संध्याकाळी पावेलला समजले.[*] एवढेच नव्हे तर, शिपायांनी शरण यावे आणि लाल सैनिकांना जाऊन मिळावे, अशी गुबेर्निया क्रांतिकारक समितीच्या आवाहनाची पत्रके वाटत असताना तो सापडला होता.

पावेलला फारशी माहिती न सांगण्याची दोलीन्नीकने खबरदारी घेतली होती.

"न जाणो, बंदुक ठासण्याच्या गजाचा ते या पोरावर प्रयोग करायचे. हा अजून फार कोवळा आहे," त्याने मनात विचार केला.

त्या रात्री उशीरा झोपायच्या वेळी थोडक्यात त्याने आपली ग्रास्ती व्यक्त केली:

"तर कोर्चागिन, आपण चांगले जाम अडचणीत सापडलो आहोत. यातून काय मार्ग निघतो ते पाहू या."

दुसऱ्या दिवशी एका नव्या कैद्याला आत आणण्यात आले — लोंबत्या कानाच्या, काटकुळ्या मानेच्या श्ल्योमा झेल्त्सेर न्हाव्याला!

"फूक्स, ब्लुवस्टाईन, त्राखतेनबेर्ग त्याचं मीठ आणि पाव देऊन स्वागत करणार आहेत," बोलताना जोरजोराने हातवारे करीत तो दोलीन्नीकला सांगू लागला. "मी म्हटलं, त्यांना तसं करायचं असलं तर खुशाल करू दे, पण बाकीची यहुदी माणसं त्यांना पाठिंबा देणार आहेत का? मुळीच नाही. याबद्दल मी तुम्हाला पैजेवर लिहून देतो. अर्थात त्यात त्यांचा स्वार्थ दडलाय. फूक्सचं दुकान आहे, त्राखतेनबेर्गची पिठाची गिरणी आहे. पण माझं काय आहे? आणि बाकीच्या भुके-कंगालांचं? काऽऽही नाही. भणंग दरिद्री आम्ही! हां, माझी जीभ मात्र फार लांब आहे. नवीनच आलेल्या अधिकाऱ्यांपैकी आज एकाची दाढी करताना मी म्हणालो: 'या पग्रोमांबद्दल आतामान पेत्ल्युराला माहीत आहे असं तुम्हाला वाटतं? प्रतिनिधींना ते भेटतील?' अरे देवा, या लांबड्या जिभेमुळं किती वेळा मी संकटात सापडलोय! तर त्या अधिकाऱ्याची तुळतुळीत दाढी करून, त्याला पावडर वगैरे लावून सरबराई केल्यानंतर त्यानं काय केलं असावं? तो उठला आणि मला

पैसे देण्याऐवजी, अधिकाऱ्यांविरुद्ध मी चिथावणी देतो म्हणून मला त्यानं पकडलं."

झेल्त्सेरने आपला ऊर बडवून घेतला. "आता कुठली चिथावणी दिली मी? काय बोललो? मी फक्त त्याला विचारलं... आणि त्यासाठी मला डांबून घालायचं...?"

भावनेच्या भरात झेल्त्सेरने दोलीन्नीकच्या सदऱ्याची गुंडी पिरगाळली आणि त्याचे दंड गच्च धरले.

संतापलेल्या श्ल्योमाची हकिकत ऐकताना दोलीन्नीकला अभावितपणे हसू फुटले.

पण म्हाव्याने आपली हकिकत संपवली तेव्हा गंभीरपणे दोलीन्नीक म्हणाला: "खरं आहे श्ल्योमा, तुझ्यासारख्या हुशार माणसानं तसला मूर्खपणा करायला नको होता. जीभ सैल सोडायला तू चुकीची वेळ निवडलीस. इथं यायचा मी तुला सल्ला दिला नसता."

झेल्त्सेरने समजल्याप्रमाणे मान डोलावली आणि निराशेने हातांना झटका दिला. तेवढ्यात दरवाजा उघडला गेला आणि समागोनवाल्या बाईला आत ढकलण्यात आले. ती धडपडत आत आली आणि तिला आणणाऱ्या कझाकावर घाणेरड्या शिव्यांची तिने लाखोली वाहिली.

"मंद आगीवर तुला आणि तुझ्या कमांडंटाला भाजलं पाहिजे! माझ्या त्या दारूनं मेल्याला आकडी आली पाहिजे!"

पहारेकऱ्याने धाडकन दरवाजा बंद केला. त्याने बाहेरून कुलूप लावल्याचा आवाज त्यांनी ऐकला.

पेटीच्या कडेशी ती बाई बसली तेव्हा म्हाताऱ्याने गंमतीच्या सुरात तिचे स्वागत केले:

"बडबडी म्हातारी, परत आमच्यात आलीस का? बैस, बैस. आपलंच घर आहे असं समज."

समागोनवाल्या बाईने म्हाताऱ्याकडे एक जळजळीत कटाक्ष टेकला व आपले गाठोडे घेऊन ती दोलीन्नीकशेजारी खाली बसली.

तिला पकडणाऱ्या लोकांना समागोनच्या काही बाटल्या भरून देण्यापुरतेच तिला मोकळे सोडले होते, असे आता कळून आले.

एकाएकी शेजारच्या पहारेकऱ्यांच्या खोलीतून आरोळ्यांचे आणि पळणाऱ्या पावलांचे आवाज ऐकू आले. कुणीतरी मोठ-मोठ्याने हुकूम ठोकीत होते. बोलायचे थांबून सारे कैदी कान देऊन ऐकू लागले.

प्राचीन घंटा-बुरूज असलेल्या त्या बेडौल चर्चच्या समोरील चौकात विलक्षण घटना घडत होत्या. चौकाच्या तीन बाजूंना शिपायांच्या काटकोनाकृती तुकड्या उभ्या होत्या. लढाईसाठी संपूर्ण सुसज्ज पवित्र्यात पायदळ डिव्हिजनच्या तुकड्या जमल्या होत्या.

चर्चच्या प्रवेशद्वाराच्या समोर पायदळाच्या तीन रेजिमेंटा बुद्धिबळपटाप्रमाणे चौकोनाकृती उभ्या केल्या होत्या. त्यांचे सैनिक शाळेच्या कुंपणापर्यंत भिडले होते.

रायफली 'विश्राम' पवित्र्यात ठेवलेला, कापलेल्या अर्ध्या भोपळ्यांप्रमाणे दिसणारी चमत्कारिक रशियन शिरस्त्राणे घातलेला आणि दारूगोळ्याची तोस्ताने अडकवण्याच्या कातडी पट्ट्यांनी लगडलेला पेत्ल्युरा शिपायांचा राखी रंगाचा तो मळकट समूह म्हणजे "डायरेक्टोरेट" पाशी असलेली सर्वोत्तम डिव्हिजन होती.

झारच्या माजी सेनेच्या भांडारांमधील उत्तम गणवेष परि-

धान केलेली, चांगले बूट घातलेली, प्रामुख्याने कुलकांचा भरणा असलेली, सोविएतांविरुद्ध कडवेपणाने लढणारी ही डिव्हिजन रणनीतीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या अशा ह्या रेल्वे जंक्शनचे संरक्षण करण्यासाठी मुद्दाम आणण्यात आली होती.

शेपेतोवकाला पाच वेगवेगळे लोहमार्ग येऊन मिळत होते. हे जंक्शन गमावणे म्हणजे पेत्ल्युरांच्या दृष्टीने त्यांची अखेरच होती. मुळातच "डायरेक्टोरेट"च्या हाती अगदी छोटा प्रदेश राहिला होता व विन्नित्सा हे छोटे गाव आता पेत्ल्युराची राजधानी होते.

"मुख्य आतामान" ने शिपायांची पाहणी जातीने करण्याचे ठरविले होते आणि त्याच्या आगमनापूर्वी आता सर्व काही सज्जता झाली होती.

चौकाच्या पिछाडीच्या दूरवरच्या कोपऱ्यात नव्या रंगरूटांची रेजिमेंट उभी केली होती. मळकट घाणेरड्या नागरी वेषातील ते अनवाणी तरुण सहसा नजरेला पडणार नाहीत अशा बेताने उभे केले होते. मध्यरात्रीच्या सुमारास शेतकऱ्यांच्या घरांवर धाडी घालणाऱ्या पेत्ल्युरा सैनिकांनी या शेतकरी तरुणांना त्यांच्या बिछान्यांमधून धरून आणले होते किंवा रस्त्यांमधून जाता जाता उचलून आणले होते. ह्या तरुणांपैकी कुणाचीही लढण्याची अजिबात इच्छा नव्हती.

"लढण्यासाठी मूर्ख माणसं त्यांना दुसरीकडं खुशाल शोधूं देत," अशी त्या युवकांची धारणा होती.

या रंगरूटांना पहाऱ्यामध्ये शहरात आणून त्यांची कंपन्यांमध्ये व बटालियनांमध्ये विभागणी करून त्यांना शस्त्रे पुरविणे, एवढेच काय ते पेत्ल्युराचे अधिकारी करू शकले. पण अशा

गोळा करून आणलेल्या रंगरूटांपैकी तिसरा हिस्सा रंगरूट दुसऱ्याच दिवशी पसार होत आणि अशा प्रकारे दर दिवसागणिक त्यांची संख्या खालावत होती.

त्यांना बूट पुरविणे अगदीच अविचारी ठरले असते, कारण बूटांचा साठा फारसा नव्हता. म्हणून प्रत्येकाने स्वतःचे बूट घालूनच आले पाहिजे असा हुकूम काढण्यात आला. त्याचा परिणाम म्हणजे सुतळ्या आणि तारा बांधलेल्या फाटक्या-तुटक्या पादत्राणांचे तऱ्हेतऱ्हेचे नमुने गोळा झाले.

कवायतीसाठी ते अनवाणीच आले होते.

पायदळाच्या पिछाडीला गोलुबची घोडदळ रेजिमेंट उभी होती.

कवायत पाहण्यासाठी उत्सुकतेने आलेल्या नगरवासियांच्या घनदाट जमावांना घोडेस्वार शिपायांनी मागे रोखून धरले होते.

कारण "मुख्य आतामान" दस्तुरखुद्द हजर राहणार होता! अशासारखे प्रसंग गावात विरळा होते आणि यावेळी जाहीर करण्यात आलेली मोफत करमणूक चुकविण्याची कुणाचीही इच्छा नव्हती.

चर्चच्या पायऱ्यांवर कर्नल, कप्तान, पाद्र्याच्या दोन मुली, मूठभर युक्रेनी शाळामास्तर, "मुक्त कझाकां"चा एक गट आणि पाठीला किंचित पोक असलेले महापौर—अशी "जनते" मधील खाशी मंडळी जमली होती. कझाकी चेर्केस्का परिधान केलेले पायदळाचे मुख्य अंमलदारही त्यांच्यात होते. कवायतीचे नेतृत्व त्यांच्याकडे होते.

चर्चच्या आतमध्ये वासीली पाद्री ईस्टरच्या प्रार्थनेचे कपडे अंगावर चढवीत होते.

पेत्ल्युराचे मोठे थाटात स्वागत होणार होते. नव्याने गोळा करून आणलेल्या रंगरूटांचा निष्ठावंत राहण्याबद्दल शपथविधी होणार होता व त्यासाठी पिवळा-निळा झेंडा आणण्यात आला होता.

पेत्ल्युराचे स्वागत करण्यासाठी डिव्हिजनचे कमांडर एका जुनाट खटाऱ्या फोर्ड मोटरीतून स्टेशनाकडे जायला निघाले.

ते गेल्यानंतर पायदळाच्या अंमलदारसाहेबांनी उंचापुऱ्या, धिप्पाड, अक्कडबाज मिशांच्या कर्नल चेर्न्याकला बोलावून घेतले.

"कुणालातरी सांगाती घ्या आणि कमांडंटची कचेरी, पिछाडीची व्यवस्था इत्यादी ठाकठीक आहे किंवा नाही, याची खात्री करून घ्या. तिथं काही कैदी असले तर त्यांच्यावर नजर टाका आणि तसे भुरटेच असले तर त्यांना सोडून त्यांच्या ब्यादीमधून मोकळे व्हा!"

चेर्न्याकने खाडकन टाचा वाजवल्या, नजरेला पडला तो पहिला कझाक कप्तान बरोबर घेतला आणि दौडत निघून गेला.

अंमलदारमहाशय पाद्रयाच्या मोठ्या मुलीकडे वळून अदबीने म्हणाले:

"मेजवानीची व्यवस्था ठीक आहे ना?"

"हो हो. कमांडंट आपल्याकडून शर्थ करताहेत," त्या देखण्या अंमलदाराकडे लोभस नजरेने एकटक पहात ती उत्तरली.

अचानक जमावात खळबळ माजली. रस्त्यावरून एक घोडेस्वार तुफान वेगाने दौडत येत होता. घोड्याच्या मानेशी तो ओणवा झाला होता. हात हलवीत तो ओरडला:



"ते येताहेत!"

"रांगेत उभे रहा!" अंमलदार गरजला.

अधिकारी आपापल्या जागांशी पळत गेले.

चर्चपाशी फोर्ड मोटार डुगडुगत येऊन थांबली तसे बँडवर गीत वाजू लागले: "अजुनी युक्रेन जिवंत आहे."

डिव्हिजन कमांडरच्या पाठोपाठ "मुख्य आतामान" उसासा टाकीत मोठ्या कष्टाने मोटारीतून बाहेर पडला. पेत्ल्युरा मध्यम उंचीचा माणूस होता. त्याचे चौकोनी आकाराचे डोके तांबड्याभडक गरगरीत मानेवर भक्कमपणे बसवलेले होते. उत्तम लोकरी कपड्याचा निळा सदरा त्याने अंगात घातला होता, त्यावर पिवळा पट्टा कमरेला गच्च आवळला होता आणि पट्ट्याला अडकवलेल्या सुरेख कमावलेल्या नरम कातडी पिशवीत छोटे ब्राऊनिंग पिस्तूल होते. त्याच्या डोक्यावर खाकी टोकदार टोपी होती. तिच्यावर काचेचा मुलामा दिलेल्या ध्वजचिन्हासकट तुरा खोवलेला होता.

सीमोन पेत्ल्युराच्या व्यक्तिमत्वात खास लष्करी असे काही नव्हते. खरे म्हणजे तो लष्करी माणूस दिसतच नव्हता.

दुर्मुखल्या मुद्रेने त्याने अंमलदाराची खडी ताजीम ऐकली. मग महापौरांनी त्याच्या स्वागतपर भाषण केले.

पेत्ल्युराचे त्यांच्या भाषणाकडे फारसे लक्ष नव्हते. महापौरांच्या डोक्यापलिकडे दिसणाऱ्या रेजिमेंटांकडे तो टक लावून पहात होता.

"सुरू करू या," त्याने मानेने अंमलदाराला इशारा केला.

झेंड्याजवळच्या छोट्या चौथऱ्यावर उभे राहून पेत्ल्युराने शिपायांना दहा मिनिटे व्याख्यान ऐकवले.

त्याच्या भाषणात मुळीच दम नव्हता. प्रवासामुळे दमलेल्या

आतामानच्या भाषणात उत्साहाचा अभाव होता. तरीही त्याच्या भाषणाच्या अखेरी सैनिकांनी नियमाप्रमाणे "जय असो! जय असो!" अशा आरोळ्या ठोकल्या. हातरुमालाने आपल्या कपाळावरचा घाम टिपीत तो चौथऱ्यावरून खाली उतरला. मग अंमलदार आणि डिव्हिजन कमांडर यांच्याबरोबर फिरून त्याने तुकड्यांची पाहणी केली.

नव्याने भरती केलेल्या सैनिकांपुढून जात असताना तिरस्कारयुक्त आठी पडल्यामुळे त्याचे डोळे किंचित किलकिले झाले आणि चिडून त्याने दातओठ खाल्ले.

पाहणीच्या अखेरीस नव्या रंगरूटांच्या पलटणी वेड्यावाकड्या रांगांनी झेंड्यापर्यंत डावा-उजवा करीत गेल्या. तेथे वासीली पाद्री हातात बायबल घेऊन उभे होते. त्यांनी प्रथम बायबलचे चुंबन घेतले आणि नंतर झेंड्याच्या किनारीचे चुंबन घेतले. नेमक्या त्याचवेळी एक अकल्पित प्रसंग घडला.

काही हिकमती करून त्या चौकात पेत्ल्युरापर्यंत जाण्यात एका प्रतिनिधीमंडळाने यश मिळविले. त्या गटाचे नेतृत्व लाकडाचे श्रीमंत व्यापारी ब्लुवस्टाईन यांच्याकडे होते. हातात पाव आणि मीठ घेऊन ते पेत्ल्युराला सामोरे गेले. त्यांच्या पाठीमागे कापडव्यापारी फूक्स आणि इतर तीन सुस्थित व्यापारी होते.

अत्यंत अदबीने वाकून ब्लुवस्टाईन यांनी हातातील तबक पेत्ल्युरापुढे धरले. शेजारी उभ्या असलेल्या एका अधिकाऱ्याने पेत्ल्युराच्या वतीने त्या तबकाचा स्वीकार केला.

"सरकार, यहुदी जनता प्रामाणिकपणं आपली कृतज्ञता आणि आदर व्यक्त करते आहे. तिच्या वतीनं या स्वागताचा स्वीकार व्हावा."

"ठीक आहे," हाती दिलेल्या कागदावर झरंकन नजर फिरवीत पेत्ल्युरा तोंडातल्या तोंडात पुटपुटला.

फूक्स पुढे झाले.

"आम्हाला आमचे धंदे परत सुरू करण्यास परवानगी द्यावी आणि पग्रोमांपासून आमचं संरक्षण करावं, अशी आम्ही आपल्यापाशी विनंती करतो." फूक्स "पग्रोम" या शब्दाशी अडखळत म्हणाले.

संतापाच्या आठीने पेत्ल्युराचा चेहरा काळवंडला.

"माझं सैन्य पग्रोमसारखे उद्योग करीत नाही. तुम्ही याची आठवण ठेवली असती तर बरं झालं असतं."

फूक्सनी अगतिकपणे हात पसरले.

पेत्ल्युराच्या खांद्याच्या स्नायूंची अस्वस्थ हालचाल झाली. प्रतिनिधीमंडळाच्या अवेळी आगमनामुळे तो चिडला होता. आपली काळी मिशी कुरतडीत पाठीमागे उभ्या राहिलेल्या गोलुबकडे तो वळला.

"पान कर्नल, तुमच्या कझाकांविरुद्ध इथं तक्रार आलीय. या बाबतीत चौकशी करा आणि त्याप्रमाणं उपाययोजना करा," पेत्ल्युरा म्हणाला. मग अंमलदाराला उद्देशून तो कोरड्या आवाजात म्हणाला:

"तुम्ही कवायतीला सुरुवात करायला हरकत नाही."

गोलुबची गाठ पडेल असे दुर्दैवी प्रतिनिधीमंडळाला वाटले नव्हते. ते सारे घाईघाईने मागे सरले.

उत्सवी मानवंदनेच्या पूर्वतयारीकडे बघ्यांचे लक्ष पुरते वेधले होते. हुकुमांचे खणखणीत आवाज घुमत होते.

बाह्यतः चेहरा शांत ठेवून गोलुब ब्लुवस्टाईनपाशी चालत गेला आणि फिस्कारला:

"सडक्या गावढळांनो चालते व्हा इथून! नाहीतर तुमचा खिमा करीन!"

बँड वाजू लागला आणि पहिल्या तुकड्या संचलन करीत चौकात आल्या. पेत्ल्युराच्या जवळ येताच शिपाई यांत्रिकपणे "जय" चा पुकारा करीत व हमरस्त्यावर वळून बाजूच्या गल्ल्यांमध्ये दिसेनासे होत. कंपन्यांच्या अग्रभागी नव्याकोऱ्या खाकी गणवेशांमधील अधिकारी अगदी सहज फिरायला निघावे अशा थाटात पावले टाकीत होते व आपल्या नखरेबाज छड्या फिरवीत होते. बंदुका साफ करण्यासाठी सैनिकांना सळ्या द्यायची प्रथा जशी नुकतीच सुरू झाली होती, तशीच अधिकाऱ्यांनी नखरेबाज छड्या बाळगण्याची प्रथा डिव्हिजनमध्ये सुरू झाली होती.

कवायतीच्या अखेरीस नवे रंगरूट आले. त्यांच्या रांगांमध्ये शिस्त नव्हती, त्यांची पावले तालबद्ध पडत नव्हती आणि ते एकमेकांना धक्काबुक्की करीत होते.

त्या नव्याने भरती केलेल्या सैनिकांमध्ये शिस्त आणण्याचा अधिकाऱ्यांनी व्यर्थ प्रयत्न केला होता. त्या गोळा करून आणलेल्या लोकांच्या पायांचा रस्ता घासणारा आवाज अस्पष्ट ऐकू येत होता. दुसरी कंपनी जेव्हा चालत आली, तेव्हा तागाच्या कापडाचा सदरा घातलेला आणि मानवंदनेच्या चौथऱ्याच्या जवळच्या बाजूने जाणारा एक शेतकरी पोरगा "प्रमुखां" कडे एवढे डोळे विस्फारून आणि आ वासून बघत राहिला, की रस्त्याकडेच्या खड्ड्यात त्याचा चुकून पाय पडला आणि त्याने चक्क साष्टांग नमस्कार घातला. फरसबंदी दगडांवर त्याची रायफल गडगडत गेली. त्याने वर उठायचा

प्रयत्न केला, पण त्याच्या मागून येणाऱ्या लोकांच्या धक्क्यां-मुळे तो पुन्हा भुईसपाट आडवा पडला.

काही प्रेक्षक खो खो हसू लागले. कंपनीच्या रांगा विस्कटल्या आणि चौकामधून ती अगदी वेंधळेपणाने गेली. त्या कमनशिबी पोराने रायफल उचलली व इतरांमागे कशीबशी धूम ठोकली.

त्या केविलवाण्या दृश्यापासून पेत्ल्युराने पाठ फिरवली आणि कवायतीची अखेर होण्याची वाट न पाहता तो तडक मोटारीकडे चालत निघाला. त्याच्या पाठोपाठ जाणाऱ्या अंमल-दाराने अपराधी स्वरात विचारले:

"पान आतामान जेवायला थांबणार नाहीत काय?"

"नाही," पेत्ल्युरा कठोर स्वरात खेकसला.

चर्चभोवतालच्या उंच कुंपणाशी दाटून कवायत पहात उभ्या राहिलेल्या प्रेक्षकांमध्ये सेर्गेई ब्रुझ्झाक, वाल्या आणि क्लीम्का होते. लोखंडी जाळीच्या दांडयांना गच्च पकडून सेर्गेई आपल्या खालच्या बाजूच्या लोकांकडे तिटकाऱ्याने पहात होता.

"चल वाल्या, त्यांनी आपलं दुकान बंद केलंय," मुद्दाम मोठ्या आवाजात तो बंडखोरपणे म्हणाला आणि कुंपणापासून दूर झाला. लोक त्याच्याकडे चकित होऊन पाहू लागले. पण सर्वांकडे दुर्लक्ष करून तो दरवाजाकडे चालू लागला. त्याची बहीण आणि क्लीम्का त्याच्या पाठोपाठ निघाले.

कर्नल चेर्न्याक आणि तो कप्तान घोडयांवरून दौडत कमां-डंटच्या कचेरीपाशी येऊन उतरले. आपले घोडे निरोप पोच-वणाऱ्या घोडेस्वाराच्या स्वाधीन करून ते वेगाने पहारेकऱ्यांच्या चौकीकडे निघाले.

"कमांडंट कुठं आहे?" चेर्न्याकने निरोप्याला तीक्ष्ण स्वरात विचारले.

"म... माहीत नाही," तो निरोप्या चाचरत म्हणाला. "कुठंतरी गेलेत."

त्या घाणेरड्या, अस्वच्छ खोलीभर चेर्न्याकने एक दृष्टिक्षेप टाकला. तेथील बिछाने विस्कटलेले होते आणि हे अधिकारी आत आले तरी त्या बिछान्यांवर आडव्या पसरलेल्या कमांडंटच्या कझाक पहारेकऱ्यांनी उठायची मुळीसुद्धा तसदी घेतली नाही.

"कसला डुक्करखाना आहे हा?" चेर्न्याक गरजला. "आणि डुकरांसारखं लोळत पडायला कुणी तुम्हाला परवानगी दिली?" उताणे झोपलेल्या लोकांच्या अंगावर त्याने चाबूक फडकावला.

एक कझाक उठून बसला. त्याने एक भलीमोठी ढेकर दिली आणि तो गुरगुरला:

"कशाला बोंबलतोस उगाच? आमचा स्वतःचा एक बोंबल्या आहे इथं."

"काय म्हणालास?" चेर्न्याक त्या माणसाच्या अंगावर धावून गेला. "अक्करमाशा, कुणाशी बोलतोस ठाऊक आहे कर्नल चेर्न्याक! समजलं? डुक्कर साला! चला, सगळे उठा ताबडतोब! नाहीतर चाबकानं चामडी सोलून काढीन एकेकाची!" संतापलेला कर्नल सबंध चौकीभर तरातरा फिरत होता. "इथली घाण साफ करायला, वळकट्या गुंडाळायला आणि तुमची गलिच्छ थोबाडं स्वच्छ करायला मी तुम्हाला एक मिनिटाचा अवधी देतो. साल्यांनो, तुम्ही कझाक नाही, दरोडेखोर वाटता आहात!"

वाटेत आडवी आलेली घाण पाण्याची बादली रागाच्या भरात कर्नलने लाथेने उडवली.

कप्तानानेही कर्नलचा सूर लावला. आपला तिहेरी वाद्यांचा चाबूक गरगरा फिरवीत आणि शिव्यांचा भडिमार करीत त्याने झोपलेल्या लोकांना फळकुटांवरून उठवले.

"मुख्य आतामान कवायतीची पाहणी करताहेत. कोणत्याही क्षणाला ते इथं येतील. चला, आवरा पटपट!"

परिस्थितीला गंभीर वळण लागलेले पाहून आणि लोकांना चाबकाने फोडून काढण्याची चेर्न्याकची ख्याती माहीत असल्या-मुळे, कझाक झटपट उठले व आवराआवर करू लागले.

क्षणार्धात तेथील सफाईला जोरदार आरंभ झाला.

"कैद्यांवर नजर टाकली पाहिजे," कप्तानाने आठवण करून दिली. "कुणाला डांबून ठेवलंय कुणास ठाऊक! सरकार आत डोकावले तर ऐनवेळी पंचाईत व्हायची!"

"अरे, किल्ली कुणाकडं आहे?" चेर्न्याकने पहारेकऱ्याला विचारले. "ताबडतोब दार उघड."

सार्जंट उडी मारून उठला आणि त्याने कुलूप काढले.

"कमांडंट कुठं आहे? किती वेळ मी त्याची वाट पहायची? त्याला ताबतोब शोधून काढ आणि माझ्यापाशी घेऊन ये," चेर्न्याकने आज्ञा केली. "आवारात पहारेकऱ्यांना एकत्र गोळा करा. रायफलींना बागनेटं का लावलेली नाहीत?"

"आम्ही कालच इथं आलो," सार्जंटने खुलासा करण्याचा प्रयत्न केला आणि कमांडंटला शोधण्यासाठी तो घाईघाईने निघून गेला.

कोठीच्या खोलीचे दार कप्तानाने लाथ मारून उघडले.

आतील अनेक लोक जमिनीवरून उठून उभे राहिले. बाकीचे निःस्तब्ध झाले.

"दार आणखी थोडं उघड," चेर्न्याकने आज्ञा केली. "इथं पुरेसा उजेड नाही."

त्याने कैद्यांचे चेहरे न्याहाळले.

"कशासाठी तुला इथं आणलं?" लाकडी पेटीच्या कडेशी बसलेल्या म्हाताऱ्यावर तो खेकसला.

म्हातारा अर्धवट उठला, कमरेची विजार त्याने वर खेचली आणि तिखट धारदार आवाजामुळे घाबरून तो तोंडातल्या तोंडात पुटपुटला:

"माझं मलाच माहीत नाही. त्यांनी इथं मला अडकवून ठेवलं तेव्हापासून मी इथंच आहे. आवारातून एक घोडा नाहीसा झाला होता, पण त्याच्याशी माझा काहीएक संबंध नव्हता."

"कुणाचा घोडा?" कप्तानाने मध्येच विचारले.

"अर्थात, सैन्यातला घोडा. माझ्याकडं राहिलेल्या सैनिकांनी त्याला विकलं, त्या पैशाची ते दारू प्यायले आणि आता मला बोल लावताहेत."

चेर्न्याकने झरकन त्या म्हाताऱ्यावरून एकदा नजर फिरवली आणि खांद्याला अधीरपणे झटका देत तो ओरडला: "उचल तुझ्या वस्तू आणि चालता हो इथून!" मग तो समागोन-वाल्या बाईकडे वळला.

म्हाताऱ्याचा स्वतःच्या कानांवर विश्वासन बसेना. आपले अधू डोळे मिचकावीत त्याने कप्तानाला विचारले:

"म्हणजे मी गेलेलं चालेल?"

कझाकाने अशा अर्थाने मान हलवली की जणू त्याला

म्हणायचे होते: जेवढा लौकर जाशील तेवढे जास्त बरे!

पेटीच्या कोपऱ्याला लटकावलेले आपले बोचके म्हाताऱ्याने लगबगीने खाकोटीला मारले आणि दाराबाहेर तो पसार झाला.

"आणि तुला कशाबद्दल आणलं इथं?" चेर्न्याकिने समागोन-वाल्या बाईला विचारले.

आत्तापर्यंत समोशांचा तोबरा चघळणाऱ्या त्या बाईने पटकन घास गिळला आणि चटपट उत्तर दिले:

"पान साहेब, मला इथं डांबून ठेवून खरंच माझ्यावर अन्याय केलाय. जरा विचार करा साहेब, गरीब विधवेच्या घरचा समागोन प्यायचा आणि नंतर तिला असं कैदेत ठेवायचं?"

"समागोन विकायचा धंदा तर करत नाहीस ना?" चेर्न्याकिने विचारले.

"धंदा? नाही ग बाई!" अपमान झाल्याचा आविर्भाव करीत ती बाई म्हणाली. "कमांडंट आला, चार बाटल्या घेतल्या आणि एक कोपेक दिला नाही! हे अस्सं चालतंय बघा: तुमची दारू ते पितात आणि कधीही पैसे देत नाहीत! याला तुम्ही धंदा म्हणाल का?"

"बस्स! आता काळं कर इथून!"

या आज्ञेचा पुन्हा उच्चार होण्याची वाट पहायला ती बाई थांबलीच नाही. तिने आपली टोपली उचलली आणि दाराशी तसेच मागे सरकत जाऊन कृतज्ञतेने ती एकवार खाली झुकली.

"देव तुम्हाला उदंड आयुष्य देवो साहेब."

हा सगळा विनोदी प्रकार मोठ्या आश्चर्याने दोलीन्नीक

पहात होता. हे सर्व काय चालले आहे याचा कुणाही कैद्याला उलगडा होत नव्हता. एवढेच त्यांना स्पष्ट झाले होते की, आलेली माणसे कुणी बडी अधिकारी मंडळी होती आणि कैद्यांची आपल्या मनाप्रमाणे व्यवस्था लावण्याची ताकद त्यांच्यात होती.

"आणि तू रे?" चेर्न्याकने दोलीन्नीकला विचारले.

"पान कर्नल तुझ्याशी बोलतात तेव्हा उठून उभा रहा!" कप्तान गुरकावला.

अगदी मंदपणे दोलीन्नीक जमिनीवरून उठून उभा राहिला.

"तुला कशाबद्दल पकडलं?" चेर्न्याकने पुन्हा विचारले.

दोलीन्नीकने कर्नलच्या अक्कडबाज मिशांकडे पाहिले, त्याचा तुळतुळीत दाढी केलेला चेहरा न्याहाळला, गोंडेदार नव्या टोपीकडे नजर टाकली आणि एक जबरदस्त विचार त्याच्या मनात चमकून गेला: "कदाचित जमेलही!"

"संध्याकाळी आठनंतर रस्त्यात भटकल्याबद्दल मला पकडलं," डोक्यात आली ती पहिली थाप त्याने सरळ ठोकली.

विलक्षण आतुरतेने तो उत्तराची वाट पहात थांबला.

"रात्रीच्या वेळी काय करत होतास बाहेर?"

"रात्र कुठली, नुकते अकरा वाजले होते."

अंदाजाने मारलेली ही थाप पचेल असे त्याला आता वाटत नव्हते.

पण जेव्हा त्रोटक हुकूम त्याच्या कानी पडला तेव्हा त्याचे पाय थरथरले.

"चालता हो."

आपले जाकीट तेथेच विसरून दोलीन्नीक घाईघाईने दाराबाहेर गेला. कप्तानाने एव्हाना दुसऱ्या कैद्याकडे आपला मोर्चा वळवला होता.

सर्वांत शेवटी कोर्चागिनला प्रश्न विचारण्यात आले. स्तिमित होऊन तेथे चालू असलेले प्रसंग तो पहात बसला होता. दोलीन्नीकची सुटका झाली यावर त्याचा प्रथम विश्वासच बसेना. प्रत्येकाला ते अशा पद्धतीने सोडून का देत होते? पण दोलीन्नीक... संचारबंदी मोडल्याबद्दल आपल्याला पकडले असे दोलीन्नीक म्हणाला... आणि एकदम कोर्चागिनच्या डोक्यात लख्ख प्रकाश पडला!

काटकुळ्या झेल्त्सेरला कर्नलने तोच ठराविक प्रश्न टाकला: "तुला कशाबद्दल पकडलं?"

घाबरून पांढराफिकट पडलेला तो न्हावी बरळला:

"मी चिथावणी देत होतो असं ते म्हणतात, पण ते कशाबद्दल बोलताहेत ते मला अजून समजलं नाही."

"काय? चिथावणी? कशाबद्दल चिथावणी देत होतास?"

झेल्त्सेरने गोंधळून नुसते हात पसरले.

"माझं मलाच माहीत नाही. मी एवढंच म्हणालो की, मुख्य आतामानांपाशी तक्रारअर्ज गुदरण्यासाठी यहुदी माणसं यहुद्या गोळा करत होती."

"कसली तक्रार?" झेल्त्सेरकडे एकदम झेपावत चेन्यीक आणि कप्तान यांनी एकाचवेळी प्रश्न केला.

"पग्रोमांना बंदी करावी अशी विनंती करणारा अर्ज. इथं फार भयानक पग्रोम झाला हे तुम्हाला माहीत आहे? सगळी माणसं घाबरून गेलीत."

"बस्स, पुरे!" चेन्यीकने त्याला अडवले. "भिकारड्या यहुद्या, आम्ही तुझी अशी कणिक तिंबू की, तुला जन्माची आठवण राहील." कप्तानाकडे वळून तो फटकन उद्गारला: "याची नीट व्यवस्था लावा. मुख्य ठाण्यावर घेऊन चला.

तिथं मीच खुद्द त्याचा समाचार घेईन. या तक्रारअर्जामागं कोण आहेत त्याचा छडा लावू!"

झेल्त्सेरने विरोध करण्याचा प्रयत्न केला, पण कप्तानाने फाडकन त्याच्या पाठीवर चाबूक ओढला.

"चूप बैस, बेवारस अवलादीच्या!"

वेदनेने कळवळत झेल्त्सेर मागे कोपऱ्यात धडपडत गेला. त्याचे ओठ थरथरत होते आणि आपले हुंदके आवरून धरणे त्याला अशक्य झाले.

हे सर्व चालू असताना पावेल उठून उभा राहिला. त्या कोठीच्या खोलीत झेल्त्सेरशिवाय आता तोच एकमेव कैदी उरला होता.

चेन्यांक या मुलाच्या समोर उभा राहिला आणि आपल्या काळ्या भेदक डोळ्यांनी त्याने त्याला न्याहाळले.

"अस्सं, तू इथं काय करतोस रे?"

पावेलने आपले उत्तर तयार ठेवले होते.

"खोगीराचा तुकडा मी बुटांसाठी कापून काढला," तो पटकन म्हणाला.

"कुठलं खोगीर?"

"आमच्या घरी दोन कझाक रहायला ठेवले होते. त्यातल्या एकाच्या जुन्या खोगीराचा तुकडा मी माझ्या बुटांना तळवे बसवायला कापून काढला. म्हणून कझाकांनी मला इथं आणलं." आपले स्वातंत्र्य परत मिळविण्याच्या आशेने झपाटल्यामुळे त्याने आणखी पुस्ती जोडली: "तसं करायला परवानगी नसते हे मला माहीत नव्हतं..."

कर्नलच्या चेहऱ्यावर तिरस्कार उमटला.

"काय साला, या कमांडंटची खोपडी उलटी दिसते! कसले

कैदी पकडून ठेवलेत बेटचानं!" दाराच्या दिशेने वळताना पावेलला उद्देशून तो ओरडला: "तू घरी जायला हरकत नाही. आणि तुझ्या खोडीबद्दल तुझा नीट समाचार घ्यायला तुझ्या बापाला सांग. चल, पळ इथून!"

अजूनही स्वतःच्या कानांवर विश्वास न ठेवणाऱ्या पावेलने जमिनीवर पडलेले दोलीन्नीकचे जाकीट पटकन उचलून घेतले आणि तो दाराकडे धावला. त्याच्या काळजाचे ठोके एवढे जोरजोरांदा पडत होते की, कोणत्याही क्षणी ऊर फुटेल अशी त्याला भीती वाटली. पहारेकऱ्यांच्या खोलीतून तो धावत गेला आणि आवारात चालत जाणाऱ्या कर्नलच्या पाठीमागून बाहेर निसटला. क्षणात पावेल दिंडी दरवाजातून पसार झाला आणि रस्त्यावर आला.

दुर्दैवी झेल्त्सेर बिचारा एकटाच कोठीच्या खोलीत अडकला. हताश डोळ्यांनी त्याने आजूबाजूला पाहिले, अभावितपणे बाहेर जाण्याच्या दरवाजाकडे त्याने काही पावले टाकली. पण तेवढ्यात पहारेकरी चौकीत आला, त्याने दार बंद केले आणि कोयंडा अडकवून दाराशेजारच्या स्टुलावर तो बसला.

स्वतःवर खूष झालेला चेर्न्याक बाहेर व्हरांड्यात कप्तानाला म्हणाला:

"बरं झालं, आपण आत डोकावलो. कसला कचरा भरला होता तिथं! त्या कमांडंटलाच दोन आठवडे बंद करून ठेवलं पाहिजे. चला, आता आपल्याला गेलं पाहिजे."

आवारात सार्जंटने सर्व पहारेकऱ्यांना गोळा केले होते. कर्नलला पाहताच धावत येऊन त्याने वर्दी दिली:

"सारं काही ठीक आहे, पान कर्नल."

चेर्न्याकने बूट रिकीबीत अडकवला आणि अलगद खोगीरावर

मांड टाकली. कप्तानाला मात्र आपल्या अडेलतट्टू घोड्याचा थोडा त्रास झाला. त्याच्या तोंडात लगाम अडकवून कर्नल सार्जंटला म्हणाला :

"कमांडंटला सांग, त्यानं इथं गोळा करून ठेवलेला सगळा कचरा मी साफ केलाय. आणि इथं असा गबाळा कारभार चालवल्याबद्दल मी त्याला दोन आठवडे कैदेची शिक्षा देणार आहे, असं सांग. आणि आतल्या त्या माणसाला ताबडतोब मुख्य ठाण्याकडं पाठवून दे. सगळा पहारा जय्यत असू दे."

"ठीक आहे पान कर्नल," असे म्हणून सार्जंटने सलाम ठोकला.

आपल्या घोड्यांना टाचा मारीत कर्नल आणि कप्तान चौकाकडे परत दौडत निघाले. एव्हाना चौकातील कवायत संपत आली होती.

आणखी एका कुंपणावरून पावेलने उडी मारली आणि विलक्षण दमल्यामुळे तो थांबला. त्याला पुढे जाववेना. त्या घुसमटणाऱ्या कोठीच्या खोलीमधील बंदिवासाच्या दिवसात त्याची शक्ती क्षीण होत गेली होती.

कुठे जायचे असा त्याच्यापुढे प्रश्न होता. घरी जाणे तर शक्यच नव्हते. ब्रुझ्झाकच्या घरी तो जाऊ शकला असता, पण जर कुणाला त्याच्या अस्तित्वाचा सुगावा लागला असता तर त्या सबंध कुटुंबावर आपत्ती कोसळली असती.

काय करावे ते त्याला समजेना. एखाद्या आंधळ्याप्रमाणे तो धावत होता. भाजीपाल्याचे वाफे आणि परसदारीच्या बागा ओलांडीत तो शहराच्या टोकाशी येऊन पोचला. एका कुंपणावर जेव्हा तो जोरात आदळला तेव्हा त्याला भान आले.

वळून त्याने सभोवार नजर टाकली. त्या उंच कुंपणाच्या पलीकडे जंगलअधिकाऱ्याची बाग होती. म्हणजे त्याच्या थकल्या पायांनी त्याच्या नकळत त्याला या ठिकाणी आणले होते तर! या वाटेने येण्याचा विचारही त्याच्या मनाला शिवला नव्हता, असे तो शपथेवर सांगू शकला असता. मग तो इथे कसा आला? या प्रश्नाचे उत्तर त्याला सापडेना.

तरीही थोडा वेळ विश्रांती घेणे त्याला आवश्यक होते. नंतर परिस्थितीचा अंदाज घेऊन पुढचे पाऊल टाकायला पाहिजे होते. बागेच्या टोकाशी एक ग्रीष्मकुटी होती याची त्याला आठवण झाली. तिथे तो कुणाच्याही नजरेला पडला नसता.

कुंपणाच्या माथ्यापर्यंत चढून त्याने दुसऱ्या बाजूला बागेत उडी मारली. झाडांमधून अस्पष्ट दिसणाऱ्या घराकडे त्याने एक ओझरता दृष्टिक्षेप टाकला व ग्रीष्मकुटीची वाट धरली. ती कुटी चारी बाजूंनी उघडी होती. उन्हाळ्यात तिच्याभोवती माजलेले जंगली वेलींचे तण सुकून गेले होते आणि आता ती अगदी उघडीबोडकी दिसत होती.

परत जाण्यासाठी तो मागे वळला. पण आता खूप उशीर झाला होता! त्याच्यामागे कुत्र्याचे रागीट भुंकणे ऐकू येत होते. त्याने गर्रकन वळून पाहिले. घरापासून निघणाऱ्या पानगळीने भरलेल्या पायवाटेवरून एक भलामोठा कुत्रा थेट त्याच्या दिशेने धावत येत होता. त्याच्या भयानक गुरगुरण्यामुळे बागेतील नीरवता भंगली होती.

पावेल स्वतःच्या रक्षणास सज्ज झाला. कुत्र्याचा पहिला हल्ला त्याने जोरदार लाथ मारून परतवला. पण त्या जनाव-

राने दुसरी झेप घेण्यासाठी पवित्रा धरला. "त्रेझोर, इकडं ये! इकडं ये!" असा परिचित आवाज जर नेमका त्याच वेळी उमटला नसता, तर ह्या झुंजीची अखेर कशी झाली असती कोण जाणे!

पायवाटेवरून तोन्या धावत तेथे आली. गळपट्ट्याला धरून तिने त्रेझोरला मागे खेचले आणि कुंपणाशी चिकटून उभ्या असलेल्या तरुणाला उद्देशून बोलण्यासाठी ती वळली.

"काय करताय तुम्ही इथं? कुत्रा चावला असता ना तुम्हाला! बरं झालं मी वेळेवर इथं आले..."

ती बोलायची एकदम थांबली आणि आश्चर्याने तिचे डोळे विस्फारले. तिच्या बागेत भटकणारा हा परका तरुण किती कोर्चागिनसारखा दिसत होता!

कुंपणाजवळची आकृती हलली आणि अस्फुट आवाजात म्हणाली:

"तू... तुम्ही मला ओळखलं नाही?"

तोन्याच्या तोंडून एक अस्पष्ट किंकाळी उमटली आणि एकदम त्याच्यापाशी ती धावत गेली.

"पावेल, तू?"

तिचे ओरडणे म्हणजे हल्ला करण्याचा इशारा आहे असे समजून त्रेझोर पुढे झेपावला.

"थांब त्रेझोर, थांब!" तोन्याने त्याला चार धपाटे घातले तेव्हा दुखावल्या मनाने त्याने माघार घेतली व पायात शेपटी घालून तो घराकडे पळाला.

"तुला सोडलं तर?" पावेलचे हात पकडीत तोन्या म्हणाली.

"म्हणजे तुला माहीत होतं?"

"मला सगळं काही माहीत आहे," श्वास न घेता तोन्या उद्गारली. "लीझानं सांगितलं मला. पण इथं तू कसा आलास? त्यांनी सोडलं तुला?"

"होय, पण केवळ चुकून!" दमल्या सुरात पावेल उत्तरला. "मी पळून आलोय. एव्हाना ते माझ्या मागावर असतील. मी इथपर्यंत कसा आलो ते खरंच माझं मला ठाऊक नाही. तुझ्या या खोपटात थोडी विश्रांती घेता येईल असं मला वाटलं. मी भयंकर दमलोय," दिलगिरीच्या सुरात तो म्हणाला.

क्षण-दोन क्षण तिने त्याच्याकडे टक लावून पाहिले. कणवेची आणि ममतेची लाट तिच्या मनात उसळली.

"पावेल, माझ्या लाडक्या पाव्लुशा, माझ्या प्राणा," त्याचे हात गच्च पकडीत ती उद्गारली. "कित्ती कित्ती चांगला आहेस तू... माझं प्रेम आहे तुझ्यावर... ऐकलंस? एवढा कसा रे हट्टी तू? त्यावेळी असा चिडून का गेलास? आता तू आमच्याकडं आलायस, माझ्यापाशी आलायस. आता मी तुला मुळ्ळी मुळ्ळी सोडणार नाही! आमच्या घरात निवांत आहे. तुला हवे तेवढे दिवस रहा."

पावेलने नकारार्थी मान हलवली.

"त्यांना मी इथं सापडलो तर? नाही नाही, मी तुझ्या घरात नाही राहणार!"

तिच्या हातांनी त्याची बोटे घट्ट दाबली आणि तिचे डोळे चमकले.

"तू नाही म्हटलंस तर मी पुन्हा कधीही तुझ्याशी बोलायची नाही. आर्त्योम इथं नाही. त्याला इंजिनाकडं पहाऱ्यात घेऊन गेलेत. सगळ्या रेलकामगारांना गोळा करून नेताहेत. जाणार कुठं तू?"

पावेलला तिच्या भावना समजत होत्या. पण आता त्याला अत्यंत प्रिय झालेल्या या मुलीवर त्याच्यामुळे संकट कोसळेल, अशी त्याला भीती वाटत होती व त्यामुळेच तो तिच्या घरात रहायला बिचकत होता. तरीही शेवटी त्याने तिचे म्हणणे मान्य केले. आत्तापर्यंतच्या महाभयानक अनुभवांमुळे, भुकेमुळे, थकव्यामुळे त्याच्यात तिला विरोध करण्याचे त्राण उरले नव्हते.

तोन्याच्या खोलीत तो सोफावर बसून राहिला होता तेव्हा माय-लेकीमध्ये स्वयंपाकघरात पुढील संवाद घडला.

"आई, कोर्चागिन माझ्या खोलीत आहे. तुला आठवतं, तो माझा विद्यार्थी होता? मला तुझ्यापासून काहीही लपवून ठेवायचं नाही. एका बोल्शेविक खलाशाला पळून जायला मदत केली म्हणून त्याला पकडून ठेवलं होतं. आता तो तुरुंगातून निसटून आलाय, पण त्याला जायला कुठं निवारा नाही." तिच्या आवाजात कंप आला. "आई ग, काही दिवस त्याला आपल्याकडं रहायला परवानगी दे."

आईने आपल्या मुलीच्या काकुळत्या डोळ्यांकडे पाहिले.

"ठीक आहे, माझी काही हरकत नाही. पण त्याला कुठं ठेवायचा तुझा विचार आहे?"

तोन्या लाजली.

"माझ्या खोलीत तो सोफ्यावर झोपेल," ती म्हणाली. "सध्या तरी आपण बाबांना याबद्दल काही सांगायला नको."

तिच्या आईने थेट तिच्या डोळ्याला डोळे भिडवले.

"अलिकडं याच गोष्टीपायी झुरणीला लागली होतीस का?" आईने विचारले.

"होय."

"पण तो तर अजून पोरगाच आहे."

"ठाऊक आहे मला," आपल्या पोलक्याची बाही बोटांनी अस्वस्थपणे चुरगाळीत तोन्या म्हणाली. "पण तो निसटला नसता तर त्यांनी त्याला गोळी घालून ठार केलं असतं."

कोर्चागिनच्या आपल्या घरामधील अस्तित्वाने येकातेरीना मिखाईलोवना चिंतातुर बनल्या. कोर्चागिनला झालेली अटक आणि त्यांना जेमतेम माहीत असलेल्या या पोरावर त्यांच्या मुलीचे उघड उघड दिसणारे प्रेम, यामुळे त्या कमालीच्या अस्वस्थ बनल्या होत्या.

पण हा माला रांकेला लागला अशी तोन्याची समजूत झाली होती आणि आपल्या पाहुण्याची सरबराई कशी करायची याचा विचार एव्हाना तिच्या डोक्यात घोळू लागला होता.

"आई, प्रथम त्यानं आंघोळ केली पाहिजे. मी चटकन त्याच्या आंघोळीची व्यवस्था करते. अगदी काजळीनं माखावा तसा घाण झालाय तो! वर्षानुवर्षं त्यानं आंघोळ केली नसावी असं भासतंय!"

असे म्हणून पावेलसाठी पाणी गरम करायला आणि स्वच्छ कपडे शोधायला ती लगबगीने गेली. सारी तयारी होताच ती झटकन खोलीत आली, पावेलच्या दंडाला तिने धरले व कोणताही घोळ न घालता त्याला घाईघाईने न्हाणीघरात नेले.

"तू सगळे कपडे बदलून टाक. हा सूट घाल. तुझे कपडे धुतले पाहिजेत. तोपर्यंत तू हे वापर," तिने खुर्चीकडे बोट दाखवीत म्हटले. निळया रंगाचा आणि पट्टयापट्टयांच्या पांढऱ्या कॉलरचा खलाशी पोलका व विजार खुर्चीवर व्यवस्थितपणे ठेवलेली होती.

पावेलने चकित होऊन पाहिले. तोन्या हसली.

"सोंगं घेऊन नाचायच्या वेळी मी हा वेष एकदा घातला होता. तुला तो छान बसेल. आता लौकर आटप. तुझी आंघोळ होईतो मी तुला खाण्यासाठी काहीतरी आणते."

ती बाहेर गेली आणि न्हाणीघराचे दार तिने बंद केले. पावेलला आता प्रत्यवायच उरला नाही. त्याने अंगावरचे कपडे उतरवले आणि तो टबात शिरला.

तासाभरानंतर ते तिघेही–आई, मुलगी आणि पावेल– स्वयंपाकघरात जेवत होते.

पावेलला एवढी कडाडून भूक लागली होती की, त्याने तीन तीनदा पदार्थ खाल्ले तरी त्याच्या लक्षात आले नाही. सुरुवातीला येकातेरीना मिखाईलोवनांना तो लाजला, पण त्यांचा प्रेमळ स्वभाव लक्षात येताच लौकरच तो विरघळला.

जेवणानंतर ते तोन्याच्या खोलीत गेले आणि येकातेरीना मिखाईलोवनांच्या आग्रहावरून पावेलने आपले अनुभव कथन केले.

त्याचे निवेदन संपले तेव्हा येकातेरीना मिखाईलोवनांनी त्याला विचारले: "आता काय करायचा विचार आहे तुझा?"

या प्रश्नावर क्षणभर पावेलने विचार केला. "मला पहिल्यांदा आर्त्योमची भेट घ्यायचीय. मग मला इथून निघून गेलं पाहिजे."

"पण तू जाणार कुठं?"

"मला वाटतं मी उमानला जाईन किंवा कीव्हला जाईन. अजून माझं मलाच काही माहीत नाही, पण इथून मात्र मला लौकरात लौकर निघून गेलं पाहिजे."

सारीच परिस्थिती चटदिशी बदलून गेली होती यावर पावेलचा विश्वासच बसत नव्हता. केवळ त्याच दिवशी सकाळी

तो घाणेरड्या कोठडीत होता आणि आता तो इथे तोन्याशेजारी स्वच्छ कपडे घालून बसला होता. आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे तो स्वतंत्र होता.

त्याच्या मनात विचार आले: आयुष्य किती विलक्षण वळणे घेते! एका क्षणाला आकाश रात्रीप्रमाणे काळेकुट्ट भासते, तर दुसऱ्याच क्षणी त्यातून पुन्हा सूर्याची किरणे चमकू लागतात. पुन्हा अटक होण्याचा धोका जर त्याच्या मानेवर लटकत नसता, तर या क्षणाला त्याच्याएवढा सुखी मुलगा दुसरा कुणीही नव्हता.

पण या प्रचंड, निवांत घरातसुद्धा तो सुरक्षित नव्हता याची त्याला जाणीव होती. त्याने इथून निघून जाणे आवश्यक होते. कुठे जायचे ते महत्त्वाचे नव्हते, पण जायलाच पाहिजे होते. आणि तरीही निघून जाण्याची कल्पना त्याला आवडत नव्हती. शूर गॅरिबाल्डीच्या कथा वाचताना किती रोमांचकारी वाटत होते! त्याला त्यावेळी त्याचा किती हेवा वाटला होता! पण आता त्याला जाणीव झाली की, गॅरिबाल्डीचे जीवन खूप खडतर असले पाहिजे. त्याच्या पाठी ससेमिरा लागल्यामुळे त्याची या ठिकाणाहून त्या ठिकाणी होलपट झाली असली पाहिजे. पावेलने फक्त सातच दिवस दुःख आणि छळ यांचा अनुभव घेतला होता, पण तो एक आठवडा त्याला अख्ख्या एका वर्षाप्रमाणे भासला होता.

याचा अर्थ वीर बनायला तो लायक नव्हता!

"कसला विचार करतोयस?" त्याच्यापाशी झुकून तोन्याने विचारले. तिच्या डोळ्यातली गहिरी निळाई अथांग भासत होती.

"तोन्या, मी तुला ख्रिस्तीनाची हकिकत सांगू?"

"हो, जरूर सांग," तोन्या आग्रहाने म्हणाली.

त्याच्या बरोबरच्या बंदिनीची करुण कहाणी त्याने तिला सांगितली.

आपली हकिकत त्याने सांगून संपवली तेव्हा निर्माण झालेल्या शांततेत घड्याळाची टिक टिक मोठ्यांदा ऐकू येत होती. "...त्यावेळी मी तिला शेवटची पाहिली," मोठ्या कष्टाने त्याच्या तोंडून शब्द बाहेर पडले. तोन्याची मान खाली झाली. आपले अश्रू थोपवून धरण्यासाठी तिला आपले ओठ गच्च आवळून धरावे लागले.

पावेल तिच्याकडे पाहून निश्चयाने म्हणाला, "आज रात्री मला इथून गेलंच पाहिजे."

त्याच्या आखूड ताठ केसांवरून तिने आपली सडपातळ, उबदार बोटे प्रेमाने हळुवार फिरवली...

"तोन्या, तू मला मदत कर. स्टेशनावर जाऊन आर्त्योमची हालहवाल काय आहे याची कुणीतरी माहिती काढून आलं पाहिजे आणि सेर्योझाकडं एक चिट्ठी दिली पाहिजे. कावळ्याच्या घरट्यात मी एक रिवॉल्वर दडवून ठेवलंय. माझी आता तिथं जायची हिंमत नाही, पण सेर्योझा माझ्यासाठी ते घेऊन येईल. माझ्यासाठी तू एवढं करू शकशील?"

तोन्या उठली.

"मी आत्ताच लीझा सुखार्कोकडं जाते. आम्ही दोघी मिळून स्टेशनावर जाऊ. तू तुझी चिठ्ठी लिही. मी ती सेर्योझाला नेऊन देते. तो कुठं राहतो? त्याला जर तुला भेटायची इच्छा झाली, तर तुझा ठावठिकाणा मी त्याला सांगू?"

उत्तर देण्यापूर्वी पावेलने क्षणभर विचार केला. "आज संध्याकाळी तुझ्या बागेत त्याला पिस्तुलासकट यायला सांग."

तोन्या परतली तेव्हा खूप उशीर झाला होता. पावेल गाढ झोपला होता. तिच्या हाताच्या स्पर्शाने त्याला जाग आली. त्याने डोळे उघडले तेव्हा ती त्याच्यावर ओणवी उभी होती आणि आनंदी स्मित तिच्या चेहऱ्यावर झळकत होते.

"आर्त्योम लौकरच इथं येईल. तो आत्ताच परत आलाय. लीझाच्या वडलांनी त्याचा जामीन दिला, म्हणून तासाभरासाठी त्यांनी आर्त्योमला मोकळं सोडलंय. इंजिन स्टेशनात उभं आहे. तू इथं आहेस ते मी त्याला सांगू शकले नाही. मी त्याला एवढंच सांगितलं की, काही महत्त्वाची गोष्ट सांगायची आहे. तो आलाच बघ!"

दार उघडायला तोन्या धावली. आर्त्योम दारामध्ये स्तंभित होऊन उभा होता. त्याचा आपल्या डोळ्यांवर विश्वासच बसत नव्हता. तोन्याने त्याच्या मागचे दार लावून घेतले, कारण विषमज्वराने आजारी असलेल्या व पलिकडच्या अभ्यासिकेत निजलेल्या तिच्या वडिलांच्या कानांवर त्याचे बोलणे पडू नये, अशी काळजी घेणे तिला आवश्यक होते.

आणखी एक क्षण गेला आणि आर्त्योमने पावेलला कडकडून मिठी मारली. गदगदल्या आवाजात तो म्हणाला: "भावड्या! पावलूशा!"

शेवटी नक्की ठरले की, दुसऱ्या दिवशी पावेलने घर सोडून जायचे. काझातीनला जाणाऱ्या आगगाडीत पावेलला बसवून देण्याची कामगिरी ब्रुझ्झाकमार्फत आर्त्योम पार पाडणार होता.

आर्त्योमचा स्वभाव वस्तुतः गंभीर आणि अबोल होता. पण इतक्या दिवसांच्या अस्वस्थतेनंतर आणि अनिश्चिततेनंतर आपला

धाकटा भाऊ अचानक भेटलेला पाहून आज मात्र त्याला आनंदाचे भरते आले होते.

"तर मग ठरलं. उद्या पहाटे पाचाला तू गुदामापाशी यायचं. इंधन भरायचं काम चालू असेल तेवढ्यात तू आत घूस. तुझ्याशी बसून खूप बोलायची माझी इच्छा होती, पण मला आता परत गेलंच पाहिजे. उद्या मी तुझी पाठवणी करीन. रेलकामगारांची ते एक बटालियन तयार करताहेत. जर्मन इथं होते तेव्हा जसं आम्हाला सशस्त्र पहाऱ्यात कामं करावं लागे, तसंच आत्ता करतो आहोत."

त्यानंतर आर्त्योमने आपल्या भावाचा निरोप घेतला आणि तो निघून गेला.

संधिप्रकाश वेगाने पसरत होता. लौकरच रिवॉल्वर घेऊन सेर्गेई आला असता. त्याची वाट पहात अंधाऱ्या खोलीमध्ये पावेल अस्वस्थपणे येरझाऱ्या घालीत होता. तोन्या आणि तिची आई जंगल अधिकाऱ्याच्या शुश्रूषेत गुंतल्या होत्या.

पावेल अंधारातच कुंपणापाशी सेर्गेईला भेटला. दोघा मित्रांनी प्रेमभराने एकमेकांचे हात दाबले. सेर्गेई आपल्याबरोबर वाल्याला घेऊन आला होता. अगदी हळू आवाजात ते बोलत होते.

"मी पिस्तूल आणलं नाही," सेर्गेई म्हणाला. "तुझ्या परसदारात पेत्ल्युराच्या खूप माणसांचा मुक्काम पडलाय. तिथं सगळीकडं त्यांच्या गाड्या उभ्या आहेत आणि त्यांनी सारखी शेकोटी पेटत ठेवलीय. त्यामुळं झाडावर चढून पिस्तूल काढणं मला जमलं नाही. माझी मलाच लाज वाटतेय..." सेर्गेई अपराधी स्वरात म्हणाला.

"जाऊं दे, तू एवढं वाईट वाटून घेऊ नकोस," पावेलने

त्याचे सांत्वन केले. "कदाचित झालं ते बरंच झालं. वाटेत मी जर पिस्तुलासकट पकडला गेलो तर फारच भयंकर घडेल. पण संधी मिळताच ते पिस्तूल घेऊन ठेव."

वालेन्तिना पावेलच्या अधिक जवळ आली.

"तू केव्हा जाणार?"

"उद्या पहाटे."

"तू कसा निसटलास? सांग ना आम्हाला."

दबत्या आवाजांत पावेलने भरभर सर्व हकिकत सांगितली. नंतर त्याने आपल्या सहकाऱ्यांचा निरोप घेतला. नेहमीचा गमत्या सेर्गेई त्यावेळी मात्र खूपच गप्प गप्प होता.

"अच्छा पावेल, आम्हाला विसरू नको," दाटल्या आवाजात वाल्या म्हणाली.

त्यांनी त्याला सोडले व क्षणार्धात अंधारात ती दोघे गडप झाली.

घरात अगदी शांत होते. त्या निःस्तब्ध वातावरणात फक्त घड्याळाच्या टिकटिकीचा नियमित आवाज होत होता.

त्या घरात राहणाऱ्या दोघांना त्या रात्री झोपेचा विचारच सुचत नव्हता. अवघ्या सहा तासांनंतर त्यांचा वियोग घडावयाचा असताना त्यांना कशी काय झोप येणार? कदाचित पुन्हा त्यांची कधीही भेट घडली नसती. त्यांच्या अंतरंगात खळबळणाऱ्या अनंत अबोल विचारांना त्या छोट्याशा अवधीत उच्चारणे शक्य होते का?

निखळ, निर्मळ यौवनाला जेव्हा विकाराचा अजून स्पर्श घडलेला नसतो; जेव्हा काळजाच्या वाढत्या स्पंदनामधून वासनांची केवळ किंचित चाहूल लागत असते; तुमच्या प्रेयसीच्या स्तनांना तुमच्या हाताचा चुकून ओझरता स्पर्श घडताच

जेव्हा हाताला कंप सुटून तो अडखळतो; आणि शेवटचे पाऊल उचलण्यापासून यौवनातली पवित्र मैत्री जेव्हा तुम्हाला थोपवीत असते! अशा वेळी तुमच्या प्रेयसीच्या हातांचा माने-भोवती विळखा पडण्यात आणि तुमच्या ओठांवर तिचे धग-धगते चुंबन मिळण्यात किती विलक्षण सुख सामावलेले असते!

त्यांच्या सबंध मैत्रीत त्यांचे हे केवळ दुसरे चुंबन होते. पावेलने आत्तापर्यंत खूपजणांचा मार खाल्ला होता. आईविना दुसऱ्या कुणाचाही मायेचा हात त्याच्या अंगावरून फिरला नव्हता. त्यामुळे तोन्याच्या त्या प्रेमाची प्रचीती येताच तो अंतरंगातून डहुळला. आजपर्यंत आयुष्याने त्याला आपली आत्यंतिक क्रौर्याची बाजूच तेवढी दाखवली होती; आयुष्य एवढे सुंदर असू शकते याचा त्याला प्रथमच प्रत्यय येत होता. या मुलीने त्याला खऱ्या सुखाचा अर्थ शिकविला होता.

तिच्या केसांचा सुगंध हुंगत त्या अंधारात तो तिच्या डोळ्यांचा ठाव घेऊ पहात होता.

"तोन्या, माझं तुझ्यावर खूप खूप प्रेम आहे. ते किती आहे मला सांगता येत नाही, कारण ते कसं सांगायचं तेच मला माहीत नाही."

त्याचे डोके भिरभिरत होते. तिचे लवचिक शरीर किती विलक्षण प्रतिसाद देत होते... पण यौवनातल्या मैत्रीला पावित्र्याचे बंधन असते!

"तोन्या, हा सगळा गोंधळ संपला, म्हणजे मेकॅनिक म्हणून मला नक्की नोकरी मिळेल. आणि खरंच जर मी तुला हवा असेन, उगीच गंमत न करता जर तू खरंच याबद्दल गंभीर-पणानं विचार करीत असलीस, तर तुझा चांगला नवरा व्हायची माझी इच्छा आहे. मी कधीही तुला मारहाण करणार

नाही, तुला दुखेल-खुपेल असं कधीही काहीही करणार नाही. शप्पत!"

एकमेकांच्या बाहुपाशात झोप लागेल आणि तशा अवस्थेत तोन्याच्या आईने त्यांना पाहिले तर त्यांच्याबद्दल तिचा गैरसमज होईल या भीतीने, ती दोघे एकमेकांपासून विलग झाली.

एकमेकांना कधीही न विसरण्याची प्रतिज्ञा केल्यानंतर ती दोघे जेव्हा झोपी गेली तेव्हा फटफटू लागले होते.

येकातेरीना मिखाईलोवनांनी पावेलला लौकर जागे केले. तो बिछान्यातून पटकन उडी मारून उठला. आपले स्वतःचे कपडे आणि बूट घालून वर दोलीन्नीकचे जाकीट चढविण्यात जेव्हा तो न्हाणीघरात गुंतला होता, तेव्हा येकातेरीना मिखाई-लोवनांनी तोन्याला जागे केले.

पहाटेच्या करड्या धुक्यातून ती घाईघाईने स्टेशनाकडे गेली. मागच्या रस्त्याने जेव्हा ती इमारती लाकडांच्या यार्डात पोचली, तेव्हा इंजिनाच्या मागच्या बाजूच्या कोळशाच्या आणि पाण्याच्या भरलेल्या डब्याशी आर्त्योम अधीरतेने त्यांची वाट पहात असलेला त्यांना आढळला.

फुसफुसत्या वाफेच्या लोटांमध्ये गुरफटलेले इंजिनाचे एक प्रचंड धूड हळूहळू सरकत होते. ब्रुझ्झाकने मागच्या खिडकीतून डोकावून पाहिले.

तोन्याचा आणि आर्त्योमचा पावेलने घाईघाईने निरोप घेतला. मग लोखंडी दांडा पकडून तो झटकन इंजिनात चढला. त्याने मागे वळून पाहिले तेव्हा क्रॉसिंगपाशी दोन परिचित आकृत्या त्याच्या नजरेला पडल्या. उंच आकृती आर्त्योमची होती आणि त्याच्या शेजारी छोटी, डौलदार आकृती तोन्याची

होती. तिच्या पोलक्याच्या कॉलरला वारा झोंबत होता आणि तिचे तांबूस-पिंगट केस उधळीत होता. तिने त्याच्या दिशेने हात हलविला.

आर्त्योमने डोळ्याच्या कोपऱ्यातून हळूच तोन्याच्या दिशेने कटाक्ष टाकला तेव्हा ती अगदी रडण्याच्या बेतात आलेली त्याला दिसली. त्याने एक उसासा टाकला.

"एक तर मी मूर्ख असेन किंवा या दोघात खरंच काहीतरी जमलेलं दिसतंय," तो स्वतःशी पुटपुटला. "आणि मी पावेलला अजून लहान बच्चाच समजतोय!"

वळणावरून जेव्हा आगगाडी दिसेनाशी झाली तेव्हा तोन्याकडे वळून तो म्हणाला: "मग, आपली दोस्ती ठेवायची ना?" तोन्याचा चिमुकला हात त्याच्या भल्यामोठ्या पंजात मिटला गेला.

आगगाडीच्या वाढत्या वेगाचा धडधडाट दूरवरून ऐकू येत होता.

प्रकरण सातवे

खंदकांनी वेढलेले आणि काटेरी तारांच्या वेटोळ्यांमध्ये गुरफटलेले ते शहर सबंध आठवडाभर तोफांच्या गडगडाटात आणि रायफलींच्या कडकडाटात रात्री झोपी जात होते व सकाळी जागे होत होते. फक्त पहाटेच्या वेळी लढाईचे आवाज थोडे कमी होते. पण तरीही मोर्चे एकमेकांचा वेध घेत तेव्हा अधूनमधून गोळीबार घडतच. पहाटेच्या वेळी रेल्वे स्टेशनाजवळच्या तोफखान्याच्या बॅटरीभोवती माणसे लगबग करीत होती. तोफेची काळी नळी आगीचे लोळ ओकत होती आणि पोलादाचा व स्फोटक द्रव्यांचा नवा घास तिला भरविण्यासाठी

माणसे धावपळ करीत होती. दरवेळी गोलंदाज कोपरी खेची तेव्हा पायाखालची जमीन हादरत होती. शहरापासून तीन वेर्स्ता अंतरावरचे खेडे लाल सैनिकांच्या ताब्यात होते वत्यावर तोफांचे गोळे सणसणत जाऊन आदळत होते, त्यांच्या स्फोटां-मध्ये बाकीचे सर्व आवाज बुडून जात होते, मातीच फवारे उंच उसळत होते.

खेड्याच्या मध्यभागी असलेल्या एका उंच टेकडीवरच्या जुन्या पोलिश मठाच्या आवारात लाल सेनेचा तोफखाना उभा होता.

तोफखान्याचा लष्करी कमिस्सार कॉम्रेड झमोस्तिन पटकन उडी मारून उठला. तोफेच्या मागील बाजूस डोके टेकवून तो झोपला होता. जाडजूड मॉसर पिस्तूल लटकावलेला कमरपट्टा त्याने आता आवळला, तोफगोळ्याच्या उड्डाणाचा अंदाज घेतला व स्फोट होईपर्यंत थांबून राहिला. मग मात्र त्याच्या घनगंभीर आवाजाने सारे आवार दणाणून उठले.

"कॉम्रेडहो, उठायची वेळ झाली!"

तोफखान्यावरची माणसे आपल्या तोफांपाशीच झोपली होती. कमिस्सारप्रमाणे तीही पटापटा उठली. पण सिदोरचुकने मात्र नाखुषीनेच डोके वर केले व झोपाळू जड नजरेने सभोवार पाहिले.

"डुक्कर साले, अजून उजाडलंसुद्धा नाही आणि झाली यांची परत सुरुवात! निव्वळ आकसापायी असं वागतात, अक्करमाशे!"

झमोस्तिन हसला.

"समाजविरोधी घटक आहेत ते सिदोरचुक. तुला झोप हवी किंवा नको याचा विचार करीत नाहीत ते!"

सिदोरचुक कुरकुरतच उठला.

काही मिनिटातच मठाच्या आवारातील तोफा चालू झाल्या आणि शहरावर तोफगोळे फुटू लागले.

साखर कारखान्याच्या उंच चिमणीच्या टोकाशी दोरखंडाने लाकडी फळकुटांचा फलाट बांधून त्यावर एक पेत्ल्युरा अधिकारी आणि एक टेलिफोन ऑपरेटर यांनी मुक्काम टाकला होता. चिमणीच्या आतल्या अंगाला असलेल्या लोखंडी शिडीला धरून ते वर चढून गेले होते.

त्या उंचावरील ठिकाणावरून आपल्या तोफखान्याच्या माऱ्याच्या जागांचे ते मार्गदर्शन करीत होते. शहराला वेढा घालणाऱ्या लाल सैनिकांच्या प्रत्येक हालचाली ते आपल्या दुर्बीणीं-मधून पाहू शकत होते. आज बोल्शेविक विशेष कार्यप्रवण बनले होते. एक चिलखती आगगाडी हळूहळू पादोल्स्क स्टेशनच्या दिशेने येत होती आणि येताना अखंड गोळीबार करीत होती. तिच्या पाठीमागे पायदळाच्या हल्ला करणाऱ्या तुकड्या दिसत होत्या. अनेकवेळा तुफानी हल्ला चढवून शहर काबीज करण्याचा लाल सैनिकांनी प्रयत्न केला होता. पण सीमेनजीक पेत्ल्युरा सैनिकांनी खंदकांमधून भक्कम मोर्चे लावले होते. त्या खंदकांमधून आगीचा भडिमार सुरू होई, स्फोटांच्या अखंड आवाजाने सारे वातावरण दणाणून जाई आणि हल्ल्यांच्या वेळी तर हा दणदणाट शिगेला पोहोचत असे. शिशाच्या या भणाणत्या वादळासमोर बोल्शेविकांना टिकून राहणे अगदी अशक्य होई व आपल्या साथीदारांचे मृत देह तसेच टाकून त्यांना माघार घ्यावी लागे.

आज शहरावरचे हल्ले जास्त चिकाटीने आणि पूर्वीपेक्षा जास्त वेळा होत होते. तोफांच्या धडधडाटामुळे वातावरणातील

हवा कंप पावत होती. सतत पुढे येणाऱ्या बोल्शेविकांच्या रांगा चिमणीच्या टोकावरून दिसू शकत होत्या. माणसे धरतीवर अंग झोकून देत आणि पुन्हा उठून नेटाने पुढे घुसू लागत. आता स्टेशन सोडून सारे काही त्यांनी काबीज केले होते. पेत्ल्युरा डिव्हिजनचे उपलब्ध राखीव सैनिक लढाईत घालण्यात आले, पण त्यांच्या मोर्चांमध्ये पडलेले खिंडार त्यांना बुजविता आले नाही. निकराच्या निर्धाराने बोल्शेविक चढाईखोर सेना स्टेशनजवळच्या रस्त्यांवरून पुढे घुसल्या. जोरदार दणका मिळाल्यामुळे शहराच्या सीमेजवळील उद्यानांमधील आणि फळबागांमधील आपले अखेरचे मोर्चे सोडून पेत्ल्युरा डिव्हिजनची तिसरी रेजिमेंट शहरात सैरावैरा पळत आली होती. पण नवीन बचावाचा पवित्रा घेण्याआधीच लाल सैनिकांचे लोंढे तिच्यावर तुटून पडले. बागनेटांच्या हल्ल्याला तोंड देत देत पेत्ल्युरा सैनिक माघार घेऊ लागले.

त्या तळघरात मुकाट बसून राहणे सेर्गेई ब्रुझ्झाकला अशक्य झाले होते. त्याच्या घरच्या माणसांनी आणि अगदी जवळच्या शेजाऱ्यांनी त्या तळघरात आसरा घेतला होता. सेर्गेई आपल्या आईच्या विनवण्यांना न जुमानता त्या थंडगार तळघरामधून वर चढून आला. 'सगायदाचनी' असे एका बाजूवर नांव लिहिलेली एक चिलखती गाडी तुफान गोळीबार करीत त्याच्या घराजवळून वेगाने गेली. तिच्यामागे पेत्ल्युराची घाबरलेली माणसे सैरावैरा धावत होती. त्यांच्यापैकी एकजण हळूच सेर्गेईच्या घराच्या अंगणात घुसला, त्याने घाईघाईने काडतुसांचा पट्टा, लोखंडी शिरस्त्राण व रायफल तेथे टाकून दिली आणि कुंपणावरून उडी मारून परसातल्या बागेपलिकडे तो अदृश्य झाला. सेर्गेईने रस्त्यावर डोकावून पाहिले. पेत्ल्युरा सैनिक

नैर्ऋत्येकडील स्टेशनच्या रस्त्याने पळत होते आणि एक चिलखती गाडी त्यांच्या माघारीला आडोसा देत होती. शहराकडे जाणारा हमरस्ता निर्मनुष्य बनला होता. मग एक लाल सैनिक एकदम त्याच्या नजरेच्या टप्प्यात आला. तो एकदम खाली पालथा पडला आणि त्याने रस्त्याच्या दिशेने गोळीबार चालू केला. त्याच्या मागोमाग दुसरा आणि तिसरा लाल सैनिक नजरेच्या टप्प्यात आला... त्यांना येताना, खाली वाकून दबत्या पावलांनी पळत गोळीबार करताना सेर्गेई पहात होता. लालभडक डोळे झालेला पिंगट रंगाचा एक चिनी केवळ आतला सदरा अंगात घालून व मशिनगनचे पट्टे बांधून अगदी सरळ धावत येत होता. त्याच्या प्रत्येक हातात एक एक ग्रेनेड होता. आणि त्या सर्वांच्या पुढे एक पोरगेलासा दिसणारा लाल सैनिक हलकी मशिनगन घेऊन येत होता. लाल सेनेचे आघाडीचे सैनिक शहरात घुसले होते. आनंदाने बेभान झालेला सेर्गेई रस्त्यावर धावला आणि जास्तीत जास्त मोठ्या आवाजात ओरडला :

"कॉम्रेडांचा विजय असो!"

तो एवढ्या अनपेक्षितपणे रस्त्यावर धावला होता की, तो चिनी दचकून एकदम ठेचकाळला. तो चिनी आपला मोहरा त्याच्यावर वळविणार तोच सेर्गेईच्या चेहऱ्यावरचा आनंद त्याला दिसला व तो थबकला.

"पेत्ल्युरा कुठं आहेत?" धापा टाकीत चिन्याने ओरडून विचारले.

पण सेर्गेईला त्याचे बोलणे ऐकू आले नाही. तो धावत अंगणात परत गेला, त्या पेत्ल्युरा सैनिकाने टाकून दिलेला काडतुसांचा पट्टा आणि रायफल त्याने उचलली व लाल



सैनिकांच्या मागोमाग तो घाईघाईने गेला. नैर्ऋत्येकडच्या स्टेशनावर तुफानी हल्ला चढवीपर्यंत त्याचे अस्तित्व त्यांच्य लक्षातच आले नव्हते. दारूगोळ्याच्या आणि इतर बेगमीच्या अनेक वाघिणी भरेल एवढा माल ताब्यात घेतल्यावर आणि शत्रूला जंगलात पळवून लावल्यानंतर, विश्रांती घेऊन पुन्हा एकत्र जमायला ते आता थांबले होते. तो तरुण मशिनगनवाला सेर्गेईपाशी आला आणि आश्चर्याने त्याने विचारले:

"कॉम्रेड, तू कुठून आलास?"

"मी या गावचा आहे. तुमच्या येण्याची मी वाट पहात होतो."

लौकरच सेर्गेईभोवती लाल सैनिकांचा गराडा पडला.

"मी त्याला ओळखतो," चिनी सैनिक मोडक्या रशियन भाषेत म्हणाला. "तो ओरडत आला होता: 'कॉम्रेडांचा विजय असो!' तो बोल्शेविक आहे, आपल्या बाजूचा आहे, भला आहे!" त्याने सेर्गेईच्या पाठीवर शाबासकीची थाप मारली आणि तो तोंडभर हसला.

सेर्गेईच्या काळजात आनंदाचे भरते आले होते. त्याला ताबडतोब त्यांनी स्वत:मध्ये सामावून घेतले होते, त्याला आपल्यापैकी एक मानले होते. आणि त्यांच्या जोडीनेच बागनेटांचा हल्ला चढवून त्याने स्टेशन काबीज करण्यात हातभार लावला होता.

शहरात एकच खळबळ माजली होती. संकटांमुळे बेजार बनलेले नगरवासी आपल्या तळघरांमधून आणि भुयारांमधून बाहेर पडले होते व शहरात प्रवेश करणाऱ्या लाल सैनिकांच्या तुकड्यांना पाहण्यासाठी आपापल्या अंगणांच्या फाटकांशी उभे होते. अशा वेळी लाल सेनेच्या लोकांबरोबर संचलन करीत

चाललेल्या सेर्गेईला त्याच्या आईने व बहीण वाल्याने पाहिले. त्याच्या डोक्यावर टोपी नव्हती, पण त्याच्या अंगावर काडतुसांचा पट्टा रूळत होता आणि खांद्यावर रायफल लटकावलेली होती.

अन्तोनीना वासील्येवनाने संतापाने आपले कपाळ बडवून घेतले.

म्हणजे तिचा सेर्योझा लढाईत गुंतला होता. याची किंमत त्याला नक्कीच चुकवावी लागणार होती! अख्ख्या गावासमोर रायफल लटकावून मारे तोंड वर करून फिरतोय! नंतर निश्चितच संकट ओढवणार होते. अन्तोनीना वासील्येवनाला इतःपर स्वतःला आवरणे अशक्य ठरले:

"सेर्योझा, आत्ताच्या आत्ता घरी ये!" ती ओरडली. "हलकटा, कसं वागायचं ते मी तुला चांगलं शिकवते! लढाई कशी करायची ते शिकवते!" आणि आपल्या मुलाला परत खेचून आणण्याच्या ठाम इराद्याने ती रस्त्यावर तरातरा चालत गेली.

पण यावेळी मात्र तिच्या सेर्योझाने—ज्या आपल्या मुलाचे कान तिने वारंवार उपटले होते त्याने—अत्यंत खंबीर नजरेने आपल्या आईकडे टक लावून पाहिले. शरमेने आणि रागाने त्याचा चेहरा लालबुंद झाला होता. तो खेकसला:

"ओरडू नकोस! मी जिथं आहे तिथंच राहणार." आणि न थांबता तो तालात पावले टाकीत निघून गेला.

अन्तोनीना वासील्येवनाचा राग अनावर झाला.

"आपल्या आईशी असा वागतोस काय! आता घरी तर ये, दाखवतेच तुला हिसका!"

"मी येणार नाही!" मागे न वळता सेर्गेई ओरडला.

अन्तोनीना वासील्येवना वाचा गेल्यासारखी रस्त्यावर एकटक त्याला पाठमोरा पहात उभी राहिली. दरम्यान थंडी-वारा खाल्लेले, धुळीने माखलेले सैनिक तिच्या शेजारून रस्ता तुडवीत पुढे जात होते.

"रडू नकोस आई! आम्ही तुझ्या बाळाला कमिस्सार बनवू," एक भक्कम, आनंदी स्वर उमटला. सबंध पलटणभर एका गंमतीच्या हसण्याची लाट उसळली. कंपनीच्या अग्रभागी एकसुरात आवाज उमटले:

गड्यांनो, शिंग वाजले रणी,
झुंजाया सज्ज व्हा झणी,
स्वातंत्र्याच्या राज्याला
जाऊ जिंकून समराला.

सारे सैनिक एकमुखाने हे गीत गाऊ लागले आणि त्या उंच सुरात सेर्गेईचा भिंगरीसारखा आवाज मिसळला. त्याला नवे कुटुंब लाभले होते. त्यातील एक बागनेट त्याचे होते—सेर्गेईचे!

लेश्चीन्स्कींच्या घराच्या फाटकावर पांढऱ्या कार्डबोर्डाचा एक तुकडा लटकत होता आणि त्यावर लिहिले होते: "रेवकोम". त्याशेजारी एक आकर्षक पोस्टर होते. त्यावर एका लाल सैनिकाचे चित्र होते. तो सैनिक सरळ तुमच्या डोळ्यांकडे रोखून बघत होता आणि त्याच्या हाताचे बोट पुढील वाक्य तुम्हाला उद्देशून दाखवीत होते: "लाल सेनेत तुम्ही दाखल झालात का?"

ही पोस्टरे सबंध शहरभर लावण्याचे काम राजकीय विभागाची माणसे सारी रात्र करीत होती. शेपेतोवकाच्या कष्टकरी जनतेला उद्देशून क्रांतिकारक समितीची पहिली घोषणा जवळच लटकावलेली होती :

> "कॉम्रेडहो! कामगारवर्गीय शिपायांनी हे शहर जिंकले आहे. सोविएत सत्ता पुन्हा स्थापन झाली आहे. तुम्ही सुव्यवस्था राखावी असे आम्ही अवाहन करतो. खुनी गळेकापूंना आम्ही इथून हाकलून लावले आहे, पण त्यांनी पुन्हा कधीही परतू नये असे तुम्हाला वाटत असेल, त्यांचा कायमचा निकाल लावावा अशी तुमची इच्छा असेल, तर लाल सेनेमध्ये दाखल व्हा. कामकरी जनतेच्या सत्तेला तुमचा सारा पाठिंबा द्या. या शहराचे लष्करी अधिकार शिबंदीच्या प्रमुखांकडे आहेत. नागरी कारभार क्रांतिकारक समितीतर्फे चालविण्यात येईल.
>
> सही : **दोलीन्नीक**
>
> क्रांतिकारक समितीचे अध्यक्ष."

लेश्चीन्स्कींच्या घरात नव्या प्रकारची माणसे अवतीर्ण झाली होती. "कॉम्रेड" या शब्दासाठी अगदी कालपर्यंत लोकांना आपल्या प्राणांचे मोल द्यावे लागले होते. आज हा शब्द चारी बाजूंनी ऐकू येत होता. अंतःकरण हलवून सोडणारा तो अवर्णनीय शब्द : "कॉम्रेड"!

ह्या काळात दोलीन्नीकना विश्रांती किंवा झोप ठाऊक नव्हती. क्रांतिकारक सरकारची स्थापना करण्यात ते गुंतले होते.

एका छोटया खोलीच्या दारावर कागदाचा एक कपटा

लटकत होता व त्यावर पेन्सिलीने लिहिले होते : "पक्ष समिती."
त्या खोलीत कॉम्रेड इग्नात्येवा बसत होत्या. त्या नेहमी शांत असत, कशानेही त्यांची शांतता ढळत नसे. सोविएत सत्तेच्या संस्थाची स्थापना करण्याची कामगिरी त्यांच्यावर आणि दोन्झीनीकवर राजकीय विभागाने सोपविली होती.

आणखी एक दिवस उलटला आणि कचेरी कर्मचारी टेबलांशी बसू लागले होते व टंकयंत्रांचा आवाज घुमू लागला होता. किंचितशा घाबरट, पण चपळ अशा तीझीत्स्कीच्या हाताखाली पुरवठा खाते देण्यात आले. तीझीत्स्की पूर्वी स्थानिक साखर कारखान्यात मेकॅनिकचा मदतनीस म्हणून काम करीत होता. आता शहरात सोविएत सत्ता भक्कम प्रस्थापित झाली, तेव्हा साखर कारखान्याच्या मालकांशी लढा करण्याचा तीझीत्स्कीने ठाम निर्धार केला. हे साखर कारखानदार बोल्शेविकांचा मनातून कमालीचा द्वेष करीत होते आणि सध्या चुपचाप बसून योग्य संधीची वाट पहात होते.

साखर कारखान्यातील कामगारांच्या सभेत अत्यंत कडक आणि कठोर शब्दांमध्ये तीझीत्स्कीने एकूण परिस्थितीचा आढावा घेतला.

"भूतकाळ आता कधीही परतणार नाही," पोलिश भाषेत त्याने जाहीर केले व आपल्या शब्दांमधील सत्यता पटविण्यासाठी व्यासपीठाच्या कडेवर हाताची मूठ जोरात आपटली. "पतोत्स्कींसाठी आपल्या वडिलांनी आणि आपण गुलामगिरी केली तेवढी पुरे झाली. आम्ही त्यांच्यासाठी राजवाडे बांधले आणि त्या बदल्यात मेहरबान सरदारांकडून आम्हाला काय मिळाले, तर भुकेने मरू नये म्हणून जगण्याइतपत दोन घास अन्न!

“किती वर्षे पतोत्स्की सरदार आणि सांगूश्की राजे आमच्या मानगुटीवर बसलेत? रशियन आणि युक्रेनी कामगारांना जसे या पतोत्स्कींनी चिरडले तसे पोलिश कामगारांना चिरडले नाही काय? आणि आता याच कामगारांमध्ये सरदाराचे हुजरे अफवा पसरवताहेत की, सोविएत सत्ता त्या सर्वांवर कडक अंमल गाजवील.

“हे धादांत खोटे आहे कॉम्रेडहो! वेगवेगळ्या राष्ट्र-जमातींच्या कामगारांना आजच्याएवढे स्वातंत्र्य यापूर्वी कधीही नव्हते. सारे कामगारवर्गीय भाऊ भाऊ आहेत. उमरावांना आम्ही वळवून घेऊ. त्याबद्दल तुम्ही निर्धास्त रहा.” पुन्हा त्याने आपला हात व्यासपीठाच्या दांड्यावर जोराने आपटला. “भावा-भावांना एकमेकांचे रक्त सांडायला कुणी भाग पाडले? तुर्कांशी लढण्यासाठी शतकानुशतके राजांनी आणि उमरावांनी पोलिश शेतकऱ्यांची पाठवणी केली. एका राष्ट्रविरुद्ध दुसऱ्या राष्ट्राला ते नेहमी चिथावत आले आहेत. त्यांच्यामुळे झालेल्या रक्तपातांचा आणि दैन्याचा विचार करा! आणि त्यापासून फायदा कुणाचा झाला? पण लौकरच ते सर्व काही थांबेल. त्या नीचांची आता अखेर आलीय. भांडवलदारांच्या काळजांमध्ये धडकी भरविणारी घोषणा बोल्शेविकांनी केलीय: ‘जगातील कामगारांनो, एक व्हा!’ इथे आमची मुक्ती आहे, अधिक चांगल्या भविष्याची आशा इथे आहे, सर्व कामकरी लोक एकमेकांचे भाऊ बनतील ही आमची आशा या घोषणेत आहे. कॉम्रेडहो, कम्युनिस्ट पक्षात सामील व्हा!

“एक दिवस पोलिश प्रजासत्ताकसुद्धा स्थापन होईल. पण हे पतोत्स्कींविना सोविएत प्रजासत्ताक असेल, कारण पतोत्स्कींना हाकलून देण्यात येईल आणि सोविएत पोलंडचे आपण मालक

असू. ब्रोनीक प्तशीन्स्की तुम्हा सर्वांना माहीत आहेत ना? क्रांतिकारक समितीने त्यांना आपल्या कारखान्याचे कमिस्सार म्हणून नेमलेय. 'आपण कुणीही नव्हतो, आता आपण सारे आहोत.' आनंद साजरा करायला आपल्यापाशी निमित्त असेल कॉम्रेडहो! पण त्या लपलेल्या सापांच्या फूत्कारांना न ऐकण्याची खबरदारी घ्या! कामगाराच्या ध्येयामध्ये श्रद्धा बाळगू या आणि सबंध जगभरच्या लोकांशी बांधिलकीचे नाते जोडू या!"

ह्या साधासुध्या कामगाराच्या अगदी अंतःकरणामधून हे कळकळीचे आणि तेजस्वी शब्द उमटले होते. श्रोत्यांमधील तरुण उत्साही मंडळींच्या संमतीदर्शक आरोळ्यांमध्ये तो व्यास-पीठावरून खाली उतरला. पण थोडे वयस्क कामगार मात्र बोलायला बिचकले. न जाणो, उद्या बोल्शेविकांना शहर सोडून देणे भाग पडायचे आणि जे मागे राहतील त्यांना आपल्या प्रत्येक अविचारी शब्दाबद्दल जबर किंमत द्यावी लागायची! फाशीमधून जरी सुटलात तरी नोकरी मात्र नक्कीच जायची!

शिक्षण खात्याचे कमिस्सार, सडपातळ शरीरयष्टीचे, नीटनेटके राहणारे चेरनोपीझस्की, हे बोल्शेविकांची बाजू घेणारे त्या भागातील एकमेव शाळामास्तर होते.

क्रांतिकारक समितीच्या आवारासमोर एक खास कामावरची कंपनी ठेवली होती. तिचे लोक क्रांतिकारक समितीच्या कामावर होते. 'रेवकोम'च्या प्रवेशद्वारापाशी बागेत रात्रीच्या वेळी "माक्सिम" जातीची मशिनगन जय्यत तयार असायची. तिच्यामध्ये काडतुसांचा पट्टा आवळलेला असायचा. तिच्या-शेजारी दोन रायफलधारी माणसे पहारा देत उभी रहायची.

'रेवकोम'कडे जाणाऱ्या कॉम्रेड इग्नात्येवा त्यांपैकी एका लाल सैनिकाजवळ थांबल्या आणि त्यांनी विचारले :

"कॉम्रेड, तुमचं वय काय?"

"सतरावं लागलं."

"तुम्ही इथं राहता?"

त्या लाल सैनिकाने स्मित केले. "होय, परवाच्या लढाईत मी सैन्यात दाखल झालोय."

इग्नात्येवानी बारकाईने त्याचा चेहरा न्याहाळला.

"तुमचे वडील काय करतात?"

"ते इंजिन ड्रायव्हरचे मदतनीस आहेत."

त्याच क्षणाला एका गणवेषातील माणसाबरोबर दोलीन्नीक तेथे आले.

"बरं झालं तुम्ही आलात," दोलीन्नीक यांच्याकडे वळून इग्नात्येवा म्हणाला. "कम्सामोलच्या विभागीय समितीची जबाबदारी सोपवायला मला हवा होता तसा नेमका मुलगा सापडलाय. तो याच गावचा आहे."

दोलीन्नीकनी सेर्गेईकडे एक दृष्टिक्षेप टाकला.

"अच्छा, झखारचा मुलगा ना तू? ठीक आहे. तरुणांना जागं करायचं काम कर."

सेर्गेईने आश्चर्याने त्यांच्याकडे पाहिले. "पण इथं कंपनीच्या कामाचं काय?"

"ते आम्ही पाहून घेऊ," एव्हाना पायऱ्या चढून वर गेलेले दोलीन्नीक मागे न वळताच बोलले.

त्यानंतर दोन दिवसांनी युक्रेनच्या कम्युनिस्ट युवक संघाच्या स्थानिक समितीची स्थापना झाली.

शहरावर अचानकपणे आणि वेगाने येऊन कोसळलेल्या

नव्या जीवनाच्या आवर्तामध्ये सेर्गेई आकंठ गुंतला. त्याचा सारा वेळ एवढा त्या कामात व्यापला होता, की अगदी हाकेवर घर असूनसुद्धा तो आपल्या घरच्या लोकांना पार विसरून गेला होता.

सेर्गेई ब्रुझ्झाक आता बोल्शेविक बनला होता. सेर्गेई हा आता कम्सामोल सभासद होता आणि कम्सामोल समितीचा चिटणीस होता, असे सांगणारा युक्रेनी कम्युनिस्ट पक्षाने दिलेला कागद त्याने खिशातून शंभर वेळा काढून वाचला होता. आणि याबाबत कुणी शंका व्यक्त केली असती तर त्याच्या जुन्या लाडक्या मित्राने त्याला दिलेले चकचकीत "मॅनलिशेर" पिस्तूल त्याच्यापाशी होतेच. त्याच्या शर्टावरच्या पट्ट्यात तात्पुरत्या बनवलेल्या कॅन्व्हासच्या पिशवीत त्याने ते ऐटबाजपणे लटकावले होते. सेर्गेईच्या हुद्द्याची खात्री पटवायला ते पिस्तूल पुरेसे होते! पावलूश्का आसपास नव्हता याचे सेर्योझाला खूप वाईट वाटत होते.

'रेवकोम'ने सोपविलेल्या कामगिऱ्या पार पाडण्यात सेर्गेईचे दिवस चालले होते. आजही इग्नात्येवा त्याची वाट पहात होत्या. क्रांतिकारक समितीसाठी वर्तमानपत्रे आणि पुस्तके घेऊन येण्यासाठी स्टेशनावरील डिव्हिजनच्या राजकीय विभागाकडे त्यांना जायचे होते. सेर्गेई घाईघाईने इमारतीमधून बाहेर पडून रस्त्यावर आला. तेथे राजकीय विभागाचा एक माणस मोटर घेऊन त्यांची वाट पहात होता.

पहिल्या सोविएत युक्रेनी डिव्हिजनचे मुख्य ठाणे आणि राजकीय विभाग स्टेशनावरील रेल्वेच्या डब्यांमध्ये थाटलेले होते. स्टेशनापर्यंतचे दूर अंतर मोटरीतून काटत असताना इग्नात्येवांनी सेर्गेईला अनेक प्रश्न विचारले.

"तुझं काम कसं काय चाललंय? तू संघटना स्थापन केलीस की नाही? कम्सामोलमध्ये दाखल होण्याबद्दल तू तुझ्या मित्रांचं, कामगारांच्या मुलांचं, मन वळवलं पाहिजेस. लौकरच आम्हाला कम्युनिस्ट तरुणांच्या एका गटाची गरज भासेल. उद्या आपण एक कम्सामोलचं पत्रक तयार करून ते छापू. मग थिएटरमध्ये युवकांचा एक मोठ्ठा मेळावा भरवू. आपण राजकीय विभागात पोचलो म्हणजे मी तुझी उस्तिनोविच यांच्याशी ओळख करून देईन. मला वाटतं, त्या तरुणांबरोबर काम करतात."

उस्तिनोविच म्हणजे मानेपर्यंत कापलेल्या काळ्या केसांची, नवा खाकी सदरा घातलेली आणि अरुंद चामडी पट्टा कमरेला आवळलेली चक्क अठरा वर्षांची पोरगी होती. तिने सेर्गेईला त्याच्या कामाच्या महत्त्वाच्या दिशा दाखवून दिल्या व त्याला मदत करण्याचे आश्वासन दिले. तो तेथून जाण्यापूर्वी तिने त्याला पुस्तकांचा आणि वर्तमानपत्रांचा एक भला मोठा गठ्ठा दिला. त्यात कम्सामोलचा कार्यक्रम आणि नियम सांगणारेही विशेष महत्त्वाचे छोटे पुस्तक होते.

रात्री खूप उशीरा जेव्हा सेर्गेई 'रेवकोम'ला परतला तेव्हा त्याची बहीण वालेन्तीना तेथे बाहेर वाट पहात बसलेली त्याला आढळली.

"तुला काही स्वतःची लाजलज्जा वाटते की नाही?" ती ओरडली. "घराच्या बाहेर असं राहतोस याचा अर्थ काय? आईचे रडून रडून डोळे सुजलेत आणि बाबांनासुद्धा तुझा खूप राग आलाय. तुझ्यावर घरी चांगलंच शेकणारसं दिसतंय!"

"तसं काही होणार नाही," त्याने तिची खात्री पटवीत

म्हटले. "खरंच, घरी यायला माझ्यापाशी मुळीच वेळ नाही. आज रात्रीसुद्धा मी घरी येणार नाही. पण तू आलीस त्याचा मात्र मला खूप आनंद झालाय, कारण मला तुझ्याशी काही बोलायचं आहे. चल, आत जाऊ या."

वाल्या आपल्या भावाला ओळखूच शकेना. तो खूपच बदलला होता. उत्साहाने मुसमुसत होता.

ती बसताच सेर्गेईने सरळ मुद्द्याचे बोलणे सुरू केले.

"परिस्थिती अशी आहे बघ वाल्या, तुला कम्सामोलमध्ये सामील झालंच पाहिजे. कम्सामोल म्हणजे काय तुला माहीत नाही? कम्युनिस्ट युवक संघ! मी इथला कारभार पाहतोय. काय, तुझा माझ्यावर विश्वास बसत नाही? ठीक आहे, हे बघ!"

वाल्याने तो कागद वाचला आणि चकित नजरेने आपल्या भावाकडे पाहिले.

"मी कम्सामोलमध्ये काय करणार?"

सेर्गेईने आपले हात पसरीत म्हटले:

"अगं पोरी, ढीगभर करण्यासारखं आहे. आता माझ्याकडंच पहा. मी एवढा कामात गुंतलोय, की रात्री रात्री मी झोपत नाही. आम्हाला प्रचार केलाच पाहिजे. इग्नात्येवा म्हणतात की, लौकरच थिएटरात आम्ही एक सभा घेणार आहोत आणि सोविएत सत्तेबद्दल माहिती सांगणार आहोत. त्या म्हणतात की, मी भाषण केलंच पाहिजे. पण मला त्यांचं म्हणणं पटत नाही, कारण भाषणं कशी करतात ते मला ठाऊक नाही. माझा नक्की खिमा होणार भाषण करताना! ते जाऊ दे, तर मग तू कम्सामोलमध्ये दाखल होणार की नाही?"

"मला काही समजत नाही बाई. तू म्हणतोस तसं मी केलं तर आई आकांडतांडव करील."

"वाल्या, आईकडं एवढं लक्ष देऊ नकोस," सेर्गेईने तिला विनवले. "तिला काही समजत नाही. आपली मुलं कायम आपल्याभोवती असावीत, एवढंच तिला वाटतं. पण सोविएत सत्तेविरुद्ध तिला काही आकस नाही. उलट ती तिच्या बाजूचीच आहे. पण दुसऱ्या लोकांच्या मुलांनी लढाईत भाग घ्यावा असं तिला वाटतं. पण हे बरोबर आहे का? झुखरायनी आपल्याला काय सांगितलं होतं ते आठवतं? आणि पावेलकडं पहा. आपल्या आईबद्दल विचार करायलासुद्धा तो थांबला नाही. आमच्या आयुष्याला घडवण्याचा आमचा हक्क बजावण्यासाठी आपण तरुणांनी लढण्याची वेळ आता आली आहे. वाल्या, तू खास नकार देणार नाहीस, होय की नाही? जरा विचार कर, किती छान होईल. तू मुलींबरोबर काम करशील, मी दोस्तांबरोबर काम करीन. बरी आठवण झाली! त्या लालकेशा बदमाश क्लीम्काला मी आजच भेटीन. मग वाल्या, बोल! तू आमच्याबरोबर आहेस का नाहीस? माझ्याजवळ ही छोटी पुस्तिका आहे. तिच्यात कम्सामोलबद्दल सगळी माहिती तुला मिळेल."

आपल्या खिशामधून त्याने कम्सामोलच्या नियमांची पुस्तिका बाहेर काढली आणि वालेन्तीनाच्या हाती दिली.

"पण पेत्ल्युरा परत आले तर?" तिने खालच्या सुरात त्याला विचारले. तिचे डोळे आपल्या भावाच्या चेहऱ्यावर खिळले होते.

हा विचार सेर्गेईच्या मनात आत्तापर्यंत आलाच नव्हता. क्षणभर त्याने विचार केला.

"अर्थात मला इतरांबरोबर इथून निघून जावं लागेल," तो म्हणाला. "पण तुझं काय होईल? खरंच, आई खूप दुःखी होईल त्यामुळं!" तो एकदम गप्प झाला.

"सेर्योझा, आईला किंवा दुसऱ्या कुणाला न कळवता तू माझं नांव नोंदशील का? फक्त तुला नि मला ठाऊक असेल, कसं? मी करता येईल ती मदत तुला करीनच. ते सगळ्यात छान ठरेल. होय की नाही?"

"वाल्या, मला वाटतं, तुझं बरोबर आहे."

त्याच क्षणाला इग्नात्येवा त्या खोलीत आल्या.

"कॉम्रेड इग्नात्येवा, ही माझी धाकटी बहीण वाल्या. तिनं कम्सामोलमध्ये यावं म्हणून आत्ताच मी तिच्याशी बोलत होतो. ती लायक सभासद होईल, पण आमची आई काहीतरी अडचणी निर्माण करील बघा! कुणालाही माहीत होणार नाही अशा तऱ्हेनं आपण वाल्याला सभासद करून घेऊ शकू काय? त्याचं काय आहे, कदाचित आपल्याला हे शहर सोडून जावं लागेल. अर्थात मी आपल्या सैन्याबरोबर जाईन. पण इथं आईला एकटीला टाकून जाणं वाल्याला योग्य वाटत नाही."

खुर्चीच्या कडेशी बसून इग्नात्येवांनी त्याचे बोलणे गंभीरपणे ऐकून घेतले. मग त्या म्हणाल्या:

"होय, तसं करणंच सगळ्यात उत्तम ठरेल."

गच्च भरलेले थिएटर तरुणांच्या उत्तेजित बडबडीने गजबजले होते. सबंध शहरभर लावलेल्या नोटिशींना प्रतिसाद देऊन युवक मंडळी प्रचंड गर्दीने आज थिएटरात जमली होती. साखर कारखान्यातील कामगारांचा ब्रास बँड वाजत

होता. प्रेक्षकांमध्ये प्रामुख्याने स्थानिक माध्यमिक शाळेतील आणि जिम्नाशियममधील विद्यार्थी होते. त्यांना सभेपेक्षा नंतर होणाऱ्या करमणुकीच्या कार्यक्रमात जास्त स्वारस्य होते.

अखेरीस पडदा वर गेला आणि नुकतेच आलेले ऊयेझ्द समितीचे चिटणीस कॉम्रेड राझीन व्यासपीठावर अवतीर्ण झाले.

ह्या बुटक्या, सडपातळ अंगकाठीच्या, छोटचा धारदार नाकाच्या माणसाकडे सर्वांच्या नजरा वळल्या आणि त्यांचे भाषण सारेजण लक्षपूर्वक ऐकू लागले. सबंध देशभर पसर-लेल्या संघर्षाची त्यांनी माहिती सांगितली आणि कम्युनिस्ट पक्षाभोवती एकवटण्याचे तरुणांना आवाहन केले. एखाद्या अनुभवी वक्त्याप्रमाणे ते बोलत होते, पण "सनातनी मार्क्स-वादी," "सामाजिक अंधराष्ट्रवादी" ह्या व अशासारख्या त्यांच्या श्रोत्यांना न समजणाऱ्या शब्दांचा ते फार वेळा वापर करीत होते. तरीही, जेव्हा त्यांनी भाषण संपविले तेव्हा श्रोत्यांनी त्यांना कडकडून टाळ्या वाजविल्या. आपल्यानंतरच्या वक्त्याची – सेर्गेईची – ओळख करून देऊन ते निघून गेले.

त्याला वाटणारी भीती खरी ठरली होती. आता तो श्रोत्यांच्या थेट समोर उभा होता आणि काय बोलावे तेच त्याला सुचत नव्हते. शब्द आठवण्याचा त्याने आटोकाट प्रयत्न केला. अखेरीस कॉम्रेड इग्नात्येवा त्याच्या मदतीला आल्या. व्यासपीठावरील आपली खुर्ची सोडून त्या त्याच्यापाशी आल्या व त्याच्या कानात कुजबुजल्या: "कम्सामोलची संघटना स्थापन करण्याबद्दल त्यांना सांग."

सेर्गेईने तात्काळ मुद्द्याला हात घातला.

"कॉम्रेडहो, सांगण्यासारखं जे काही होतं ते तुम्ही ऐकलंत.

आता आपल्याला एक संघटना स्थापन करायची आहे. याला कोण अनुकूल आहे?"

श्रोत्यांमध्ये एक प्रकारची स्तब्धता पसरली. दरम्यान उस्तिनोविच व्याख्यात्याच्या जागी येऊन उभी राहिली. मॉस्कोत युवकांची संघटना कशी बनविली जात होती याबद्दलची माहिती तिने श्रोत्यांना सांगितली. सेर्गेई बाजूला गोंधळून उभा होता.

संघटना स्थापन करण्याच्या प्रश्नावर सभेत उमटलेली प्रतिक्रिया पाहून त्याला आतून संतापाच्या उकळ्या फुटत होत्या व श्रोत्यांकडे तो रागाने डोळे वटारून पहात होता. उस्तिनोविचचे भाषण कुणीही ऐकत नव्हते. व्यासपीठावरील व्याख्यातीकडे एक तिरस्काराचा कटाक्ष टाकून झलिवानोव लीझा सुखार्कोच्या कानात काहीतरी कुजबुजत असल्याचे सेर्गेईने पाहिले. पहिल्या रांगेत बसलेल्या पावडरी थापलेल्या चेहऱ्याच्या जिम्नाशियमच्या वरच्या वर्गांमधील मुली लाजरे कटाक्ष फेकीत होत्या आणि एकमेकींमध्ये हलक्या आवाजात गप्पा मारीत होत्या. रंगमंचाच्या मागील बाजूस जाणाऱ्या वाटेकडील पलिकडच्या दाराशी लाल सेनेतील तरुण लोकांचा एक गट उभा होता. त्यांच्यामध्ये तो तरुण मशिनगनवाला असल्याचे सेर्गेईने पाहिले. रंगमंचाच्या अगदी टोकाशी चुळबुळ करीत अस्वस्थपणे तो बसला होता. अगदी निर्लज्जपणे आपल्या मित्रांबरोबर जोरजोरात गप्पा मारणाऱ्या झकपक पोषाखातील लीझा सुखार्कोकडे आणि आन्ना अदमोवस्कायाकडे तो अगदी उघड तिरस्काराने पहात होता.

आपले भाषण कुणीही ऐकत नाही याची जाणीव होताच, उस्तिनोविचने आपले भाषण आटोपते घेतले आणि ती खाली

बसली. इग्नात्येवा बोलायला उभ्या राहिल्या व त्यांच्या शांत, धीरगंभीर वागण्याने अस्वस्थ श्रोते काहीसे गप्प झाले.

"कॉम्रेडहो," त्या म्हणाल्या, "आज इथं जे काही सांगण्यात आलं त्यावर तुमच्यापैकी प्रत्येकानं विचार करावा, असं माझं तुम्हाला सांगणं आहे. तुमच्यापैकी निदान काहीजण तरी नुसते प्रेक्षक न राहता क्रांतीमध्ये प्रत्यक्ष भाग घेतील, अशी मला खात्री आहे. तुमच्या स्वागताला दारं सताड उघडी आहेत, बाकी सारं तुमच्यावर अवलंबून आहे. तुमची मतं ऐकायला आम्हाला आवडेल. ज्या कुणाला काही सांगावंसं वाटत असेल त्यानं व्यासपीठावर यावं, असं आम्ही आवाहन करतो."

पुन्हा एकदा प्रेक्षागारात शांतता पसरली. मग पाठीमागून एक आवाज आला:

"मला बोलायचंय!"

किंचित तिरळ्या डोळ्याचा आणि छोटया अस्वलासारख्या बांध्याचा मीशा लेवचुकोव नांवाचा पोरगा रंगमंचापर्यंत चालत आला.

त्याने बोलायला सुरुवात केली: "परिस्थिती अशी आहे की, आपण बोल्शेविकांना मदत केलीच पाहिजे. मी या मताचा आहे. सेर्योझा मला ओळखतो. मी कम्सामोलमध्ये दाखल होतोय."

सेर्गेईचा चेहरा उजळला. रंगमंचाच्या मध्यभागी तो झटकन पुढे आला.

"पाहिलंत कॉम्रेडहो-!" तो उच्च सुरात म्हणाला. "मी नेहमी म्हणत होतो, मीशा आमच्यातला एक होता म्हणून! त्याचे वडील स्विचमन होते आणि आगगाडीखाली सापडून

ते मेले. म्हणून मीशाला पुढं शिक्षण घेता आलं नाही. पण आत्ताच्या काळाला कशाची गरज आहे हे जाणून घेण्यासाठी त्याला जिम्नाशियमला जाण्याची आवश्यकता भासली नाही."

प्रेक्षागारात एकच गोंधळ माजला. काळजीपूर्वक केस विंचरलेल्या एका तरुणाने बोलण्याची परवानगी मागितली. तो ओकुशेव होता. गावच्या औषधविक्रेत्याचा तो मुलगा होता आणि जिम्नाशियममध्ये शिकत होता. आपला सदरा खेचून धरीत त्याने बोलायला आरंभ केला:

"मला माफ करा कॉम्रेडहो, पण आमच्यापासून काय अपेक्षा आहेत हेच मला समजलेलं नाही. आम्ही राजकारणात पडावं अशी अपेक्षा आहे का? तसं असेल तर आम्ही अभ्यास केव्हा करणार? आम्हाला जिम्नाशियमचा अभ्यास तर पूर्ण केलाच पाहिजे. जर हा एखादा क्रीडा समाज किंवा क्लब असता आणि तिथं आम्ही एकत्र जमून वाचन वगैरे करायचं असतं, तर ती गोष्ट वेगळी होती. पण राजकारणात पडायचं म्हणजे नंतर फासावर जायचा धोका पत्करण्यासारखं आहे. माफ करा, पण हे करायला कुणी तयार होईल असं काही मला वाटत नाही."

ओकुशेवने रंगमंचावरून खाली उडी मारली आणि तो आपल्या आसनावर परत बसला तेव्हा प्रेक्षागारात हास्याची लाट उसळली. त्यानंतरचा वक्ता होता तरुण मशिनगनवाला. रागाने त्याने आपली टोपी कपाळावर खाली खेचली आणि श्रोत्यांकडे डोळे वटारून पहात तो ओरडला:

"नीचांनो, हसताय कशाला?"

त्याचे डोळे जळत्या अंगारासारखे फुलले होते आणि संतापाने तो थरथर कापत होता. एक दीर्घ श्वास घेऊन त्याने बोलायला आरंभ केला:

"इवान झार्कीय माझं नांव. मी पोरका आहे. माझे आई-बाप मला ठाऊक नाहीत आणि मला कधीही माझं घर नव्हतं. पावाच्या तुकड्यासाठी भीक मागत आणि बहुतेकवेळा उपास काढत मी रस्त्यावर वाढलो. मी तुम्हाला खरं सांगतो, ते अक्षरश: कुत्र्याचं जिणं होतं. तुम्हा आईच्या कुशीत वाढलेल्या लाडक्या बाळांना त्याबद्दल काहीही माहीत नाही. मग सोविएत सत्ता आली, लाल सैन्यातल्या लोकांनी मला आपल्यात घेतलं, माझी काळजी घेतली. त्यांच्या आख्ख्या पलटणीनं मला दत्तक घेतलं होतं. त्यांनी मला कपडे दिले, लिहा-वाचायला शिकवलं. पण सर्वांत महत्त्वाचं म्हणजे माणूस कसा असतो ते त्यांनी मला शिकवलं. त्यांच्यामुळं मी बोल्शेविक बनलो आणि मरेपर्यंत मी बोल्शेविक राहीन. आम्ही कशासाठी लढतोय ते मला चांगलं ठाऊक आहे. आम्हा गरीबांसाठी, कामगारांच्या सरकारसाठी आम्ही लढतोय. तुम्ही तिथं बसून खदाखदा हसताय, पण या शहरासाठी लढताना दोनशे कॉम्रेड ठार झाले हे तुम्हाला माहीत नाही. ते नष्ट झाले..." ताणलेल्या तारेसारखा झार्कीयचा आवाज़ झंकारत होत होता. "आमच्या सुखासाठी, आमच्या ध्येयासाठी, त्यांनी मोठ्या आनंदानं स्वत:चं बलिदान केलं... सबंध देशभर, सर्व आघाड्यांवर माणसं मरत आहेत आणि तुम्ही इथं झिम्मा-फुगडी खेळत बसलाय! कॉम्रेडहो," अचानक अध्यक्षीय मेजाकडे वळून तो म्हणाला, "यांच्याशी इथं बोलण्यात तुम्ही आपला वेळ वाया घालवताय." सभागृहाकडे बोट दाखवीत त्याने विचारले, "हे तुम्हाला समजून घेतील असं वाटतं? मुळीच नाही! भरलं पोट रिकाम्या पोटाशी कधी बांधिलकी करीत नाही. इथं फक्त एक माणूस पुढं झाला आणि ते सुद्धा तो

गरीब आहे, पोरका आहे म्हणून!" प्रेक्षागारातील लोकांकडे गर्जून तो म्हणाला, "काही हरकत नाही, तुमच्याविना आम्ही चालवू. आमच्यात या म्हणून आम्ही तुमची विनवणी करायला येणार नाही. खुशाल खड्ड्यात जा सारे! तुमच्याशी एकाच पद्धतीनं बोललं पाहिजे—मशिनगननं!" असे म्हणून तो रंगमंचावरून खाली उतरला आणि डावी-उजवीकडे मुळीच न पाहता ताडताड प्रेक्षागाराबाहेर निघून गेला.

सभेमध्ये बोलणाऱ्यांपैकी कुणीही नंतरच्या करमणुकीच्या कार्यक्रमांना थांबले नाही.

"सगळाच गोंधळ!" ते 'रेवकोम' कडे परत येत असताना सेर्गेई कमालीच्या निराश सुरात म्हणाला. "झार्कीयचं बरोबर होतं. त्या जिम्नाशियमवाल्यांबरोबर आपण काहीही करू शकणार नाही. त्यांच्यामुळं तुमचा संताप मात्र वाढतो!"

"त्यात काही आश्चर्य नाही," इग्नात्येवांनी त्याचे बोलणे मध्येच थांबवले. "नाही तरी तिथं कामगारवर्गातले तरुण मुळी नव्हतेच. त्यांच्यापैकी बहुतेक एकतर मध्यमवर्गीयांची मुलं होती किंवा गावातल्या बुद्धिमंतांची पोरं होती. एकजात सगळे ढोंगी. लाकडं कापण्याच्या गिरणीमधल्या आणि साखर कारखान्यामधल्या कामगारांमध्ये तुम्ही काम केलं पाहिजे. पण ती सभासुद्धा काही अगदीच वाया गेली नाही. त्या विद्यार्थ्यांमध्ये तुम्हाला काही चांगले कॉम्रेड नक्की सापडतील."

उस्तिनोविच इग्नात्येवांशी सहमत होती.

ती म्हणाली, "सेर्योझा, आपल्या विचारांना, आपल्या घोषणांना सगळ्यांपर्यंत पोचवणं हेच तर आपलं काम आहे. प्रत्येक नव्या घटनेवर कामकरी जनतेचं लक्ष पक्ष वेधील. आपण सभा भरवू, परिषदा आणि काँग्रेसा घेऊ. स्टेशनावर

राजकीय विभाग खुलं थिएटर सुरू करणार आहे. काही दिवसात प्रचाराची आगगाडी इथं येऊ घातलीय. मग साऱ्या गोष्टी वेगानं सुरू होतील. लेनिन काय म्हणाले त्याची आठवण आहे ना? जनसमूहांना, कोटचवधी कामकरी लोकांना आपण लढचात ओढल्याशिवाय आपल्याला विजय मिळायचा नाही."

त्या संध्याकाळी उशिरा सेर्गेई उस्तिनोविचला पोचवायला स्टेशनापर्यंत गेला. निरोपाच्या वेळी त्याने तिचा हात घट्ट पकडला आणि जरूरीपेक्षा जास्त वेळ निष्कारणच धरून ठेवला. तिच्या चेहऱ्यावर स्मिताची एक हलकीशी लकेर उमटून गेली.

परत येताना वाटेवर सेर्गेई आपल्या घरच्या माणसांना भेटायला गेला. त्याने आपल्या आईचे ताडताड बोलणे मुकाटचाने ऐकून घेतले. पण जेव्हा वडिलांनी तिच्या सुरात सूर मिसळला, तेव्हा मात्र सेर्गेईने आक्रमक पवित्रा घेतला व लौकरच झखार वासील्येविच कोंडीत सापडले.

"हे बघा बाबा, जर्मन इथं असताना तुम्ही संपावर गेलात आणि आगगाडीच्या इंजिनात त्या शिपायाला ठार मारलंत, तेव्हा तुम्ही आपल्या कुटुंबाचा विचार केला होता? अर्थात तुम्ही आमचा विचार केला होता. पण तरीही तुम्ही तसे वागलात, कारण तुमच्या कामगाराच्या सदसद्विवेकबुद्धीनं तुम्हाला तसं करायला सांगितलं. मीसुद्धा आपल्या घरच्या माणसांबद्दल विचार केलाय. मला चांगलं ठाऊक आहे की, जर आम्हाला माघार घ्यावी लागली, तर माझ्यापायी तुम्हा लोकांचा छळ होईल. पण म्हणून मी घरात गप्प बसून राहू शकत नाही. हे असं कसं होतं ते तुम्हाला चांगलं माहीत आहे बाबा! मग उगाच हा घोळ कशाला? मी चांगल्या

ध्येयासाठी काम करतोय. तेव्हा आरडाओरडा करण्यापेक्षा तुम्ही मला पाठिंबा दिला पाहिजे. बाबा, तुमच्या-माझ्यात समझोता करून टाकू या. म्हणजे मग आईसुद्धा मला रागं भरायची थांबेल." आपल्या नितळ निळया डोळयांनी त्याने आपल्या वडिलांकडे रोखून पाहिले आणि मंद स्मित केले. आपले बरोबर आहे असा विश्वास त्याच्या मुद्रेवर प्रकटला होता.

झखार वासील्येविचनी बाकावर बसल्या बसल्या अस्वस्थपणे चुळबुळ केली. त्यांच्या जाड पिंजारलेल्या मिशांमधून आणि छोटचा विस्कटलेल्या दाढीमधून त्यांचे पिवळसर दात त्यांच्या चेहऱ्यावर उमटलेले हसू दाखवीत होते.

"अरे चोरा, त्यात वर्गजाणीव आणतोस काय? मारे त्या रिवॉल्वरची ऐट दाखवतोयस. पण म्हणून तुला घाबरून तुझ्या पाठीची चामडी सोलून काढणार नाही असं वाटलं काय?"

पण त्यांच्या आवाजात रागाचा अंशमात्र नव्हता. आपल्या मनातील गोंधळावर ताबा मिळवून त्यांनी आपला हडकुळा हात आपल्या मुलासमोर धरला. "चालू दे सेर्योझा. एकदा तू वेग घेतला आहेस, त्याला मी खीळ घालणार नाही. पण तू आम्हाला अगदीच विसरू नकोस. अधूनमधून येत जा."

रात्रीची वेळ. दाराच्या फटीमधून प्रकाशाचा कवडसा पायऱ्यांवर पडला होता. वकीलसाहेबांच्या मोठ्या खोलीतील फर्निचर शानदार आवरणांनी सजवलेले होते आणि त्यांच्या भल्या मोठ्या मेजाभोवती पाच माणसे बसली होती: दोलीन्नीक, इग्नात्येवा, आपल्या कझाक केसाळ टोपीत किर्घिझ माणसाप्रमाणे दिसणारे चेकाचे प्रमुख तिमोशेन्को, धिप्पाड

रेलकामगार शूदीक आणि रेलयार्डातले बसक्या नाकाचे ओस्तापचूक. 'रेवकोम'ची बैठक चालू होती.

टेबलावर किंचित ओणवून आणि इग्नात्येवांवर आपली कडक नजर रोखून दोलीन्नीकनी घोगऱ्या आवाजात भडाभडा बोलायला सुरुवात केली :

"आघाडीला पुरवठा केला पाहिजे. कामगारांना खायला मिळालं पाहिजे. आपण इथं येताच दुकानदारांनी आणि बाजारातल्या नफेखोरांनी भराभरा मालाच्या किंमती वाढवल्या. ते सोविएत पैसे घेणार नाहीत. इथं फक्त जुनं झारचं चलन किंवा केरेन्स्की नोटा चालतात. आज आपण बसून किंमती नक्की केल्या पाहिजेत. कुठलाही नफेखोर ठराविक किंमतीला माल विकायला तयार होणार नाही हे आपल्याला ठाऊक आहे. त्यांच्यापाशी असलेला माल ते दडवून ठेवतील. अशा वेळी आपल्याला झडत्या घ्याव्या लागतील आणि त्या रक्तशोषकांचा माल जप्त करावा लागेल. गोड गोड वागायची ही वेळ नव्हे. इत:पर कामगारांची उपासमार चालू देणं योग्य ठरणार नाही. आम्ही फार पुढं जाऊ नये असा इशारा कॉम्रेड इग्नात्येवा आम्हाला देत आहेत. मला जर विचाराल तर त्यांचा हा इशारा म्हणजे कमकुवत काळजाच्या बुद्धिमंताची प्रतिक्रिया आहे. झोया, माझ्या बोलण्याचा राग मानू नको. मी काय बोलतोय त्याची मला चांगली जाणीव आहे. शिवाय ही काही छोट्या व्यापाऱ्यांची बाब नाही. आजच मला माहिती मिळालीय की, खाणावळवाला बरीस झोन याच्या घरात गुप्त तळघर आहे. पेत्ल्युरा इथं येण्याच्याही आधी, मोठ्या दुकानदारांनी आपला माल तिथं दडवून ठेवला आहे."

तिमोशेन्को यांच्याकडे एक चोरटा, उपहासाचा कटाक्ष टाकण्यासाठी ते बोलायचे किंचित थांबले.

"तुम्हाला कसं समजलं?" दोलीन्नीकनी 'चेका'*वर आघाडी मारल्याचे पाहून चकित झालेल्या तिमोशेन्कोनी थोड्या नाराजीच्या सुरात विचारले.

दोल्लीन्नीक गालातल्या गालात हसले. "बंधू, मला सारं काही माहीत आहे. त्या गुप्त तळघराबद्दलच मला माहिती आहे असं नाही, तर काल तू आणि डिव्हिजन कमांडरचा ड्रायव्हर अशा दोघांनी मिळून समागोनची अर्धी बाटली रिचवल्याचंही मला ठाऊक आहे."

तिमोशेन्को खुर्चीतल्या खुर्चीत चुळबुळले आणि त्यांच्या फिकट चेहऱ्यावर एकदम लाल रंग चढला.

"छान!" थोड्याशा नाराजीनेच ते उद्गारले. पण इग्नात्येवांच्या कपाळावरील नाखुषीची आठी पाहून त्याबाबत त्यांनी पुढे काही बोलायचे टाळले. "या बेटचा जुळाऱ्याची स्वत:ची चेका दिसते!" 'रेवकोम'च्या अध्यक्षाला न्याहाळून पाहताना त्यांच्या मनात विचार आला.

"सेर्गेई ब्रुझ्झाकनं मला सांगितलं," दोलीन्नीक पुढे म्हणाले. "फराळाच्या दुकानात काम करणारं कुणीतरी त्याच्या ओळखीचं आहे. तर त्या पोराला आचाऱ्यांकडून समजलं की, त्यांना लागणारा माल वाट्टेल तेवढ्या प्रमाणात झोनकडून मिळायचा. काल सेर्गेईनं तळघराची नक्की माहिती काढली. आता ते नेमकं हुडकून काढायचं एवढंच काम. तिमोशेन्को, तुझ्या

---

*'चेका' – प्रतिक्रांतिविरुद्ध लढा देण्यासाठी सोविएत सरकारने स्थापन केलेली अखिल रशियन खास समिती. **– अनु.**

माणसांना ताबडतोब ह्या कामाला लाव. त्या सेर्गेईलाही बरोबर घे. आपलं जर नशीब जोरावर असेल, तर कामगारांना आणि डिव्हिजनला आपण रसद पुरवू शकू."

अर्ध्या तासानंतर आठ सशस्त्र माणसे खाणावळवाल्याच्या घरात घुसली. बाहेर दरवाजावर पहारा द्यायला दोघे उभे राहिले.

खाणावळीचा मालक हा बुटका, भक्कम आणि पिंपासारख्या गोल बांध्याचा होता. त्याचा एक पाय लाकडी होता आणि चेहऱ्यावर लाल रंगाच्या दाढीची खुंटे माजली होती. ह्या नवागतांचे त्याने विशेष आदबीने स्वागत केले.

"ह्या अशा आडवेळी तुम्हाला काय पाहिजे कॉम्रेडांनो?" त्याने बसक्या आवाजात चौकशी केली.

झोनच्या मागे त्याच्या मुली तिमोशेन्कोंच्या विजेरीच्या झोतात डोळे मिचमिचत उभ्या होत्या. त्यांनी घाईघाईने अंगरखे घातल्याचे जाणवत होते. पलिकडच्या खोलीमधून झोनच्या लठ्ठ बायकोचे घाईघाईने कपडे घालताना होणारे सुस्कारे आणि कण्हणे ऐकू येत होते.

"आम्ही घराची झडती घ्यायला आलोय," तिमोशेन्कोनी करड्या आवाजात स्पष्ट सांगितले.

फरशीचा प्रत्येक इंच न इंच बारकाईने तपासण्यात आला. कापून उंच उतरंड रचलेल्या लाकडांचे प्रशस्त कोठार, अनेक कोठीच्या खोल्या, स्वयंपाकघर आणि मोठे तळघर – ह्या सर्वांची काळजीपूर्वक तपासणी घेण्यात आली. त्या गुप्त तळघराचा अजिबात छडा लागला नाही.

स्वयंपाकघराशेजारच्या एका छोट्या खोलीत एक मोलकरीण गाढ झोपली होती. त्या मुलीला एवढी जोरदार झोप लागली

होती की, ही झडती घेणारी माणसे घरात केव्हा आली याचा तिला पत्ताच नव्हता. सेर्गेईने तिला हळूच जागे केले.

"तू इथं काम करतेस?" त्याने विचारले. झोपाळू नजरेच्या त्या गोंधळलेल्या मुलीने खांद्यापर्यंत पांघरुण ओढून घेतले व प्रकाश टाळण्यासाठी डोळ्यांपुढे हाताचा आडोसा धरला.

"होय," ती उत्तरली. "तुम्ही कोण?"

सेर्गेईने तिला समजावून सांगितले व तिला कपडे करायला सांगून तो खोलीबाहेर आला.

मोठ्या भोजन दालनात तिमोशेन्को खाणावळवाल्याची उलटतपासणी घेत होते. तो घाईगडबडीने बोलत होता आणि संतापाने घुसफुसत होता.

"तुम्हाला पाहिजे तरी काय माझ्यापासून? माझ्या घराला आणखी तळघरं नाहीत. मी तुम्हाला खात्रीपूर्वक सांगतो, तुम्ही निष्कारण आपला वेळ वाया घालवताय. एकेकाळी माझी खाणावळ होती हे खरं आहे, पण आता मी अगदी एक गरीब माणूस आहे. पेत्ल्युराच्या लोकांनी मला पुरता धुतला आणि ते जवळ जवळ मला ठार मारायलाच निघाले होते. सोविएतं सत्तेवर आली याचा मला आनंद वाटतो आणि जे काही माझ्या मालकीचं आहे ते तुमच्या डोळ्यांसमोर हजर आहे." आपले आखूड लठ्ठ हात त्याने पसरले होते आणि त्याचे लालभडक डोळे चेका प्रमुखांच्या चेहऱ्यापासून सेर्गेईच्या चेहऱ्यापर्यंत व सेर्गेईच्या चेहऱ्यापासून कोपऱ्यात आणि छतापर्यंत गरागरा फिरत होते.

तिमोशेन्कोनी अस्वस्थपणे आपले ओठ चावले.

"अच्छा, तर तुम्ही सांगत नाही काय? अखेरचा हुकूम करतो, ते तळघर कुठं आहे दाखवा."

“पण कॉम्रेडसाहेब, आम्हालाच काही खायला मिळत नाही,” खाणावळवाल्याची बायको विव्हळली. “आमच्यापाशी होतं नव्हतं तेवढं सगळं त्यांनी काढून घेतलं.” तिने रडण्याचा प्रयत्न केला, पण तिच्या डोळयांना पाणीच आले नाही.

“तुमची उपासमार चाललीय म्हणता, आणि घरकामाला मोलकरीण ठेवता?” सेर्गेईने प्रश्न टाकला.

“ती मोलकरीण नाही. गरीब बिचाऱ्या मुलीला कुठंच थारा नाही म्हणून आम्ही तिला आमच्यापाशी ठेवून घेतलं. ती स्वत:च सांगील तुम्हाला.”

तिमोशेन्को यांचा संयम आता सुटला. “ठीक आहे तर,” ते ओरडले, “आता आम्ही गंभीरपणं कामाला सुरुवात करतो!”

पहाट उजाडली तरी झडती चालू होती. तेरा तासांच्या निष्फळ प्रयत्नांनंतर दमलेले तिमोशेन्को झडती बंद करण्याच्या बेतात होते, पण तेवढ्यात त्या मोलकरणीच्या खोलीतून झडती घेऊन बाहेर पडत असलेल्या सेर्गेईने स्वत:मागे त्या मुलीचा अस्पष्ट आवाज ऐकला: “स्वयंपाकघरातल्या चुलाण्याच्या आत पहा.”

दहा मिनिटांनंतर, त्या फोडलेल्या रशियन चुलाण्याच्या आत एक लोखंडी गुप्त दार सापडले. आणि एक तासाच्या अवधीत, पिंपांनी व पोत्यांनी भरलेला एक दोन टनी ट्रक खाणावळवाल्याच्या घरापासून भरधाव गेला. एव्हाना घराभोवती बघ्यांचे कोंडाळे जमले होते आणि सामानाने गच्च भरून जाणाऱ्या त्या ट्रककडे ते आ वासून पहात होते.

आपल्या चीजवस्तूंचे छोटे गाठोडे खाकोटीला मारून मरीया याकोवलेवना कोर्चागिना घरी आली त्यादिवशी फार उकाडा

होन होता. पावेलची हकिकत आर्त्योमने तिला सांगितली तेव्हा ती हमसाहमशी रडली. तिचे आयुष्य आता रिते आणि उजाड भासत होते. तिला काम शोधणे भाग होते. काही काळानंतर लाल सेनेतल्या लोकांचे कपडे धुण्याचे काम तिने पत्करले. कामाच्या मोबदल्यात तिला सैनिकांचा शिधा मिळत असे.

एके संध्याकाळी खिडकीपलिकडून आर्त्योमची पावले नेहमी-पेक्षा जास्त झपझप पडत असलेली तिने ऐकली. त्याने दार ढकलून सताड उघडले आणि उंबरठ्यावरूनच तो ओरडला: "मी पाव्काचं पत्र आणलंय."

पावेलने लिहिले होते: "प्रिय भाऊ, मी फारसा बरा नसलो तरी जिवंत आहे हे तुला कळविण्यासाठी हे पत्र लिहितोय. माझ्या मांडीच्या मागच्या भागात गोळी घुसली होती, पण आता मी बरा होतोय. डॉक्टर म्हणतात, हाडाला इजा पोचली नाही. तेव्हा माझी काळजी करू नका. मी बरा होईन. इस्पितळातून मला बाहेर सोडल्यानंतर कदाचित मला सुटी मिळेल आणि काही दिवसांसाठी मी घरी येईन. मी आईला भेटू शकलो नाही. कॉम्रेड कतोवस्की यांच्या घोडदळ ब्रिगेडमध्ये मी दाखल झालो होतो. त्यांचं नांव तू ऐकलं असशीलच, कारण शूरपणाबद्दल ते खूप प्रसिद्ध आहेत. त्यांच्यासारखा माणूस मी यापूर्वी कधीही पाहिलेला नाही. त्यांच्याबद्दल मला खूप खूप आदर वाटतो. आई अजून घरी आली की नाही? आली असेल तर तिला माझा नमस्कार सांग. माझ्यामुळं तुला जे त्रास सोसावे लागले त्याबद्दल क्षमा कर. तुझा भाऊ, पावेल.

"आर्त्योम, कृपा करून जंगल अधिकाऱ्याच्या घरी जा आणि या पत्राबद्दल त्यांना सांग."

पावेलचे हे पत्र ऐकल्यानंतर मरीया याकोवलेवनाने खूप अश्रू ढाळले. त्या वेंधळया पोराने धड आपल्या इस्पितळाचा पत्ताही दिला नव्हता!

"आंदोलन-प्रचार डिव्हिजन, राजकीय विभाग" अशी पाटी लावलेल्या स्टेशनावरील हिरव्या रंगाच्या रेलडब्याला सेर्गेई अलिकडे वारंवार भेटी देऊ लागला होता. त्या डब्याच्या एका कंपार्टमेंटमध्ये उस्तिनोविच आणि मेद्वेदेवा यांची कचेरी होती. जेव्हा जेव्हा सेर्गेई यायचा तेव्हा तेव्हा मेद्वेदेवा यांच्या सतत सिगारेट धरलेल्या ओठांवर सूचक हसू उमटायचे.

कम्सामोलच्या विभागीय समितीच्या चिटणीसाची रीता उस्तिनोविचबरोबर दाट मैत्री जमली होती. स्टेशनावरून पुस्तकांचा आणि वर्तमानपत्रांचा गठ्ठा बरोबर घेऊन येताना, तिच्याशी होणाऱ्या प्रत्येक भेटीनंतर एक अस्पष्ट सुखाची जाणीवही तो स्वत:बरोबर आणीत होता.

डिव्हिजनच्या राजकीय विभागाच्या खुल्या नाटयगृहात कामगार आणि लाल सैनिक प्रेक्षकांची दररोज प्रचंड गर्दी जमत होती. रंगीबेरंगी पोस्टरे डकवलेली बाराव्या सेनेची आंदोलन आगगाडी बाजूच्या फलाटाशी उभी होती. तिथे दिवसाचे चोवीस तास वर्दळ चालू होती. तिच्यामध्ये एक छपाई यंत्र बसविले होते व वर्तमानपत्रे, पत्रके, घोषणा यांचा अखंड ओघ लागला होता. युद्धआघाडी तेथून अगदी जवळच होती.

एके संध्याकाळी सेर्गेई सहज नाटयगृहात डोकावला. लाल सैनिकांच्या एका गटाबरोबर रीता असल्याचे त्याला आढळले. त्या रात्री उशीरा, राजकीय विभागातील कर्मचारी रहात

होते त्या स्टेशनवरील ठिकाणी तिला पोचवताना तो एकदम म्हणाला: "कॉम्रेड रीता, तुला नेहमी भेटावंसं मला का वाटतं?" आणि पुढे तो म्हणाला: "तुझ्याबरोबर असताना किती छान वाटतं! तुला भेटल्यानंतर मला नेहमी असं वाटतं की, मी न थांबता सतत काम करू शकेन."

रीता थबकली. "हे बघ कॉम्रेड ब्रुझ्झाक," ती म्हणाली, "आत्ता इथंच आपण ठरवू या की, यापुढं कधीही तू कवितेतली भाषा बोलायची नाही. मला ती आवडत नाही."

एखाद्या शाळकरी मुलाला ताकीद दिल्यानंतर तो जसा शरमिंदा होईल तसे सेर्गेईचे झाले.

"माझ्या बोलण्यात तसा काही अर्थ नव्हता," तो गडबडीने म्हणाला. "मला वाटलं आपण मित्र आहोत तर... पण मी काही प्रतिक्रांतिकारक बोललो नाही. बोललो का? ठीक आहे कॉम्रेड उस्तिनोविच, मी एक शब्दही उच्चारणार नाही!"

त्याने घाईघाईने तिच्याशी हस्तांदोलन केले आणि धावतच तो शहराकडे परतला.

त्यानंतर अनेक दिवसपर्यंत सेर्गेई स्टेशनच्या जवळसुद्धा फिरकला नाही. इग्नात्येवांनी त्याला तिकडे येण्याबद्दल विचारले तेव्हा खूप कामात असल्याची सबब सांगून त्याने नकार दिला. आणि खरोखरीच त्याला खूप काम होते.

एके रात्री कॉम्रेड शूदीक आपल्या घरी जात असताना कुणीतरी त्यांच्यावर गोळ्या झाडल्या. साखर कारखान्यात व्यवस्थापकीय जागांवर काम करणाऱ्या पोलिश लोकांची त्या रस्त्यावर प्रामुख्याने वस्ती होती. त्यानंतर झडत्या घेण्यात

आल्या तेव्हा 'स्त्रेलेत्स' नांवाने ओळखल्या जाणाऱ्या पिल्सूदस्की संघटनेच्या मालकीची काही शस्त्रे व दस्तऐवज उजेडात आले.

'रेवकोम' मध्ये एक बैठक झाली. त्या बैठकीला हजर राहिलेल्या उस्तिनोविचने सेर्गेईला एका बाजूला घेतले आणि शांत सुरात ती म्हणाली: "तर तुझ्या क्षुद्र अभिमानाला धक्का बसला अं? तुझ्या कामामध्ये तुझ्या वैयक्तिक बाबी का मिसळतो? कॉम्रेड, हे असं चालणार नाही."

तेव्हा सेर्गेई पुन्हा एकदा हिरव्या रेलडब्याकडे जाऊ लागला.

दोन दिवस चाललेल्या विभागीय परिषदेला तो हजर राहिला आणि तेथील गरमागरम वादविवादांमध्ये त्याने भाग घेतला, तिसऱ्या दिवशी, परिषदेच्या बाकीच्या प्रतिनिधीं-बरोबर नदीपलिकडील जंगलात तो गेला आणि अद्याप मोकाट सुटलेल्या झारूदनी नांवाच्या पेत्ल्युरा अधिकाऱ्याच्या गुंडां-बरोबर एक सबंध दिवस आणि रात्र त्याने लढाई केली. परत आल्यावर तो इग्नात्येवांना भेटायला गेला तेव्हा तेथे उस्तिनोविच होती. नंतर तिला स्टेशनपर्यंत पोचवायला तो गेला. निरोपाच्या वेळी त्याने तिचा हात गच्च पकडला.

तिने रागाने आपला हात मागे खेचून घेतला. पुन्हा एकदा आंदोलन-प्रचाराच्या डब्यापासून सेर्गेई बरेच दिवस दूर राहिला व कामासाठीसुद्धा रीताला भेटणे टाळू लागला. त्याच्या ह्या वागण्याचा खुलासा जेव्हा ती विचारी तेव्हा तो तुटकपणे उत्तर देई: "तुझ्याशी बोलून काय उपयोग? फार तर तू मला क्षुद्र स्वभावाचा म्हणशील किंवा कामगारवर्गाचा विश्वास-घात करणारा, वगैरे काहीतरी विशेषणं लावशील!"

कॉकेशियाच्या लाल ध्वजा डिव्हिजनच्या सैनिकांना घेऊन

आगगाड्या स्टेशनात आल्या. काळसर वर्णाचे तीन सेनापती 'रेवकोम'मध्ये आले. नकशीकाम केलेल्या चांदीचा पट्टा बांधलेला त्यांच्यापैकी एक उंच सडपातळ बांध्याचा सेनापती सरळ दोलीन्नीकपाशी गेला आणि शंभर गवताच्या गाड्यांची त्याने मागणी केली. अगदी मोजक्या शब्दात तो म्हणाला: "मला आता कोणतीही सबब नको. मला ते गवत मिळालंच पाहिजे. माझे घोडे उपाशी मरायला लागलेत."

तेव्हा गवत आणण्यासाठी दोन लाल सैनिकांबरोबर सेर्गेईला धाडण्यात आले. एका खेड्यात कुलकांच्या एका टोळीने त्यांच्यावर हल्ला चढवला. लाल सेनेच्या लोकांना नि:शस्त्र बनवून निर्दयपणे मारहाण करण्यात आली. सेर्गेईच्या लहान वयामुळे त्याला तेवढा चोप बसला नाही. गरीब किसान समितीच्या लोकांनी त्या तिघांनाही गाडीत घालून शहरात परत आणले.

त्या खेड्यामध्ये एक सशस्त्र तुकडी पाठविण्यात आली व दुसऱ्या दिवशी गवताचा पुरवठा झाला.

आपल्या घरच्या लोकांना उगीच चिंतेत पाडायला नको म्हणून संपूर्ण बरा होईपर्यंत सेर्गेई इग्नात्येवांकडे राहिला. रीता उस्तिनोविच तेथे त्याला भेटायला आली. आणि प्रथमच तिने सेर्गेईचा हात प्रेमाने आणि हळुवारपणे कुरवाळला. ज्या पद्धतीने तिने आपल्या भावना व्यक्त केल्या तसे करण्याचे धाडस सेर्गेईला या जन्मी तरी झाले नसते.

एका रणरणत्या दुपारी रीताला भेटायला सेर्गेई आंदोलन डब्यापाशी आला होता. पावेलचे पत्र त्याने तिला वाचून दाखविले आणि आपल्या ह्या मित्राबद्दलची काही माहिती

सांगितली. बाहेर जाता जाता मान वळवून तो म्हणाला: "मी आता जंगलात जाऊन तळ्यात डुंबायचा विचार करतोय."

रीताने आपल्या कामातून मान वर केली आणि ती म्हणाली: "माझ्यासाठी थांब. मी येते तुझ्याबरोबर."

तळे आरशाप्रमाणे गुळगुळीत आणि स्तब्ध दिसत होते. त्याच्या उबदार पारदर्शी पाण्याला एक मोहक ताजेपणा होता.

"रस्त्यापाशी माझ्यासाठी थांब, मी प्रथम पाण्यात जाते," रीताने त्याला हुकूम केला.

पुलाजवळच्या एका दगडावर सेर्गेई बसला आणि सूर्याच्या दिशेने त्याने आपला चेहरा वर उचलला. मागील बाजूस तिने पाण्यात केलेले चुबुक चुबुक आवाज त्याला ऐकू येत होते.

तेवढ्यात त्याला तोन्या तुमानोवा आणि आंदोलक आगगाडीचा लष्करी कमिस्सार चुझानिन असे दोघे झाडीमधून येत असलेले दिसले. त्या दोघांनी एकमेकांच्या हातात हात घातले होते. उत्तम लष्करी गणवेष परिधान केलेला, रुबाबदार कातडी पट्टा कमरेभोवती आवळलेला, अनेक फिती लावलेला आणि गुडघ्यापर्यंतचे चकचकीत चामडी बूट घातलेला चुझानिन मोठा देखणा दिसत होता. तोन्याशी बोलण्यात तो पार गुंगला होता.

पावेलकडून चिठ्ठी घेऊन येणारी ती हीच मुलगी म्हणून तोन्याला सेर्गेईने ओळखले. त्याच्या जवळ येताना तिनेही त्याच्याकडे टक लावून पाहिले. त्याला आठवण्याचा ती प्रयत्न करीत होती असे दिसत होते. जेव्हा ते त्याच्या अगदी समोर

आले तेव्हा सेर्गेईने आपल्या खिशातून पावेलचे शेवटचे पत्र बाहेर काढले व तो तिच्यापाशी गेला.

"एक मिनिट थांबा कॉम्रेड. माझ्यापाशी हे पत्र आहे त्याचा तुमच्याशी थोडा संबंध आहे."

तोन्याने आपला हात चुझानिनच्या हातातून खेचून मोकळा केला व पत्र घेतले. ती वाचत होती तेव्हा तिच्या हातात धरलेला कागदाचा कपटा किंचित थरथरत होता.

"त्याच्याबद्दल आणखी काही बातमी आहे तुमच्यापाशी?" सेर्गेईला पत्र परत देत तिने विचारले. "नाही," तो उत्तरला.

तेवढ्यात रीताच्या पायांखाली गारगोटी खडे दबल्याचा आवाज झाला. आत्तापर्यंत चुझानिनला तिच्या तेथील अस्तित्वाचा पत्ता नव्हता. तो चटकन तोन्याच्या कानाशी वाकून कुजबुजला: "आपण आता जाऊ या."

पण रीताच्या उपहासात्मक, रागीट आवाजाने त्याला थोपविले.

"कॉम्रेड चुझानिन! सबंध दिवसभर तिथं आगगाडीशी माणसं तुम्हाला शोधत होती."

चुझानिनने नाराजीने तिला न्याहाळले.

"काही हरकत नाही," तुसडेपणाने तो म्हणाला, "माझ्याशिवाय त्यांचं काही अडणार नाही."

तोन्या आणि लष्करी कमिस्सार जात होते तेव्हा त्यांच्या पाठमोऱ्या आकृत्यांकडे रीता बराच वेळ पहात राहिली.

"ह्या कुचकामी माणसाला केव्हाच परत पाठवायला हवा होता!" कोरड्या आवाजात ती म्हणाली.

ओकच्या झाडांचे प्रचंड शेंडे वाऱ्याने झुलत तेव्हा जंगलातून सळसळ आवाज येत होता. तळ्यामधून एक गोड ताजेपणा

आसमंतात पसरत होता. सेर्गेईने पाण्यात सूर मारायचे ठरविले.

पोहून तो जेव्हा बाहेर आला तेव्हा रस्त्यापासून जवळच्याच एका झाडाच्या बुंध्यावर रीता बसलेली त्याला आढळली. जंगलाच्या आतील दाट भागांमधून गप्पा मारीत ती दोघे भटकली. खूप दाट गवताने भरलेल्या एका छोटया घळीत ती विसाव्यासाठी थांबली. जंगल अगदी शांत होते. ओकची झाडे एकमेकांशी हलकेच कुजबुजत होती. रीताने मऊ मऊ गवतावर स्वतःला झोकून दिले आणि डोक्याभोवती स्वतःच्या हातांची उशी केली. त्या उंच गवतामध्ये तिचे जुन्या बुटांमधील घाटदार पाय लपले गेले. सेर्गेईच्या नजरेला अचानक तिची पावले दिसली. व्यवस्थित ठिगळे लावलेले तिचे बूट त्याने पाहिले व नंतर अंगठा बाहेर डोकावणाऱ्या स्वतःच्या बुटांकडे पाहून तो हसला.

"हसतोस कशाला?" तिने विचारले.

सेर्गेईने तिला आपले बूट दाखविले. "असे बूट घालून आम्ही कसे लढणार?"

रीताने उत्तर दिले नाही. ती गवताचे पाते चघळीत होती. तिचे विचार कुठेतरी दुसरीकडे भरकटत होते हे उघड होते.

"चुझानिन हा वाईट कम्युनिस्ट आहे," शेवटी ती म्हणाली. "आमचे सारे राजकीय कार्यकर्ते फाटक्यातुटक्या कपडयांमध्ये फिरतात. पण हा माणूस मात्र फक्त स्वतःचा विचार करतो. तो आमच्या पक्षातला नाही... युद्धआघाडी-वरची परिस्थिती खरंच गंभीर आहे. आपल्या देशाला खूप काळ जोरदार लढा द्यावा लागणार आहे." थोडे थांबून पुढे ती म्हणाली, "सेर्गेई, आपल्याला शब्दांनी आणि शस्त्रांनी,

अशा दोन्ही तऱ्हांनी लढलं पाहिजे. आपल्या एक-चतुर्थांश कम्सामोल सदस्यांना सैन्यात भरती करण्याच्या मध्यवर्ती समितीच्या ठरावाबद्दल तू ऐकलंस? तुला खरं सांगू सेर्गेई, आम्ही इथं आता फार काळ असणार नाही."

तिचे बोलणे ऐकत असताना, तिच्या आवाजातील एक नवीनच स्वर जाणवून सेर्गेई चकित झाला. तिचे काळेभोर नितळ डोळे त्याच्यावर रोखलेले असताना, सारे शहाणपण गहाण टाकून तिचे डोळे कसे आरशांसारखे आहेत असे सांगायला तो अगदी उतावीळ झाला होता. पण त्याने वेळीच स्वत:ला आवरले.

रीता आपल्या हातांच्या कोपऱ्यांवर रेलून म्हणाली: "तुझं रिवॉल्वर कुठाय?"

सेर्गेईने आपला पट्टा चाचपत रडव्या आवाजात म्हटले, "त्या कुलकांच्या टोळीनं माझ्याकडून ते काढून घेतलं."

रीताने आपल्या शर्टच्या खिशात हात घालून एक चकचकीत स्वयंचलित पिस्तूल बाहेर काढले.

"सेर्गेई, ते ओकचं झाड पाहिलंस?" सुमारे पंचवीस पावलांवरच्या एका ओकच्या सुरकुतलेल्या बुंध्याकडे पिस्तुलाची नळी रोखून तिने म्हटले. आणि आपल्या डोळ्यांपर्यंत ते पिस्तूल उंचावून नेम न धरता तिने गोळी झाडली. फुटलेल्या बुंध्याची साल भुगा होऊन खाली कोसळली.

"पाहिलंस?" स्वत:वर खूष होऊन तिने पुन्हा एकदा पिस्तूल झाडले. आणि पुन्हा झाडाची साल भुगा होऊन गवतावर कोसळली.

"हे घे," खट्याळ स्मित करीत तिने पिस्तूल त्याच्या हाती दिले. "आता तू काय करतोस पाहू या."

सेर्गेईचा तीनपैकी एक नेम चुकला. रीता हसत प्रांजलपणे म्हणाली : "मला वाटलं होतं, तुला एवढंही जमणार नाही."

तिने पिस्तूल खाली ठेवले व ती गवतावर पहुडली. तिच्या घट्ट स्तनांवर तिचा सदरा ताणला गेला होता.

"सेर्गेई," हळूच ती म्हणाली. "इकडं ये."

तो तिच्या अधिक जवळ सरकला.

"आकाशाकडं बघ. किती निळं आहे ते. तुझे डोळे त्या रंगाचे आहेत. आणि तेच वाईट आहे. ते करडे असायला हवे होते, पोलादासारखे! निळा हा फार हळुवार रंग आहे."

आणि अचानक त्याच्या सोनेरी केसांचे डोके तिने आपल्या हातांमध्ये गच्च धरले व त्याच्या ओठांचे विलक्षण भावनावेगाने चुंबन घेतले.

दोन महिने सरले. शरदाचे दिवस आले. झाडांना आपल्या काळ्या आवरणाखाली गुरफटून टाकीत रात्र हळूच चोरपावलांनी पसरली. डिव्हिजनच्या मुख्य ठाण्यावरचा तारमास्तर मोर्सच्या सांकेतिक भाषेत टिकटिकणाऱ्या तारयंत्रावर ओणवून सापासारखी नागमोडी लांब अरुंद फीत आपल्या हाताच्या बोटांखाली गुंडाळीत होता. त्या फितीवरच्या टिंबांचे आणि रेघांचे त्याने झटकन शब्दांमध्ये आणि वाक्यांमध्ये रूपांतर केले :

> "पहिल्या डिव्हिजनचे चीफ ऑफ स्टाफ, शेपेतोवकाच्या रेवकोमच्या अध्यक्षांना प्रत. ही तार मिळाल्यानंतर दहा तासांच्या आत शहरातील सर्व अधिकृत संस्था मोकळ्या करा. आघाडीच्या क्षेत्राला ताब्यात क्ष रेजिमेंटच्या सेनापतीच्या दिमतीला शहरात एक

बटालियन ठेवा. डिव्हिजनचे मुख्य ठाणे, राजकीय विभाग, सर्व लष्करी संस्था बारान्चेव स्टेशनावर हलवा. हुकुमाची तामिली केल्याचे डिव्हिजन प्रमुखांना कळवा.

"सही."

दहा मिनिटांनंतर, अंधाराला आपल्या पुढील दिव्याच्या उजेडाने कापीत, शहरातल्या झोपलेल्या रस्त्यांवरून एक फटफटी धडधडत निघाली. फटफट आवाज करीत ती 'रेव-कोम'च्या फाटकासमोर थांबली. फटफटीस्वार घाईघाईने आत गेला व दोलीन्नीक यांच्या हाती त्याने क्रांतिकारक समितीच्या अध्यक्षांचा तारेचा कागद दिला. तात्काळ त्या स्थळी जोरात हालचाली सुरू झाल्या. खास पाळीवरची कंपनी रांगेत उभी राहिली. एक तासानंतर, 'रेवकोम'मधील सामानाने भरलेल्या गाड्या शहरातून गडगड आवाज करीत पादोल्स्क स्टेशनकडे गेल्या व ते सामान आगगाडीच्या डब्यां-मध्ये चढविण्यात आले.

तारेतला मजकूर समजताच सेर्गेई फटफटीस्वाराच्या मागे धावला.

"कॉम्रेड, तुम्ही मला स्टेशनापर्यंत न्याल?" त्याने फटफटी-स्वाराला विचारले.

"चढून बस मागं. पण घट्ट पकडून ठेव."

आंदोलन-डबा एव्हाना आगगाडीला जोडला होता. त्यापासून दहा पावलांवर असताना सेर्गेईने रीताला पाहिले. त्याने तिचे खांदे गच्च पकडले. त्याला अत्यंत प्रिय असे काहीतरी तो आता लौकरच गमावणार होता याची जाणीव होऊन

तो अस्पष्टपणे पुटपुटला : "प्रिय कॉम्रेड रीता, तुझा निरोप घ्यायला आलोय ! कधी ना कधी भेटू ! मला विसरू नकोस !"

अश्रूंनी त्याचा गळा दाटला होता याची जाणीव होताच तो हादरला. त्याला तेथून जाणे आवश्यक होते. आपल्या आवाजावर त्याचा विश्वास राहिला नव्हता, म्हणून दुखेपर्यंत तो तिचा हात हलवीत राहिला.

सकाळच्या प्रहरी शहर आणि स्टेशन उजाड दिसत होते. शेवटच्या आगगाडीने जणू निरोप घेण्याच्या इराद्याने शिट्टी वाजवली आणि ती स्टेशनातून हलली. पाठीमागे राहिलेल्या बटालियनच्या सैनिकांनी रुळांच्या दोन्ही अंगांना मोर्चे धरले. झाडांवरची पिवळी पाने भिरभिरत खाली पडत होती आणि झाडांच्या फांद्या उघड्या बोडक्या दिसत होत्या. खाली पडलेल्या पानांना वाऱ्याचा झोत गोळा करून रस्त्यांवर त्यांची उधळण करीत होता.

सेर्गेईने लाल सेनेचा मोठा पायघोळ कोट अंगात चढविला होता, त्याच्या खांद्यांवर काडतुसांचे कॅनव्हासचे पट्टे लटकत होते आणि डझनभर लाल सैनिकांबरोबर तो साखर कारखान्याच्या समोरच्या क्रॉसिंगपाशी मोर्चा धरून उभा होता. पोलिश सैन्य जवळ येत होते.

आवतोनोम प्येत्रोविचने आपला शेजारी गेरासिम लेओन्त्ये-विचच्या दारावर टिचक्या वाजविल्या. अजून कपडे अंगात न घातलेल्या गेरासिमने दाराच्या फटीतूनच मुंडके बाहेर काढले.

"काय झालं?"

रस्त्यावरून जाणाऱ्या लाल सैनिकांकडे आवतोनोम प्येत्रोविचने बोट दाखवून इशारा केला आणि डोळा मारला: "ते निघून चाललेत."

गेरासिम लेओन्त्येविचने त्याच्याकडे काळजीच्या नजरेने पाहिले: "पोलिश लोकांचा झेंडा कसा आहे? तुम्हाला माहीत आहे?"

"मला वाटतं एका डोक्याचा गरुड."

"आता कुठं सापडायचा तो?"

पाचावर धारण बसलेल्या आवतोनोम प्येत्रोविचने कराकरा डोके खाजविले.

"या बेट्या सगळ्यांचं ठीक आहे," क्षण दोन क्षण विचार केल्यानंतर तो म्हणाला. "सरळ उठून चालायला लागतात. पण नव्या सत्तेबरोबर जुळवून घेण्यासाठी इथं आमच्या डोक्याला केवढा ताप होतो!"

मशिनगनच्या कडकडाटाने शांततेचा पडदा टराटरा फाडला. स्टेशनावर आगगाडीची शिटी वाजली व तेथूनच एक तोफ धुमली. एक भलामोठा तोफगोळा उंच हवेतून सणसणत उडाला आणि साखर कारखान्याच्या समोरच्या रस्त्यावर आदळला. रस्त्याकडेच्या झुडुपांना निळया धुराच्या ढगाने वेढले. माघार घेणाऱ्या लाल सेनेचे शिपाई मुकाट गंभीर चेहऱ्याने रस्त्यांमधून जात होते व जाता जाता वारंवार मागे वळून पहात होते.

सेर्गेईच्या गालावरून अश्रूचा एक थेंब ओघळला. चटकन त्याने तो पुसला व आपल्या बरोबरच्या लोकांनी त्याला रडताना पाहिले नाही याची खात्री करून घेण्यासाठी त्याने सभोवार भर्रकन नजर फिरवली. सेर्गेईच्या जोडीने लाकूड

कापण्याच्या गिरणीतला कामगार आन्तेक क्लपतोव्स्की चालत होता. लंबू आन्तेकच्या हाताचे बोट त्याच्या रायफलीच्या चापावर विसावले होते. आन्तेक दु:खी आणि स्वत:च्या विचारांमध्ये गढलेला दिसत होता. सेर्गेईच्या नजरेला त्याची नजर भिडली आणि तो उसळला :

"आता ते आपल्या घरच्या लोकांचा भयंकर छळ करणार. खास करून माझ्या घरच्या! कारण आम्ही पोलिश आहोत. ते म्हणतील, तुम्ही पोलिश असून पोलंडच्या सैन्याला विरोध केलात. नक्की माझ्या म्हाताऱ्याला गिरणीतून धक्के मारून ते बाहेर काढतील आणि चाबकानं त्याची पाठ फोडतील. आमच्याबरोबर ये म्हणून त्याला मी म्हटलं, पण घरच्यांना सोडून यायचा त्याला धीर झाला नाही. त्या हलकट डुकरांना भाजून काढायला माझे हात नुसते शिवशिवताहेत!" डोळ्यांवर सरकलेले पोलादी शिरस्त्राण आन्तेकने रागाने मागे सारले.

...माझ्या लाडक्या गावा, तुला अखेरचा प्रणाम! तुझ्या वेड्याबागड्या छोट्या घरांमुळं आणि वेड्यावाकड्या रस्त्यांमुळं तू कितीही विद्रूप आणि घाण दिसत असलास, तरी तू मला आवडत होतास. सग्यासोयऱ्यांनो, तुम्हाला अखेरचा दंडवत. भूमिगत राहून काम करायला मागं राहिलेल्या वाल्या आणि दोस्तमंडळींना माझा प्रणाम. अत्यंत क्रूर, निर्दय अशा पोलिश श्वेतरक्षक सेना जवळ येऊन ठेपल्यात.

तेलाचे डाग पडलेले सदरे अंगात घातलेले रेलकामगार जाणाऱ्या लाल सैनिकांकडे खिन्न नजरांनी पहात होते.

"कॉम्रेडहो, आम्ही परत येऊ!" दुखऱ्या अंत:करणाने सेर्गेईने आरोळी दिली.

प्रकरण आठवे

सकाळच्या पहिल्या प्रहरीच्या धुक्यातून नदीचे पाणी अंधुक चमकते आहे. किनाऱ्यांनजीकच्या गुळगुळीत गोटयांवर हलकेच आपटताना त्या पाण्याचा गुडगुड असा आवाज होतोय. किनाऱ्यांनजीकच्या उथळ पात्रात नदी अगदी शांत भासतेय, तिचा रूपेरी पृष्ठभाग मुळीच विस्कटलेला दिसत नाही. पण नदीच्या मधल्या पात्रातले पाणी मात्र काळसर आणि चलविचल दिसतेय. पाण्याचा प्रवाह वेगाने पुढे धावतोय. हीच ती भव्य नीपर नदी! गोगलने अजरामर केलेली! पाण्याच्या प्रचंड प्रवाहापुढे एखादा पर्वत एकदम थबकलेला असावा तसा नदीचा उंच उजवा किनारा पाण्यापर्यंत थेट उतरत गेला आहे. वसंतामधील पुरानंतर पाणी ओसरून गेल्यावर उरलेले वाळूचे पट्टे खालच्या सपाट डाव्या किनाऱ्याला आच्छादून राहिले आहेत.

नदीकिनाऱ्याच्या जवळच खणलेल्या एका छोटयाशा खंदकात चपटया नाकाच्या 'माक्सिम' मशिनगनशेजारी पाच माणसे पहुडली आहेत. सातव्या रायफल डिव्हिजनची ही आघाडी-वरची 'चौकी' होती. त्या मशिनगनपासून सर्वांत जवळ आणि नदीकडे तोंड करून सेर्गेई ब्रुझ्झाक पहुडला होता.

अखंड लढायांनी थकून जाऊन व पोलिश तोफखान्याच्या झंझावाती भडिमारापुढे टिकाव धरणे अशक्य झाल्याने, परवाच्या दिवशी त्यांना कीव्ह सोडावे लागले होते. नदीच्या डाव्या किनाऱ्यापर्यंत त्यांनी माघार घेतली होती व तेथे खंदक खणून मुक्काम ठोकला होता.

माघार, प्रचंड हानी आणि अखेरीस कीव्हची शत्रूपुढे

शरणागती, या गोष्टींमुळे त्या लोकांना जबरदस्त धक्का बसला होता. शत्रूच्या वेढ्यामधून शौर्याने लढून आपला मार्ग काढीत, जंगलांमधून पुढे घुसत, मालीन स्टेशनाजवळच्या रेलमार्गाशी सातवी डिव्हिजन एकदम उगवली होती आणि एका सणसणीत थपडेसरशी पोलिश सैन्याला मागे भिरकावून तिने कीव्हपर्यंत जाणारा रस्ता मोकळा करून दिला होता.

पण ते सुंदर शहर शरण गेले होते आणि लाल सेनेच्या लोकांची मान खाली गेली होती.

पोलिश सैनिकांनी लाल तुकड्यांना दार्नित्सामधून हाकून लावल्यानंतर, रेल्वे पुलाशेजारी नदीच्या डाव्या किनाऱ्यावरची एक छोटी तटबंदी व्यापली होती. पण कडव्या प्रतिहल्ल्यांमुळे त्या तटबंदीच्या पुढे एक पाऊल सरणे त्यांना अशक्य ठरले होते.

नदीच्या वाहत्या पाण्याकडे टक लावून पाहताना सेर्गेईच्या मनात आदल्या दिवशीच्या घडामोडींचा विचार येत होता.

काल दुपारच्या प्रहराला, त्याच्या तुकडीने पोलिश सैनिकांशी लढाई केली होती. काल शत्रूशी त्याने प्रथमच हात-घाईची लढाई केली. फ्रेंच बनावटीचे तलवारीसारख्या लांब पात्याचे बागनेट बंदुकीच्या पुढे लावलेला एक तरुण पोलिश सैनिक त्याच्या अंगावर त्वेषाने धावून आला होता. काहीतरी न समजणाऱ्या आरोळ्या ठोकत, सेर्गेईसमोर सशासारख्या उड्या मारीत तो झेपावला. क्षणभरच त्याचे डोळे उन्मादाने विस्फारलेले सेर्गेईने पाहिले. दुसऱ्याच क्षणी सेर्गेईचे बागनेट त्या पोल सैनिकाच्या बागनेटावर जोराने आपटले आणि ते चकचकते फ्रेंच पाते बाजूला सारले गेले. तो पोल पडला...

सेर्गेईचा हात मुळीच अडखळला नाही. त्याला माहीत

होते की शत्रूला ठार मारीत जाणे आवश्यक होते. होय, त्याच सेर्गेईला हे कर्म करणे भाग होते जो हळुवार प्रेम करू शकत होता, निष्ठावंत मैत्रीला समर्थ होता. स्वभावाने तो दुष्ट किंवा क्रूर नव्हता. पण जगातील परपुष्ट बांडगुळांनी पाशवी द्वेषाचा उन्माद भरवून त्याच्या मायभूमीविरुद्ध पाठविलेल्या त्या पथभ्रष्ट सैनिकांविरुद्ध लढणे त्याला भाग होते. आणि माणसे माणसांना इतःपर ठार मारणार नाहीत असा दिवस लौकर उजाडावा म्हणून सेर्गेई अशा लोकांना ठार मारणार होता.

परमोनोवने त्याच्या खांद्यावर हळूच चापट मारीत म्हटले: "सेर्गेई, आपण पुढं चालणं बरं! नाहीतर आपण त्यांच्या तावडीत सापडू."

आता सुमारे वर्षभर पावेल कोर्चागिन आपल्या मायभूमीचा उभा-आडवा प्रवास करीत होता. कधी मशिनगनच्या गाड्यां-वरून आणि दारूगोळयाच्या पेटाऱ्यांवरून, तर कधी कानाला कातरा पडलेल्या एका छोट्या करड्या रंगाच्या घोडीच्या पाठीवर स्वार होऊन. आता तो मोठा बाप्या बनला होता. कष्ट आणि यातना सोसून समजदार व कणखर बनला होता. अवजड काडतुसाचा पट्टा घासून मऊ कातडीला पार हाडापर्यंत झालेली जखम केव्हाच भरून आली होती व त्याच्या खांद्यावरच्या रायफलच्या पट्ट्याखाली एक जाड घट्टा पडला होता.

त्या वर्षातल्या भयानक घडामोडींपैकी खूप काही पावेलने पाहिले होते. त्याच्यासारख्याच फाटक्यातुटक्या कपड्यातील, पण आपल्या वर्गाच्या सत्तेसाठी लढायला अजिंक्य निर्धाराने पेटलेल्या हजारो लढवय्यांबरोबर, आपल्या मायभूमीच्या एका

टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत त्याने मजला मारल्या होत्या. फक्त दोनदाच झंझावात त्याच्याविना वाहिला होता. पहिल्या वेळी कमरेखाली मागच्या भागात जेव्हा तो जखमी झाला होता तेव्हा आणि दुसऱ्यांदा, १९२० च्या फेब्रुवारीच्या कडाक्याच्या थंडीत विषमाच्या तापाने अंगाची लाही लाही होत तो तळमळत पडला होता तेव्हा.

पोलिश मशिनगनच्या फैरींपेक्षा, विषमज्वराने बाराव्या सेनेच्या रेजिमेंटांमधील व डिव्हिजनांमधील सैनिकांचे जास्त भयानक बळी घेतले. त्यावेळी, पोलिश सेनांची प्रगती थोपवून, जवळ जवळ आख्ख्या उत्तर युक्रेनच्या उभ्या-आडव्या प्रचंड प्रदेशावर बारावी सेना लढत होती. पावेल जेव्हा आपल्या तुकडीत परतला तेव्हा आजारपणातून तो जेमतेम बरा झाला होता.

काझातीन-उमान फाटचावरच्या लोहमार्गावरचे फ्रन्तोवका स्टेशन आत्ता ह्या तुकडीच्या ताब्यात होते. फ्रन्तोवका ऐन जंगलात वसले होते. स्टेशनची एक लहान इमारत आणि इमारतीभोवती उध्वस्त झालेल्या व ओस पडलेल्या काही झोपडचा, एवढेच तेथे होते. तीन वर्षे चाललेल्या अखंड लढायां-मुळे ह्या भागांमध्ये नागरी जीवन अशक्य ठरले होते. फ्रन्तोवकाचा ताबा अनेकवेळा वेगवेगळया पक्षांकडे आळीपाळीने गेला होता.

मोठ्या घडामोडींची पुन्हा चाहूल लागत होती. बाराव्या सेनेतील सैनिक कमालीचे शिणून गेले होते, थोडे विस्कळीतही झाले होते आणि पोलिश सैन्याच्या रेटच्रापुढे दबून कीव्हकडे माघार घेत होते, अशा वेळेला विजयोन्मादाने मस्त झिंगलेल्या

पोलिश श्वेतरक्षकांवर वज्राघात करण्यासाठी कामगारवर्गीय प्रजासत्ताक आपल्या फौजा एकवटत होते.

लढाईत मुरलेल्या पहिल्या घोडदळ सेनेच्या डिव्हिजना पार उत्तर कॉकेशसपासून युक्रेनपर्यंत हलविल्या जात होत्या. लष्करी इतिहासात ही मोहीम अतुलनीय होती. उमान प्रदेशामध्ये चौथी, सहावी, अकरावी आणि चौदावी, अशा घोडदळ डिव्हिजना एका पाठोपाठ एक येऊन थडकत होत्या. युद्ध-आघाडीच्या मागील भागात त्या एकवटत होत्या आणि निर्णायक लढायांच्या प्रदेशाकडे जाताना वाटेवर माखनो दरोडेखोरांचा समाचार घेत होत्या.

सोडेसोळा हजार तलवारी आणि साडेसोळा हजार योद्धे स्तेपच्या रणरणत्या उन्हात भाजून निघत होते.

सध्याच्या क्षणाला ह्या वज्रप्रहाराला शत्रूने खोटे पाडू नये हीच लाल सेनेच्या सरसेनापतींची आणि नैर्ऋत्य आघाडी-वरील सेनाप्रमुखाची मुख्य चिंता होती. ही प्रचंड घोडदळ सेना यशस्वीपणे एकवटण्यासाठी सारे काही केले जात होते.

उमान क्षेत्रामधील प्रत्यक्ष कारवाया थांबविण्यात आल्या होत्या. मॉस्कोपासून खार्कोवच्या मुख्य लष्करी ठाण्यापर्यंतच्या थेट संदेशाच्या तारा व खार्कोवपासून पुढे चौदाव्या आणि बाराव्या सेनांच्या मुख्य ठाण्यांमधील संदेशवाहक तारा अखंड घुमत होत्या. संदेशवाहक सांकेतिक हुकूम कडकट्ट कडकट्ट वाजवीत होते: "घोडदळ सेनेच्या एकवटण्यापासून पोल सेनेचे लक्ष दुसरीकडे वळवा." जेव्हा पोलिश सैन्याच्या मुसंडीमुळे बुद्योन्नी घोडदळ डिव्हिजना लढाईत गुंतण्याचा धोका निर्माण झाला, तेव्हाच फक्त शत्रूला प्रत्यक्ष लढाईत झुंजत ठेवण्यात आले.

छावणीतील शेकोटीच्या लालभडक ज्वाला लवलवत होत्या. आगीमधून धुराची काळी वेटोळी वर उठत होती आणि पिसाळलेल्या चिलटांच्या थव्यांना पळवून लावत होती. शेकोटीभोवती अर्धवर्तुळात माणसे पहुडली होती आणि आगीच्या प्रकाशामुळे त्यांचे चेहरे तांब्याप्रमाणे चमकत होते. निळसर करड्या राखेमध्ये ठेवलेल्या ॲल्युमिनियमच्या भांड्यांमधील पाणी उकळून त्याला बुडबुडे येत होते.

एका जळक्या ओंडक्यामधून अचानक एक ज्वाला उमटली आणि कुणाच्यातरी विस्कटलेल्या केसांना चाटून गेली. त्या माणसाने चटकन आपले डोके बाजूला केले आणि तो गुर-गुरला : "थुत् च्यायला!" शेकोटीभोवतालच्या माणसांमधून हसण्याची एक लाट उसळली.

"हे पोरगं पुस्तकं वाचण्यात एवढं रमलंय की त्याला आगीचं भान नाही," कोरीव मिशांचा एक मध्यमवयीन सैनिक आपल्या दमदार आवाजात उद्गारला. आगीच्या उजेडात आपल्या रायफलीच्या नळीची पाहणी करण्यात तो थोड्या वेळापूर्वी गुंतला होता.

"कोर्चागिन, तू काय वाचतोयस ते आम्हाला पण सांग ना!" कुणीतरी सुचविले.

त्या तरुण लाल सैनिकाने आपल्या होरपळलेल्या केसाच्या बटांमधून बोटे फिरविली आणि स्मित केले.

"कॉम्रेड अन्द्रोश्चूक, खरंच फार छान पुस्तक आहे. एक क्षणभरही सोडावंसं वाटत नाही."

"कशाबद्दल आहे?" आपल्या बटव्याचा पट्टा दुरुस्त करण्यात गुंतलेल्या, कोर्चागिनच्या शेजारीच बसलेल्या एका नकट्या मुलाने विचारले. त्याने जाडाभरडा दोरा दाताने तोडला,

उरलेला सुईभोवती गुंडाळला आणि शिरस्त्राणाच्या आत सुई खोवून ठेवीत तो पुढे म्हणाला, "जर प्रेमाबद्दल त्यात काही असेल तर ऐकायला मजा येईल!"

त्याच्या ह्या बोलण्यावर एक जोरदार हशा उमटला. डोक्यासरशी बारीक केस कापलेल्या मात्वेईचूकने मान वर केली आणि त्या नकट्या पोराकडे पाहून हळूच डोळा मारला: "प्रेम ही फार चांगली गोष्ट आहे सेरेदा," तो म्हणाला. "आणि तू तर चिकणा पोरगा आहेस! अगदी चित्रातल्या-सारखा! जिथं जिथं जातोस तिथं तिथं पोरी तुझ्यामागं एवढ्या धावतात, की बिचाऱ्यांचे जोडे झिजून जातात. पण तुझ्यासारख्या देखण्या माणसाला एक दृष्ट लागलीय गड्या! नाकाऐवजी तुला पाच कोपेकचं नाणं बसवलंय. पण ही चूक सुधारणं अगदी सोप्पं आहे. रात्रभर नाकाच्या शेंड्याला नोवीत्स्की दहा पौंडी* अडकवून ठेव, सकाळी सगळं ठाकठीक होईल!"

ह्या विनोदानंतर एवढा जोरदार हशा पिकला की, मशिनगनच्या गाड्यांना बांधलेले घोडे घाबरून खिंकाळले.

सेरेदाने शांतपणे मान फिरवून कटाक्ष टाकीत म्हटले: "तुमच्या चेहऱ्यापेक्षा तुमच्या इथं काय आहे ते महत्त्वाचं असतं." त्यानें आपल्या कपाळावर टिचक्या मारून दाखविल्या. "आता तुझीच गोष्ट घे, खाजकुयलीसारखी झोंबणारी

---

*नोवीत्स्की हातबाँब सुमारे चार किलो वजनाचा असतो आणि काटेरी तारांचा अडथळा नष्ट करायला तो वापरतात.
—अनु.

जीभ तुझ्यापाशी आहे, पण गाढवापेक्षा तुझी लायकी जास्त नाही. आणि तुझे कान अगदी गारठणक आहेत."

"पोरांनो, उगीच कशाला एकमेकांना चावता?" एकमेकांच्या अंगावर धावून जाण्याच्या पवित्र्यात असलेल्या त्या दोघांना आवरीत विभागीय कमांडर तातारिनोव यांनी म्हटले. "त्यापेक्षा त्या पुस्तकात खरंच काही चांगलं असेल तर कोर्चागिनला मोठ्यानं वाचू दे आणि आपण सारे ऐकू."

"बरोबर, बरोबर. वाच रे पाव्लुश्का!" चारी बाजूंनी लोकांनी आग्रह केला.

पावेलने खोगीर शेकोटीच्या आणखी जवळ सरकवले, त्यावर तो व्यवस्थित रेलून बसला आणि गुडघ्यावरचे छोटे जाड पुस्तक त्याने उघडले.

"कॉम्रेडांनो, ह्या पुस्तकाचं नांव आहे 'गोमाशी'! बटालियनच्या कमिस्सारनी मला दिलं. फार छान पुस्तक आहे. जर तुम्ही शांतपणं बसणार असाल तर मी वाचून दाखवतो!"

"लगाव बत्ती! आम्ही सगळेजण ऐकतोय."

थोड्या वेळानंतर रेजिमेंटचे कमांडर पुझीरेव्स्की आपल्या कमिस्सारबरोबर शेकोटीच्या ठिकाणी घोड्यावरून आले तेव्हा त्यांचे आगमन कुणाच्याही लक्षात आले नाही. अकरा डोळ्यांच्या जोड्या वाचकावर खिळल्याचे त्यांनी पाहिले. कमिस्सारकडे वळून ते म्हणाले:

"ह्या इथं रेजिमेंटचे निम्मे टेहळे आहेत. त्यांच्यातले चौघे अगदी तरुण कम्सामोल सभासद आहेत. पण ते सगळे पटाईत सैनिक आहेत. जो वाचतोय त्याचं नांव कोर्चागिन आणि लांडग्याच्या पोरासारखे भेदक डोळे असलेला तो पलि-



कडचा झार्कीय. ते मित्र आहेत, पण त्या दोघात नेहमी चुरस लागते. कोर्चागिन हा माझा पूर्वी सर्वांत उत्तम टेहळ्या होता. आता त्याला जबरदस्त प्रतिस्पर्धी निर्माण झालाय. सध्या ते राजकीय कार्य करतात आणि फार चांगल्या रीतीनं करतात. या पोरांना 'तरुण रक्षक' म्हणून ओळखतात असं मी ऐकलं. मला वाटतं, हे नांव त्यांना शोभतं!"

"तो वाचतोय तो राजकीय शिक्षक?"

"नाही. क्रामेर राजकीय शिक्षक आहे." पुझीरेव्स्कींनी आपल्या घोड्याला टाच मारून पुढे आणले.

"रामराम मंडळी!" त्यांनी सर्वांना अभिवादन केले. घोड्यावरून हलकेच खाली उडी मारून त्या घोळक्याच्या दिशेने येणाऱ्या कमांडरांकडे सर्वांच्या माना वळल्या.

"काय मित्रांनो, शेक घेताय वाटतं?" मोकळेपणी हसत ते म्हणाले. त्यांच्या कणखर चेहऱ्यावरच्या किंचित मंगोली थाटाच्या बारिक डोळ्यांमधील कठोरपणा एकदम विरला होता. आपल्या जिवाभावाच्या मित्राप्रमाणे सर्वांनी कमांडरांचे स्वागत केले. कमिस्सार मात्र घोड्यावरून खाली उतरले नाही. त्यांना पुढे जायचे होते.

पिस्तुलाची चामड्याची पिशवी बाजूला सरकवीत पुझीरेव्स्की कोर्चागिनच्या शेजारी बसले.

"थोड्या बिड्या ओढू या का? माझ्यापाशी मस्त तंबाखू आहे." ते म्हणाले.

कागदामध्ये तंबाखू घालून त्यांनी सिगारेट वळली व ती पेटवून ते कमिस्सारना म्हणाले: "दोरोनिन, तुम्ही चला पुढं. मी थोडा वेळ इथं थांबतो. मुख्य ठाण्यावर माझी गरज लागली तर मला कळवा."

दोरोनिन निघून गेल्यानंतर कोर्चागिनकडे वळून पुझीरेव्स्की म्हणाले, "वाच पुढं. मला सुद्धा ऐकायचंय."

पावेलने अखेरपर्यंत वाचले, पुस्तक आपल्या गुडघ्यांवर ठेवले आणि शेकोटीतल्या आगीकडे तो विचारमग्न होऊन पहात राहिला. काही क्षण कुणीच बोलले नाही. गोमाशीच्या नायकाच्या शोकांतिक दैवाचे सर्वांनाच दुःख झाले होते. चर्चा सुरू होण्याची वाट पहात पुझीरेव्स्की सिगारेटी फुंकत राहिले.

"फार गंभीर गोष्ट आहे," शांततेचा भंग करीत सेरेदा म्हणाला. "मला वाटतं, अशी माणसं जगात आहेत. त्या नायकानं जे केलं तसं करू शकणारी फारशी माणसं नाहीत. पण कशासाठी लढायचं याची माणसाला कल्पना असते तेव्हा तो काय वाट्टेल ती संकटं सोसू शकतो," आवेगाने सेरेदा म्हणाला. त्या पुस्तकाचा त्याच्यावर जबरदस्त परिणाम झाल्याचे उघडपणे दिसत होते.

"त्याच्या नरडीवर क्रूस रेटून धरायचा प्रयत्न करणारा तो पाद्री माझ्या तावडीत सापडला, तर त्या डुकराला जागच्या जागी खलास करीन!" बेलाया त्सेर्कोव येथील चांभाराच्या मदतनीसाचे काम पूर्वी करणारा आन्द्रयूशा फोमिचेव संतापाने उद्गारला.

काठीने एक भांडे आगीच्या जवळ ढकलीत अन्द्रोश्चूक ठाम सुरात म्हणाला, "कसल्यातरी ध्येयासाठी मरायचं असेल तर माणसाला मरण पत्करायला काही वाटत नाही. ते ध्येय माणसाला ताकद देतं. आपलं बरोबर आहे याची खात्री असते तेव्हा माणसाला मरायची खंत वाटत नाही. वीर असेच जन्माला येतात. परायका नांवाचा एक पोरगा माझ्या माहि-

तीचा होता. अदेस्सात श्वेतरक्षकांनी त्याची कोंडी केली तेव्हा त्यानं एकट्यानं आख्ख्या पलटणीशी सामना दिला आणि त्यांची बागनेटं त्याच्या शरीरात खुपसली जायच्या आतच त्यानं हातबाँब उडवून स्वतःसकट त्या सर्वांचा निकाल लावला. नसा वरवर पहायला काही खास नव्हता. पुस्तकात वर्णन करतात त्या नायकासारखा मुळीच नव्हता. पण तरीही त्याच्या-बद्दल पुस्तक लिहावं अशा लायकीचा तो आहे. आपल्यात अशी खूप पोरं सापडतील."

भाड्यातले द्रव त्याने चमच्याने ढवळले, ओठ मुरडून त्याची चव घेतली आणि तो पुढे बोलू लागला:

"काहीजणं अगदी कुत्र्याच्या मोलानं मरतात. अगदी हीन, लाजिरवाणं मरण त्यांना येतं. इझ्यास्लावलच्या लढाईत काय झालं ते सांगतो. पूर्वी राजांच्या अमदानीत गोरीन नदीवर वसवलेलं ते जुनं शहर आहे. तिथं एखाद्या गढीसारखं बांधलेलं एक पोलिश चर्च होतं. तर आम्ही शहरात शिरलो आणि नागमोड्या गल्ल्यांमधून एकेकाच्या रांगेनं पुढं चाललो. लात्वि-याच्या एका कंपनीनं आमची उजवी फळी धरली होती. हमरस्त्याला आम्ही आलो तर एका घराच्या कुंपणाशी तीन जोगीर चढवलेले घोडे बांधून ठेवलेले आम्हाला दिसले. अरे वा, आम्हाला वाटलं! आता काही पोल आमच्या तावडीत सापडणार! आमच्यापैकी जवळ जवळ दहाजण आवारात धावले. त्या लात्वियाच्या कंपनीचा कमांडर हातात मॉसर पिस्तूल नाचवीत आमच्यापुढे धावत होता.

"पुढचं दार उघडं होतं. आम्ही आत धावलो. पण पोलिश सैनिकांऐवजी आम्हाला तिथं आमचीच माणसं सापडली. ते गस्तीचे घोडेस्वार होते. ते आमच्या आधीच तिथं

आले होते. तिथं जे काही दृश्य आम्ही पाहिलं ते चांगलं नव्हतं. तिथं राहिलेल्या पोलिश अधिकाऱ्याच्या बायकोची अब्रू लुटायचा ते प्रयत्न करीत होते. तो प्रकार त्या लातिश अधिकाऱ्यानं पाहताच आपल्या मायभाषेत तो काहीतरी ओरडला. त्याच्या लोकांनी त्या तिघा गस्तवाल्यांना पकडलं आणि बाहेर खेचत आणलं. आम्ही फक्त दोनच रशियन तिथं होतो, बाकी सारे लातिश होते. त्यांच्या कमांडरचं नांव होतं ब्रेदीस. त्यांची भाषा मला समजत नाही, पण त्या तिघांचा निकाल लावायचा हुकूम त्यानं दिला होता, एवढं मात्र मला समजलं. हे लातिश फार कडवे असतात. जरासुद्धा डळमळत नाहीत. त्यांनी त्या तिघांना तबेल्यात ओढत आणलं. त्यांची शंभरी भरलेली मला दिसत होती. त्यांच्यातला एक धिप्पाड देहाचा, विटकरीसारख्या थोबाडाचा माणूस सुटायची धडपड आकांतानं करत होता. एका रांडेपायी ऱ्याला ते ठार मारू शकत नाहीत, असं तो ओरडत होता. दुसरे दोघेही दयेची याचना करत होते.

"मला दरदरून घाम फुटला होता. ब्रेदीसपाशी धावत जाऊन मी म्हणालो: 'कॉम्रेड कंपनी कमांडर, कोर्टापुढं त्यांचा खटला होऊं दे. त्यांच्या रक्तानं तुमचे हात कशाला बरबटून घेता? अजून शहरातल्या चकमकी थांबलेल्या नाहीत, आणि ह्या घाणीला चिवडीत आपण आपला वेळ वाया घालवतोय.' तो गर्रकन माझ्याकडं वळला. त्याचे डोळे वाघासारखे चमकत होते. खरं सांगतो, मी जे काही बडबडलो होतो त्याचा मला पश्चात्ताप झाला होता. त्यानं सरळ आपलं पिस्तूल माझ्यावर रोखलं. सात वर्षं मी लढतोय, पण त्या क्षणाला मी विलक्षण घाबरलो होतो हे कबूल करतो. सरळ

गोळी घालण्याचा त्याचा पवित्रा मला स्पष्ट दिसत होता. चुकीच्या रशियन भाषेत तो माझ्यावर खेकसला. त्यामुळं तो काय म्हणाला ते मला नीटसं कळलंच नाही. तो म्हणत होता: 'आमची पताका आमच्या रक्तानं रंगवलेली आहे. ही माणसं सगळ्या सैन्याला शरम आणताहेत. गुंडगिरीला एकच शासन: मरण!'

"तो सारा प्रकार सहन करणं माझ्या आवाक्याबाहेर गेलं आणि जास्तीत जास्त वेगानं मी त्या कुंपणातून धावत रस्त्यावर गेलो. माघारी त्यांना गोळ्या घातल्याचे आवाज मी ऐकले. ते तिघे ठार झाल्याचं मला समजलं. इतरांना आम्ही जाऊन मिळेपर्यंत शहर आमच्या ताब्यात आलं होतं.

"ते तिघं ज्या पद्धतीनं मेले त्याला मी कुत्र्याचं मरण म्हणतो. मेलीतोपोलला आम्हाला येऊन सामील झालेल्या सैन्यातले ते गस्तीचे लोक होते. एकेकाळी ते माखनोबरोबर होते. अगदी मवाली होते."

अन्द्रोश्चूकने चहाचे भांडे आपल्याजवळ ओढले व पावाची पिशवी उघडायला सुरुवात केली.

"आपल्या बाजूच्या लोकांमध्येही काही वेळा असा गाळ सापडतो. प्रत्येकाला तुम्ही जबाबदार राहू शकत नाही. वर वर पाहता ते सारे क्रांतीच्या बाजूनं असतात. आणि त्यांच्या-मुळंच आपण बदनाम होतो. पण ते पाहताना फार त्रास झाला. अजून विसरायला होत नाही," चहाचे घुटके घेत त्याने आपले बोलणे संपविले.

छावणीतील लोक झोपले तेव्हा बरीच रात्र सरली होती. सेरेदाचे शिळेसारखे वाजणारे घोरणे त्या शांततेत घुमत होते. खोगीरावर डोके टेकवून पुझीरेव्स्की झोपले होते. राजकीय

शिक्षक क्रामेर आपल्या नोंदवहीत काहीतरी खरडत बसला होता.

दुसऱ्या दिवशी टेहळणीवरून परत आल्यानंतर पावेलने आपला घोडा झाडाला बांधला आणि क्रामेरला त्याने हाक घातली. क्रामेर नुकताच चहा पिऊन बसला होता.

"ए क्रामेर, मी पहिल्या घोडदळ सेनेत बदली करून घेतली तर चालेल काय? त्यांच्या एकूण हालचालींवरून त्यांचा काहीतरी फार मोठा बेत दिसतोय. एवढी मोठी जमवा-जमव त्यांनी उगीच केली नसणार, होय की नाही? आणि आपल्याला इथं बसून माशा माराव्या लागणार!"

क्रामेरने चकित होऊन त्याच्याकडे पाहिले.

"बदली करणार? सिनेमा थिएटरातल्या खुर्च्या बदलाव्या त्याप्रमाणं सैन्यातल्या तुकड्या बदलता येतात असं तुला वाटलं काय?"

"पण माणूस कुठं लढतोय यावरून काय मोठासा फरक पडतो?" पावेलने प्रश्न केला. "मी काही पिछाडीला पळून चाललो नाही, चाललोय?"

पण क्रामेरचा पावेलच्या कल्पनेला अगदी सरळ सरळ विरोध होता.

"पण शिस्तीचं काय? पावेल, तसा तू वाईट पोरगा नाहीस, पण काही बाबतीत तू थोडा बंडखोर आहेस. तुला हवं त्याप्रमाणं वागता येईल असं वाटतं तुला? पक्ष आणि कम्सामोल कडक शिस्तीवर आधारलेले आहेत हे तू विसरतोस. प्रथम पक्षाचा विचार केला पाहिजे. आणि आपल्यातल्या प्रत्येकानं जिथं आपली अत्यंत गरज आहे तिथं असलं पाहिजे. जिथं आपल्याला आवडेल तिथं नव्हे!

पुझीरेव्स्कींनी तुझा बदलीचा अर्ज फेटाळला की नाही? तुला उत्तर मिळालंय!"

क्रामेर एवढ्या क्षोभाने बोलला की, त्याला जोरदार खोकल्याची ढास लागली. हा उंच, हाडकुळा माणूस व्यवसायाने मुद्रक होता व शिसाची धूळ त्याच्या फुफ्फुसांमध्ये खोलवर पोचली होती. अधूनमधून लालबुंद होणारा त्याचा चेहरा त्याच्या ढासळलेल्या प्रकृतीची साक्ष देत असे.

त्याची खोकल्याची उबळ जेव्हा कमी झाली तेव्हा पावेल अत्यंत खालच्या पण खंबीर आवाजात त्याला म्हणाला:

"ते सारं ठीक आहे. पण तरीही मी बुद्योन्नींच्या सैन्यात जाणार हे पक्कं!"

दुसऱ्या दिवशी संध्याकाळी छावणीवरील शेकोटीभोवती पावेल नव्हता.

शेजारच्याच खेड्यात एका शाळेच्या इमारतीसमोरील टेकाडावर, बुद्योन्नींच्या घोडेस्वारांचा एक गट मोठ्या गोलाकारात बसला होता. टोपी डोक्याच्या मागील बाजूस सरकवून मशिनगनच्या गाडीच्या मागे बसलेला एक धिप्पाड सैनिक ॲकॉर्डियन वाजवीत होता. त्याच्या वेडगळ बोटांखाली ते वाद्य विलक्षण जोराने विव्हळत होते आणि लालभडक तुमानी चढवलेले घोडदळ सैनिक त्या वेड्यावाकड्या संगीताच्या तालावर वर्तुळाच्या मध्यभागी बेभानपणे 'गपाक' नाच नाचत होते.

खेड्यात नुकत्याच आलेल्या ब्रिगेडमधील सैनिकांच्या ह्या माकडचेष्टा पहायला गावातली उत्सुक मुले-मुली तोफगाडीवर आणि कुंपणावर चढून बसली होती.

"चल तोप्तालो! दाखव तुझी करामत! शाब्बास! ए बाजेवाल्या, जरा जोरानं वाजव!"

पण घोड्याचा नाल सहज वाकविणारी त्या सैनिकाची भलीमोठी बोटे वाद्याच्या पट्ट्यांवरून मात्र अगदी बेंगरूळपणे फिरत होती.

"माखनोनी अफनासीय कुल्याब्कोला टिपला हे फार वाईट झालं," उन्हात चेहरा करपलेला एक घोडदळ सैनिक खेदाने म्हणाला. "तो पोरगा काय झकास वाजवायचा ॲकॉर्डियन! आपल्या स्क्वाड्रनच्या उजव्या फळीनं तो दौडत होता. ठार झाला हे फार वाईट झालं. असा उत्तम सैनिक आणि उत्तम वादक आपल्याकडं दुसरा नव्हता!"

वर्तुळात उभ्या असलेल्या पावेलने हा शेवटचा उद्गार ऐकला. गर्दीतून वाट काढीत तो मशिनगनच्या गाडीपाशी गेला आणि ॲकॉर्डियनच्या भात्यांवर त्याने हात दाबला. संगीत एकदम विरले.

"काय पाहिजे तुला?" कपाळाला आठी घालीत ॲकॉर्डियन वादकाने त्याला विचारले.

तोप्तालो एकदम नाचायचा थांबला आणि जमावातून नापसंतीची कुजबुज उमटली: "काय भानगड उमटली तिथं?"

पावेलने वाद्य घेण्यासाठी हात पुढे करीत म्हटले, "जरा प्रयत्न करून बघतो, दे मला ॲकॉर्डियन!"

बुद्योन्नी घोडदळ सैनिकाने ह्या लाल पायदळी सैनिकाकडे एक अविश्वासाची नजर टाकली व अनिच्छेनेच वाद्याचा पट्टा खांद्यावरून खाली सरकवला.

सराईतपणे पावेलने वाद्य गुडघ्यावर धरले, त्याचे नागमोडी भाते पंख्याप्रमाणे पसरले आणि त्या ॲकॉर्डियनमधून जेवढी

उमटणे शक्य होती तेवढी धुंदफुंद संगीताच्या सुरांची उधळण केली.

अरे अरे सफरचंदा
आता जाशील कुठं?
तावडीत सापडलास ओठांच्या
मागं पळशील कुठं?

ओळखीचे सूर कानी पडताच तोप्तालोने एखाद्या प्रचंड पक्ष्याप्रमाणे हात पसरून रिंगणात झेप घेतली. अत्यंत विलक्षण गिरक्या आणि वळसे घेत तो नाचू लागला. आपल्या पोटऱ्यांवर, मांड्यांवर, गुडघ्यांवर, डोक्यावर, बुटाच्या तळव्यांवर आणि अखेरीस संगीताचा ताल पकडून आपल्या तोंडावरही हाताचे पंजे आपटू लागला.

अ‍ॅकॉर्डियनचे सूर बेभान लयीत अधिकाधिक वेगाने उमटत होते आणि अगदी दमछाक होईपर्यंत तंगड्या उडवीत तोप्तालो वर्तुळाभोवती भिरभिरत राहिला.

५ जून १९२० रोजी, अगदी थोड्या पण धुमश्चक्रीच्या झटापटीनंतर, बुद्योन्नींच्या पहिल्या घोडदळ सेनेने पोलिश सैन्याची फळी फोडली. तिसऱ्या आणि चौथ्या पोलिश सेनांमधून मुसंडी मारून जनरल सावित्स्की यांच्या आधिपत्याखालील घोडदळ ब्रिगेडचा तिने फन्ना उडविला आणि रूझीनीच्या दिशेने झपाट्याने दौड मारली.

पोलिश सेनाविभागाने घाईघाईने हल्ला चढविणारी सुसज्ज फौज एकवटली व लाल सेनेने पाडलेल्या खिंडारात तिला पाठविले. पोग्रेबीश्चे स्टेशनवरून झुंजीच्या स्थळी पाच रणगाडे धावले.

पण पोलिश सेनाधिकाऱ्यांनी जेथून हल्ला चढविण्याचे ठरविले होते त्या झारूझीत्सीला घोडदळाने वळसा घालून टाळले आणि ते एकदम पोलिश पिछाडीला पोचले.

पहिल्या घोडदळ सेनेच्या पिछाडीवर आघात करण्यासाठी जनरल कोर्नीत्स्कींची घोडदळ डिव्हिजन पोलिश सेनाविभागाने धाडली होती. पोलिश पिछाडीला रणनीतीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे असे एक ठाणे असलेल्या काझातीनच्या वाटेवर पहिली घोडदळ सेना दौडत होती असा पोलिश सेनाधिकाऱ्यांचा कयास होता. पण हा डाव टाकूनही पोलिश सैन्याच्या परिस्थितीत फारशी सुधारणा झाली नव्हती. खिंडार बुजविण्यात आणि घोडदळ सेनेला तोडण्यात जरी पोलिश सैन्याला यश मिळाले, तरी त्याच्या पिछाडीला वावरणारे लाल सेनेचे जबरदस्त सामर्थ्यवान घोडदळ त्याच्या पिछाडीच्या ठाण्यांचा नाश करून कीव्हमधील पोलिश सैन्यावर तुटून पडण्याचा धोका त्याला सतत धास्तावत होता. लाल घोडदळाच्या डिव्हिजना पुढे दौडत जात होत्या तेव्हा वाटेतील छोटे रेल्वे पूल उडवून लावीत होत्या, रेलमार्ग उखडून टाकीत होत्या व पोलिश माघारीला अडथळे आणीत होत्या.

कैद केलेल्या सैनिकांपासून जेव्हा माहिती मिळाली की, पोलिश सैन्याचे मुख्य लष्करी ठाणे झितोमीर येथे होते— प्रत्यक्षात संपूर्ण आघाडीचे मुख्य ठाणे तेथे होते,—तेव्हा झितोमीर आणि बेर्दीचेव अशी दोन्ही महत्त्वाची रेल्वे जंक्शने आणि शासकीय केंद्रे काबीज करण्याचा पहिल्या घोडदळ सेनेच्या सेनापतीने निर्णय घेतला. ७ जूनच्या पहाटे चौथी घोडदळ डिव्हिजन भरवेगाने झितोमीरकडे दौडत होती.

पूर्वी ठार झालेल्या ॲकॉर्डियनवादक कुल्याब्कोच्या जागी,

एका स्क्वाड्रनच्या उजव्या फळीला आता कोर्चागिन दौडत होता. त्याच्यासारख्या उत्तम अ‍ॅकॉर्डियनवादकाला गमावण्याची घोडदळातील लोकांची इच्छा नव्हती. म्हणून सर्वांच्या सामुदायिक विनंतीवरून पावेल कोर्चागिनला घोडदळाच्या स्क्वाड्रनमध्ये दाखल करून घेण्यात आले होते.

आपल्या फेसाळलेल्या घोड्यांना मुळीच न आवरता ते वायुवेगाने झितोमीरकडे दौडले आणि नंग्या तळपत्या तलवारींनिशी त्या शहरावर चाल करून ते निघाले होते.

घोड्यांच्या टापांखाली जमीन विव्हळत होती, घोड्यांना धापा लागल्या होत्या आणि माणसे रिकीबींमध्ये उभ्याने दौडत होती.

पायाखालची जमीन वेगाने मागे पसार झाली आणि डिव्हिजनसमोर बागांनी व उद्यानांनी बहरलेले शहर घाईघाईने भेटीला धावले. हे घोड्यावरचे सैनिक त्या बागा पार करून शहराच्या मध्यभागी एखाद्या तुटलेल्या हिमानीप्रमाणे चारी बाजूंनी कोसळले आणि प्रत्यक्ष मृत्यूइतकीच धडकी भरविणारी कठोर रणगर्जना त्यांच्या कंठांमधून उमटली.

पोल एवढे स्तंभित झाले होते की, त्यांनी फारच थोडा प्रतिकार केला. स्थानिक शिबंदीचा निःपात करण्यात आला.

घोड्याच्या मानेशी समांतर वाकून पावेल कोर्चागिन दौडत होता. त्याच्या शेजारूनच तोप्तालो आपल्या निमुळत्या पायांच्या काळ्या घोड्यावरून धावत होता. एका पोलिश सैनिकाने आपली रायफल खांद्यापर्यंत उचलण्याच्या आतच धाडसी तोप्तालोने एका अचूक घावात त्याची खांडोळी केल्याचे पावेलने पाहिले.

शहरातील फरसबंदी रस्त्यांवरून जाताना त्यांच्या घोड्यांच्या

नालबंद टापा खडखड वाजत होत्या. एका चौकाशी रस्त्याच्या मध्यभागी एक मशिनगन उभी केलेली व निळया गणवेषातील आणि काटकोनी, पोलिश टोप्यांमधील तीन लोक तिच्यावर झुकलेले त्यांना अगदी अचानक तोंडासमोर आढळले. आणखी एक चौथा सैनिकही तेथे होता. त्याच्या कॉलरवर सोनेरी फितीची वेटोळी होती आणि घोडेस्वारांवर त्याने आपले मॉसर पिस्तूल रोखले होते.

तोप्तालोला किंवा पावेलला अशा दोघांनाही आपल्या घोडयांना एकदम आवरता आले नाही. ते सरळ मशिनगनच्या दिशेने मृत्यूच्या जबडयात दौडत गेले. त्या अधिकाऱ्याने पावेलवर गोळी झाडली, पण त्याचा नेम चुकला. गोळी सणसणत पावेलच्या गालाजवळून गेली आणि दुसऱ्याच क्षणी घोडयाच्या धडकीमुळे तोल सुटून तो लेफ्टनंट धाडकन फरसबंदी रस्त्यावर उताणा आपटला आणि निपचित पडला.

त्याच क्षणाला मशिनगनमधून तुफान भडिमार सुरू झाला होता आणि डझनभर गोळया शरीरात घुसलेले तोप्तालो व त्याचा काळा घोडा खाली कोसळले होते.

पावेलचा घोडा दचकून फुरफुरत मागील पायांवर उभा राहिला आणि आपल्या स्वारासकट त्याने मशिनगनवर झुकलेल्या त्या तीन लोकांवर झेप घेतली. पावेलची तलवार हवेत कमानदार तळपली आणि एका काटकोनी टोपीवर खाडकन आदळली.

दुसऱ्या डोक्यावर प्रहार करण्यासाठी पुन्हा एकदा तलवार हवेत उंचावली गेली, पण बेभान घोडयाने बाजूला उडी मारली.

तेवढ्यांत पर्वतप्राय लोंढ्याप्रमाणे स्क्वाड्रनमधील स्वार रस्त्यांवर धावून आले आणि अनेक तलवारी हवेत तळपू लागल्या.

तुरुंगाच्या लांबलचक अरुंद व्हरांड्यांमधून आरोळ्यांचे प्रतिध्वनी उमटत होते.

हडकुळ्या, डोळे खोल गेलेल्या स्त्री-पुरुषांनी गच्च भरलेल्या कोठड्यांमधून एकच कोलाहल माजला होता. शहरातील लढाईचे आवाज त्यांना ऐकू येत होते. याचा अर्थ मुक्तता जवळ आली होती काय? अचानक शहरावर चालून आलेली ही फौज त्यांना स्वतंत्र करणार होती काय?

तुरुंगाच्या आवारापर्यंत लढाई येऊन पोचली. व्हरांड्यां-मधून माणसे धावत आली. आणि खूप काळापासून अपेक्षित असलेले शब्द वातावरणात उमटले: "कॉम्रेडहो, तुम्ही स्वतंत्र आहात!"

छोटी खिडकी असलेल्या एका कुलुपबंद दारापाशी पावेल धावत आला. त्या खिडकीतून डझनभर डोळ्यांच्या जोड्या अपेक्षेने डोकावून पहात होत्या. पावेलने आपल्या रायफलीचा दांडा त्या कुलुपावर त्वेषाने पुन:पुन्हा मारला.

"थांब, मी बॉंबनं ते फोडतो," मीरानोव ओरडला. त्याने पावेलला बाजूला ढकलले आणि खिशातून एक हातबॉंब काढला.

"अरे मूर्खा थांब, वेड तर लागलं नाही ना तुला? आत्ता एका मिनिटात ते किल्ल्या आणतील. जी दारं आपल्याला फोडता येणार नाहीत ती किल्लीनं उघडू."

फाटक्या कपड्यांमधले, दिवसचे दिवस शरीराला पाण्याचा

स्पर्श न झालेले कैदी आपापल्या कोठड्यांमधून आनंदाने बेभान होऊन भराभरा बाहेर पडत होते तेव्हा तुरुंगातल्या पहारेकऱ्यांना पाठीला पिस्तुले टेकवून व्हरांड्यांमधून एव्हाना चालवले होते.

कोठडीचे दार सताड उघडे टाकून पावेल आत धावला.

"कॉम्रेडांनो, तुम्ही स्वतंत्र आहात! आम्ही बुद्योन्नींचे लोक आहोत—आमच्या डिव्हिजननं शहर काबीज केलंय!"

एक स्त्री रडत रडत पावेलच्या दिशेने धावली आणि त्याच्या गळ्याभोवती मिठी घालून ढसढसा रडू लागली.

पोलिश श्वेतरक्षकांनी ह्या दगडी कोंडवाड्यातील नरकात पाच हजार एकाहत्तर बोल्शेविकांना आणि लाल सेनेच्या दोन हजार राजकीय कार्यकर्त्यांना डांबून ठेवलेले होते. ह्या लोकांच्या नशिबी गोळ्या खाऊन मरणे अथवा फासावर चढणे एवढ्याच गोष्टी वाट पहात होत्या. ह्या सर्वांची सुटका करणे हे आतापर्यंत हस्तगत केलेल्या सगळ्या विजयचिन्हांपेक्षा डिव्हिजनच्या लोकांच्या दृष्टीने जास्त महत्त्वाचे होते. प्रत्यक्ष विजयापेक्षाही हे पारितोषिक जास्त मोठे होते. सात हजार क्रांतिकारकांपुढील अंधाराचा अभेद्य पडदा फाडून टाकण्यात आला होता आणि जूनमधील तळपत्या सूर्याचे त्यांना मुक्त दर्शन घडले होते.

निस्तेज पिवळी कातडी बनलेल्या एका कैद्याने अत्यानंदाने पावेलकडे धाव घेतली. शेपेतोवकाच्या छापखान्यात जुळाऱ्याचे काम करणारा तो सामुईल लेहेर होता.

आपल्या जन्मगावी घडलेली रक्तपाती शोकांतिका सामुईलच्या तोंडून पावेल जेव्हा ऐकत होता तेव्हा त्याचा

चेहरा काळवंडून गेला आणि सामुईलचे शब्द जणू शीशाचा तापला रस ओतावा त्याप्रमाणे त्याचे काळीज फाडून आत घुसत होते.

"रात्रीच्या वेळी आम्हा सर्वांना एकाच झटक्यात त्यांनी पकडलं. कुणा हरामखोरानं विश्वासघात करून लष्करी पोलिसांच्या ताब्यात आम्हाला दिलं होतं. आणि एकदा आम्ही त्यांच्या पंजात सापडल्यानंतर त्यांनी मुळीच दयामाया दाखवली नाही. पावेल, त्यांनी आम्हाला भयानक मारहाण केली. दुसऱ्यांपेक्षा मला त्रास थोडा कमी झाला, कारण पहिल्याच तडाख्यानंतर मी बेशुद्ध पडलो. पण बाकीचे माझ्यापेक्षा जास्त कणखर होते.

"लपविण्यासारखं आमच्यापाशी काही उरलंच नव्हतं. आमच्यापेक्षा पोलिसांना जास्त चांगली माहिती होती. आम्ही टाकलेल्या प्रत्येक पावलाची त्यांना माहिती होती यात आश्चर्य काहीच नव्हतं, कारण आमच्यातलाच एकजण त्यांना फितुर झाला होता! पकडलेल्यांपैकी खूप लोक तुझ्या ओळखीचे आहेत. वाल्या ब्रुझ्झाक आणि रोझा ग्रीत्स्मान—नुकतं सतरावं संपलं होतं तिला! पावेल, तिचे डोळे किती निर्मळ होते सांगू! शिवाय साशा बुनशाफ्त, तुला माहीत आहे. आमच्यातलाच एक जुळारी. मोठा आनंदी स्वभावाचा पोरगा, नेहमी मालकाची व्यंग्यचित्रं काढायचा! त्याला, नोवोसेल्स्की आणि तूझिच ह्या दोघा जिम्नाशियमच्या विद्यार्थ्यांना—कदाचित ते तुला आठवत असतील—त्यांनी पकडून नेलं. बाकीची सुद्धा गावातली किंवा जिल्हा केंद्रातली माणसं होती. एकूण एकोणतीस लोकांना पकडलं होतं—त्यात सहा बायका होत्या. त्यांचा पाशवी छळ झाला. पहिल्याच दिवशी वाल्यावर आणि

रोझावर बलात्कार झाले. त्या डुकरांनी त्या गरीब बापड्या मुलींची हरतऱ्हेनं अब्रू लुटली. त्यांना परत कोठडीत फरपटत आणून टाकलं तेव्हा त्या अर्धमेल्या झाल्या होत्या. त्यानंतर लौकरच रोझा बरळू लागली आणि काही दिवसांनी ती पूर्ण वेडी झाली.

"ती वेडी बनलीय यावर त्यांचा विश्वासच बसेना. ती वेडाचं सोंग पांघरतेय असं समजून दरवेळी प्रश्न विचारताना ते तिला निर्दयपणे मारहाण करायचे. शेवटी त्यांनी तिला गोळी घातली तेव्हाच दृश्य अगदी केविलवाणं होतं. जखमांनी तिचा सबंध चेहरा काळानिळा पडला होता, तिचे डोळे भयाण बनले होते आणि एखाद्या म्हातारीची कळा तिला आली होती.

"वाल्या ब्रुझ्झाक मात्र शेवटपर्यंत ताठ राहिली. सारेच खऱ्या वीरांसारखे मेले. ते सारं सहन करायची ताकद त्यांच्यात कुठून आली कुणास ठाऊक! पावेल, त्यांच्या मरणाचं वर्णन मी तुझ्यापाशी कोणत्या शब्दात करू? फार फार भयानक होतं.

"वाल्या सगळ्यात जास्त धोक्याचं काम करत होती. पोलिश मुख्य ठाण्यातल्या बिनतारी संदेशवाहकांशी आणि जिल्हा केंद्रातल्या आपल्या लोकांशी संपर्क असलेली ती एक होती. शिवाय त्यांनी तिच्या घराची झडती घेतली तेव्हा दोन ग्रेनेड आणि एक पिस्तूल तिथं सापडलं. ते ग्रेनेड तिला चिथावणीखोरानंच दिले होते. सारा बनाव असा काही करण्यात आला की, मुख्य ठाणं उडवून लावण्याचा त्यांचा कट होता असा पुरावा सिद्ध करता यावा.

"पावेल, त्या अखेरच्या दिवसांबद्दल बोलताना मला अत्यंत यातना होताहेत, पण तू आग्रहच करतोस म्हणून मी

तुला सांगतो. लष्करी कोर्टानं वाल्याला आणि आणखी दोघांना फाशीची शिक्षा ठोठावली, बाकीच्या सगळ्यांना गोळ्या घालण्याचा हुकूम दिला. आमच्याशी सहकार्य करणाऱ्या पोलिश सैनिकांवर दोन दिवस आधी खटला भरला होता. युद्धापूर्वी लोद्झ इथं इलेक्ट्रिशिअन म्हणून काम केलेल्या कापरल स्नेगूर्को ह्या तरुण बिनतारी संदेशवाहकावर देशद्रोहाचा आणि सैनिकांमध्ये कम्युनिस्ट प्रचार करण्याचा आरोप ठेवण्यात आला होता. त्याला गोळी घालून ठार मारण्याचा हुकूम फर्मावण्यात आला. त्याने अपील केले नाही आणि शिक्षा जाहीर झाल्यानंतर चोवीस तासांनी त्याला गोळी घालण्यात आली.

"त्याच्या खटल्याच्या वेळी पुराव्याचा साक्षीदार म्हणून वाल्याला बोलावून नेलं होतं. तिनं नंतर आम्हाला सांगितलं की, कम्युनिस्ट प्रचाराचं काम केल्याचा आरोप स्नेगूर्कोनं मान्य केला, पण देशद्रोहाच्या आरोपाचा मात्र ठाम इन्कार केला. तो म्हणाला, 'पोलिश सोविएत समाजसत्तावादी प्रजासत्ताक ही माझी पितृभूमी आहे. होय. मी पोलंडच्या कम्युनिस्ट पक्षाचा सभासद आहे. माझ्या इच्छेविरुद्ध मला सैन्यात भरती करण्यात आलं होतं. पण एकदा तिथं दाखल झाल्यावर, माझ्याप्रमाणंच जबरदस्तीनं युद्धआघाडीवर पाठवल्या गेलेल्या इतर लोकांचे डोळे उघडावेत म्हणून मी प्रयत्नांची शर्थ केली. त्यासाठी तुम्ही मला फासावर चढवू शकता, पण पितृभूमीचा द्रोही म्हणून मात्र नाही. कारण तसा मी कधीही नव्हतो आणि असणार नाही. तुमची पितृभूमी ही माझी पितृभूमी नाही. श्रीमंतांची पितृभूमी ती तुमची आहे, माझी कामगार-किसानांची पितृभूमी आहे. आणि माझ्या

भावी पितृभूमीत—ती नक्की अस्तित्वात येणार याची मला खात्री आहे—मला कुणीही कधीही द्रोही म्हणणार नाही.'

"खटल्यानंतर आम्हा सगळ्यांना एकत्र ठेवलं होतं. वधापूर्वी जरा आधी आमची तुरुंगात पाठवणी झाली. रात्रीच्या वेळी तुरुंगाच्या समोर, इस्पितळाशेजारी त्यांनी फाशीचे खांब ठोकले. गोळ्या घालून ज्यांना मारायचे होते त्यांच्यासाठी जंगलातल्या, रस्त्यापासून फारशा लांब नसलेल्या एका मोठ्या खड्ड्याजवळची जागा त्यांनी निवडली होती. म्हणजे आमच्यासाठी एक सामायिक थडगं खणलं होतं.

"शिक्षेची बातमी सबंध शहरभर ठिकठिकाणी चिकटवली होती. सर्वांना ती समजावी म्हणून. लोकांना दहशत बसावी म्हणून सार्वजनिक ठिकाणी वध करण्याचा पोल अधिकाऱ्यांनी निर्णय घेतला. अगदी सकाळपासूनच वधस्थळी शहरातल्या लोकांना जबरदस्तीने हाकलून न्यायला त्यांनी सुरुवात केली. हत्येचं दृश्य भयानक होतं तरी काहीजण मात्र उत्सुकतेपायी स्वत:च गेले होते. लौकरच तुरुंगाच्या भिंतीपाशी एक भला-मोठा जमाव गोळा झाला. आमच्या कोठडीपर्यंत त्याचा गलका ऐकू येत होता. जमावामागं रस्त्यावर त्यांनी मशिनगन लावल्या होत्या आणि आसपासच्या सर्व भागातून घोडेस्वार आणि पायदळी पोलीस आणले होते. त्यांच्या सबंध बटालियननं रस्त्यांना आणि भोवतालच्या भाजीपाल्याच्या मळ्यांना गराडा घातला होता. ज्यांना फासावर चढविण्यात येणार होतं त्यांच्यासाठी फाशीच्या खांबांशेजारीच एक खड्डा खणला होता.

"मरणाची वाट पहात आम्ही गप्प बसून होतो. अधून-मधून काही शब्दांची देवाणघेवाण घडत होती. आदल्या रात्री आम्ही सारं काही बोलून घेतलं होतं आणि एकमेकांचे

निरोप घेतले होते. एकटी रोझा तेवढी कोठडीच्या कोपऱ्यात स्वत:शीच अस्पष्ट बडबडत बसली होती. अनेकवेळच्या मारहाणींमुळं आणि बलात्कारांमुळं वाल्या एवढी अशक्त झाली होती, की तिला अजिबात हालचाल करता येत नव्हती म्हणून एका कोपऱ्यात ती स्वस्थ पडून होती. आमच्यात दोन स्थानिक कम्युनिस्ट बहिणी-बहिणी होत्या. त्यांनी एकमेकींचा अखेरचा निरोप घेताना मिठ्या मारल्या तेव्हा त्यांच्या डोळ्याचं पाणी खळेना. स्तेपानोव नांवाचा खेडेगावचा एक दांड्गा तरणा पोरगा आमच्यात होता. त्याला अटक करायला गेलेल्यांपैकी दोघा पोलिसांना त्यानं चांगलंच पाणी पाजलं होतं. तो त्या बहिणींना म्हणाला: 'कॉम्रेडांनो, डोळ्यात पाणी नको! तुम्ही पाहिजे तर इथं रडा, पण तिथं बाहेर नाही. त्या हलकट डुकरांना दुष्ट समाधान मिळेल अशी संधी द्यायची आमची अजिबात इच्छा नाही. कोणत्याही परिस्थितीत आपल्यावर दया होणार नाही. आपल्याला मेलं तर पाहिजेच, मग आपण मानानं मरू या. आपण गुडघ्यावर सरपटणार नाही. कॉम्रेडहो, लक्षात ठेवा, आपण शूरपणं मेलं पाहिजे.'

"नंतर ते आम्हाला न्यायला आले. सगळ्यात पुढं हेरांचा प्रमुख श्वारकोव्स्की होता. अगदी पिसाळलेला दुष्ट कुत्रा! जेव्हा तो स्वत: बलात्कार करत नसे तेव्हा आपले सहकारी पोलीस बलात्कार कसा करतात, ते बघायला त्याला आवडायचं! पोलिसांच्या दोन रांगांच्या मधून आम्हाला रस्त्यावरून फाशीच्या खांबांकडं चालवण्यात आलं. त्या पोलिसांच्या खांद्यांवर पिवळे गोंडे झुलायचे म्हणून आम्ही त्यांना 'पिवळे पक्षी' म्हणत असू. नंग्या तलवारी हातात धरून ते उभे होते.

"तुरुंगाच्या आवारामधून त्यांनी आम्हाला रायफलींच्या दांड्यांनी लोटत घाईघाईनं चालवलं. आम्हाला चारचारच्या रांगांमधून नेत होते. नंतर त्यांनी दरवाजे उघडले आणि फाशीच्या खांबांसमोर रस्त्यावर नेऊन उभं केलं. आमच्या कॉम्रेडना फासावर लटकावलं जात असताना आम्ही पहावं, म्हणून मुद्दाम त्यांनी असं केलं होतं. नंतर आमची मरण्याची पाळी होती. जाड ओंडक्याचे उंच खांब ठोकले होते. भक्कम दोरखंडाचे तीन गळफास क्रूसावर लोंबत होते. प्रत्येक फासाखाली लाकडाच्या एका ओंडक्यावर एक फळकूट ठेवले होते आणि तो ओंडका ढकलून बाजूला करता येईल अशी व्यवस्था केली होती. समुद्राप्रमाणं हेलकावणाऱ्या लोकांच्या प्रचंड गर्दीमधून अस्पष्ट कुजबुज उमटली. सर्वांच्या नजरा आमच्यावर खिळल्या. जमावातल्या आमच्या काही माणसांना आम्ही ओळखलं.

"काही अंतरावर एका दर्शनी दालनात पोलिश श्रीमंतांचा आणि अधिकाऱ्यांचा एक गट दुर्बीणी घेऊन उभा होता. बोल्शेविकांना फासावर लटकावीत असताना पाहण्यासाठी ते मुद्दाम आले होते.

"पायाखालचं बर्फ मऊ भुसभुशीत झालं होतं. सारं जंगल बर्फानं झाकल्यामुळं पांढरंशुभ्र दिसत होतं आणि झाडांच्या शेंड्यांवर त्याचे कापसासारखे जाड झुपके लटकत होते. भिरभिरत येणारे हिमकण मंदपणं खाली येऊन आमच्या भाजत्या चेहऱ्यांवर वितळत होते. फाशीच्या खांबांजवळच्या पायऱ्यांवर बर्फाची बिछायत पसरली होती. आमच्या अंगावर फारसे कपडे नव्हते, पण तरीही आम्हा कुणालाही थंडी वाजत नव्हती. आपण फक्त पायमोजे घालूनच चालतो आहोत याचे स्तेपानोवला भान नव्हते.

"फाशीच्या तख्ताशेजारी लष्करी वकील आणि श्रेष्ठ अधिकारी उभे होते. अखेरीस वाल्याला आणि फाशी देण्यात येणाऱ्या आणखी दोन कॉम्रेडना तुरुंगाबाहेर आणण्यात आलं. ते तिघं एकमेकांच्या हातात हात घालून चालत होते. वाल्या मध्यभागी चालत होती. तिच्यात एकटीनं चालण्याची ताकद नव्हती म्हणून बाजूच्या दोघांनी तिला आधार दिला होता. पण तरीही स्तेपानोवचे शब्द आठवून तिनं ताठ चालण्याचा आटोकाट प्रयत्न केला: 'आपण शूराप्रमाणं मरणाला मिठी घातली पाहिजे कॉम्रेडांनो!' तिच्या अंगात गरम जाकीट होतं, पण कोट नव्हता.

"ती तिघं हातात हात घालून चालत होती हे श्वार-कोव्स्कीला आवडलं नव्हतं असं स्पष्ट दिसलं, कारण तो त्यांना मागून धक्के मारत होता. वाल्या काहीतरी म्हणाली आणि एका पोलिसानं साऱ्या ताकदीनिशी तिच्या चेहऱ्यावर काडकन चाबूक फडकावला. जमावातल्या एका बाईनं मर्मभेदक किंकाळी फोडली आणि साखळी तोडून कैद्यांपर्यंत पोचण्यासाठी तिनं जिवाच्या आकांतानं रेटारेटी सुरू केली. पण तिला पकडून दूर फरफटत नेण्यात आलं. बहुधा ती वाल्याची आई असावी. फाशीच्या खांबांजवळ जाताच वाल्यानं गाणं म्हणायला सुरुवात केली. तसा आवाज मी पूर्वी कधीही ऐकला नव्हता. केवळ मरणाकडं जाणारी व्यक्तीच त्या भावनेनं गाऊ शकेल. ती 'वर्षाव्यान्का' गात होती. इतर दोघांनी तिला साथ दिली. घोड्यावरचे पहारेकरी रागाने आंधळे होऊन त्या तिघांना चाबकांनी झोडत होते. पण ती तिघं जणू त्या वेदनेच्या पलिकडं पोचली होती. त्यांना ठोसे मारून खाली पाडण्यात आलं आणि पोती फरफटत न्यावीत तसं फाशीच्या

खांबांकडं नेण्यात आलं. घाईघाईनं शिक्षेचा कागद वाचण्यात आला आणि त्यांच्या गळयांमध्ये फास अडकवण्यात आले. त्या क्षणाला आम्ही गायला सुरुवात केली :

ऊठा ऊठा भूकबंद्यांनो ऽऽ...

"चारी बाजूंनी पहारेकरी आमच्यावर धावून आले. रायफलीच्या दांडयांनी ते लाकडाचे ओंडके ढकललेले आणि त्या तीन शरीरांना फासाचा हिसका बसलेला मी जेमतेम पाहिला...

"बाकीच्या आम्हा सर्वांना एव्हाना भिंतीशी उभं केलं होतं, पण तेवढयात जाहीर करण्यात आलं की, आमच्यापैकी दहाजणांची शिक्षा कमी करून आम्हाला २० वर्षांचा कारावास देण्यात आला होता. बाकीच्या सोळाजणांना गोळया घालण्यात आल्या."

जणू काही आकडी येऊन घुसमट व्हावी त्याप्रमाणे सामुईलने आपल्या शर्टाच्या कॉलरला घट्ट पकडले होते.

"तीन दिवसपर्यंत प्रेतं फासावर लटकत होती. त्या ठिकाणी रात्रंदिवस पहारा ठेवला होता. त्यानंतर कैद्यांची एक नवी तुकडी तुरुंगात आणण्यात आली. त्यांनी आम्हाला सांगितलं की, चौथ्या दिवशी कॉम्रेड तोबोल्दिनचं प्रेत फाशीच्या दोराला सोसलं नाही आणि दोर तुटला. तोबोल्दिन त्या सर्वांत जाड होता. मग त्यांनी दुसरी दोन्ही प्रेतंही खाली उतरवली आणि सर्वांना पुरलं.

"पण फाशीचे खांब तसेच ठेवण्यात आले. आम्हाला इथं आणण्यात आलं तेव्हाही ते तसेच उभे होते. नव्या बळींची वाट पहात नवीन फास लटकावून ते उभे होते."

सामुईल गप्प झाला. त्याची नजर शून्यात कुठेतरी बघत होती. पण त्याचे कथन संपल्याचे पावेलला समजलेच नाही. एका बाजूला हिडीसपणे मान कललेली ती तीन शरीरे त्याच्या डोळ्यांसमोर मुकाटपणे हेलकावत होती.

सर्वांनी बाहेर एकत्र जमण्याचा इशारा देणारे बिगुल वाजताच पावेल दचकून भानावर आला.

"चल सामुईल," जेमतेम ऐकू जाईल अशा आवाजात तो म्हणाला.

रस्त्यावर घोडदळाचे सैनिक रांगेने उभे होते आणि पोलिश कैद्यांची तुकडी चालविण्यात येत होती. तुरुंगाच्या दरवाजांपांशी रेजिमेंटचे कमिस्सार उभे राहून आपल्या नोंदवहीवर हुकूम लिहीत होते.

कागदाचा तुकडा उंचनिंच स्क्वाड्रन कमांडरांच्या हाती देत ते म्हणाले, "कॉम्रेड अन्तीपोव, हे घ्या आणि घोडदळाच्या पहाऱ्यात ह्या कैद्यांना नोवग्राद-वोलीन्स्कीला न्या. जखमींना औषधोपचार मिळतील अशी काळजी घ्या. मग त्यांना गाड्यांमध्ये बसवा, शहरापासून सुमारे वीस वेर्स्ता न्या आणि सोडून द्या. त्यांची कटकट निस्तरायला आपल्यापाशी वेळ नाही. पण कैद्यांना वाईट वागणूक अजिबात द्यायची नाही."

घोड्यावर मांड टाकीत पावेल सामुईलला म्हणाला, "ऐकलंस? ते आमच्या लोकांना फासावर लटकावतात. पण आम्ही मात्र त्यांना सुरक्षित त्यांच्या लोकांमध्ये नेऊन पोचवायचं! शिवाय चांगलं वागवायचं! कसं करू शकणार आम्ही?"

रेजिमेंटचे कमिस्सार गर्रकन वळले आणि वरील शब्द

बोलणाऱ्या व्यक्तीकडे त्यांनी कठोर नजरेने पाहिले: जणू स्वत:शीच बोलल्याप्रमाणे त्यांनी काढलेले उद्गार पावेलच्या कानी आले: "नि:शस्त्र कैद्यांना क्रूरपणं वागवल्यास देहांताची शिक्षा मिळेल. आम्ही श्वेतरक्षक नाही!"

सबंध रेजिमेंटसमोर वाचून दाखविलेल्या क्रांतिकारक लष्करी-मंडळाच्या हुकुमातील शेवटचे शब्द पावेलला घोड्यावरून जात असताना आठवत होते:

"कामगार-किसानांच्या भूमीचं आपल्या लाल सेनेवर प्रेम आहे. तिला तिचा अभिमान आहे. आणि त्या सेनेच्या पताकांवर एकही डाग असणार नाही!"

"एकही डाग असणार नाही," पावेल पुटपुटला.

चौथ्या घोडदळ डिव्हिजनने ज्यावेळी झितोमीर घेतले होते, त्याचवेळी कॉम्रेड गोलीकोव यांच्या आधिपत्याखाली धडक ब्रिगेड बनलेल्या सातव्या रायफल डिव्हिजनच्या २०व्या ब्रिगेडने ओकूनिनोवो खेड्याच्या प्रदेशात नीपर नदी ओलांडली होती.

नीपर ओलांडून कीव्हकोरोस्तेन रेलमार्ग ईर्शा स्टेशनवर व्यापण्याचा हुकूम २५वी रायफल डिव्हिजन आणि बश्कीर घोडदळ ब्रिगेड यांच्या मिळून बनलेल्या सेनेला देण्यात आला होता. ह्या कारवाईमुळे, कीव्हपासून माघार घेण्याचा पोलिश अधिकाऱ्यांचा शेवटचा मार्ग तुटणार होता.

ही नदी पार करीत असताना शेपेतोवका कम्सामोल संघटनेचा मीशा लेवचुकोव ठार झाला होता. डगमगणाऱ्या नावांच्या पुलावरून ते धावत होते तेव्हा पलिकडच्या उंच तीरावरून एक तोफगोळा कुठूनतरी सणसणत आला आणि दणणदिशी

पाण्यावर आपटला. त्याच हादऱ्यात एका नावेखाली मीशाने गटांगळी खाल्ली आणि तो दिसेनासा झाला. नदीने त्याला एकदम गिळून टाकले. तो एकदा तळाशी गेला तो पुन्हा वर आलाच नाही. सोनेरी केसाचा, चिंध्या झालेली टोपी घातलेला याकीमिन्को नांवाचा सैनिक ओरडला: "मीश्का! अरे तो मीश्का बुडाला! बिच्चारा, सरळ धोंडा टाकल्यासारखा तळाला गेला!" काळ्याभोर पाण्याकडे तो एक क्षणभर भेदरल्या डोळ्यांनी टक लावून पहात राहिला. पण मागून धावत येणाऱ्या लोकांनी त्याला पुढे ढकलले: "मूर्खा, आ वासून बघत काय राहिलास? धाव पुढं!" कुणासाठीही थांबून रहायला तिथे वेळ नव्हता. नदीचा उजवा किनारा एव्हाना व्यापून बसणाऱ्यांच्या मानाने ब्रिगेड मागे पडली होती.

त्यानंतर चार दिवसांनी सेर्गेईला मीशाच्या मृत्यूची बातमी समजली. या दरम्यान ब्रिगेडने बूचा स्टेशन ताब्यात घेतले होते व कोरोस्तेनमधून फळी फोडून जाण्याचा निकराचा प्रयत्न करणाऱ्या पोलिश सेनेचे प्रखर हल्ले कीव्हच्या दिशेने वळून ती परतवून लावीत होती.

गोळीबार जेथून चालू होता तेथे सेर्गेईशेजारी याकीमेन्को धावत येऊन पालथा पडला. गेला काही वेळ तो सतत गोळ्या झाडीत होता आणि भयंकर तापलेल्या त्याच्या रायफलीचा खटका मागे खेचणे त्याला आता अवघड झाले होते. काळजी-पूर्वक आपले डोके खाली वळवून सेर्गेईला उद्देशून तो म्हणाला: "तिला थोडी विश्रांती दिली पाहिजे. निखाऱ्यासारखी भाजतेय!"

गोळीबाराच्या आवाजात त्याचे बोलणे सेर्गेईला जेमतेम ऐकू आले.

जेव्हा गोळीबार थोडासा कमी झाला तेव्हा याकीमेन्को सहजपणे उद्गारला : "तुझा कॉम्रेड झीपरमध्ये बुडाला! मी काही प्रयत्न करण्याआधीच तो तळाला पोचला!" बस्स, तो एवढेच म्हणाला. त्याने आपल्या रायफलीचा खटका पुन्हा एकदा चाचपून पाहिला व काडतुसे ठासण्यास सुरुवात केली.

बेर्दिचेव काबीज करण्यासाठी पाठवलेल्या अकराव्या डिव्हिजनला पोलिश सैन्याकडून कडवा प्रतिकार झाला.

शहराच्या रस्त्या-रस्त्यावरून रक्ताचे पाट वाहिले. मशिन-गनच्या भडिमारामधून लाल घोडदळाने पुढची वाट काढली. अखेरीस शहर ताब्यात आले व पराभूत पोलिश सैन्याचे उरलेले सैनिक पळून गेले. रेल्वे यार्डातल्या आगगाड्या जशाच्या तशा ताब्यात आल्या. पण पोलिश सैन्याची एक फार मोठी हानी झाली. सबंध युद्धआघाडीला पुरवठा करणाऱ्या दारूगोळ्याच्या साठ्याचा स्फोट झाला. दशलक्षावधी तोफगोळे आकाशात उडाले. त्या स्फोटाने घरांच्या खिडक्यांच्या तावदानांच्या काचांचा भुगा झाला आणि कार्डबोर्डाची घरे असावीत त्याप्रमाणे सगळी घरे डगमगली.

झितोमीर आणि बेर्दिचेव काबीज केल्यानंतर पोलिश सैन्याची पिछाडी कोसळली व त्यांना आवळणारा पोलादी वेढा तोडण्याचा निकराचा प्रयत्न करीत कीव्हमधून दोन वाटांनी त्यांचे लोंढे बाहेर पडू लागले.

लढाईच्या आवर्तात सापडलेल्या पावेलला ह्या काळात स्वतःचा संपूर्ण विसर पडला होता. सर्व लोकांमध्ये त्याचे स्वतःचे वेगळे अस्तित्व लोपून गेले होते. प्रत्येक लढवय्या-

प्रमाणे त्याच्या दृष्टीनेही "मी" हा शब्द विसरला गेला होता. फक्त "आम्ही" हा शब्द उरला होता: आमची रेजिमेंट, आमचे स्क्वाड्रन, आमची ब्रिगेड.

वादळी वाऱ्याच्या वेगाने घटना घडत होत्या. दर दिवशी काहीतरी नवी बातमी येत होती.

एखाद्या हिमानीप्रमाणे बुद्योन्नींची घोडदळ सेना पुढे जात होती. एकामागून एक प्रहार करीत तिने पोलिश पिछाडीचे अक्षरश: राईराईएवढे तुकडे केले. मिळालेल्या विजयांनी धुंद बनलेल्या घोडदळ डिव्हिजना पोलिश पिछाडीचे काळीज समजले जाणाऱ्या नोवग्राद-वोलीन्स्कीवर त्वेषाने तुटून पडल्या. समुद्राची लाट जशी खडकाळ किनाऱ्यावर आपटून पुन:पुन्हा उसळत येते, त्याप्रमाणे घोडदळ सेना पुन:पुन्हा त्या शहरावर आवेगाने तुटून पडत होती आणि "पुढे चला! पुढे चला!" अशा रणभेदी आरोळ्या तिच्यामधून उमटत होत्या.

पोलिश सैन्याला काहीही वाचवू शकले नाही! काटेरी तारांची भेंडोळी कुचकामी ठरली, तसेच शहराभोवतीच्या खंदकात बसून शिबंदीने केलेला प्रखर प्रतिकारही नि:ष्प्रभ ठरला. आणि २७ जूनच्या सकाळी, बुद्योन्नींच्या घोडदळाने पायउतार न होता स्लूच नदी ओलांडली व नोवग्राद-वोलीन्स्की शहरात प्रवेश करून पोल सैन्याला हाकलून करेत्सच्या दिशेने पिटाळले. त्याचवेळी पंचेचाळीसाव्या डिव्हिजनने स्लूच नदी नोवा मीरोपोल येथे ओलांडली व कतोवस्की घोडदळ ब्रिगेड ल्यूबारच्या वस्तीवर वेगाने धावली.

रोवनो काबीज करण्यासाठी सर्व घोडदळ सेना एकवटा, असा युद्धआघाडीच्या सरसेनापतींचा हुकूम पहिल्या घोडदळ सेनेच्या रेडिओ केंद्राला मिळाला. लाल डिव्हिजनांच्या दुर्दम्य

हल्ल्यामुळे पोलिश सैनिक घाबरून गेले व सैरावैरा धावत सुटले.

ह्या अत्यंत घाईगर्दीच्या दिवसांमध्ये पावेल कोर्चागिनची एका व्यक्तीशी अगदी अनपेक्षितपणे भेट घडली. चिलखती आगगाडी उभी असलेल्या स्टेशनावर त्याला त्याच्या ब्रिगेड कमांडरने पाठविले होते. रेल्वेच्या कडेचा उंच चढ पावेल चौकचालीने पार करून गेला आणि पारव्या रंगाच्या पहिल्या डब्यापाशी त्याने लगाम खेचले. चाकांवरून पुढे आलेल्या तोफांच्या त्या काळ्याकभिन्न सोंडा पाहताना ती चिलखती आगगाडी छातीत धडकी भरवीत होती. चाकांचे संरक्षण करणारे अवजड चिलखती पत्रे चढवण्याचे काम तेलकट डागांनी माखलेल्या कपडयातले अनेक लोक तेथे करीत होते.

"आगगाडीचे कमांडर कुठं भेटतील?" पाण्याची बादली वाहून आणणाऱ्या, कातडी जाकीट घातकेल्या एका लाल सैनिकाला पावेलने विचारले.

"त्या तिथं" इंजिनाकडे बोट दाखवीत तो माणूस उत्तरला.

पावेल घोडयावरून इंजिनापर्यंत गेला. "मला कमांडरना भेटायचंय!" तो म्हणाला. चेहऱ्यावर देवीचे वण असलेला आणि नखशिखांत कातडी वेष परिधान केलेला एक माणूस वळून म्हणाला, "मीच कमांडर!"

पावेलने आपल्या खिशातून एक लखोटा बाहेर काढला.

"ब्रिगेड कमांडरचा यात हुकूम आहे. लखोटयावर सही करा."

कमांडरने लखोटा मांडयांवर ठेवला आणि आपली सही लखोटयावर खरडली. खाली रूळांवर इंजिनाच्या मधल्या चाकाशी तेलाची बुधली घेऊन एक माणूस वाकून काम करीत

होता. पावेलला त्याची फक्त रुंद पाठ दिसत होती आणि त्याच्या चामडी पँटीला लटकावलेल्या पिस्तुलाची बाहेर डोकावणारी मूठ दिसत होती.

कमांडरने लखोटा पावेलला परत दिला आणि परत जाण्यासाठी पावेलने लगाम खेचले तोच तेलाची बुधली घेतलेला तो माणूस सरळ उभा झाला आणि मागे वळला. दुसऱ्याच क्षणी पावेलने घोड्यावरून खाली उडी टाकली आणि वाऱ्यासारखा वेगाने तो धावला.

"आर्त्योम!"

त्या माणसाने तेलाची बुधली खाली टाकली आणि त्या तरुण लाल सैनिकाला गच्च मिठी मारली.

"पाव्का! गाढवा! तू होय?" आपल्या डोळ्यांवर विश्वास न बसून तो ओरडला.

चिलखती आगगाडीचा कमांडर गोंधळून पाहू लागला. त्या दोन भावांची ही अचानक पडलेली गाठ पाहून, बाजूला उभे असलेले अनेक गोलंदाज मनापासून हसत होते.

ल्वोव प्रदेशातील लढाईत १९ ऑगस्टला ते घडले. लढाईच्या धुमाळीत पावेलची टोपी कुठेतरी गायब झाली होती आणि त्याने घोड्याचा लगाम खेचला. पुढच्या स्क्वाड्रन एव्हाना पोलिश मोर्चांमध्ये घुसल्या होत्या. त्याच क्षणाला झुडुपांमधून दौडत येऊन नदीच्या दिशेने जाणारा देमीदोव पावेलच्या जवळून जाताना ओरडून म्हणाला:

"डिव्हिजन कमांडर ठार झाले!"

पावेल दचकला. लेतुनोव, त्याचा शूर कमांडर, अतुलनीय

धैर्याचा त्याचा कमांडर, ठार झाला होता! पावेलमध्ये विलक्षण संताप संचारला.

आपल्या तलवारीच्या बोथट टोकाने त्याने आपल्या ग्नेदोक घोड्याला टोचले. त्याचा घोडा कमालीचा दमला होता, रक्ताळ फेस त्याच्या तोंडातून वहात होता. पण पावेलने तसेच त्याला रणधुमाळीत दामटले.

"ठार मारा नीचांना! खांडोळी उडवा! पोलिश शल्याख्ताचे तुकडे तुकडे करा! त्यांनी लेतुनोवना ठार केलं!" आणि न पाहता त्याने हिरव्या गणवेषातील एका आकृतीला कापून काढले. आपल्या डिव्हिजन कमांडरच्या मृत्यूमुळे संतापाने बेभान होऊन घोडदळ सैनिकांनी आख्खी पोलिश पलटण कापून काढली.

शत्रूचा पाठलाग करीत ते रणमैदानावरून सरळ पुढे दौडत गेले. पण आता तोफखाना धडाडू लागला होता. तोफगोळे सबंध रणमैदानावर फुटू लागले आणि मृत्यूचे तांडव सुरू झाले.

अचानक पावेलच्या डोळ्यांसमोर दिपवणारा हिरवा चक-चकाट झाला, त्याच्या कानाचे पडदे स्फोटाने हादरले आणि त्याच्या कवटीत गरम भाजणारे पोलाद घुसले. त्याच्या भोवतीची जमीन विलक्षण भयानकपणे गरकन वरती फिरली आणि हळूहळू उलटी होऊन खाली येऊ लागली.

एखाद्या गवताच्या काडीसारखा पावेल घोड्यावरून खाली फेकला गेला. ग्नेदोकच्या सरळ डोक्यावरून तो पुढच्या दिशेने उडाला आणि धपकन जोरात जमिनीवर आदळला.

तात्काळ गडद काळोखी रात्र पसरली!

प्रकरण नववे

ऑक्टोपसचा फुगीर डोळा चांगला मांजराच्या डोक्याएवढ्या आकाराचा आहे. त्या झिलईदार तांबूस डोळयाचा केंद्रभाग हिरवा आहे आणि त्यातून फॉस्फरससारखा प्रकाशझोत बाहेर पडतोय. ऑक्टोपस हा अनेक नांग्या असलेला किळसवाणा मांसाचा गोळा आहे, अनेक सापांचे वेटोळे जसे वळवळावे तसा तो वळवळतोय आणि त्याच्या नांग्यांची हालचाल होताना खवल्या खवल्यांची कातडी हिडीसपणे सळसळतेय. ऑक्टोपस हलला. आपल्या अगदी डोळयांसमोर तो त्याला पाहतोय. आता त्या ऑक्टोपसच्या नांग्या त्याच्या शरीरावर फिरू लागल्या आहेत. त्यांचा स्पर्श अगदी थंडगार आहे आणि खाजकुयलींप्रमाणे त्यांचा दंश वेदना करतोय. ऑक्टोपस आपल्या नांग्यांचा दंश करून त्याच्या डोक्याला जळूप्रमाणे चिकटलाय आणि गरगरा वेटोळी घालत त्याचे रक्त तो शोषतोय. आपल्या शरीरातून रक्त नाहीसे होतेय आणि ऑक्टोपसच्या फुगणाऱ्या अंगात उतरतेय याची त्याला जाणीव होतेय. नांग्या दंश करून रक्त शोषताहेत आणि त्या शोषणाची वेदना कमालीची असह्य झालीय.

अगदी दूर कुठेतरी त्याला माणसांचे आवाज ऐकू आल्यासारखे वाटतात:

"त्याची नाडी आता कशी आहे?"

उत्तर देणारा दुसरा मंद आवाज स्त्रीचा आहे:

"नाडी एकशे अडतीस. ताप १०३ पूर्णांक १ दशांश. सगळा वेळ तो भ्रमात आहे."

ऑक्टोपस अदृश्य झाला, पण वेदना मात्र अजून रेंगाळते आहे. आपल्या मनगटाला कुणीतरी स्पर्श केल्याचे पावेलला

जाणवले. त्याने डोळे उघडण्याचा प्रयत्न केला, पण त्याच्या पापण्या एवढ्या जड झाल्या आहेत, की त्या उचलण्याइतपत त्याच्यात त्राण नाहीत. एवढे गरम का होतेय? आईने बहुधा चुलाणा पेटवला असावा! पुन्हा त्याला ते आवाज ऐकू येतात:

"आता त्याची नाडी एकशे बावीस आहे."

तो पापण्या उघडण्याचा प्रयत्न करतो. पण त्याच्या आत नुसती आग पेटलीय. त्याचा जीव घुसमटला.

त्याला विलक्षण तहान लागलीय. ताबतोब उठून पाणी प्यायले पाहिजे! पण तो उठत का नाही? तो हलण्याचा प्रयत्न करतो, पण त्याचे अवयव त्याचे ऐकत नाहीत. त्याचे शरीर जणू त्याला परके बनलेय! आई आत्ता त्याच्यासाठी पाणी आणील. मग तो तिला म्हणेल: "मला पाणी प्यायचंय!" त्याच्या शेजारी काहीतरी हालचाल झाली. तो ऑक्टोपस तर पुन्हा त्याच्या अंगाला विळखा घालणार नाही ना? आला तो पुन्हा... त्याचे लालभडक डोळे त्याला पुन्हा दिसताहेत...

दूरवरून तो अस्फुट नाजुक आवाज येतो:

"फ्रोस्या, थोडं पाणी आण!"

"कुणाचं बरं नांव हे?" पण आठवण्याचा प्रयत्न त्याला सोसत नाही आणि पुन्हा एकदा अंधार त्याला वेढतो. परत जेव्हा तो शुद्धीवर येतो तेव्हा त्याला आठवण होते: "मला तहान लागलीय."

आणि पुन्हा आवाज ऐकू येतात:

"बहुधा शुद्धीवर येतोय."

तो नाजुक आवाज आता अधिक जवळ आणि स्पष्ट ऐकू येतो:



"तुम्हाला पाणी हवंय का? आता बरं वाटतंय?"

"मला उद्देशून ही माणसं बोलताहेत? म्हणजे मी आजारी आहे? अरे हो, मला विषमाचा ताप आलाय, बरोबर!" आणि तिसऱ्यांदा तो पापण्या उघडण्याचा प्रयत्न करतो. अखेरीस त्याला यश आले. किंचित किलकिल्या डोळ्यांमधून प्रथम त्याला अंधुकपणे दिसते की, त्याच्या डोक्यावर एक तांबडा फुगा टांगलेला आहे. पण एवढ्यात तो तांबडा फुगा कसल्यातरी काळ्या आकृतीने झाकला जातो व ती काळी आकृती त्याच्यावर ओणवी झुकते. त्याच्या ओठांना काचेची कठीण कडा स्पर्शते आणि त्या पाठोपाठ ओलसर स्पर्श! जीवनदायी पाणी! त्याच्या शरीरातली आग शमली. समाधानाने तो पुटपुटला: "आता बरं वाटतंय."

"तुम्हाला मी दिसतेय की नाही सांगा पाहू!"

त्याच्यावर ओणवी झालेली ती काळी आकृती बोलली आहे आणि गुंगीचा झटका येण्यापूर्वी तो कसाबसा बोलला: "मला दिसत नाही, पण ऐकू येतंय..."

"हा जगू शकेल असं कोण सांगू शकलं असतं? पण पहा कसा आयुष्याकडं परत आला! कमालीची चिवट प्रकृती! नीना व्लादीमिरोवना, शाबास तुमची! तुम्ही अक्षरशः याचा जीव वाचवलात."

आणि त्या स्त्रीचा किंचित कापरा आवाज उत्तरतो: "मला खूप आनंद झालाय!"

तेरा दिवसांच्या बेशुद्धीनंतर पावेल कोर्चागिन पुन्हा थाऱ्यावर आला. त्याचे तरुण शरीर मरायला तयार नव्हते. हळूहळू त्याची ताकद भरून आली. जणू त्याचा पुनर्जन्म झाला होता. प्रत्येक गोष्ट नवी आणि अद्भुत भासत होती. फक्त त्याचे

डोके मात्र निश्चल पडून होते, प्लास्टरच्या बँडेजमध्ये शीशासारखे जड भासत होते आणि ते डोके हलविण्याची त्याच्यात शक्ती नव्हती. पण बाकीच्या शरीरात मात्र पुन्हा चेतना निर्माण झाली होती व आपली बोटे तो वाकवू शकत होता.

लष्करी इस्पितळातील कनिष्ठ डॉक्टर नीना व्लादीमिरोवना आपल्या खोलीतल्या छोटचा टेबलाशी बसून फिकट जांभळ्या वेष्टनाच्या एका टिपणवहीतील पाने चाळीत होती. वळणदार तिरप्या अक्षरात त्या वहीत छोटचा नोंदी केल्या होत्या.

"२६ ऑगस्ट १९२०

"रुग्णवाहक आगगाडीने आज काही गंभीर स्वरूपाचे रुग्ण आणले. त्यातल्या एका रुग्णाच्या डोक्याला फार भयानक जखम झालीय. खिडकीजवळच्या कोपऱ्याशी आम्ही त्याला ठेवलेय. तो अवघा सतरा वर्षांचा आहे. त्याच्या खिशात सापडलेले कागद आणि त्याच्या आजाराची पूर्वपीठिका सांगणारे कागद त्यांनी एका पाकिटामधून मला दिले. त्याचे नांव आहे कोर्चागिन, पावेल आन्द्रेयेविच. त्याच्या कागदपत्रांमध्ये युक्रेनच्या कम्युनिस्ट युवक संघाच्या सदस्यत्वाचं एक जीर्णशीर्ण कार्ड होते (क्र. ९६७), लाल सेनेचे एक फाटके ओळखपत्र होते आणि टेहळणी मोहीम अत्युत्तम पार पाडल्याबद्दल लाल सैनिक कोर्चागिन यांचा गौरव करण्यात येत आहे, असे निवेदन करणारे रेजिमेंटचे शिफारसपत्र होते. त्या कागदांमध्ये त्याने स्वत: लिहिलेली एक चिठ्ठीही होती: "माझा जर मृत्यू घडला तर कृपया माझ्या नातेवाईकांना कळवा: शेपेतोवका, रेल्वे जंक्शन, मेकॅनिक आर्त्योम कोर्चागिन."

"१९ ऑगस्टला तोफगोळ्याच्या तुकड्याचा फटका बसल्यापासून तो बेशुद्ध आहे. उद्या अनातोली स्तेपानोविच त्याला तपासतील."

"२७ ऑगस्ट

आज आम्ही कोर्चागिनची जखम तपासली. ती खूप खोल आहे, कवटीला तडा गेलाय आणि डोक्याचा संपूर्ण उजवा भाग लुळा पडलाय. उजव्या डोळ्यातली रक्ताची धमनी फुटलीय आणि त्याला प्रचंड सूज आलीय.

"जळजळ होऊ नये म्हणून डोळा काढून टाकावा असे अनातोली स्तेपानोविच यांचे मत होते. पण मी त्यांना त्या विचारापासून परावृत्त केले, कारण सूज उतरण्याची अद्याप आशा आहे. असे करताना केवळ सौंदर्यवादी विचार माझ्या डोक्यात होते. हा पोरगा बरा होईल, पण विद्रूप झाला तर त्याची अवस्था केविलवाणी होईल.

"तो सतत भ्रमात आहे आणि कमालीचा अस्वस्थ आहे. आमच्यापैकी कुणी ना कुणीतरी सतत त्याच्या बिछान्यापाशी बसून आहे. मी माझा बराचसा वेळ त्याच्याजवळ घालविते. एवढ्या तरुण वयात त्याने मरणे योग्य नाही आणि मृत्यूच्या पंजामधून त्याला सोडविण्याचा मी निर्धार केलाय. मला यश आले पाहिजे.

काल माझी कामाची पाळी संपल्यानंतर त्याच्या वॉर्डात मी बराच वेळपर्यंत होते. त्या ठिकाणी सर्वांत वाईट अवस्था त्याची आहे. त्याचे बरळणे मी ऐकत होते. काहीवेळा त्याची बडबड एखाद्या गोष्टीप्रमाणे वाटते आणि त्याच्या आयुष्याबद्दल मला बरेच काही समजले. पण काहीवेळा मात्र

तो भयंकर शिवीगाळ करतो. तो कमालीची घाणेरडी भाषा वापरतो. त्याच्या तोंडून अशी शिव्यागाळ ऐकताना मला कसेसेच वाटते. तो बरा होईल असे अनातोली स्तेपानोविचना वाटत नाही. "अशा पोरांपासून सैन्याला काय हवंय तेच मला समजत नाही. अगदी शरमेची बाब आहे," म्हातारबाबा गुरगुरतात."

"३० ऑगस्ट

"कोर्चागिन अजूनही बेशुद्धीत आहे. काहीही आशा नसलेल्या रुग्णांच्या वॉर्डात त्याला हलविले आहे. नर्स फ्रोस्या जवळ जवळ सतत त्याच्यापाशी बसून आहे. तो तिच्या माहितीचा आहे असे दिसते. एकेकाळी त्यांनी एकत्र काम केले होते म्हणे! किती हळुवारपणे वागते ती त्याच्याशी! त्याची अवस्था खरेच हाताबाहेर गेलीय अशी आता मलाही भीती वाटू लागलीय."

"२ सप्टेंबर

"रात्रीचे अकरा वाजलेत. आज माझ्या दृष्टीने दिवस मोठा छान होता. माझा रोगी कोर्चागिन पुन्हा शुद्धीवर आला. अरिष्ट टळले. गेले दोन दिवस घरी न जाता मी सतत इस्पितळातच होते.

"आणखी एक जीव वाचवला ह्या जाणीवेने मला झालेला आनंद वर्णन करणे अशक्य आहे. आमच्या वॉर्डात एक मृत्यू कमी. माझ्या ह्या दमछाक करणाऱ्या कामात रुग्णाची प्रकृती बरी होणे ही सर्वांत चांगली गोष्ट. ते अगदी लहान मुलांसारखे बनतात. त्यांचे प्रेम साधे आणि प्रामाणिक असते. मलासुद्धा त्यांचा लळा लागतो आणि जेव्हा ते इथून जायला निघतात

तेव्हा बहुधा मी रडते. माझा हा मूर्खपणा आहे हे मला समजते, पण त्यावर माझा काही इलाज नाही."

"१० सप्टेंबर

आज मी कोर्चागिनसाठी त्याच्या कुटुंबाला पहिले पत्र लिहिले. तो लिहितो की, त्याची जखम काही विशेष गंभीर नाही, लौकरच तो बरा होईल आणि घरी परतेल. त्याचा बराच रक्तस्त्राव झालाय आणि अगदी भुतासारखा पांढरा-फटक दिसतोय. अजून तो खूपच अशक्त आहे."

"२४ सप्टेंबर

"आज कोर्चागिनच्या चेहऱ्यावर प्रथमच स्मित उजळले. त्याचे स्मित फार आल्हादक आहे. तसा एरवी तो स्वतःच्या वयाला न शोभेल एवढा गंभीर असतो. त्याची प्रकृती फार झपाट्याने सुधारते आहे. त्याची आणि फ्रोस्याची जोरदार मैत्री जमलीय. बऱ्याचवेळा ती त्याच्या उशाशी बसलेली मी पाहते. ती बहुधा माझ्याबद्दल त्याच्याशी बोलत असावी आणि माझे गुणगान त्याच्यापाशी करीत असावी असे दिसते. कारण आता रोगी मला पाहताच किंचित हसून अभिवादन करतो. काल मला त्याने विचारले:

"डॉक्टर, तुमच्या दंडांवर त्या काळ्या खुणा कसल्या?"

"तो जेव्हा भ्रमात तळमळत होता, तेव्हा त्याच्या बोटांनी माझे दंड गच्च आवळून धरल्यामुळे ते वण उमटले होते, हे मी त्याला सांगितले नाही."

"१७ सप्टेंबर

"कोर्चागिनच्या कपाळावरची जखम छान भरून येतेय. त्याची जखम स्वच्छ करण्याचा वेदनादायी सोहळा हा तरुण

माणूस ज्या धैर्याने सहन करतो, त्याचे आम्हा डॉक्टरांना आश्चर्य वाटते.

"सर्वसाधारणपणे अशा वेळी रोगी खूप कण्हतो-विव्हळतो आणि बराच त्रास देतो. पण हा मात्र अगदी गुपचूप पडून राहतो आणि ओल्या जखमेवर जेव्हा आयोडिनचा बोळा ठेवतात तेव्हा व्हायोलिनच्या ताणलेल्या तारेप्रमाणे स्वतःला घट्ट आवळून धरतो. अनेकदा त्याची शुद्ध हरपते, पण त्याच्या तोंडून एकदाही विव्हळण्याचा आवाज उमटलेला आम्ही ऐकला नाही.

"कोर्चागिन जेव्हा कण्हतो तेव्हा तो बेशुद्धीत असतो, हे आता आम्हाला माहीत झाले आहे. त्याला एवढी सहन-शक्ती कुठून प्राप्त झाली कुणास ठाऊक?"

"२१ सप्टेंबर

"आज आम्ही प्रथमच कोर्चागिनला ढकलखुर्चीत बसवून मोठ्या गच्चीत नेले. त्याने जेव्हा बगीचा पाहिला तेव्हा त्याचा चेहरा आनंदाने किती उजळला होता! किती आधाशीपणे तो ताजा वारा प्यायला! त्याचे डोके मलमपट्ट्यांनी गुंडाळलेले आहे आणि त्याचा फक्त एकच डोळा उघडा आहे. आणि तो सजीव, तेजस्वी डोळा जगाकडे असा काही पहात होता की, जणू जगाला तो प्रथमच पहात होता."

"२६ सप्टेंबर

"कोर्चागिनला भेटण्याची परवानगी विचारीत आज दोन तरुणी इस्पितळात आल्या होत्या. मी खाली प्रतीक्षाकक्षात त्यांच्याशी बोलायला गेले. त्यांच्यापैकी एक तरुणी खूपच सुंदर होती. तोन्या तुमानोवा आणि तात्याना बुरनोवस्काया

अशी त्यांनी आपली ओळख करून दिली. तोन्याबद्दल मी ऐकले होते. भ्रमात असताना कोर्चागिनने तिच्या नांवाचा उल्लेख केला होता. त्याला भेटायची मी त्यांना परवानगी दिली."

"८ ऑक्टोबर

"कोर्चागिन आता कुणाच्याही मदतीविना बागेत फिरतो. इस्पितळ केव्हा सोडता येईल, याबद्दल सतत तो मला विचारतो. मी त्याला सांगते – लौकरच. भेटीच्या प्रत्येक दिवशी त्या दोन तरुणी त्याला भेटायला येतात. तो कधीही का कण्हत नाही हे आता मला समजलेय. मी त्याला विचारले तेव्हा तो उत्तरला होता: "'गोमाशी' वाचा, म्हणजे तुम्हाला समजेल."

"१४ ऑक्टोबर

"कोर्चागिनला इस्पितळातून जाण्याची परवानगी मिळाली. अत्यंत प्रेमाने त्याने माझा निरोप घेतला. त्याच्या डोळ्यावरची पट्टी आता काढली आहे आणि आता फक्त डोक्याभोवती पट्टी गुंडाळलेली आहे. त्याचा एक डोळा आंधळा झालाय, पण दिसायला मात्र तो चार चौघांसारखाच दिसतो. ह्या छान तरुण कॉम्रेडचा निरोप घेताना खूप वाईट वाटले. पण हे असेच नेहमी घडते! एकदा ते बरे झाले म्हणजे आम्हाला सोडून जातात आणि पुन्हा क्वचितच त्यांची आमच्याशी भेट घडते.

"जाताना तो म्हणाला: "उजव्याऐवजी डावा डोळा गेला नाही हे फार वाईट झालं. आता मी बंदूक कशी चालवणार?"

"अजून तो युद्धआघाडीचा विचार करतो!"

इस्पितळामधून मुक्तता झाल्यानंतर काही दिवसपर्यंत पावेल बुरनोवस्की कुटुंबात राहिला. तोन्या तेथेच रहात होती.

तोन्याला कम्सामोलच्या कामात ओढण्याचा पावेलने ताबडतोब प्रयत्न केला. गावातल्या कम्सामोलच्या सभेला हजर राहण्याचे तिला आमंत्रण देऊन त्याने आरंभ केला होता. तोन्याने जायचे कबूल केले, पण जायचा जामानिमा करून ती जेव्हा आपल्या खोलीतून बाहेर आली, तेव्हा पावेल तिला पाहून स्तंभित झाला. तिने एवढा ऐटबाज पोषाख केला होता की, कम्सामोलच्या त्या सभेत तिचा हा थाटमाट अगदीच अस्थानी दिसला असता असे पावेलला वाटले.

त्यांच्यामधील पहिल्या भांडणाचे कारण हे ठरले. तिने असा पोषाख का केला असे जेव्हा त्याने विचारले, तेव्हा तिला भयंकर अपमान झाल्यासारखे वाटले.

"इतरांसारखंच मी का म्हणून दिसावं? माझा पोषाख जर तुझ्याबरोबर जायला योग्य नाही असं वाटत असेल, तर मी घरी बसून राहते!"

क्लबामध्ये आलेल्या तरुण-तरुणींच्या विटक्या शर्टांमध्ये आणि मळक्या पोलक्यांमध्ये तोन्याचे झकपक कपडे एवढे उठून दिसत होते, की पावेल अगदी कमालीचा शरमून गेला. तरुण मंडळींनी तिला अगदी परक्यासारखे वागवले आणि त्यांच्या नापसंतीची जाणीव झालेल्या तोन्यानेही त्यांच्याशी फटकून वागण्याचे धोरण स्वीकारले.

बंदरावरील रुंद खांद्यांचा गोदीकामगार, जाडाभरडा लिननचा सदरा घातलेला गोदीवरच्या कम्सामोल संघटनेचा चिटणीस पानक्रातोव पावेलला एका बाजूला घेऊन गेला आणि नजरेनेच तोन्याकडे इशारा करून त्याने संतापून विचारले:

"ह्या बाहुलीला तू इथं आणलंस?"

"होय," पावेल तुटकपणे उत्तरला.

"अस्सं ऽ" तोन्याला न्याहाळीत पानक्रातोव उद्गारला. "तिच्या एकूण थाटमाटावरून ती आमच्यातली वाटत नाही. भांडवलदारांपैकी वाटते. तिला कसं काय आत सोडलं?"

पावेलच्या कपाळावरच्या शिरा ताडताड उडू लागल्या.

"ती माझी मैत्रीण आहे. मी तिला इथं आणली. समजलं? कपड्यांचा ती फार विचार करत असली तरी ती काही आपली शत्रू नाही. लोकांच्या पोषाखावरून त्यांची नेहमीच ओळख पटते असं नाही. तुझ्याप्रमाणंच मलाही चांगलं समजतं – इथं कुणाला आणावं आणि कुणाला आणू नये! तेव्हा नसता चोंबडेपणा करू नको!"

काहीतरी विलक्षण तिखट आणि अपमानकारक बोलण्याची त्याची इच्छा होती. पण पानक्रातोव तिथल्या एकूण मंडळींचे मत बोलून दाखवीत होता याची जाणीव झाल्याने पावेलने स्वतःला आवरले. पण त्यामुळे तोन्याबद्दलचा त्याचा राग मात्र वाढला.

"काय घडेल याची मी तिला आधी कल्पना दिली होती! कशाला दाखवायला पाहिजे होता हा दिमाख?"

त्यांची मैत्री संपुष्टात येण्याचा आरंभ त्या संध्याकाळी झाला. अगदी टिकाऊ वाटणारे ते नाते तुटत असलेले पाहताना पावेलच्या मनात विलक्षण कडवट आणि निराशेच्या भावना दाटल्या होत्या.

असेच काही दिवस उलटले. त्यांच्या प्रत्येक भेटीत काहीतरी बाचाबाची होऊ लागली आणि त्यांचे संबंध दुरावत गेले. तिची अहंभावी वृत्ती त्याला असह्य होऊ लागली.

मैत्री तुटणे अटळ होते याची दोघांनाही जाणीव झाली.

आज 'कुपेचेस्की' बागेत त्यांची अखेरची भेट झाली होती. साऱ्या वाटांवर पानगळ विखुरली होती. कड्याच्या टोकावरच्या नक्षीदार गजांच्या कठड्यापाशी ते उभे होते आणि ज्ञीपर नदीच्या राखाडी रंगाच्या पाण्याकडे निरखून पहात होते. उंच पुलाच्या सांगाड्याच्या मागून गलबते ओढणारी एक छोटी आगबोट दोन पडावांना खेचत संथपणे नदीमधून येत होती. मावळत्या सूर्याने त्रुखानोव बेटाला सोनेरी रंगाची डूब दिली होती व घरांच्या खिडक्या प्रज्वलित केल्या होत्या.

सोनेरी सूर्यकिरणांना न्याहाळीत तोन्या खिन्न सुरात म्हणाली :

"ह्या मावळत्या सूर्याप्रमाणंच आपली मैत्रीसुद्धा मावळून जाणार?"

तिच्या चेहऱ्याकडे एवढा वेळपर्यंत निरखून पाहणाऱ्या पावेलने कठोरपणे कपाळाला आठ्या घातल्या आणि खालच्या सुरात तो म्हणाला :

"तोन्या, याबद्दल आपण पूर्वीसुद्धा बोललोय. मी तुझ्यावर प्रेम केलं हे तुला ठाऊक आहे आणि पुन्हा कदाचित ती प्रेमाची भावना माझ्यात जागी होईल. पण त्यासाठी तू आमच्याबरोबर असायला हवं! मी पूर्वीचा पावलशा राहिलो नाही. आणि पक्षाआधी मी तुला प्राधान्य द्यावं अशी जर तुझी अपेक्षा असेल, तर मी चांगला नवरा ठरणार नाही. कारण मी नेहमीच पक्षाला प्राधान्य देईन आणि तू किंवा माझी इतर प्रिय मा""सं ही ऱ्यापुढं दुय्यग" राहतील."

गडद निळ्या पाण्याकडे केविलवाणी नजर रोखून तोन्या पहात राहिली. तिचे डोळे अश्रूंनी डबडबून आले.

खूप परिचित झालेल्या तिच्या अर्ध्या चेहऱ्याच्या रूपरेषेकडे पावेल एकटक पहात होता, तिचे दाट तांबूस-पिंगट केस न्याहाळीत होता. एकेकाळी त्याला अत्यंत प्रिय असलेल्या ह्या मुलीबद्दल त्याच्या मनात एकाएकी जबरदस्त कणव दाटून आली.

त्याने हळूच तिच्या खांद्यावर हात ठेवला.

"तोन्या, सारे पाश तोडून आमच्याकडं ये. मालक लोकांना नष्ट करायला जोडीनं काम करू या. ह्या कडव्या संघर्षाचा भार उचलणाऱ्या, सर्व कष्ट आणि यातना सहन करणाऱ्या कितीतरी छान मुली आमच्यात आहेत. त्या कदाचित तुझ्या-एवढ्या शिकलेल्या नसतील, पण तू का म्हणून आमच्यात सामील होत नाहीस? तू म्हणालीस की, चुझानिननं तुला फसवायचा प्रयत्न केला. पण तो पतित आहे, लढवय्या नाही. कॉम्रेडमंडळी तुझ्याशी मित्रत्वानं वागली नाही, असं तू म्हणतेस. पण श्रीमंती नृत्य समारंभाला जावं तसा पोषाख करण्याची तुला काय गरज होती? तुझा खोटा अभिमान याला जबाबदार आहे: प्रत्येकजण घाणेरडा लष्करी सदरा घालतो म्हणून मी का घालावा? एका कामगारावर प्रेम करायचं तुझ्यात धैर्य आहे, पण विचारावर तू प्रेम करू शकत नाहीस. तुझा निरोप घेताना मला अत्यंत दुःख होतंय. तुझी आठवण मनात ठेवायला मला नेहमी आवडेल."

यावर तो आणखी बोलला नाही.

दुसऱ्या दिवशी रस्त्यावर एक हुकुमाचा कागद चिकटवलेला त्याने पाहिला. प्रादेशिक चेकाचे अध्यक्ष झुखराय यांची सही

त्यावर होती. आनंदाने त्याच्या हृदयाचा ठोका चुकला. खलाशांच्या कचेरीत त्याला मोठ्या मिनतवारीने प्रवेश मिळाला. पहारेकरी त्याला आत सोडेनात आणि त्याने एवढा गोंधळ माजविला, की त्याला जवळ जवळ अटक झाली होती. पण अखेरीस त्याने आपले म्हणणे खरे केले.

फ्योदरनी त्याचे अत्यंत प्रेमाने स्वागत केले. त्यांचा एक हात तुटला होता. तोफगोळ्याच्या स्फोटात त्यांनी तो गमावला होता.

त्यांच्या संभाषणाचा ओघ तात्काळ कामाकडे वळला. "युद्धआघाडीवर जायला ठाकठीक होईपर्यंतच्या काळात इथं प्रतिक्रांती चिरडून टाकायला तू मला मदत करू शकशील. उद्यापासून कामाला लाग," झुखराय म्हणाले.

पोलिश श्वेतरक्षकांविरुद्धचा संघर्ष संपला होता. लाल सेनांनी शत्रूचा अगदी वॉर्साच्या वेशींपर्यंत पाठपुरावा केला, पण त्यांची भौतिक आणि शारीरिक ताकद संपल्यामुळे व रसद-पुरवठ्याचे तळ फार दूर मागे राहिल्यामुळे त्यांना मागे परतावे लागले. अशा रीतीने लाल सेना वॉर्सापासून मागे हटल्या व पोलिश लोकांच्या शब्दात सांगावयाचे म्हणजे "वीस्लावरचा चमत्कार" घडला. पोलंडच्या उच्चभ्रूंना नव्याने जगायची संधी मिळाली. पोलिश सोविएत समाजसत्तावादी प्रजासत्ताकाचे स्वप्न अजून पूर्ण व्हावयाचे नव्हते.

रक्ताचे प्रचंड सिंचन घडलेल्या भूमीला विश्रांतीची गरज होती.

पावेल आपल्या लोकांना भेटू शकत नव्हता, कारण शेपेतोवका पुन्हा पोलिशांच्या हाती गेले होते व तात्पुरते सीमेवरचे ठाणे बनले होते. तहाच्या वाटाघाटी चालू होत्या.

वेगवेगळ्या जबाबदाऱ्या पार पाडीत पावेलने चेकामध्ये अनेक दिवस-रात्री पार केल्या. फ्योदर यांच्या खोलीत तो रहात होता. आपले जन्मगांव पोलिश लोकांनी व्यापले हे ऐकल्यापासून तो कमालीचा अस्वस्थ होता.

"म्हणजे आता युद्धबंदी तहावर सह्या झाल्या तर माझी आई सीमेच्या पलिकडच्या भागात राहणार?" त्याने झुखरायना विचारले.

पण फ्योदरनी त्याची धास्ती कमी केली.

"सीमारेषा बहुधा नदीकाठानं गोरीनमधून जाईल. म्हणजे तुझं गांव आपल्या बाजूला राहील," ते म्हणाले. "कोणत्याही परिस्थितीत याचा निर्णय आपल्याला लौकरच समजेल."

पोलिश सीमेपासून दक्षिणेकडे डिव्हिजनांची पाठवणी केली जात होती. कारण प्रजासत्ताकाने जेव्हा पोलिश आघाडीवर आपले सर्व बळ एकवटले होते, तेव्हा मिळालेल्या अवसराचा फायदा उठवून व्रँगेल आपल्या क्रिमियाच्या गुहेतून बाहेर आला होता व येकातेरीनोस्लाव गुबेर्निया काबीज करण्याचे ताबडतोबीचे उद्दिष्ट ठरवून ग्नीपरच्या काठाने उत्तरेकडे चाल करून जात होता.

आता पोलिशांविरुद्धचे युद्ध संपले होते व प्रतिक्रांतीचे अखेरचे संघर्षस्थान विझवून टाकण्यासाठी प्रजासत्ताकाने लाल सेनांना क्रिमियाकडे घाईगर्दीने धाडले होते.

आगगाड्या भरभरून सैनिक, गाड्या, आघाडीवरचे भटारखाने, तोफा यांची कीव्हमार्गे दक्षिणेला पाठवणी चालली होती. या दिवसात स्थानिक वाहतुक सेवेची चेका अखंड कामात गुंतली होती व वाहतुकीचे तुंबलेले लोंढे मोकळे करण्यासाठी जिवाचे रान करीत होती. स्टेशने आगगाड्यांनी तुंबली

होती व मोकळ्या लोहमार्गांच्या अभावी वारंवार वाहतुक थांबत होती. या ना त्या डिव्हिजनसाठी मार्ग मोकळा करावा असा हुकूम देणारे असंख्य संदेश तारसंदेशवाहक सतत पाठवीत होते. टिंबे आणि रेघांनी भरलेल्या अखंड फिती उलगडल्या जात होत्या व प्रत्येक संदेश प्राधान्य मागत होता : "सर्वांआधी प्राधान्य द्यावे... हा लष्करी हुकूम आहे... ताबडतोब रस्ता मोकळा करा..." आणि जवळ जवळ प्रत्येक संदेशाच्या अखेरीस ताकीद दिलेली होती की, तो हुकूम अंमलात न आणल्यास क्रांतिकारक लष्करी न्यायालयासमोर खटला भरण्यात येईल !

विनाअडथळा वाहतुक चालू ठेवण्याची जबाबदारी स्थानिक वाहतुकीच्या चेकावर होती.

सेनाविभागांचे प्रमुख आपल्या हातात पिस्तुले रोखूनच चेकाच्या मुख्य ठाण्यांमध्ये घुसत व सेनाप्रमुखांच्या सहीच्या अमुक अमुक क्रमांकाच्या तारेनुसार त्यांच्या आगगाड्यांची पाठवणी करावी अशी मागणी करीत. आणि ते अशक्य होते हा खुलासा त्यांच्यापैकी कुणीही ऐकून घेत नसे. "जिवाचा आकांत कर, म्हणजे ती आगगाडी निघेल बघ!" आणि त्यापुढे भयानक शिव्यांचा भडिमार होई. काही गंभीर प्रसंगी झुखरायना तातडीचे बोलावणे जाई व एकमेकांना गोळ्या घालायला निघालेल्या लोकांना ते ताबडतोब शांत करीत. शांत थंड स्वरात बोलणाऱ्या व कोणत्याही सबबी ऐकून न घेणाऱ्या ह्या पोलादी माणसाच्या नुसत्या दर्शनाने पिस्तुले तात्काळ आपापल्या चामडी पिशव्यांमध्ये जाऊन बसत.

काहीवेळा डोक्यात ठणकणारी वेदना असह्य झाल्यामुळे धडपडत उठून पावेल बाहेर फलाटावर येई. चेकामधील

कामाचा त्याच्या मन:स्थितीवर अनिष्ट परिणाम घडत होता.

एके दिवशी सेर्गेई ब्रुझ्झाक पावेलच्या दृष्टीस पडला. दारूगोळ्याच्या खोक्यांनी भरलेल्या एक ट्रकवर सेर्गेई बसला होता. सेर्गेईने धप्पकन खाली उडी मारली तेव्हा त्याच्या धक्क्याने पावेल जवळ जवळ कोसळलाच असता. आपल्या मित्राभोवती घट्ट मिठी घालीत तो आनंदाने ओरडला:

"पाव्का! सैताना, तुला पाहिलं त्याच वेळी खात्री पटली होती की तो तूच!"

त्या दोघा तरुणांपाशी एकमेकांना सांगण्याजोग्या एवढ्या बातम्या होत्या, की कुठून आरंभ करावा तेच त्यांना समजेना. त्यांची अखेरची भेट घडली होती त्यानंतर त्या दोघांच्याही आयुष्यात अनेक घटना घडल्या होत्या. त्यांनी एकमेकांवर प्रश्नांचा भडिमार केला आणि उत्तरांची वाट न पाहता अखंड बोलत राहिले. इंजिनाची शिट्टी त्यांना ऐकू आलीच नाही आणि जेव्हा आगगाडी स्टेशनातून हलू लागली तेव्हा कुठे त्यांना आपल्या सभोवतालच्या परिस्थितीचे भान आले.

त्यांना एकमेकांना अजून खूप काही सांगायचे होते. पण आगगाडी आता वेग घेऊ लागली होती. सेर्गेई आपल्या मित्राला उद्देशून काहीतरी ओरडला व फलाटावरून धावत धावत त्याने आगगाडीच्या एका डब्याचे उघडे दार पकडले. अनेक हातांनी त्याला वर घेतले व डब्यात खेचले. पावेल उभा राहून सेर्गेईला जात असताना पहात होता, तेव्हा अचानक त्याला आठवण झाली की, वाल्याच्या मृत्युबद्दल सेर्गेईला काहीच माहिती नव्हती. कारण सेर्गेईने शेपेतोवका ज्या क्षणाला सोडले होते, त्यानंतर तो तेथे परत अजून गेलाच नव्हता व ह्या अचानक घडलेल्या भेटीच्या धांदलीत ती बातमी सेर्गेईला सांगायचे पावेल विसरला होता.

"त्याला ते माहीत नाही हे एका परीनं चांगलंच आहे. त्याचं मन त्यामुळं स्वस्थ राहील," पावेलच्या मनात विचार आला. त्याचा मित्र त्यानंतर पुन्हा कधीही भेटणार नव्हता, हे त्यावेळी त्याला माहीत नव्हते. तसेच, शरदाचे वारे आपल्या उघडया छातीवर झेलीत, आगगाडीच्या डब्याच्या टपावर उभ्या राहिलेल्या सेर्गेईलाही त्यावेळी कल्पना नव्हती, की तो आपल्या मरणाला भेटायला चालला होता.

"सेर्योझा, तिथून खाली उतर बघू," पाठीशी जळके भोक पडलेला कोट अंगात घातलेल्या दोरोशेन्को नांवाच्या लाल सैनिकाने त्याला विनवले.

"सगळं काही ठीक आहे," हसत सेर्गेई म्हणाला. "मी आणि वारा एकमेकांचे चांगले दोस्त आहोत."

एक आठवडयानंतर झालेल्या त्याच्या पहिल्याच लढाईत एक अज्ञात गोळी त्याच्या छातीत घुसली. तो पुढे धडपडला, त्याच्या छातीमधून असह्य वेदना चरचरा कापत गेली, त्याने हवेत काहीतरी धरण्याचा प्रयत्न केला आणि छातीशी आपले बाहू गच्च आवळून भेलकांडत तो धप्पदिशी जमिनीवर कोसळला. असीम युक्रेनी स्तेपकडे त्याचे निर्जीव निळे डोळे रोखून पहात होते.

पावेलच्या अशक्त प्रकृतीवर चेकामधील त्रासदायक कामाचा परिणाम उघडपणे दिसू लागला. त्याची असह्य डोकेदुखी वारंवार उद्भवू लागली. पण दोन रात्री झोपेविना काम केल्यानंतर जेव्हा तो बेशुद्ध पडला, तेव्हा मात्र त्याने ही झुखरायपर्यंत नेण्याचा निश्चय केला.

"फ्योदर, मी दुसऱ्या प्रकारचं काम करणं आवश्यक

आहे असं तुम्हाला वाटत नाही काय? मुख्य रेल दुरुस्ती खात्यात, माझ्या स्वतःच्या धंद्यात काम करायला मला सर्वांत जास्त आवडेल. माझ्या डोक्यात काहीतरी दोष निर्माण झालाय असं वाटतं. लष्करी सेवेला मी कुचकामी आहे असं वैद्यकीय आयोगानं मला सांगितलं. पण हे काम तर युद्धआघाडी-पेक्षा वाईट आहे. सुतीरच्या टोळीचा निकाल लावण्याच्या गडबडीत आपण जे दोन दिवस घालवले, त्यात माझा पुरता खिमा झाला. ह्या सगळ्या गोळीबारापासून मला विश्रांती हवीय. पयोदर, मला माझ्या पायांवर धड उभं राहवत नाहीय, अशा अवस्थेत माझा तुम्हाला फारसा उपयोग होणार नाही."

झुखरायनी चिंतायुक्त नजरेने पावेलचा चेहरा न्याहाळला.

"खरंच, तुझी प्रकृती चांगली दिसत नाही. हा सगळा माझाच दोष. यापूर्वी केव्हाच मी तुला जाऊ द्यायला पाहिजे होतं. पण मी एवढा कामात गुरफटलोय, की तुझ्याकडं माझं लक्षच राहिलं नाही."

या संभाषणानंतर थोड्याच काळात पावेल कम्सामोलच्या प्रादेशिक समितीच्या कचेरीत स्वतः हजर झाला. समितीच्या सेवेसाठी त्याचा उपयोग करून घ्यावा असे शिफारसपत्र बरोबर घेऊन तो आला होता. नाकावर पुढे टोपी सरकवून तेथे बसलेल्या एका चोंबड्या पोरगेल्याशा तरुणाने त्या कागदावरून झर्रकन नजर फिरवली आणि पावेलला डोळा घालीत तो म्हणाला :

"अस्सं! चेकामधून आला का? मोठी मस्त संघटना आहे बेटी! आम्ही तुला आत्ता एका मिनिटात काम देऊ. आम्हाला माणसं हवीच आहेत. तुला कुठं काम करायला

आवडेल? कोठीखान्यात? नको? ठीक आहे. खाली गोडीवर आंदोलन विभागात? नको? हे मात्र ठीक नाही. छान साजुक काम आहे. खास शिधाही मिळतो..."

पावेलने त्याचे बोलणे मध्येच अडवले.

"मला रेल्वे दुरुस्ती विभागात जायला आवडेल," तो म्हणाला. तो पोरगा तोंड वासून बघतच राहिला. "पण... तिथं आम्हाला कुणाची गरज आहे असं वाटत नाही. उस्तिनोविचकडं जा. ती तिला कुठंतरी चिकटवून देईल."

काळयाभोर डोळयांच्या त्या मुलीबरोबर छोटीशी मुलाखत आटपल्यानंतर असे ठरले की, आपला नेहमीचा व्यवसाय करून, रेल्वे दुरुस्ती विभागातल्या कम्सामोल संघटनेचा चिटणीस म्हणून पावेलने काम करावे.

दरम्यान क्रिमियाच्या प्रवेशद्वारांच्या संरक्षणाची डागडुजी करण्यात श्वेतरक्षक गुंतले होते. क्रिमियाचे तातार आणि झापोरोझ्ये कझाकांच्या वसाहती यांच्यादरम्यानची सीमा पूर्वी ह्या जमिनीच्या अरुंद पट्ट्यावर होती, तेथे आता पेरेकोपची अत्याधुनिक तटबंदी उभी होती.

आणि क्रिमियात ह्या पेरेकोपच्या मागे, देशाच्या सर्व भागातून हाकलून लावलेले जुने बुडालेले जग एकत्र जमले होते. या जगाला तिथे सुरक्षित वाटत होते, मदिरेच्या मैफलीं-मध्ये धुंद झाले होते.

शरदातील एका थंड ओलसर रात्री, कष्टकरी जनतेच्या हजारो सुपुत्रांनी सिवाशच्या बर्फाळ पाण्यात उड्या घेतल्या व अंधारात उपसागर पार करून गढीत बसलेल्या शत्रूवर पाठीमागून हल्ला चढविण्याचे ठरविले. त्या हजारो लोकांमध्ये

इवान झार्कीय याचा समावेश होता. मशिनगन पाण्यात ओली होऊ नये म्हणून तिला आपल्या डोक्यावर धरून पाण्यातून तो वाट काढीत होता.

आणि पहाटे जेव्हा पेरेकोपच्या पुढील तटबंदीवर हल्ला झाला आणि तुंबळ लढाई माजली, तेव्हा सिवाश पार केलेल्या लोकांच्या पहिल्या तुकड्या लितोवस्की द्वीपकल्पाच्या किनाऱ्यांवर चढून श्वेतरक्षकांवर पिछाडीकडून हल्ले चढवू लागल्या होते. आणि त्या खडकाळ किनाऱ्यावर इवान झार्कीयने सर्वांत प्रथम पाय ठेवला.

अभूतपूर्व लढाई जुंपली. पाण्यातून वर येणाऱ्या लाल सैनिकांवर श्वेतरक्षकांचे घोडदळ जंगली श्वापदांप्रमाणे तुटून पडले. झार्कीयची मशिनगन जणू मृत्यूचा सडा शिंपत होती. तिच्यामधून अखंड गोळ्या सुसाटत होत्या, अचूक निशाण टिपत होत्या. त्या शिशाच्या झोतामध्ये माणसांचे आणि घोड्यांचे ढीग मरून पडत होते. विलक्षण वेगाने झार्कीयने मशिनगनला काडतुसांची नवी तबकडी बसवली.

शेकडो तोफांच्या मुखातून पेरेकोप उलट गर्जना करीत होते. जमिनीला जणू अथांग विवर पडले होते, हजारो तोफगोळे यमदूतांच्या रूपाने कोसळत होते, सणाणत, कर्कश्यपणे आवाज करीत आकाश फाडत त्यांचे स्फोट धडाडत होते, असंख्य कपचे दूरपर्यंत आणि विस्तृत प्रदेशात उधळत होते. विवर्ण आणि छिन्नभिन्न जमिनीतून काळ्या धुराचे लोट उसळत होते व त्यांनी सूर्याला झाकून टाकले होते.

राक्षसाचा मस्तकभेद झाला आणि अखेरचा मर्माघाती प्रहार करण्यासाठी पहिल्या घोडदळ सेनेचा लाल महापूर क्रिमियामध्ये वाहू लागला. भीतीने धाबे दणाणलेले श्वेतरक्षक,

बंदर सोडून जाणाऱ्या बोटींच्या दिशेने जीव वाचविण्यासाठी सैरावैरा धावत सुटले.

अनेक लाल सैनिकांच्या विटक्या शर्टांवर लाल ध्वजेच्या किताबाचा सोनेरी बिल्ला प्रजासत्ताकामार्फत लावण्यात आला. कम्सामोलचा मशिनगनवाला इवान झार्कीय याचा त्या मानकऱ्यां-मध्ये समावेश होता.

पोलिश सैन्याबरोबर शांततेचा तह झाला आणि झुखराय यांच्या भाकितानुसार, शेपेतोवका गांव सोविएत युक्रेनमध्ये राहिले. गांवापासून दूर पस्तीस किलोमीटरवरची नदी आता नवी सीमा ठरली.

१९२०च्या डिसेंबरातील एका अविस्मरणीय सकाळी पावेल आपल्या जन्मगांवी परतला.

हिमभरल्या फलाटावर त्याने पाय टेकवले, शेपेतोवका-१ ह्या पाटीवरून एका नजर फिरवली आणि डावीकडे वळून सरळ रेल्वेयार्डात जाऊन आर्त्योमची चौकशी केली. पण त्याचा भाऊ तेथे नव्हता. अंगातला लष्करी कोट घट्ट आवळून धरीत राईमधून वाट काढीत पावेल गांवाकडे निघाला.

दारावर जेव्हा टकटक ऐकू आली तेव्हा मरीया याकोवलेवना मागे वळली व म्हणाली, "या, आत या." हिमाने माखलेली एक आकृती घरात घुसली आणि आपल्या मुलाचा लाडका चेहरा तिच्या दृष्टीस पडला. चटकन तिचा हात आपल्या काळजावर गेला आणि अतिआनंदापायी तिच्या तोंडून शब्दच उमटेनात.

आपल्या मुलाच्या छातीवर ती कोसळली आणि त्याच्या चेहऱ्याची असंख्य चुंबने घेऊन तिने त्याला गुदमरून टाकले.

तिच्या गालांवरून आनंदाच्या आसवांच्या धारा वाहू लागल्या. तिच्या छोटचा, कृश देहाला पावेलने घट्ट कवटाळले.

तिच्या शिणलेल्या चेहऱ्यावर वेदना आणि चिंता यांच्यामुळे दाट रेषांचे जाळे उमटले होते, त्याच्याकडे मूकपणे पावेल पह्यात राहिला. ती शांत होईपर्यंत काहीही न बोलता तो मुकाट राहिला.

अनंत यातना सोसलेल्या ह्या स्त्रीच्या डोळयात पुन्हा एकदा आनंदाचा प्रकाश चमकला. ह्या मुलाला आपण पुन्हा केव्हा पाहू शकू अशी आशाच खरे म्हणजे तिच्या मनातून मावळून गेली होती. त्यामुळे त्याच्या चेहऱ्याकडे कितीही एकटक पाहिले तरी तिचे समाधान होत नव्हते. त्यानंतर तीन दिवसांनी, बऱ्याच उशिरा रात्रीच्या वेळी जेव्हा खांद्यावर हत्यारांची पिशवी लटकावून आर्त्योमही घरातल्या छोटचा खोलीत घुसला, तेव्हा मात्र तिच्या आनंदाला पारावार राहिला नाही.

आता कोर्चागिन कुटुंबाचे पुनर्मीलन झाले होते. दोघे भाऊ मृत्युच्या जबडचातून सुटून आले होते. अनेक दिव्यांमधून आणि कसोटचांमधून पार पडल्यानंतर त्यांची पुन्हा गाठ पडली होती.

"आता काय करायचा तुमचा विचार आहे रे पोरांनो?" आईने विचारले.

"आई, मी परत दुरुस्ती विभागात कामाला जाणार!" आनंदी सुरात आर्त्योम उत्तरला.

पावेल दोन आठवडे घरी राहिला आणि नंतर कीव्हला परत गेला. तिथे त्याचे काम त्याची वाट पहात होते.

वाचकांना विनंती

'प्रगती प्रकाशना'ला या पुस्तकाच्या अनुवादाबाबत व रचनेबाबत आपले मत जाणून घ्यायला आनंद वाटेल. आपल्या इतर सूचनांचाही अवश्य विचार केला जाईल. कृपया पुढील पत्त्यावर पत्रव्यवहार करा:

प्रगती प्रकाशन
१७, झुबोव्स्की बुलेवार्द,
मॉस्को, सोविएत संघ.

Н. Островский

КАК ЗАКАЛЯЛАСЬ СТАЛЬ

Кн. I

На языке маратхи

Перевод сделан по книге:

Н. Островский «Как закалялась сталь»,
издательство «Прогресс», 1975.

"जीवन ही माणसाची सर्वांत मौल्यवान ठेव आहे," निकोलाय अस्त्रोवस्कींनी लिहिले होते. "त्याला ते एकदाच लाभते आणि त्याने ते असे जगले पाहिजे, की वर्षे वाया घालविल्याबद्दल त्याला खंतीच्या भावनांनी छळू नये, क्षुद्र आणि अतिसामान्य भूतकाळाच्या जळत्या शरमेची त्याला कधी अनुभूती घडू नय. असे जगावे की मरतेवेळी त्याला म्हणता यावे: सबंध आयुष्यभर मी माझ्या सर्व शक्ती सगळ्या जगाच्या सर्वोत्तम कार्यासाठी कारणी लावल्या – मानवजातीच्या मुक्तीच्या लढ्यासाठी!"